# महानगरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती सभा इतिवृत्त

## दिनांक १७-१-१९९७ ते २९-३-१९९७

## रजिष्टर क्र. ५

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक १७-१-१९९७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**शुक्रवार दि. १७ जानेवारी १९९७ रोजी दुपारी ३.१५ वाजता मा. स्थायी समिती सभेस मा. श्री. गिरजाराम हाळनोर यांचे अध्यक्षतेखाली सुरुवात झाली. या सभेस कार्यालयीन सदस्य उपस्थित होते.**

१) स.श्री. कवंरसिंग बैनाडे
२) स.श्री. गौतम खरात
३) स.श्री. रशिदखान (मामु)
४) स.श्री. अभिमन्यु भालेराव
५) स.श्री. सुभाष टाकळकर
६) स.सौ. रंजनी जोशी

**संवाद**

**मा. सभापती :** आजच्या सभेस उपस्थित सहकारी सन्मानिय सदस्य, अधिकारी वर्ग पत्रकार बंधुचे प्रथमतः स्वागत.

**श्री. रशिद खान (मामु) :** मा. सभापती साहेब, मुबंई येथे जेष्ठ कामागार नेते श्री. दत्ता सामंत यांच्यावर भ्याड हल्ला करुन त्यांची हत्या करण्यांत आलेली आहे. या सभागृहातर्फे प्रथमतः त्यांना श्रध्दाजंली अर्पण करण्यांत यावी. तसेच या भ्याड हल्ल्याचा निषेधाची ठराव करुन मा. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना ठरावाची प्रत पाठविण्यात यावी.

**श्री. गौतम खरात :** मा. सभापती साहेब तसेच या ठरावाची प्रत केंद्रीय गृहमंत्री यांनाही पाठविण्यांत यावी.

**मा. सभापती :** आजच्या सभेमध्ये आचार संहिता सुरु असल्या कारणाने अशा प्रकारचा ठराव करुन शासनास पाठविता येईल किंवा काय? याबाबत कायदेशीर बाजु तपासुन बघावी लागेल. तथापी कै. दत्ता सांमत यांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली अर्पण करुया.
(सभागृहातर्फे कै. दत्ता सांमत यांना दोन मिनिटे स्तब्धता पाळुन श्रध्दांजली अर्पण करण्यांत आली.)

**मा. सभापती** : जिल्हा परिषद/पंचायत समितीच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहिर झालेला असल्यामुळे आचार संहितेचा अंमल सुरु आहे. करिता आजच्या सभेमध्ये चर्चा करता येणार नाही. किंवा कोणत्याही धोरणात्मक निर्णय घेता येणार नाही, असे नगरसचिव यांनी कळविले आहे.

**श्री. रशिद (मामु)** : मा. सभापती साहेब आचार संहिता जरी सुरु असली तरी नागरिकांच्या जिवनाशी निगडीत प्रश्नावर चर्चा करण्यांस काय हरकत आहे. पाणी पुरवठयाचा प्रश्न सध्या आहे. तीन दिवस शहराला पाणी पुरवठा होणार नाही यावर चर्चा करण्यास काय हरकत आहे?

**मा. सभापती** : सध्या हे प्रकरण कोर्टापुढे आहे या प्रकारणी मा. उच्च न्यायालयाकडुन निकाल अपेक्षित आहे.

**श्री. रशिद खान (मामु)** : मा. सभापती साहेब आपण पाण्याचे टँकरव्दारे पुरवठा करण्याबाबत चर्चा करु शकतो की नाही ते उप आयुक्तांना सांगु घ्यावे या बाबत आपण कोर्टापुढेही सांगु शकतो पोलिओ निर्मुलन या राष्ट्रीय कार्यक्रमा विषयी चर्चा करावयाची आहे.

**मा. सभापती** : सोमवार काही जास्त दुर नाही. त्यामुळे सोमवार पर्यंत थांबण्यास काही हरकत नाही. करिता मा. उच्च न्यालयाच्या आदेशापर्यंत आजची सभा तहकुब करण्यांत येते.

"जन गण मन" या राष्ट्रगिता नंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले. (वेळ अंदाजे ३.३० वाजता)

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरी/-
सभापती स्थायी समिती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक २९-१-१९९७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचा इतिवृत्त.**

**सभेची सुरुवात "वदे मातरम्" गिताने अंदाजे ३.३० वाजता झाली अधिकाऱ्यांसह खालील स. सदस्य उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स.श्री. गिरजाराम हाळनोर | अध्यक्ष |
| २) | स.श्री. गौतम भागाजी खरात | सदस्य |
| ३) | स.सौ. रंजनी जोशी | --//-- |
| ४) | स.श्री. डॉ. भागवत कराड | --//-- |
| ५) | स.श्री. कंवरसिंग बैनाडे | --//-- |
| ६) | स.कु. माया लाडवाणी | --//-- |
| ७) | स.श्री. विजयकुमार मेहेर | --//-- |
| ८) | स.श्री. महादेव सुर्यवंशी | --//-- |
| ९) | स.श्री. हमीदउद्यीन ताबा | --//-- |
| १०) | स.श्री. सुभाष टाकळकर | --//-- |
| ११) | स.श्री. भगवान घडमोडे | --//-- |
| १२) | स.श्री. त्रिबंक तुपे | --//-- |
| १३) | स.श्री. अभिमन्यु भालेराव | --//-- |
| १४) | स.श्री. अ.रशिद खान (मामु) | --//-- |

**संवाद**

**मा. सभापती :** सध्या जिल्हा परिषदा व महानगरपालिकेच्या निवडणुका असल्या कारण्याने आचारसंहिता सर्वत्र लागु आले त्यामुळे आपल्याला कोणत्याही प्रकारच्या बैठका घेण्यास शासनाच्या धोरणाने आचार संहिते अन्वये शक्य नाही. त्याकरिता मा. उच्च न्यायालयात या बाबत रिट दाखल केलेली होती की, महापालिकेचे विकासात्मक कामे त्यामुळे खोंळबतीत यासाठी विकास कामे करण्यास आम्हाला बैठकाची परवानगी द्यावी. त्याअनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने काही अटी टाकुन परवानगी दिलेली आहे. या ठिकाणी स्थायी समिती सभेतील ठराव पारित झाल्यानंतर मा. आयुक्त झालेल्या ठरावाची माहिती देतील कृपा करुन या सभेतील ठरावा बाबत कुणीही बाहेर वाच्यता करुन नये. गुप्तता ठेवावी व महापालिकेला सहकार्य करावे ही विनंती.

**श्री. अ. रशिदखान (मामु)** : मा. उच्च न्यायालयातुन अशा प्रकारची रिट यांचिका दाखल करुन आपण महापालिकेच्या विकासात्मक कामाबाबत सहानुभुती दाखवुन एक प्रकारचा विजय संपादन केला. त्याबद्दल मा. अभिनंदन करण्यांत येते.

**श्री. हमीदखान ताबा** : खरोखरच अभिमानास्पद बाब महापालिकेच्या दृष्टीने आहे.

**श्री. गौतम खरात** : दि. २७-१-९७ रोजी बुध्दवासी अविनाश साळवे यांचा एका स. सदस्यांनी दिवसाढवळया वार करुन खुन केला त्यामुळे संपुर्ण शहरवासीयांना वातावरणाच्या गढुळपणाने त्रास झाला व एका निरपराध व्यक्तीचा खुन झाल्याने त्यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली वाहण्यात आली.

**मा. सभापती :** सभागृहात ००.०२ मिनिटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली वाहण्यात यावी.

( सभागृहात ००.०२ मिनिटे स्तब्ध उभे राहुन बुध्दवासी अविनाश साळवे यास श्रध्दांजली वाहण्यांत आली.)

**श्री. हमीद उद्दीन ताबा** : मागिल इतिवृत्तांत सुचित केल्या प्रमाणे नविन शिक्षक भरती प्रकरणातील शिक्षकांना त्यावेळेस पासुनचा पगार देणेची कार्यवाही झालेली नाही.

**मा. सभापती** : संबंधीत बाबत मागिल सभेत चर्चा होऊन निर्णय झालेल्या होता तथापि इतिवृत्त कायम न झाल्याने कार्यवाही झालेली नाही. तेव्हा आजच्या सभेत सदरील इतिवृत्त कायम झाल्यानंतर सचिवांनी याबाबत इतिवृत्त कायम झाल्याचे पत्र प्रशासनाला दिल्यानंतर प्रशासनाने याबाबत पुढील महिन्यापासुन संबंधीत नविन शिक्षकांना पगार केव्हापासुन देय नाही. त्यावेळेपासुन देण्याबाबत कार्यवाही करेल.

**श्री. अ. रशिद खान (मामु)** : सचिवांनी याबाबत त्वरीत कार्यवाही करावी.

**मा. सभापती** : संचिवांनी याबाबत आजच कार्यवाही करावी. आता विषय पत्रिकेवरच चर्चा करण्यास हरकत नाही.

**विषय क्र. ५८४/१ :**

दि. ७-१-९७ व १७-१-९७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद**

**मा. सभापती** : १) इतिवृत्तातील पान क्र. २६ मध्ये विषय क्र. ५४६/१७ यास स्थळपाहणीसाठी ठेवले होते त्यांस मंजुरी देण्यांत येत आहे.

२) पान क्र. ३८ विषय क्र. ५६६/५ हा विषय स्थळ पाहणीसाठी होता त्यांस मंजुरी देण्यांत येते.

**श्री. हमीद उद्दीन ताबा** : जकात नाक्यांवरील निलंबन कर्मचाऱ्यां पैकी काहींना कामावर घेतले तर काहीना कामावर घेतले नाही.

**उप आयुक्त-१** : सर्वाना कामावर घेतलेले आहे.

**श्री. हमीद उद्दीन ताबा** : शहरातील विटभट्टयांची माहिती सभागृहात देणे बाबत सांगितले होते. त्याबाबत काय कार्यवाही झाली.

**मा. सभापती :** प्रशासकीय विभागाचा प्रस्ताव सभे समोर आलेला आहे. याबाबत पुढील बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात येईल. अनधिकृत विटभट्टया बाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

१) दि. ७-१-९७ व १७-१-९७ ची तहकुब सभेच्या इतिवृत्तास कायम करण्यात येते.

विषय क्र. - दि. १७-१-९७ ची विषय पत्रिका

**मा. सभापती** : मंजुर

**ठराव :**

१) इतिवृत्तातील पृष्ठ क्र. २६ मधील विषय क्र. ५४६/१७ व पृष्ठ क्र. ३८ विषय क्र. ५६६/५ स्थळपाहणी करिता ठेवावयास सांगितले होते सदरील दोन्हीही प्रस्ताव मंजुर करण्यात येते.

२) तसेच दि. ७-१-९७ चे व दि. १७-१-९७ चे इविवृत्त दुरुस्तीसह कायम करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८५/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मी पुष्पक गार्डन (चिकलठाणा) वार्ड क्र. ८१ येथे डांबरी रस्ते तयार करणेच्या कामाकरिता र.रु. २,८१,०००/- चे अंदाजपत्रक सां.बा. विभाग औरंगाबाद यांची दरसुची ९५-९६ नुसार तयार करण्यांत आले असुन मा. आयुक्त यांनी दि. २३-११-९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

करिता सदरील काम १८ खेडी विकास योजने अंतर्गत अर्थसंकल्प ९६-९७ या लेखा शिर्षाखाली ३०० लाखाची तरतुद करण्यांत आलेली आहे.

करिता सदरील अंदाजपत्रक मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चिकलठाणा (पुष्पक गार्डन) वार्ड क्र. ८१ येथे डांबरी रस्ते तयार करणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु. २,८१,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "१८ खेडी विकास योजने अंतर्गत अर्थसंकल्प ९६-९७ या लेखा शिर्षाखालील तरतुदीतुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८६/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. चिकलठाणा (कामगार कॉलनी) वार्ड क्र. ८१ येथे नविन गटारी बांधणे व अस्तित्वात असलेल्या गटारी दुरुस्त करणे कामाकरिता र.रु. ४,९८,९८०/- चे अंदाजपत्रक सां.बा. विभाग औरंगाबाद यांची दरसुची ९५-९६ नुसार तयार करण्यांत आले असुन मा. आयुक्त यांनी दि. ६-१-९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

सदर काम १८ खेडी विकास कार्यक्रम अंतर्गत करण्याचे प्रस्तावित आहे. करिता मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चिकलठाणा कामागार कॉलनी वार्ड क्र. ८१ येथे नविन गटारी बांधणे व अस्तित्वात असलेल्या गटारी दुरुस्त करणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रु. ४,९८,९८०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाचा खर्च "१८ खेडी विकास कार्यक्रम" अंतर्गत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८७/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, छावणी येथे व्यायाम शाळा इमारत बांधणे बाबत सदर कामाचे अंदाजपत्रक सन ९५-९६ च्या सां.बा. विभागाच्या दरसुची अन्वये र.रु. ५,००,०००/- (पाचलाख) अंदाजपत्रक तयार करण्यांत आले त्यास मा. आयुक्त यांची मंजुरी प्राप्त झालेली आहे. या अनुषंगाने बी-१ नमुन्यात लघुनिविदा मागविण्यांकरिता दै. वत्रमानपत्रात प्रसिध्द केले. त्याव्दारे एकुण १४ कोरे निविदा विकले गेले व

स्विकारण्याच्या तारखेपर्यंत दर भरुन सिलबंद पाकिटात एकुण (३) निविदा प्राप्त झाली. त्या निविदा दि. ३०-१२-९६ रोजी लेखाधिकारी-१ यांच्या दालनात उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आले. त्यात दिलेले दराचे तपशिल खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. काझीनुर मोहियोद्दीन | ०.००१% | अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दर |
| २. | श्री. एस.एम. मंडारे | ७% | --//-- |
| ३. | श्री. ए.एम. फारुकी | ८% | --//-- |

सदरील निविदा पत्रकात सर्वात कमी तुलनात्मकदृष्टया श्री. काझीनुर मोहियोद्दीन गुत्तेदार यांचे ०.००१% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराचे दर आहे.

सदर खर्च स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत (आमदार फंडातुन) करावयाचा आहे व या निधीतुन व्यायाम शाळा इमारत मनपा औरंगाबाद यांनी बांधुन दयावे असे नमुद केले आहे. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

सदर प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवण्यात येतो.

**विषय क्र. ५८८/५ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जहागिरदार कॉलनी येथे अर्धगोलाकार पुर्वरचित आर.सी.सी. बांधणे बाबत अंदाजपत्रक र.रु. २,०९,५००/- यास ठराव क्र. ४१७/१२ दि. ८-११-९६ व्दारे मान्यता मिळाली आहे त्यानंतर निविदा सुचना प्रसिध्द करुन संबंधीत कामाच्या निविदा मागविल्या असता एकुण सोळा निविदा विक्री झाल्या. होत्या त्यापैकी दर भरलेल्या एकुण चार निविदा प्राप्त झाल्या असुन खालील प्रमाणे दर दर्शविले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. शेख मसुद | अंदाजपत्रकीय दरापेक्षा | ६% जास्त |
| २. | श्री. डी.सी. पंजाबी | --//-- | ७% जास्त |
| ३. | श्री. ए.एम. फारुकी | --//-- | १०% जास्त |
| ४. | श्री. अशोक जाधव | --//-- | ०.३०% कमी |

तुलनात्मकदृष्टया अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ०.३०% कमी दराची श्री. अशोक जाधव ठेकेदाराची निविदा आहे. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जहागिरदार कॉलनी येथे अर्धगोलाकार पुर्वरचित आर.सी.सी. गटार बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.३०% कमी दराची श्री. अशोक जाधव यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५८९/६ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. जुना बाजार मेन रोड वरील देना बँक पासुन बी.एम.सी. बॅक पर्यंतची अस्तित्वात असलेली नादुरुस्त सरफेस गटार तोडुन नविन ४५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. अर्धगोल्लागार गटार बनविण्याच्या कामाकरिता अंदाजपत्रकीय र.रु ३,८१,८००/- ला स्थायी समितीने दि. ९-१०-९६ च्या सभेत ३४२/११ ने संमत झाला होता. सदरील कामाची निविदा

सुचना क्र. लेखा/नि/१२१/९६ दि. १८-११-९६ अन्वये वर्तमानपत्रात जाहिरात देऊन बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकुण (११) अकरा निविदा विक्री झाल्या व त्यापैकी (६) सहा निविदा प्राप्त झाल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. आर.बी. चव्हाण | २६% | अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराने |
| २. | श्री. राजा कन्ट्रक्शन | २५% | --//-- |
| ३. | श्री. एस.एम. मंडोरे | १८.१०% | --//-- |
| ४. | श्री. मे. एस.एच. असोशिएट | ९% | --//-- |
| ५. | श्री. सलीम पटेल | ४.९९% | --//-- |
| ६. | श्री. अब्दुल सलाम | २.३% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा २६% कमी दराची श्री. आर.बी. चव्हाण यांची आहे.

सदरील निविदेस मा. आयुक्तांनी दि. ४-१-९७ ला प्रशासकीय मंजुरी दिली आहे.

तरी श्री. आर.बी. चव्हाण यांची २६% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराची निविदा विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जुना बाजार मेन रोडवरील देना बॅक पासुन बी.एन.सी. बॅक पर्यंतची अस्तित्वास असलेली नादुरुस्त सरफेस गटार तोडुन नविन ४५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. अर्धगोलाकार गटार बनविणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६% कमी दराची श्री. आर.बी. चव्हाण यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## पुरवणी विषय पत्रिका

**विषय क्र. ५९०/१ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. देवडी बाजार येथील नाल्यास संरक्षित भिंत बाधणेच्या कामाकरिता अंदाजपत्रकीय र.रु १३,२७,०००/- च्या कामाकरिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेमध्ये प्रस्ताव क्र. ८२/३ दि. २०-९-९६ ला मंजुर होवुन सदरील कामाची निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/१२१/०६ दि. १८-११-९६ अन्वये वर्तमान पत्रात बी-१ नमुन्यात जाहिरात देवुन निविदा मागविल्या असता एकुण १६ निविदा विक्री झाल्या व त्यापैकी २ निविदा प्राप्त झाल्या त्याचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | मे. बसरा कन्स्ट्रक्शन | ७.५०-% | अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराने |
| २. | श्री. अ. सलीम | १२% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे अ.प. दरापेक्षा ७.५०% जास्तीच्या दराने मे. बसरा कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे परंतु सदरील दर जास्तीच्या दरात असल्याने मा. आयुक्तांनी त्यांना चर्चेस बोलविले असता त्यांनी सदरील काम अंदाज पत्रकीय दराने करण्यांस संमती दर्शविली असुन मा. आयुक्तांनी दि. ८-१-९७ ला प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.

तरी मे. बसरा कन्स्ट्रक्शन यांच्याकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्याच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे देवडी बाजार येथील नाल्यास संरक्षित भिंत बांधणे च्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची मे. बसरा कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९१/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. जरीपुरा,गांधीनगर स्लम येथील डांबरीकरण करणे बाबत कामकरिता सा.बा. खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुचीनुसार रु. २,३०,७१५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील काम ५% कमकुवत घटक कल्याण योजना या शिर्षातुन करण्यांत येईल सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. ४-१-९७ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदरील कामाकरिता तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक रु. २,३०,७१५/- यासं मान्यतेचा तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जरीपुरा,गांधीनगर स्लम येथील डांबरीकरण करणेच्या कामकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. २,३०,७१५/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम "५% कमकुवत घटक कल्याण योजना" या शिर्षकातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९२/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. किराडपुरा स्लम येथे डांबरीकरण करणे बाबत कामाकरिता सां.बा. खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुचीनुसार रु. ४,५३,८३१/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील काम "डांबरीकरण रस्ते" या शिर्षकातुन करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त दि. ४-१-९७ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदरील कामाकरिता तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक रु. ४,५३,८३१/- यासं मान्यतेचा तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, किराडपुरा स्लम येथे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु. ४,५३,८३१/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च डांबरी रस्ते" या शिर्षकातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९३/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. हर्षनगर स्लम येथील गटारीवर एस.एफ.आर.सी.ठापे टाकणे व गटारीची दुरुस्ती करणे बाबत कामाकरिता सां.बा. खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुचीनुसार रु. ३,४८,८६७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील काम "खुली गटार" या शिर्षकातुन करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दि. ४-१-९७ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदरील कामाकरिता तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक रु. ३,४८,८६७/- यासं मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हर्षनगर स्लम येथील गटारीवर एस.एफ.आर.सी.ठापे टाकणे व गटारीची दुरुस्ती करणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. ३,४८,८६७/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च "खुली गटार" या शिर्षकातुन करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९४/५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. गणेश कॉलनी येथे वाचनालय इमारत बांधणेच्या कामासाठी सां.बा. खात्याचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसुचीनुसार रु. ३,००,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवण्यासाठी मा. आयुक्तांनी दि. १३-१२-९६ अन्वये शिफारस केलेली आहे. सबब सदर कामाचे र.रु. ३,००,५००/- चे अंदाजपत्रक मंजुरी प्रस्ताव विचारार्थ सादर.

सदरचा खर्च सन ९६-९७ या वर्षात इतर वाचनालय या लेखा शिर्षामधुन करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गणेश कॉलनी येथे वाचनालय इमारत बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु. ३,००,५००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च इतर वाचनालयात या लेखा शिर्षातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र. ५९५/६ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शहानुरवाडी येथील स.न.३७ मधील मंजुर रेखांकना मध्ये १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहीनी टाकावयाची आहे. त्यासाठी अभियांत्रिकी विभागाची सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार र.रु. ३,२२,८६०/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदर कामाचा खर्च भांडवली कामाची तरतुदीमधुन करण्यांत येणार आहे. तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहानुरवाडी येथील स.न.३७ मधील मंजुर रेखांकना मध्ये १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहीनी टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु. ३,२२,८६०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च "भांडवली कामाच्या" तरतुदीमधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९६/७ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, चिंतामणी कॉलनी (पार्श्वनाथ हौ.सो.) येथे १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहीनी टाकावयाची आहे.

त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९५-९६ च्या दर सुचीनुसार र.रु. १,३२,१४०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदर कामाचा खर्च भांडवली तरतुद मधुन करण्यांत येणार आहे. तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चितांमणी कॉलनी (पार्श्वनाथ हौ.सो.) येथे १०० व १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहीनी टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रुपये १,३२,१४०/- च्या "भांडवली तरतुदीतुन" करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९७/८ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पदमपुरा मोचीवाडा भागात २५०/३०० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. जलनि:सारण वाहिनी टाकणे बाबत परिसर अभियात्रिकी विभागाच्या सन ९५-९६ च्या दर सुची प्रमाणे अंदाजपत्रक रक्कम रु. ३,६६,०००/- चे तयार करण्यांत आले आहे. सदरील खर्च जलनि:सारण भांडवली या शिर्षकाखाली करण्यात येईल.

तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पदमपुरा मोचीवाडा भागात २५०/३०० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. जलनि:सारण वाहिनी टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र. रु. ३,६६,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च "जलनि:सारण भांडवली" हया शिर्षकाखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९८/९ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, इटखेडा येथे जलनि:सारण वाहिनी टाकुन सेप्टीक टॅब बांधणे बाबत परिसर अभियात्रिकी विभागाच्या दरसुची सन ९५-९६ प्रमाणे अंदाजपत्रक रक्कम रु. १,५०,३००/- चे तयार करण्यांत आले आहे. सदरील खर्च झोपडपट्टी सुधारणा आर्थिक शिर्षका अंतर्गत करण्यात येईल.

तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इटखेडा येथे जलनि:सारण वाहिनी टाकुन सेप्टीक टॅक बांधणेच्या कामकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,५०,३००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च झोपडपट्टी सुधारणा या शिर्षकांतर्गत करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९९/१० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, दिल्लीगेट येथे मनपा निवासस्थान बांधणेच्या कामासाठी सा.बा. खात्याचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसुचीनुसार र. रु. ४,९०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन मा. आयुक्तांनी दि. ९-१-९७

अन्वये मंजुरी दिलेली आहे. सबब सदर कामाचे र.रु. ४,९०,०००/- अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

सदरचा खर्च व्यापारी संकुल व इतर इमारती या लेखा शिर्षामधुन सन ९६-९७ या वर्षात करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिल्लीगेट येथे मनपा निवासस्थान बांधणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रु. ४,९०,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च "व्यापारीसंकुल व इतर इमारती" लेखा शिर्षातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६००/११ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. घाटी जयभिमनगर स्लम येथे ८० मी.मी. व्यासाची सी.आय.जल वाहिनी टाकणे बाबत कामाकरिता सा.बा. खाते यांच्या वर्ष ९६-९७ च्या दरसुचीनुसार र. रु. १,१३,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे. सदरील काम "म्हाडा फंड" या शिर्षकातुन करण्यांत येईल सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दि. १७-१२-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी. सदरील कामासाठी तयार करण्यांत आलेले रु. १,१३,०००/- चे अंदाजपत्रक मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, घाटी जयभिमनगर स्लम येथे ८० मी.मी. व्यासाची सी.आय.जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. १,१३,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च "म्हाडा फंड" या शिर्षकातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०१/१२ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, झोन क्र. ४ अतंर्गत जलनि:सारण वाहीनीची देखभाल व दुरुस्ती (भाग-२) कामे करणेस्तव अंदाजपत्रक र. रु. २,१०,०००/- यांस विषय क्र. ३८१/१ दि. ८-११-९६ व्दारे मान्यता मिळाल्या असता एकुण पाच निविदा विक्री झाल्या होत्या त्यापैकी तीन निविदा प्राप्त झाल्या असुन खालील प्रमाणे दर दर्शविलेले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. राजसिंग कौशल | अ.प.दरापेक्षा | १४.९०% कमी |
| २. | श्री. शेख सलीम अहमद | --//-- | ९.९९% --//-- |
| ३. | श्री. डी.सी.पंजाबी | --//-- | ७.३% --//-- |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १४.९०% कमी दराचे श्री. राजासिंग कौशल यांचे दरपत्रक आहे.

तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र. ४ अतंर्गत जलनि:सारण वाहीनीची देखभाल व दुरुस्ती करणे (भाग-२) कामे करणेस्तव प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात

कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.९०% कमी दराची श्री. राजासिंग कौशल यांचे निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०२/१३ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, झोन क्र. ४ अतंर्गत जलनिःसारण वाहीनीची देखभाल व दुरुस्ती (भाग-३) बाबत अंदाजपत्रक रक्कम रु. २,२०,०००/- यांस विषय क्र. ४१९/१४ दि. ८-११-९६ व्दारे मान्यता मिळाल्यावर निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविल्या असता एकुण आठ निविदा विक्री झाल्या होत्या त्यापैकी दोन निविदा प्राप्त झाल्या असुन निविदा विक्री झाल्या असुन सदरील प्रमाणे. दर दर्शविलेले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. राजसिंग कौशल | अ.प.दरापेक्षा | १३.९०% कमी |
| २. | श्री. शेख सलीम अहमद | --//-- | १०.११% --//-- |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १३.९०% कमी दराचे श्री. राजासिंग यांचे दरपत्रक आहे. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र. ४ अतंर्गत जलनिःसारण वाहीनीची देखभाल व दुरुस्ती (भाग-३) बाबतच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.९०% कमी दराची श्री. राजासिंग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०३/१४ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, झोन क्र. ४ अतंर्गत जलनिःसारण वाहीनीची देखभाल व दुरुस्ती (भाग-१) च्या कामासाठी अ.प.रक्कम रु. २,१६,९००/- यांस विषय क्र. ४२०/१५ दि. ८-११-९६ व्दारे मान्यता मिळाल्यावर निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविल्या असता एकुण आठ निविदा विक्री झाल्या होत्या त्यापैकी दोन निविदा प्राप्त झाल्या असुन खालील प्रमाणे दर दर्शविलेले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. शेख. सलीम अहमद | अ.प.दरापेक्षा | ०.०५% कमी |
| २. | श्री. कुलवंतसिंग | --//-- | २% जास्त |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ०.०५% कमी दराची श्री. शेख सलीम अहमद यांचे दरपत्रक आहे. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र. ४ अतंर्गत जलनिःसारण वाहीनीची देखभाल व दुरुस्ती (भाग-१) च्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया कमी व अ.प.दरापेक्षा ०.०५% कमी दराची श्री. शेख सलीम अहमद यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०४/१५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. किराडपुरा स्लम येथे नाल्यास संरक्षित भिंत बाधणेबाबत कामाकरिता सा.बा. खाते याच्या वर्ष ९४-९५ च्या

दरसुचीनुसार रु. १९,२३,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील काम विशेष शासकीय अनुदान १० कोटी या शिर्षकातुन करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. २१-१२-९५ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे. तसच श्री. स. सिराजोद्यीन ठेकेदार यांनी अ.प. दरापेक्षा ८.७०% कमी दराची निविदेस स्थायी समिती विषय क्र. २८ दि. २९-१२-९६ रोजी मंजुरी मिळाली आहे.

परंतु सदरील ठेकेदाराने काम स्पेसिफिकेशन प्रमाणे न केल्यामुळे त्यांना मा. आयुक्त यांची मंजुरी दि. २७-९-९६ नुसार ठेकेदारास काळया यादीत कोणत्याही प्रकारचे काम न देण्याचे ठरविले आहे. त्यानंतर सदरील कामाची फेरनिविदा मागविण्यात आली असता अंतिम तारखे पर्यंत एकुण ७ निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण चार निविदा प्राप्त झाल्या त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. अनुयोग कन्स्ट्रक्शन | २१.१% | कमी |
| २. | श्री. अदिनाथ कन्स्ट्रक्शन | २.५% | --//-- |
| ३. | श्री. न्यु सुपर कन्स्ट्रक्शन | ०.१% | --//-- |
| ४. | श्री. कुलवंतसिंग | १५% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व म्हणजेच अ.प. दरापेक्षा २१.१% कमी दराची श्री. अनुयोग कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. तरी अ.प. दरापेक्षा २१.१% कमी दराची अनुयोग कन्स्ट्रक्शन यांची निविदा मान्यतेचा प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद**

**श्री. महादेव सुर्यवंशी :** या प्रस्तावमध्ये संबंधीत गुत्तेदाराने ८.७०% कमी दराने काम करण्याचे ठरविले आहे. तरी सदरील काम व्यवस्थित होईल काय?

**मा. सभापती :** याबाबत संबंधीत अधिकारी यांनी जवाबदारी घेऊन व्यवस्थित पार पाडावे प्रस्तावास मंजुरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, किराडपुरा स्लम येथे नाल्यास संरक्षित भिंत बाधणेच्या कामाकरिता फेरनिविदा अन्वये प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.१% कमी दराची श्री. अनुयोग कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०५/१६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, क्रांतीचौक राणी लक्ष्मीबाई उद्यानजवळ मनपाचे प्रा.आरोग्य केंद्रासह दुकान क्रेंद्राची तीन मजली इमारत बांधणेसाठी प्रशासकीय ठराव क्र. ७०० दि. ३-१२-९४ अन्वये र.रु. ३१,८८,०००/- चे अंदाजपत्रकास मान्यता मिळालेली आहे. तसेच सदर कामात मुळ कामा व्यतिरिक्त प्राप्त झालेली वाढ र.रु. ६,७०,५९७/- वाढीव सुधारीत अंदाजपत्रक र.रु. ३८,५८,५२७/- ला व सदर काम मुळ एजन्सी कडुन करुन घेण्यास स्थायी समिती ठराव क्र. ९७/४२ दि. १२-७-९६ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे. व त्या नुसार आता पर्यंत संबंधीत गुत्तेदारास र.रु. ४२,२७,२३३/- अदा करण्यांत आलेले आहे.

तदनंतर संबंधीत गुत्तेदाराने "ब-१" निविदेतील अट क्र. ३८ नुसार १२५% पेक्षा जास्त झालेल्या परिणामास १९९५-९६ च्या जिल्हा दर सुची नुसार दर देणेची मागणी

केलेली आहे. "बी-१" निविदेतील अट क्र. ३८ नुसार र.रु. २,८८,७९९/- जास्तीची होत आहे. करिता सुधारित अंदाजपत्रकीय र.रु. ४५,१५,०३२/- ला मा. स्थायी समितीने मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करणेसाठी मा. आयुक्तांनी दि. १०-१-९७ अन्वये मंजुरी दिलेली आहे. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव तसेच मुळ गुत्तेदार यांनी मागणी केल्या नुसार "बी-१" निविदा नियम ३८ नुसार संबंधीत मक्तेदारास ९५-९६ चे दरसुचीनुसार वाढीव रक्कम अदा करणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, क्रांतीचौक राणी लक्ष्मीबाई उद्यानजवळ महानगरपालिकेच्या प्राथमिक आरोग्य केंद्रासह दुकान केंद्राची तीन मजली इमारत बांधणेच्या कामाकरिता अतिरिक्त कामामुळे अंदाजपत्रकास वाढ झाल्यामुळे वाढीव सुधारीत अंदाजपत्रक र.रु. ४५,१५,०३२/- ला सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. तसेच पुर्वीचे अंदाजपत्रक रु. ३८,५८,५९७/- असल्याने फरकाची र.रु. ६,५६,४३५/- या रक्कमेस आणि "ब-१" निविदेतील अट क्र. ३८ नुसार १२५% पेक्षा जास्त झालेल्या परिणामात १९९५-९६ च्या दरसुचीनुसार २.५% जास्त संबंधीत गुत्तेदाराचे वाढीव रक्कमेची मागणी केल्या नुसार जास्तीचे होणारी र.रु. २,८८,७९९/- वर २.५% जास्त अदा करणेस मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी. या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते.

**विषय क्र. ६०६/१७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, हॉटेल अमरप्रित समोरील चौकामध्ये "प्रज्वलीत यज्ञकुंड"ची प्रतिकृती बसविण्या बाबतच्या कामाचे सन ९५-९६ चे डी.एस.आर. दराने र.रु. २,२४,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास मा. आयुक्त यांची मंजुरी मिळालेली आहे. तरी सदर कामा करिता तयार केलेल्या र.रु. २,२४,५००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हॉटेल अमरप्रित समोरील चौकामध्ये "प्रज्वलीत यज्ञकुंड"ची प्रतिकृती बसविणेच्या कामाकरिता तयार करण्यात र.रु. २,२४,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०७/१८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जयनगर ते स्टेट बॅक कॉलनी रस्त्या वरील पुलाची रुंदी वाढविणेच्या कामाचे सन ९५-९६ चे डी.एस.आर. दराने र.रु. १,३५,२००/- चे अ.प. तयार करण्यात आले असुन त्यास मा. आयुक्त यांची मंजुरी मिळालेली आहे.

तरी सदर कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रु. १,३५,२००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जयनगर ते स्टेट बॅक कॉलनी रस्त्या वरील पुलाची रुंदी वाढविणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १,३५,२००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०८/१९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर करीत आहेत की, शहानुरमियॉं दर्गा चौकाचे सौंदर्यीकरणाचे कामी सिव्हील वर्कसाठी सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन पुर्वी मुळ अंदाजपत्रक ६०,१००/- रुचे होते. त्या नंतर सदरील कामात काही बदल झ ााल्यामुळे सदरील कामाचे सुधारित अंदाजपत्रक र.रु. ९९,५६४/- होत आहे. त्यास मा. आयुक्त यांनी मान्यता दिली आहे.

सदरील काम हे विशिष्ट प्रकारचे असल्याने वाढीव काम हे सुध्दा स्वप्नपुर्ती कन्स्ट्रक्शन यांचे कडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्याचे मान्यतेस्तव प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहानुरमियॉं दर्गा चौकाचे सौंदर्यीकरणाचे कामी सिव्हील वर्कसाठी तयार करण्यांत आलेल्या सुधारीत अंदाजपत्रक र.रु. ९९,५६४/- ला सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. तसेच सदरील वाढीव काम मे. स्वप्नपुर्ती कन्स्ट्रक्शन यांचे कडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०९/२० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर करीत आहेत की, एस.एस.सी. बोर्डाचे चौकाचे सौंदर्यीकरणाचे कामी सिव्हील वर्कसाठी सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन पुर्वी मुळ अंदाजपत्रक ४५,३००/- रुपये होतेग. तयामध्ये फक्त गोताकार वाहतुक बेट प्रस्तावित होते त्यांनतर सदरील वाहतुक बेटाची लांबी वाढविण्यात आल्याने सदरील कामाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यांत आले.

सदरील कामाचे सुधारित अंदाजपत्रक १,२६,६००/- रुपयाचे असुन त्यास मा. आयुक्तांनी मंजुरी दिली आहे. सदरील काम हे विशिष्ट प्रकारचे असल्याने सदरील काम हे कॉन्ट्रॅक्टर श्री. हबीब मॅक्स यांचे कडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्याचे मान्यतेस्तव सादर. सदर कामाचा खर्च हा शासकीय अनुदान ९५-९६ मधुन प्रस्तावित आहे. करिता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एस.एस.सी. बोर्डाचे चौकाचे सौंदर्यीकरणाचे सिव्हील वर्कसाठी तयार करण्यांत आलेल्या सुधारित अंदाजपत्रक रक्कम रु. १,२६,६००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम श्री. हबीब मॅक्स यांचे कडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. तसेच सदर खर्च "शासकीय अनुदान ९५-९६" या शिर्षकातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१०/२१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, कलेक्टर ऑफीस ते मजनुहिल पर्यंतच्या रोडचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रु. २४,३०,७००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीद विषयी क्र. १२१/३/ दिनांक २०-११-९६ अन्वये मंजुरीस्तव झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामा करीता निविदा पत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखे पर्यत एकुण कोरी निविदा पत्रके विकल्या गेंली व निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखे पर्यंत यापैकी फक्त ४ निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. मास्कट कन्स्ट्रक्शन | १८.९९% | कमी दराने |
| २. | श्री. आदिनाथ कन्स्ट्रक्शन | १७.९९% | कमी दराने |
| ३. | श्री. राजेश्वर बा. देशमुख | १५.८८% | कमी दराने |
| ४. | श्री. डी. अजितसिंग | ११.००% | कमी दराने |

वरील प्राप्त निविदापैकी मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्या निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरा पेक्षा १८.९९% कमी आहेत.

तरी मे. मास्कॉट कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.९९% कमी दर मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

तरी मे. मास्कॉट कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.९९% कमी दर मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कलेक्टर ऑफीस ते मजनुहिल पर्यंतच्या रोडचे डांबरीकरणाचे कामसाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.९९% कमी दराची मे. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६११/२२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, अलहिलाल कॉलनी येथील रोडचे खडीकरण कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ५,८६,५००/- च्या अंदाजपत्रकास विषय क्र. २२०/२ दि. २०-११-९६ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामा करिता निविदा पत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकुण १५ कोरी निविदा पत्रके विकल्या गेली. व स्विकारणेच्या अंतिम तारखे पर्यंत यापैकी फक्त एकुण १० (दहा) निविदापत्रके विकल्या गेली व स्विकारणेच्या अंतिम तारखे पर्यंत यापैकी फक्त १० (दहा) निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदा पत्रके उघडण्यांत आली त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. सुखबिरसिंग | ३२.००% | कमी दराने |
| २. | श्री. मे. राणा कन्स्ट्रक्शन | २८.००% | --//-- |
| ३. | श्री. कुलवंतसिंग | २७.१०% | --//-- |
| ४. | श्री. आर.बी. चव्हाण | २६.००% | --//-- |
| ५. | श्री. शेख मसुद | २४.१०% | --//-- |
| ६. | श्री. मो.सलिम | २३.००% | --//-- |
| ७. | श्री. मे. पारस कन्स्ट्रक्शन | १३.१०% | --//-- |
| ८. | श्री. स. सुजातअली हाश्मी | १३.००% | --//-- |
| ९. | श्री. मे. एस.एच. आसोशियेटस | ७.००% | --//-- |
| १०. | श्री. अब्दुल सलिम | ११.००% | --//-- |

वरील प्राप्त निविदापैकी श्री. सुखबिरसिंग यांच्या निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३२.००% कमी आहेत.

तरी श्री. सुखबिरसिंग यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३२% कमी दर मंजुरी बाबत प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अलहिलाल कॉलनी येथील रोडचे खडीकरण करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३२% कमी दराची श्री. सुखबिरसिंग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१२/२३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. कटकटगेट किराडपुरा स्लम येथे डांबरीकरण करणे बाबत कामा करिता सा.बा. खाते वर्ष ९४-९५ च्या दर सुचीनुसार रु. ६,२५,७४३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील काम "डांबरीकरण करणे" या शिर्षकातुन करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांची दि. १३-२-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे. तसेच सदरील अंदाजपत्रकास दि. २९-२-९६ रोजी स्थायी समितीत मंजुरी मिळालेली आहे. प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आले असता एकुण तिन निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याचे अंतिम तारखे पर्यंत एकुण दोन निविदा प्राप्त झाल्या व उपस्थित गुत्तेदारा समक्ष उघडण्यांत आले आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. पी.जे. तमखाने | ५.९७% | कमी |
| २. | श्री. आदिनाथ कन्स्ट्रक्शन | ५.७% | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.९७% कमी दराची निविदा श्री. पी.जे.तमखाने (व्यंकटेश कन्स्ट्रक्शन) यांचे आहे.

तरी अ.प. दरापेक्षा ७.९७% कमी दराची असलेली श्री.पी.जे.तमखाने (व्यंकटेश कन्स्ट्रक्शन) यांची निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. कटकटगेट किराडपुरा स्लम येथे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.९७% कमी दराची श्री. पी.जे. तमखाने (व्यंकटेश कन्स्ट्रक्शन) यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१३/२४ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, अजबनगर छोटा तकीया येथे १५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. जलनिःसारण वाहिनी टाकणे बाबत अंदाजपत्रक र.रु. ४,२७,२७०/- यास विषय क्र. ४१८/१३/दिनांक ८/११/९६ व्दारे स्थायी समितीची मान्यता मिळाल्यावर निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविल्या असता एकुण सोळा निविदा विक्री झाल्या होत्या त्यापैकी चार निविदा प्राप्त झाल्या असुन खालील प्रमाणे दर आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. कुलवंतसिंग | अ.प.दरापेक्षा | १३% जास्त |
| २. | श्री. नरेंद्र एस.शेट्टी | --//-- | १०% जास्त |
| ३. | श्री. शेख मसुद | --//-- | ७% जास्त |
| ४. | श्री. ए.एम.फारुकी | --//-- | १२% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७% जास्त दराची निविदा श्री. शेख मसुद ठेकेदारास बोलाविले असता चर्चेअंती सदरील काम अंदाजपत्रकीय दराने करण्यास मान्यता दिलेली आहे तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अजबनगर छोटा तकीया येथे १५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. जलनिःसारण वाहिनी टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दराची श्री. शेख मसुद यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१४/२५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, विद्यानगर येथील मनपाच्या खुल्या जागेवर उद्यान विकसित करणे बाबतचे अंदाजपत्रक व गुत्तेदाराच्या नावाने कामाचे दर इ. स्थायी समिती दि. २९-२-९६ विषय क्र. ३५ अन्वये मंजुर झालेले आहे पुर्वी या कामाचे अंदाजपत्रक र.रु ५,३१,०००/- येते गुत्तेदार श्री. शेख शरीफ यांस अ.प.दरापेक्षा १% कमी दराने काममंजुर झाले होते. ५,३१,०००/- रु. च्या अंदाजपत्रकात वास्तुशास्त्रज्ञ यांनी नकाशा मध्ये दिलेल्या सर्व बाबींच्या समावेश मुळ अंदाजपत्रकात नाही. दिलेल्या नकाशा प्रमाणे सदर उद्यान परिपुर्ण व पुर्ण सुशोभित करण्या करिता मुळ अ. पत्रका पेक्षा रु. १२,२१,०००/- (बारा लाख एकविस हजार) इतकी येत आहे.

चालु असलेल्या गुत्तेदारा मार्फत श्री. शेख शरीफ यांच्या कडुन मंजुर झालेल्या दरा मध्येच करुन घेण्यास्तव सदर खर्च सन १९९५-९६ शासकीय अनुदान १० कोटी अंतर्गत मधुन करण्यांत येईल. करिता वाढीव अ. पत्रकास व शेख शरीफ गुत्तेदाराकडुन १% कमी दराने काम करुन घेण्यास्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विद्यानगर येथील महानगरपालिकेच्या खुल्या जागेवर विकसित करण्यात येत असलेल्या उद्यानाच्या कामाचे अंदाजपत्रकास रक्कम रु. ६,९०,०००/- ची वाढ झाल्यामुळे सुधारित अंदाजपत्रक र.रु. १२,२१,०००/- ला तसेच सदरील काम पुर्वीचेच गुत्तेदार श्री. शेख शरीफ यांचे कडुन अंदाजपत्रकीय दरपेक्षा १% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१५/२६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, टाऊनहॉल येथे जिम्नॅस्टीक हॉल बांधणेच्या कामाचे अंदाजपत्रक सा.बा. खात्याच्या सन ९५-९६ च्या दर सुची नुसार र.रु. ६,७२,६००/- चे तयार करण्यांत आले त्यास मा. आयुक्त यांची व सर्वसाधारण सभेची मंजुरी झालेली आहे. या अनुषंगाने सदर कामाचे बी-१ नमुन्यात निविदा मागविण्यांत करिता शहरातील दै. वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यांत आले. विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत कोरे निविदा एकुण ७ सात विकले गेले व स्विकारण्याच्या तारखे पर्यंत दर भरुन सिलबंद

पाकीटात एकुण ३ तीन निविदा प्राप्त झाल्या. सदरील निविदा मा. लेखाधिकारी यांच्या दालनात उपस्थित गुत्तेदारा समक्ष उघडण्यांत आले त्यात दिलेले दराचे तपशिल खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. एस.ए. नवाब | ६.१०% | अ.प. दरापेक्षा जास्त दराने |
| २. | श्री. एस.एम. मंडोरे | ८.४% | --//-- |
| ३. | श्री. अब्दुल सलाम | १०.००% | --//-- |

सदरील निविदा पत्रकात सर्वात कमी तुलनात्मकदृष्टया श्री. एस.ए.नवाब यांचे अ.प. दरापेक्षा ६.१०% जास्त दराचे दर आहे. आलेले दर मा. आयुक्त यांच्याकडे सादर करण्यांत आले. त्यावर मा. आयुक्त यांनी संबंधीत गुत्तेदार यांस दराच्या वाटाघाटीसाठी बोलविण्याची तजविज केली या अनुषंगाने संबंधीत गुत्तेदार व मा. आयुक्त यांच्यात दराच्या संदर्भात चर्चा झाली. चर्चे अंती मा. आयुक्त यांनी २% जास्त दराने काम करुन देण्यांत यावे असे सुचविले त्यावर संबंधीत गुत्तेदार यांनी मान्य केले आहे.

करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, टाऊन हॉल जिम्नॅस्टीक हॉल बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदा धारक श्री. एस.ए.नवाब यांचेशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार सदर काम अ.प.दरापेक्षा २% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१६/२७ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. दादा कॉलनी येथील गटारीची दुरुस्ती करणेच्या कामा करिता अ.प.र.रु. ३,४०,२३६/- ला स्थायी समिति सभा दि. २१-९-९६ ला विषय क्र. २३०/९ ने ठराव संमत केला आहे. सदरील कामाची निविदा सुचना जा.क्र. मनपा/लेखा/नि/११३/९६ दि. २२-१०-९६ अन्वये वर्तमान पत्रात जाहिरात देऊन बी-१ नमुन्यात जाहिरात दिली असता एकुण ८(आठ) निविदा विक्री झाल्या व ३ निविदा प्राप्त झाल्या त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. शेख सलीम अहेमद | ०.१०% | अ.प. दरापेक्षा कमी दराने |
| २. | श्री. कुलवंतसिंग | ५% | --//-- |
| ३. | श्री. ए.एम.फारुकी | १.००% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे अ.प. दरापेक्षा ०.०१% कमी दराची निविदा श्री. शेख सलिम अहेमद यांची आहे. परंतु स्पर्धात्मक दर प्राप्त झाल्यामुळे मा. आयुक्तांनी ठेकेदारास चर्चेस बोलावुन सदरील काम २% अ.प. दरापेक्षा कमी दराने मान्यता दिली आहे. तरी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दादा कॉलनी येथील गटारीची दुरुस्ती करणेच्या कामा करिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व ठरावचे निविदाधारक श्री. शेख. सलीम अहेमद यांचेशी झालेल्या वाटाघाटी ठरल्याप्रमाणे सदर काम अ.प. दरापेक्षा २% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१७/२८ :**

एन-५ सिडको भागात १०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेसाठी परिसर अभियांत्रिकी विभागाच्या ९५-९६ च्या दर सुची नुसार अंदाजपत्रक र.रु. ६,४१,८६०/- चे तयार करण्यांत येवुन त्यास सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. १६९/ दि. ३०/१०-९६ नुसार मंजुरी देण्यांत आलेली आहे. निविदा सुचना वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यांत येवुन बी-१ निविदा मागविण्यात आल्या कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण १८ निविदा विक्री झाल्या. व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकुण ५ (पाच) निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त झालेल्या निविदा खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. मे. रुबी कन्स्ट्रक्शन | २९.०५% | अ.प. दरापेक्षा दराने |
| २. | श्री. शेख मसुद | २५.९९% | --//-- |
| ३. | श्री. ए.एम. फारुकी | २४.२५% | --//-- |
| ४. | श्री. जी.आर. घोडेले | २२.२१% | --//-- |
| ५. | श्री. बी.ए. काल्डा | २३.७९% | --//-- |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर मे. रुबी कन्स्ट्रक्शन अ.प. दरापेक्षा २९.०५% कमी दराची निविदा आहे.

तरी मे. रुबी कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २९.०५% दराची निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन-५ सिडको भागात १०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अ.प. दरापेक्षा २९.०५% कमी दराची मे. रुबी कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१८/२९ :**

जलवाहिन्या देखभाल व दुरुस्तीसाठी टेक्नीकल जाईन्ट व जिफी जाईन्ट खरेदी करण्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाच्या दर सुची नुसार रु. ५,७४,३००/- चे अ.प. तयार करण्यात येऊन त्यास सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. १२७/९ दि. १९-१०-९६ नुसार मंजुरी देण्यांत आलेली आहे. निविदा सुचना दै.वर्तमान पत्रात प्रसिध्दीस येवुन फॉर्म-डी निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ३ निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस तिन निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. ओसिस रिलायबत प्रॉडक्टस | १.८% | कमी दराने |
| २. | श्री. ओरियन्ट रबर प्रॉडक्टस | ५.०% | --//-- |
| ३. | श्री. अर्थ मुव्हर्स | ०.९३% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अ.प. दरापेक्षा ५% कमी दराची मे. आरिएन्ट रबर प्रॉडक्टस् यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जलवाहिन्या देखभाल व दुरुस्तीसाठी मेॅकनिकल जाईन्ट व जिफी जाईन्ट खरेदी करण्याकरिता प्राप्त झालेल्या निविदा दरापेक्षा ५% कमी दराची मे. ओरिएन्ट रबर प्रॉडक्टस् यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१९/३० :**

जलवाहिन्याच्या देखभाल व दुरुस्तीसाठी आय.व्ही.सी./किर्लोसकर कंपनीचे स्कुल व्हॉल्व्ह खरेदी करण्यांसाठी व रु. ४,८२,१००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले असुन त्यास स्थायी समिती ठराव क्र. २८७/७ दि. ९-१०-९६ अन्वये मंजुरी देण्यांत आलेली आहे. निविदा सुचना दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्दीस देण्यांत येऊन फॉर्म-डी निविदा मागविण्यांत आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकुण (तीन) निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. सागर इन्टरप्रायझेस | ११.८३% | जास्त दराने |
| २. | श्री. सुरज इन्टरप्रायझेस | ३.४०% | --//-- |
| ३. | श्री. अर्थ मोव्हर्स | ५% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराची मे. अर्थ मोव्हर्स यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जलवाहिन्याच्या देखभाल व दुरुस्तीसाठी आय.व्ही.सी./किर्लोसकर कंपनीचे स्कुल व्हॉल्व्ह खरेदी करण्याकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराची मे. अर्थ मोव्हर्स यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२०/३१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, चेतनानगर हर्सुल स्लम येथे खडी रस्ते तयार करणेच्या कामाकरिता सा.बा. खाते यांच्या सर्व ९५-९६ च्या दरसुचीनुसार रु. २,३०,६२३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील काम "५% कमकुवत घटक कल्याण योजना" या शिर्षकातुन करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. २९-१२-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदरील कामाकरिता तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक रु. २,३०,६२३/- यास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चेतनानगर हर्सुल स्लम येथे खडी रस्ते तयार करणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रु. २,३०,६२३/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर काम "५% कमकुवत घटक कल्याण योजना" या शिर्षकातुन करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२१/३२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मापे. मुंकुदवाडी येथील मनपा प्रा. शाळेच्या जुन्या दोन खोल्या सोडुन पश्चिमेस नविन शालेय इमारत बांधणेच्या कामासाठी मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. ११६/२ दि. २०-९-९६ अन्वये ऐनवेळच्या विषय म्हणुन र.रु. १०,५३,५४०/- चे अंदाजपत्रकास सर्वानूमते मंजुरी मिळालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/१२१/९६ दि. १८-११-९६ अन्वये

बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकुण (८) निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकारणेच्या तारखेपर्यंत एकुण (२) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या दि. १२-१२-९६ ला उघडण्यांत आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. मे. एस.एच. असोशिएटस | ११% | जास्त दराने |
| २. | श्री. एस.पी. सोधी | ४.९०% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९०% जास्त दर श्री. एस.पी. सोधी यांची निविदा आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्याने मा. आयुक्तांचे आदेशान्वये संबंधीत गुत्तेदारास वाटाघाटीनुसार सदरचे काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९१% जास्त ऐवजी अंदाजपत्रकीय दराने करण्यांस मा. आयुक्तांनी मंजुरी दिली व त्यास मक्तेदारानेही लेखी संमती दर्शविली सबब कामासाठी प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९०% जास्त ऐवजी (दराचे वाटाघाटीनुसार) अंदाजपत्रकीय दराची श्री. एस.पी.सोधी यांनी निविदा मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुकुंदवाडी येथील मनपा प्रा. शाळेच्या जुन्या खोल्या तोडुन पश्चिमेस नविन शालेय इमारत बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम निविदाधारक श्री.एस.पी. सोधी यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२२/३३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. घाटी जयभिमनगर स्लम येथील "गुलाबवाडी" भाग जो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र वस्तीगृह व उद्यान कॉम्प्लेक्सजवळ आहे. त्याचा विचार करुन सदरील भाग हा आदर्श झोपडपट्टी तहत विकसित करण्याचे मा. आयुक्तांनी सदरील भागाची पाहणी करुन ठरविले असुन आदर्श झ ोपडपट्टी योजने अंतर्गत येणाऱ्या कामास्तव र.रु. ५१,६०,५००/- च्या कामास मंजुरी दिली आहे. या भागाचे सर्व्हेक्षण केले असता एकुण ११७ झोपडपट्टयाची नोंद करण्यांत आली आहे. आदर्श झोपडपट्टी योजने अंतर्गत पुढील प्रमाणे कामे प्रस्तावित आहेत.

१) ८० मी.मी. व्यासाची सी.आय.पाणी पुरवठा लाईन टाकणे अ.प. ११३०००/-
२) २५० मी.मी. व्यायाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणे र.रु. ८,१९,३००/-
३) ११७ झोपडपट्टयासाठी स्वतंत्र संडास बांधुन प्रत्येक झोपडीस स्वतंत्र अर्धा इंच व्यासाचे नळ कनेक्शन देणे अंदाजपत्रक रक्कम रु. ८,१९,३००/-
४) वस्तीतील अस्तीत्वात असलेल्या एकुण ११७ झोपडपट्टयांचा दर्शनी भाग एका सरळ रेषेत वस्तीस पाहिजे असलेल्या रस्त्या पाडुन नविन विटा सिमेंट मध्ये बांधणे. भिंतीने सिमेंट प्लॅस्टर करणे, लोखंडी पत्रे टाकणे, सावगवाणी दरवाजा व एक सांगवाणी खिडकी बसविणे फरशी बसविणे तसेच सदरील झोपडपट्टीचा दर्शनी भाग एकसारखा करुन त्यास एका प्रकारचा रंग देणे हया कामास रु. ३०,६१,३५१/-
५) सदरील १७० झोपडपट्टयामध्ये स्वतंत्र विद्युत मिटर देणे, अंतर्गत लाईट फिटींग अंतर्गत दिड पाईटची करणे व वस्तीत २० सोडीयम व्हेपरचे खांब देणे हया कामासाठी रु. ३,१२,८५०/-

वरील २ ते ५ प्रकारच्या कामाचे अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी प्रशासकीय मंजुरी दिली आहे व हया कामाचा खर्च हा झोपडपट्टी सुधारणा सन ९६-९७ खर्चाचे शिर्षका अंतर्गत असलेल्या एकुण ७.०० (सात कोटी) कोटीमधुन करणे प्रस्तावित आहे.

तरी प्रस्ताव मंजुरीस्तव व मान्यतेस्तव सादर.

संवाद

मा. सभापती : आदर्श झोपडपट्टीसाठी जी योजना आहे. त्यामध्ये रु. ५१,६०,५००/- ची ही योजना आहे. सदरील प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात शिफारस करण्यांत येत प्रस्ताव मंजुर.

आजच्याच सभेत जे सर्व विषयांना मंजुरी दिलेली आहे ते सर्वप्रस्ताव आजच्याच सभेत कायम करण्यात येते.

त्याप्रमाणे प्रशासनाने कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. जयभिमनगर (स्लम) मधील "गुलाबवाडी" या भागामध्ये सर्व्हेक्षण करुन नोंद करण्यांत आलेल्या ११७ झोपडपट्टयामध्ये "आदर्श झोपडपट्टी योजणे अंतर्गत" पाणी पुरवठा लाईन टाकणे आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणे, ११७ झोपडपट्टयांसाठी स्वतंत्रसंडास बांधुन प्रत्येक झोपडीस स्वतंत्र अर्धा इंच व्यासाचे नळ कनेक्शन देणे अस्तित्वात असलेल्या झोपडपट्टयांना दर्शनी भाग एक सरळ रेषेत पाडुन नविन विटा सिमेंटमध्ये बांधणे, प्लॅस्टर करणे, सोडियम विद्युत मिटर देणे लाईट पिटींग करणे, स्वतंत्र विद्युत मिटर देणे लाईट फिटिंग करणे , सोडीयम व्हेपरचे खांब बसवुन देणे. इ. कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु. ५१,६०,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येऊन सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद**

मा. सभापती : १) स.स.श्री. वंसत देशमुख यांनी त्यांच्या स्वेच्छा निधीतुन आभ्यासिका केंद्र सुरु करणेबाबत पत्र दिलेले आहे ते मी.मा. आयुक्त यांचेकडे देत आहे. याबाबत त्वरीत कार्यवाही करावी व प्रस्ताव स्थायी समिती समोर दयावा.

२) साववरकर मित्र मंडळांना दिलेल्या पत्रान्वये प्रशासनाने कार्यवाही करावी व दि. २६-२-९७ पर्यंत काम पुर्ण होईल. याची काळजी घ्यावी.

मा. आयुक्त : स.स.चे अशा प्रकारचे अनेक पत्र माझ्या कडे येत आहेत. ज्यामध्ये स.स. श्री. नुरजहाँ बेगम, श्रीमती. मोहसिना बिल्कीस व आता स.स.श्री. वसंतराव देशमुख यांचेही पत्र आलेली आहे. तेव्हा याबाबत धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. कारण संबंधीत वॉर्डात अभ्यासिका केंद्र चालविण्यासाठी जागेची आवश्यकता आहे तर ती जागा मिळेल ती प्रायव्हेट किंवा मनपाचा यासाठी प्रायव्हेट असल्यास वाटाघाटी करावी लागेल. पुढे ती जागा कुणाच्या ताब्यात राहील वगैरे बाबी प्रशासनाला तपासाव्या लागतील यासाठी धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक राहील.

मा. सभापती : बरोबर सदरील प्रस्ताव तयार करुन सर्वसाधारण सभेपुढे ठेवावे.

श्री. रशिद मामु : अशा प्रकारे प्रस्ताव उद्याला कुणीही स.स. मांडील आणि जागेबाबत उलटसुलट कार्यवाही होईल यासाठी पॉलिसी डिसाईड होणे आवश्यक आहे.

मा. सभापती : प्रशासनाने याबाबत अहवाल सादर करुन सर्वसाधारण सभेपुढे ठेवावे.

श्री. गौतम खरात : शिवाजी मैदान (आमखास) येथील डॉ. बाबासाहेब संशोधन केंद्राचे उद्‌घाटन मा. महापौर यांच्या उर्वरित काळास होईल त्याप्रमाणे प्रशासनाने कार्यवाही करावी असे मा. महापौर यांच्या उर्वरित काळास होईल त्याप्रमाणे

प्रशासनाने कार्यवाही करावी. असे मा. महापौर यांची विनंती आहे. या कामासाठी जी तरतुद रु. २५.०० लाखाला आहे. पैकी रु. १५.०० लाख खर्च झालेले आहेत. आता फक्त रु. १०.०० ला शिल्लक आहेत. आणि पुन्हा १०.०० लाख विविध कामासाठी खर्च येणाची शक्यता आहे. अपुरा निधी इतर खर्चातुन काढुन या कामासाठी वापरण्याचे आदेश होवुन काम तत्परतेने करावे.

मा. आयुक्त : सदरील कामास जास्तीचा खर्च येत आहे. त्यासाठी स्थायी समितीची मंजुरी घेवुन सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव मांडण्यात येईल. तरीही मुख्यलेखापरिक्षक यांनी खुलासा करावा.

मुख्यलेखापरिक्षक : सुधारित प्रस्ताव रु. २५.०० लाखाचा असल्याने सर्वसाधारण सभेची मंजुरी घेणे आवश्यक आहे.

मा. आयुक्त : आजच्या सभेत स्थायी समितीने शिफारस केल्यास सर्वसाधारण सभेसमोर मांडण्यात येईल.

श्री. महादेव सुर्यवंशी : या कामासाठी वेगवेगळे कामे असल्याने कामाचे वेगवेगळे अंदाजपत्रक असुन कामे एकाच प्रकारची नाहीत. त्यामुळे वेगवेगळया खर्चास मंजुरी देण्यास हरकत नसावी.

श्री. गौतम खरात : एकत्रीत कामाचे अंदाजपत्रकाचे काम गृहीत न धरता कामाचे तुकडयांत विभागणी करुन खर्चास मंजुरी देवुन काम तात्काळ करावे.

मा. सभापती : या कामाचे संदर्भात वेगवेळया तुकडयांमध्ये करवुन अंदाजपत्रकास मान्यता देण्यांस हरकत नाही.

श्री. महादेव सुर्यवंशी : अंदाजपत्रकीय पेक्षा रु. १०.०० लाख जादा खर्च अपेक्षित आहे. आणि इतर लेखा शिर्षकातुन काढुन या कामासाठी खर्च करावयाचे झाल्यास सर्वधारण सभेची मंजुरी द्यावी लागेल.

मा. सभापती : कोणत्या लेखा शिर्षातुन खर्च कसे करणार याची माहिती लेखाधिकारी -१ यांनी दयावी.

लेखाधिकारी-१ : सदरील कामाचे इतर लेखाशिर्षातुन खर्च करण्याबाबत तपासणी करुन कार्यवाही करावी लागेल शिवाय रिकाईन्ड बजेट वेळेस पाहणी करावी. लागेल.

मा. सभापती : पुढील बैठकीत पाहणी करुन माहिती दयावी. नंतर प्रस्तावास मंजुरी देता येईल.

श्री. गौतम खरात : विनाकारण वेळ वाया जाऊ नये अशी माझी विनंती आहे.

मा. आयुक्त : मार्च -९७ पर्यंत काम होईल. परंतु स्थायी समितीने शिफारस करावी व नंतरच सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव मंजुरीस्तव पाठविण्यांत येईल.

श्री. गौतम खरात : शहर अभियंता याचे कामाकडे दुर्लक्ष होत आहे.

शहर अभियंता : मुळ निविदाप्रमाणे काम व्यवस्थित होत आहे. जादा कामाचे अंदाजपत्रक वाढल्याने आपल्याला कामाची प्रगती दिसत नाही.

मा. सभापती : ठिक आहे. सर्वांनी बैठकीत सहकार्य केले. त्याबद्दल सर्वाचे आभार मानतो.

"जन गण मन" या राष्ट्रगिताने काम संपल्याचे मा. सभापती यांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगर सचिव, | सभापती, स्थायी समिती, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक १३-२-१९९७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचा इतिवृत्त. सभेची सुरुवात अंदाजे ३.३० वाजता "वंदे मातरम" या गिताने झाली. सभेस खाली सदस्य व अधिकारी उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स.स.श्री. गिरजाराम हाळनोर | अध्यक्ष |
| २) | स.स.श्री. गौतम भागाजी खरात | स.सभासद |
| ३) | स.स.सौ. रजनी रमेश जोशी | --//-- |
| ४) | स.स.श्री. डॉ. भागवत कराड | --//-- |
| ५) | स.स.श्री. कंवरसिंग बैनाडे | --//-- |
| ६) | स.स.श्री. महादेव विजयकुमार मेहेर | --//-- |
| ७) | स.स.श्री. महादेव सुर्यवंशी | --//-- |
| ८) | स.स.श्री. हमीदउद्यीन ताबा | --//-- |
| ९) | स.स.श्री. सुभाष टाकळकर | --//-- |
| १०) | स.स.श्री. भगवान घडामोडे | --//-- |
| ११) | स.स.श्री. त्र्यंबक तुपे | --//-- |
| १२) | स.स.श्री. कचरु नवपुते | --//-- |
| १३) | स.स.श्री. विकास जैन | --//-- |
| १४) | स.स.श्री. अ. रशिद खान (मामु) | --//-- |

**संवाद**

श्री. अ.रशीद खान (मामु) : मागिल वेळेस नविन शिक्षकांना त्यांचा पगार देणे बाबत निर्णय झालेला असतांनाही अद्यापही पगार दिला गेला नाही.

श्री. हमीदउद्यीन ताबा : प्रत्येक सभेत स. सदस्यांच्या सुचना असतात व मा. सभापती यांचेही निवेदन असते. परंतु प्रशासन त्याची अमंलबजावणी करीत नाही. आता ईदचा सण येऊन गेला तरीही नविन शिक्षकांना अद्यापही पगार दिला नाही. जर शिक्षक भरती प्रकरणांतील अहवाल प्राप्त होत नसेल तर त्याचे कारण काय?

मा. सभापती : स. सदस्यांच्या भावना लक्षात घेता प्रशासनाने काय कार्यवाही केली याची माहिती दयावी.

श्री. अब्दुल रशिद खान (मामु) : असे लक्षात येते की, स्थायी समिती मध्ये कोणत्याही निर्णय घेऊन काहीच उपयोग नाही.

श्री. महादेव सुर्यवंशी : सभेचा अजेंडा हा प्रत्येक विभागाकडे वितरित केला जातो आणि त्यानुसार संबंधीत विभागाणे नियमाप्रमाणे कार्यवाही करावी. असे असते परंतु त्याकडे संबंधीत अधिकारी दुर्लक्ष करतात काय असे वाटते.

श्री. गौतम खरात : स्थायी समितीमध्ये वेळोवेळी चर्चा होऊ नही आणि मंजुरी देवुनही प्रशासन कार्यवाही करीत नसेल तर ही बाब गंभीर आहे.

श्री. महादेव सुर्यवंशी : गेल्या १५ वर्षापासुन या कार्यालयात वॉचमनचे पदे आहेत आणि त्यांना पगार दिल्या जातो. मात्र त्यांना पगार दिल्याजातो. मात्र त्यांना प्रशासन वेतन श्रेणी व मंजुरी पदाप्रमाणे रितसर कार्यवाही करित नाही. ही

बाब मी वेळोवेळी सभेतच सांगितलेली आहे. आणि त्याच पध्दतीने या शिक्षक भरती प्रकरणातही होत आहे.

मा. सभापती : ज्या अर्थी शिक्षक वर्ग काम करीत आहेत तर त्यांना प्रशासनाने पगार दयावा. शिक्षक भरती चौकशीच्या वेळी पुर्ण होईल आणि आपला अहवाल देईल त्यावेळी योग्य ती कार्यवाही प्रशासनाने करावी.

मा. सभापती : नविन शिक्षकांना पगार का दिला नाही याचा खुलासा प्रशासनाने करावा.

उप-आयुक्त-२ : स्थायी समितीने निर्णय दिल्यानंतर सदरची संचिका माझ्याकडे दोन दिवसांनी आली व मी त्याच दिवशी मा. आयुक्त यांचेकडे स्वाक्षरीसाठी पाठविली नंतर मात्र सदरची संचिका माझ्याकडे आली नाही परस्पर आस्था-१ कडे गेली.

मा. सभापती : मला याबाबत काहीही ऐकुण घ्यावयाचे नाही. मला स्थायी समिती मध्ये निर्णय झालेला अंमलबजावणी होणे बाबतची कार्यवाही केल्याची माहिती पाहिजे.

श्री. रशिद खान(मामु) श्री. हमीदउद्यीन ताबा, श्री. कचरु नवपुते : प्रशासनाने वेळोवेळी दिरंगाई केलेली आहे. स्थायी समिती मध्ये निर्णय झालेला असतांना ही आणि मागिल बैठकीच्या वेळी मा. सभापती यांनी आदेशित केल्याप्रमाणे की नविन पगार माहे फेब्रुवारी ९७ च्या पगारात देणे बाबत इतिवृत्तात सुचित केलेले होते व इतिवृत्त कायम करण्यात आलेले असतांनाही प्रशासनाने काहीही कार्यवाही केलेली नाही.

श्री. हमीदउद्यीन ताबा : शिक्षक भरती प्रकरणीचा चौकशी समितीचा अहवाल जोपर्यंत प्राप्त होत नाही तापर्यंत प्रशासन निर्णय घेणार नाही. काय?

सौ. रजनी जोशी : समितीचा अहवाल प्राप्त न झाल्याने प्रशासन निर्णय घेत नाही.

श्री. अब्दुल रशिद (मामु) : गेले एक महिन्यापासुन या बाबत सतत चर्चा चालु आहे ही बाब प्रशासनाच्या दृष्टीने योग्य नाही. ते शिक्षक भुकेने मरत आहेत याची किव प्रशासनाला वाटत नाही.

मा. सभापती : उप आयुक्त-२ यांनी या प्रकरणी काय स्थिती आहे सदरील संचिका मागवुन सभागृहाला माहिती दयावी. तोपर्यंत अर्ध्या तासासाठी सभा तहकुब करण्यांत येते. (अंदाज वेळ ३.४५ वा) (बैठकीस सुरुवात अंदाजे ४.३० वाजता)

मा. सभापती : उप आयुक्त-२ यांनी खुलासा करावा.

उप-आयुक्त-२ : दि. २९-१-९७ रोजी स्थायी समितीच्या बैठकीत झालेल्या निर्णया प्रमाणे संचिकांकडुन कोणताही पत्रव्यवहार झालेला नाही. तरीही सदरील संचिका शिक्षक भरती प्रकरणा बाबत आदेशास्तव माझ्याकडे दि. ३-९-९७ रोजीह आली असतांना (संचिकेत लिहिलेला मजकुर वाचुन दाखविला) मी स्वाक्षरी करुन मा. आयुक्तांकडे पाठविला व मा. आयुक्तांकडुन ती संचिका शिक्षकांचे मुळ आदेशांची प्रत बाबत अस्था-१ कडे परस्पर गेली.

श्री. महादेव सुर्यवंशी : गेल्या सभेमध्ये इतिवृत्त कायम करण्यात आलेले होते. व दिनांक २९-१-९७ च्या इतिवृत्तात असे स्पष्ट नमुद आहे की, सदरील इतिवृत्त कायम करण्यांत येऊन शिक्षकांना पगार माहे फेब्रु-९७ च्या पगारात देणेत यावा व सचिवांशी याबाबत आजच कार्यवाही करावी. तरीही प्रशासनाने अद्यापही अंमलबजावणी केलेली नाही.

श्री. अब्दुल रशिद खान (मामु) : बरेचसे अधिकारी अशा काही संचिका तात्काळ निकाली काढावयाच्या असल्यास त्या मा. आयुक्तांकडे हातोहात घेऊन जाऊन प्रकरण निकाली काढतात. त्याच पध्दतीने उप आयुक्त-२ यांनी या प्रकरणी कार्यवाही करावयासा पाहिजे होती ती केली नाही. त्यामुळे शिक्षकांना नाहक भुके भरावे लागत आहे.

श्री. कचरु नवपुते : आता अजुन याबाबत किती कालावधी लागेल ते तरी सांगावे.

मा. सभापती : सदरची संचिका पाहिली असता मा. आयुक्तांनी असे लिहिलेले आहे की, मुळ आदेशाची प्रत दाखवा. त्यामुळे मुळ आदेशाच्या प्रतिची संचिका चौकशी प्रकरणी मा. महापौराकडे विचारणा करावी आणि त्यामुळेच विलंब लागला आहे.

उप-आयुक्त-२ : माझ्याकडुन शिक्षक भरती प्रकरणी संचिका आल्यानंतर ताबडतोब सदरची संचिका मा. आयुक्तांकडे पाठविले त्यानंतर मा. आयुक्तांनी मुळ आदेशाची प्रत दाखवा, असा शेरा लिहुन आस्था-१ कडे संचिका पाठविली गेली.

श्री.अ.रशिद खान (मामु) : अशा प्रकारची माहिती सभागृहात योग्य वाटत नाही. आपण उप आयुक्त म्हणुन तातडीने कार्यवाही करावयास पाहिजे होती. ती आपले कडुन झाली नाही. माझे असे मत आहे की, शिक्षण विभाग उप आयुक्त-१ यांचेकडे सुपुर्त करावा.

मा. सभापती : स. सदस्यांनी मा. महापौरांकडील शिक्षक भरती प्रकरणी चौकशी अहवाला बाबत सर्वसाधारण सभेत विचारणा करावी आणि उप आयुक्त-२ यांनी आदेशीची प्रति बाबत मा. महापौरांशी तात्काळ भेट घेऊन चर्चा करुन आदेशाच्या प्रति घ्याव्यात.

श्री. भगवान घडामोडे : उप आयुक्त-२ यांनी तात्काळ कार्यवाही करावयास पाहिजे होती.

उप आयुक्त-२ : स्थायी समितीतीत निर्णय झाल्यानंतर मी तीन दिवसात संचिका सादर केलेली आहे. तरीही शिक्षकांच्या पगारा बाबत २० तारखे पर्यंत पगार काढणेस्तव कार्यवाही करण्यात येईल.

श्री. अ.रशिदखान (मामु) : मला एवढेच सांगावयाचे आहे की, उप आयुक्त-१ यांनी कार्यवाही करावयास पाहिजे होती.

श्री. महादेव सुर्यवंशी : इतिवृत्त दि. २९-१-९७ रोजीच कायम झालेले असतांनाही शिक्षकांचा पगार काढण्यात आला नाही. ही बाब प्रशासनाच्या दृष्टीने योग्य वाटत नाही. त्यासाठी अजुन किती कालावधी लागणार याची माहिती दयावी.

मा. सभापती : उप आयुक्त-२ यांनी आताच सांगितल्याप्रमाणे २० तारखे पर्यंत शिक्षकांचा पगार काढणे बाबत आदेशीत करणार आहे.

श्री. अ. रशिद खान (मामु) : विद्युत विभागाची गाडी बंद आहे किती दिवसांपासुन बंद आहे याची माहिती दयावी.

उप अभियंता (मेक) : गेल्या आठ दिवसांपासुन बंद आहे.

श्री. अ. रशिद खान (मामु) : माझ्या माहितीप्रमाणे २३ दिवसांपासुन लाईटची गाडी बंद आहे त्यामुळे अडथळे निर्माण होत आहेत म्हणजे एका गाडीला दुरूस्ती होण्यास किती कालावधी लागतो तर प्रायव्हेट ठिकाणी दुरुस्तीसाठी गाडी लावल्यास इतका विलंब लागत नाही.

उप अभियंता (मेक) : सदरीली गाडीचे इंजिन ओव्हर ऑईल बाबत गाडी बंद पडलेली होती.

मा. सभापती : ज्या काही गाडयाची तत्परता सर्व्हिस असल्यास तातडीने कामे करावी याबाबत अति शहर अभियंता यांनी पाहुन कार्यवाही करावी.

अति शहर अभियंता : इंजिन ओव्हर ऑईल बाबत गाडी गेल्या १५ दिवसापासुन बंद आहे.

श्री. अ. रशिद खान (मामु) : इमरजन्सी काही गाडया असल्यास त्या तातडीने कामाच्या मंजुरी घेवुन कार्यवाही करावी.

मा. सभापती : अशा काही संचिका तातडीच्या असल्यास त्या मा. आयुक्तांकडुन मंजुरी घेवुन तातडीने कराव्यात कोणत्याही प्रकारचा विलंब लागु नये याची दक्षता घ्यावी.

उप अभियंता (मेक) : आपल्याकडील सर्वच गाडया इमरजन्सी असतात.

अति शहर अभियंता : याबाबत मी उदया स्वतः पाहुन कार्यवाही करतो.

मा. सभापती : हैड्रोलिक गाडी बाबत काय झाले?

उप-अभियंता (मेक) : संबंधीत एजन्सीने १००% पेमेंट दिल्यानंतरच कार्यवाही करण्यांत येईल असे म्हटले आहे याबाबत करारपत्र तयार आहे.

मा. सभापती : या संदर्भात अति शहर अभियंता यांनी कार्यवाही करावी.

श्री. अ. रशिद खान (मामु) : मागे सुध्दा मी सुचना केलेली होती की, शहरातील प्रत्येक पोलवर नंबरींग टाकावे त्याप्रमाणे कार्यवाही चालु आहे. परंतु नंबरींग लहान अक्षरात टाकणे चालु असल्याने ते लवकर स्पष्ट दिसुन येत नाही. याबाबत बारकाईने लक्ष देवुन कार्यवाही करावी. त्याशिवाय संबंधीताचे बिले देवुनये.

मा. सभापती : याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.

अति.शहर अभि. : संबंधीत कॉट्रक्टरला ६ "पर्यंत लिहिणे बाबत सुचना केलेली आहे.

श्री. अ.रशिद खान (मामु) : स्थायी समिती मधील स. सदस्यांनी आपआपल्या वॉर्डातील सर्व लाईटचे पोलवरील टाकलेले नंबरींग पहावे. जवळपास ७५% शहरातील पोलवर नबरिंग टाकण्याचे काम झालेले आहे. परंतु ते दिसुन येत नाही मनपाचा इतका खर्च झाला झालेला खर्च कोण देणार याची माहिती दयावी.

अति शहर अभियंता : याबाबत पहाणी करतो व दुरुस्ती करण्याबाबत संबंधीतांना योग्य त्या सुचना देतो.

श्री. अ. रशिद खान (मामु) : सिध्दार्थ गार्डन मध्ये वॉचमन आहे काय? कारण बऱ्याच वेळा या ठिकाणी चोऱ्या होत आहेत व अडचणी येत आहेत कारण ट्राफिक पोलीस वाल्यांची सांगितल्याप्रमाणे त्यांना स्टॅन्ड आंतमध्ये दिले संबंधीतांना या बाबत आदेशीत करावे. शिवाय त्याठिकाणी जे दुकाने बसलेले आहेत. त्याचे दुकाने वेळोवेळी फोडुन चोऱ्या येत आहेत यासाठी गार्डनमध्ये वॉचमनची आवश्यकता आहे. काही दरवर्षी पाहिजे त्याच ठिकाणीच चालवितात परंतु दरवर्षी "ना हरकत प्रमाण पत्र" त्यांचेकडुन करवुन घेणे बंधनकारक आहे काय? याबाबत निर्णय व्हावा.

मा. सभापती : ज्या ठिकाणी आपण नोटीस नेहमीच ना हरकत प्रमाणपत्र देतो त्या जागेची पहाणी करुन आवश्यक ती कार्यवाही करावी.

श्री. हमीदउद्यीन ताबा : बऱ्याच टपऱ्या शहरात पुर्वीपासुन आहेत परंतु काही टपऱ्यांना अद्यापही अधिकृत परमिशन ज्यांना मिळाल्या नाही त्यांना आपण काय करणार? याबाबत प्रशासनाने आवश्यक ती कार्यवाही करावी.

उप-आयुक्त-१ : अनधिकृत टपऱ्यांबाबत आपण आवश्यक ती कार्यवाही करणार आहोत. व अधिकृत टपऱ्यांना दरवर्षी प्रमाणे पुर्ण तपासणी करण्यांत येत आहे.

मालमत्ता अधिकारी : आपल्या कडील कमिटी तर्फे रेकार्ड तयार केलेले आहे त्या प्रमाणे कार्यवाही करणार.

मा. सभापती : ठिक आहे त्या प्रमाणे कार्यवाही व्हावी.

श्री. हमीदउद्दीन ताबा : कार्यालयातील बरेचसे कर्मचारी दि. ११-२-९७ रोजी ऑफ्शनल (ऐच्छिक) रजेवर होते त्या मंजुरी होती. तरीही दि. ७-२-९७ च्या भेटीनुसार गैरहजर समजुन त्यांना नोटीस बजावली याचे कारण काय.

मा. सभापती : ही बाब प्रशासकीय आहे जर चुकीने तसे काही झाले असल्यास तपासणी करुन रद्द करण्यांत येईल.

श्री. हमीदउद्दीन ताबा : बालवाडी शिक्षकांची भरती एवढयात केलेली आहे.

उप-आयुक्त-२ : बालवाडी शिक्षकांच्या भरती त्याच वेळेस झालेल्या आहेत. आता कोणतीही भरती झालेली नाही.

श्री. हमीदउद्दीन ताबा : वाचनालयात अनाधिकृत रित्या कर्मचारी घेतलेले आहजे त्याबाबत काय?

उप-आयुक्त-२ : वाचनालयातील श्री संगेकर यांचेकडे दोन कर्मचारी अनाधिकृतीरित्या जे की, उच्च न्यायालयाचे आदेशा प्रमाणे दिलेल्या यादीतील नाहीत ते घेतलेले आहेत घरे तर यादीतील लोकांनाच दै. वे वर घेता येते.

श्री. हमीद उद्दीन ताबा : शहरातील विकास कामाबाबत बैठक कधी होणार?

मा. सभापती : प्लॉनिंग कमिटीची बैठक पुढे होणार आहे. त्या वेळी आपणास सुचना केली जाईल.

श्री. सुभाष टाकळकर : फुलेनगर येथे रु. २.०० लाखाची खांडकी काढुन टाकलेली आहे व त्याबाबत तेथील लोकांनी तक्रार केलेल्या आहेत.

श्री. भगवान घडामोडे : दै. सामना या वृत्तपत्रात बऱ्याचशा बातम्या येतात त्या बाबत काय कार्यवाही होते.

शहर अभियंता : फुलेनगर येथील खांडकी बाबत तसे काहीही नसुन आमचे शाखा अभियंता यांनी संबंधीत स्थळी जाऊन प्रत्यक्ष पाहणी केलेली आहे तसे काहीही नसुन सदरील काम गेल्या दिड वर्षापुर्वीच झालेले आहे. सदरील काम पुर्ण झालेले असुन वृत्तपत्रातील बातमी प्रमाणे तसे काहीही नाही.

डॉ. मेहेर : संबंधीत ठिकाणी जुनी खांडकी काय झालेली आहे.

उप अभियंता स्लम : त्या ठिकाणी नविन खांडकी बसविलेली आहे. जुनी खांडकी बसविण्यात आलेली नाही सदरील काम ऑगस्ट ९५ मध्ये झालेले आहे.

श्री. गौतम खरात : फुलेनगर येथील खांडकी डांबरीकरण करीत असतांना काढण्यात आली व ती खांडकी कोणत्या ठिकाणी जमा केली याची माहिती दयावी. आम्हाला अशी माहिती निळाली की तेथील खांडकी संबंधीत कॉन्ट्रक्टरने इतर ठिकाणी कामात वापरलेली आहे.

उप अभियंता स्लम : या बाबत तशी कल्पना नाही परंतु तेथील कामाची आपण स्वतः पहाणी करावी.

श्री. कचरु नवपुते : ठिक आहे पाहणी करावी.

मा. सभापती : स.स. सोबत पाहणी करावी.

श्री. रशिद खान (मामु) : जकातीचा अहवाल अद्यापही आलेला नाही सहा महिन्याच्या कालावधीत अकॉट रेनेवल करावे असे नियम आहेत.

उप आयुक्त -१ : जकात कमि झालेले नाही (आकडे वाचुन दाखविले)

श्री. रशिद खान (मामु) : पाहुन मार्गवरुन ज्या वाहतुक गाडया येतात त्याकडे जकात कर्मचाऱ्यांनी लक्ष दयावे.

उप आयुक्त-१ : महाराष्ट्र डिस्टलिरीज गाडया येत नाहीत. आणि गरवारेचा एक प्लॅन्ट सध्या बंद आहे. त्यामुळे बराचसा फरक पडलेला आहे. शिवाय मेल्ट्रॉन कंपनी कडुनही येणे बंद पडलेले आहे त्यामुळे जवळपास १ कोटी पेक्षा जास्तीचा फटका मनपास बसलेला आहे. त्याप्रमाणे सिमेंटचे भाव कमिजास्त होत आहेत.

श्री. हमीद ताबा, श्री. रशिद खान (मामु), श्री. गौतम खरात : जकात बाबत रेनेवल कधी करणार.

उप आयुक्त-१ : ॲक्टप्रमाणे असल्याने पुढील बैठकीत या बाबत निर्णय घेण्यात येईल.

श्री. कचरु नवपुते : शहरात बऱ्याच भागात मच्छर फार प्रमाणात वाढलेले असुन मलेरिया विभागा मार्फत फॉगिंग मशिनने कार्यवाही करावी.

आरोग्य वै.अ. : आपल्याकडे आठ मशिन आहेत आता येत्या पंधरवाडयात या बाबत कार्यवाही करण्यात येणार आहे. शहरात कोणत्याही प्रकारची रजा होत नाही केवळ गाडी चालविणारे असतील त्यांच्या डोळयामध्ये या मच्छरांमुळे त्रास होतो.

मा. सभापती : मालमत्ता कराची वसुली सध्या फारच कमी होत आहे. अशा प्रकारच्या बातम्या दै.वृत्तपत्रात येतात या बाबत खुलासा करावा.

उप आयुक्त-१ : सिडकोतील लोक मालमत्ता कर भरणा करीत नाही फक्त पाणी पट्टी भरणा करतात मागिल वर्षी जाने ९६ ला मालमत्ता कर ३.२८ कोटी होता वर्षी ३.८७ कोटी वसुली आहे. काही वृत्तपत्रात बातम्या कशा येतात याची मला कल्पना नाही.

श्री. रशिद खान (मामु) : वसुली बाबत टॅक्स इन्स्पेक्टर यांनी काही टारगेट ठरवुन दिलेले आहे काय? किंवा वसुली कमी झाल्यास त्यांना नोटीसा बजावतात काय?

उप आयुक्त-१ : होय प्रत्येक टॅक्स इन्स्पेक्टर यांना झोनशिवाय टारगेट ठरवुन दिलेले आहे शिवाय त्यांनी टारगेट पुर्ण केल्यास त्यांना कारणे दाखवा नोटीस देवुन विचारणा केली जाते.

श्री. हमीद ताबा श्री. रशिद खान (मामु) : वेळोवेळी वर्तमान पत्रात मालमत्ता कर व पाणी पट्टी बाबत दै. वर्तमान पत्रात जाहिराती देवुन नागरिकांना प्रोत्साहीत करावे व जाहिर प्रगटन दयावे.

उप आयुक्त-१ : त्या प्रमाणे प्रक्रिया कार्यरत आहे.

श्री. विजयकुमार मेहेर : शहरात बऱ्याच जुन्या इमारती धारक आहेत. आणि त्या इमारती पडक्या स्थितीत आहेत अशा थकबाकी धारकां बाबत आपण काही तरी प्रशासनाने निर्णय घेवुन वाटाघाटी करुन प्रकरणे मिटवावीत.

श्री. महादेव सुर्यवंशी : माझ्या असे निदर्शनास आले की, एक व्यक्ती सन १९७९ ते ९५ पर्यंतचा थकबाकी कर भरणा करुनही त्यांच्या नावावर पुन्हा थकबाकी दाखविली आहे. अशा अनेक केसेस/तक्रारी प्रत्येक झोनमध्ये आहेत. या बाबत झोनमध्ये योग्य ते आदेश व्हावेत किंवा काही व्यक्ती/कर्मचारी टुब्लीकेट पावती तर तयार करीत नाही न अशी शंका येते याबाबत चौकशी व्हावी. मालमत्ता कर पाणी पट्टी थकबाकी वसुली बाबत प्रत्येक वार्डनिहाय लाऊडस्पिकर व्दारे लोकजागृती व्हावी.

उप आयुक्त-१ : स. सदस्यांनी सुचित केल्याप्रमाणे एखादे वेळी पावती अनावधाने फाडलेली असल्यास तशी संबधीत झोन अधिकारी यांचे निदर्शनास आणुन दयावी व त्याप्रमाणे कार्यवाही करता येईल. परंतु झोनमध्ये बोगस पावत्या कुणीही फाडणार नाही. शिवाय मालमत्ता कर व पाणी पट्टी वसुली बाबत झोन निहाय अधिकारी/कर्मचारी यांचेकडुन लाऊडस्पिकर तथा वर्तमान पत्रातुन जाहिर प्रगटनाव्दारे आवाहन करण्यांत येत आहे.

श्री. कचरु नवपुते : झोन -५ मध्ये मागिल वर्षी ज्यांच्याकडे थकबाकी आहे त्यांचे घरासमोर एक बॅनर जप्ती बाबत लावुन कार्यवाही केली होती त्यामुळे संबंधीत घर मालकावर परिणाम होतो. व वसुली ताबडतोब होते. त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

उप-आयुक्त-१ : ठिक आहे स.सदस्यांनी सुचित केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यांत येईल आता इतिवृत्तास सुरुवात व्हावी.

**विषय क्र. ६२३/१ :**

दिनांक २९-१-९७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.
१) इतिवृत्तातील पान क्र. ३ मधील विषय क्र. ५८७/४ हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात आला होता तो मंजुर करण्यांत येतो.

संवाद

श्री. गौतम खरात : या प्रस्तावा बाबत नेमके कोणत्या ठिकाणी जागा आहे त्या बाबतचा सर्व्हे मनपा तर्फे केला आहे काय?

उप आभियंता : होय केला आहे.

मा. सभापती : पृष्ठ क्र. ४ विषय क्र. ५८९/६ बाबत संबंधीत उप अभियंता यांनी जबाबदारीने कार्यवाही करावी.

श्री. महादेव सुर्यवंशी : पृष्ठ क्र. ११ विषय ६०५/१६ या विषयामध्ये र.रु. ३१,८८,०००/- स्थायी समितीने मंजुरी दिलेली असतांना सदर कामातील मुळ कामा व्यतिरिक्त झालेली वाढ म्हणुन रु. ६,७०,५९७/- म्हणजे रु. ३८,५८,५२७/- मंजुरी मिळविली नंतर पुन्हा त्याच कामा बाबत मुळ एजन्सीकडुन "बी-१" निविदेतील अट क्र. ३८ नुसार १२५% पेक्षा जास्त झालेल्या परिणामास सन १९९५-९६ च्या दरसुचीनुसार सुधारित अंदाजपत्रक र.रु. ४५,१५,०३२/- ला मंजुरीस्तव प्रस्ताव कसा आला याची माहिती दयावी.

मा. सभापती : शहर अभियंता यांनी खुलासा करावा.

शहर अभियंता : "बी-१" ची अट क्र. ३८ मधील अंदाजपत्रक रिव्हाईज्ड करुन ठरविण्यात आलेली आहे व सदरील काम त्याच ठिकाणाचे वाढीव असुन त्याच गुत्तेदराने घेतलेले आहे.

श्री. महादेव सुर्यवंशी : अशा प्रकारचे अनेक प्रस्ताव आहेत मग अनेक गुत्तेदार याच पध्दतीची मागणी करतील आपण त्यांना काम देणार काय? ज्यावेळी मुळ अंदाजपत्रक रु. ३१.०० लाख स्थायी समितीने मंजुरी दिलेली असतांना नंतर पुन्हा ३८.०० लाखास घेतली आणि नंतरही वाढीव कामामुळे रु. ४२.०० १२५% जास्त झालेल्या कामामुळे संबंधीत गुत्तेदारास जादा देयक मोजावे लागत आहे याची मा. आयुक्त यांची मंजुरी घेतली आहे काय?

शहर अभियंता : सदरील प्रस्तावावर मा. आयुक्त यांची मंजुरी घेतलेली आहे.

श्री. महादेव सुर्यवंशी : वेळोवेळी अशा प्रकारचे काही गुत्तेदार जर त्याच कामाचे बाबतीत बी-१ अट ३८ प्रमाणे काम करुन देयके घेत असतील तर त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान होईल हे देखील लक्षात घ्यावे.

श्री. कचरु नवपुते : त्याच कामातील आर्थिक काम (वाढीव) असल्याने आणि एकाच गुत्तेदाराने केले असल्याने ही वाढ प्रस्तावित केली आहे.

श्री.अ.रशिद खान (मामु) : कोणत्याही प्रकारची वाढीव कामाची मंजुरी घ्यावी. लागते, याची जाणिव प्रशासनाने का ठेवली नाही.

श्री. गौतम खरात : ज्यावेळी त्याच कामावरील वाढीव काम करावयाचे होते, तर त्याची स्थायी समितीची मंजुरी का घेतली नाही. व प्रशासकीय मान्यता मिळवुन ऐनवळी प्रस्ताव स्थायी समिती समोर का आणला?

मा. सभापती : लेखाधिकारी यांनी खुलासा करावा.

लेखाधिकारी : सुरुवातीस सदरील प्रस्तावावर मुळ कामा व्यतिरिक्त झालेली वाढ लक्षात घेवुन रु. ३८.०० लाखाच्या कामास प्रशासकीय मान्यता घेण्यात आली. ते सुध्दा मुळ दरानेच त्यानंतर पुन्हा त्याच कामाबाबत वाढीव काम संबंधीत गुत्तेदाराकडुन करवुन घेतल्याने व वाढीव गुत्तेदार सदरील काम करण्यास तयार असल्यास प्रशासकीय व स्थायी समितीच्या मंजुरीने काम करवुन घेता येते. आता या प्रस्तावाबाबत वेळोवेळी वाढीव काम करवुन घेता येते. आता या प्रस्तावाबाबत वेळोवेळी वाढीव काम त्याच गुत्तेदाराने केल्याने "बी-१" निविदेतील अट क्र. ३८ अन्वये १२५% पेक्षा जास्त झालेल्या परिणामामुळे वाढीव कामाचे दरसुचीनुसार मागणी करीत आहे. सदरीची केस ही एक्सस्पेशल आहे. त्यामुळे संबंधीत गुत्तेदारास वाढीव कामाचा मोबदला देणे बाबत कार्यवाही करणे योग्य राहील.

मा. सभापती : वाढीव कामाच्या बाबतीत स्थायी समितीची मंजुरी घेवुन कार्यवाही व्हावी. याची प्रशासनाने नोंद घ्यावी.

श्री. अ. रशिद खान (मामु) : मागील इतिवृत्तात सुचना केल्याप्रमाणे शहरातील विटभट्टीचा अहवाल प्राप्त झाला. परंतु माझे असे मत आहे की, ज्या विटभट्टया शहरा बाहेर आहेत उदा. जटवाडा,मिटमिटा, दौलताबाद यांचे बाबतीत कार्यवाही होऊ नये फक्त शहरातील ज्या विटभट्टया आहेत. ऐतिहासिक शहराचा बिबिका मकबरा हा त्यामुळे खराब होतो. तर तेथील विटभट्टया व किरडापुरा वगैरे बाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

मा. सभापती : शहरातील ज्या जवळपास विटभट्टया आहेत त्याचे बाबतीत मनपाने कार्यवाही करावी.

श्री. हमीद उद्दीन ताबा : शहरातील बिबिका मकबरा येथील मकबरा स्मशान, किराडपुरा वगैरे ठिकाणच्या विटभट्टया बाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

मा. सभापती : ठिक आहे. शहरातील ऐतिहासीक बिबिका मकबरा जवळील विट भट्टया, स्मशानातील विटभट्टया आणि किराडपुरा जवळील विट भट्टया बाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

डॉ. विजय कुमार मेहेर : बेगमपुरा येथील स्मशानभुमीत बऱ्याच विटभट्टया चालतात बरोबर आहे काय?

प्रशासकीय आधिकारी : तेथील विटभट्टया वाल्यांनी कोटीमार्फत स्टे आणलेला आहे. जेव्हा स्टे व्हेकेट होईल. त्यानंतर कार्यवाही करता येईल.

डॉ. विजय कुमार : जर संबंधीत विटभट्टीवाले अनाधिकृत भट्टया चालवितात तर इमारत निरिक्षक पाहणी करुन दैनंदिन अहवाल कार्यालयात देत नाहीत काय?

प्रशासकीय अधिकारी : इमारत निरिक्षक अहवाल देतात. काही बाबतीत नियमाप्रमाणे नोटीसा बजावुन कार्यवाही करण्यांत येते.

श्री. कचरु नवपुते, श्री. हमीद ताबा : दुधनगर बाबत काय कार्यवाही झाली.

मा. सभापती : शहरात गोठे आहेत. माझ्या मते गोठे हलविण्यापुर्वी अगोदर सर्वाची एक बैठक बोलावुन चर्चा करावी आणि नंतर प्रशासकीय कार्यवाही करावी.

श्री. कचरु नवपुते : यासाठी रु. १.०० कोटीची तरतुद अंदाजपत्रकात केलेली आहे व त्यासाठी जागाही उपलब्ध आहे.

श्री. हमीद उद्यीन ताबा : याबाबत ४० एकर जागा देवुन ताबडतोब कार्यवाही का केली नाही.

उप आयुक्त-२ : पशुधन विकास आधिकारी यांचेकडे काम सोपविलेले आहे. याबाबत कार्यवाही करण्यांत येईल.

श्री. भगवान घडामोडे : मागिल सभेच्या वेळी मी सुचना केलेली होती की, विनायक स्टोन इंडस्ट्रिज चिकलठाणा यांचे बाबतीत काय कार्यवाही सहा संचालक नगर रचना यांनी केली.

सहा.संचालक नगर रचना : संबंधीतानी कोर्टातुन स्टे आणलेला आहे.

मा. सभापती : इतिवृत्तातील पृष्ठ क्र. २ मध्ये सभापतीच्या शक्यता प्रशासनाने नविन शिक्षकांना दि. फेब्रुवारी ९७ पासुन पगार देणेची कार्यवाही करावी. व ज्यावेळेस या शिक्षकांची भरती झालेली आहे. त्योवेळेपासुन पगार देय करण्याची प्रशासनाने कार्यवाही करावी अशी दुरुस्ती करावी. व इतिवृत्तास मंजुरी देण्यांत येते.

**ठराव :**

१) इतिवृत्तातील पृष्ठ क्र. ३ मधील विषय क्र. ५८७/४ हा प्रस्ताव स्थगित ठेवलेला होता. प्रस्तावास मंजुरी देण्यांत येते.
२) इतिवृत्तातील पृष्ठ क्र. २ मध्ये सभापतीच्या वाक्यात प्रशासनाने नविन शिक्षकांना दि. १ फेब्रुवारी ९७ पासुन पगार देण्याची कार्यवाही करावी. व नविन शिक्षक भरतीतील शिक्षकांना ज्या वेळेस पासुन लागले त्या वेळेस पासुन पगार देयक अदाई करण्याची कार्यवाही करावी.
३) दि. ७-१-९७ चे इतिवृत्तातील ठराव क्र. ५६६/५ पाहणीसाठी ठेवलेला होता तो मंजुर करण्यात येतो.
   या वर इतर दुरुस्तीसह दि. २९-१-९७ च्या इतिवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.
   वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२४/२ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शेरखॉन कॉलनी येथे १०० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियात्रिकी विभागाची सन १९९४-९५ च्या दर सुची नुसार र.रु. १,६५,०००/- एवढयाचे अंदाजपत्रक

तयार करण्यांत आले आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामाची तरतुद मधुन करण्यांत येणार आहे.

तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शेरखॉन कॉलनी येथे १०० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. १,६५,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च "भांडवली कामाची तरतुद" मधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२५/३ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पीरबेग कॉलनी कटकटगेट येथे १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन १९९५-९६ च्या दर सुची नुसार र.रु. १,३१,२००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे सदर कामाचा खर्च भांडवली कामाची तरतुद मधुन करण्यांत येणार आहे. तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पीरबेग कॉलनी कटकटगेट येथे १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. १,३१,२००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च भांडवली कामाची तरतुद मधुन करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२६/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. चिकलठाणा (गांव) येथे खांडकी रस्ते तयार करणे कामा करिता र.रु. ६,७०,६००/- चे अंदाज पत्रक सा.बा. विभाग औरंगाबाद यांची दरसुची १९९५-९६ प्रमाणे तयार करण्यांत आले असुन मा. आयुक्तांनी प्रशासकीय मान्यता दिली आहे. तसेच सर्वसाधारण सभेच्या प्रस्ताव क्र. १२३/५ दि. १९-१०-९६ मंजुरी नुसार सदर कामा करिता निविदा प्रसिध्दी देवुन मागविण्यांत आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दि. २७-११-९६ पर्यंत एकुण (२१) कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारणेच्या अंतिम तारीख ११-२-९६ रोजी फक्त (६) मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या त्या निविदा उपस्थित ठेकेदारा समक्ष उघडण्यांत आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. सलीम पटेल | अ.प. दरा पेक्षा | ३% जास्त |
| २. | श्री. डी.सी. पंजाबी | --//-- | ११% जास्त |
| ३. | श्री. एस.डी. मंडोरे | --//-- | १२.१% जास्त |
| ४. | श्री. सुखबीरसिंग | --//-- | १५% जास्त |
| ५. | श्री. अन्सारी कन्स्ट्रक्शन | --//-- | १६% जास्त |
| ६. | श्री. सिद्यीकी एस.झेड | --//-- | १७% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराची निविदा श्री. सलीम पटेल यांची आहे.

परंतु सदरील दर मा. आयुक्त यांना मान्य नसल्यामुळे संबंधीत ठेकेदार श्री. सलीम पटेल यांना वाटाघाटीसाठी बोलवण्यात आले व वाटाघाटीत ढरल्या प्रमाणे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त ऐवजी अंदाजपत्रकीय दराने करण्यास मा. आयुक्त यांनी मान्यता दिली आहे.

करिता मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चिकलठाणा (गांव) येथे खांडकी रस्ते तयार करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची निविदाधारक यांचेशी झालेल्या वाटाघाटी नुसार सदरील काम श्री. सलीम पटेल यांचे कडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२७/५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. फुलेनगर हर्सुल येथे रस्ते तयार करणे गटार दुरुस्त करणे रोड क्रॉस पाईप व ठापे टाकणे बाबत. कामाकरिता सा.बा. खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दर सुची नुसार रुपये ४,२७,८००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील काम अंठरा खेडी विकास योजना" या शिर्षकातुन करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दि. ९-१-९७ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे. प्रस्तावित तारखे पर्यंत एकुण १३ निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याचे अंतिम तारखे पर्यंत एकुण दोन निविदा प्राप्त झाल्या. दि. १२-१२-९६ रोजी उपस्थित गुत्तेदारा समक्ष उघडण्यात आल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. सय्यद रफिकोद्दीन | ०.२५% | कमी |
| २. | श्री. मन्नान खान | ६.२५% | जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.२५% कमी दराची निविदा श्री. सय्यद रफिकोद्दीन यांची आहे. अंदाजपत्रकीय दरा पेक्षा ०.२५% कमी दराची असलेली श्री. सय्यद रफिकोद्दीन यांची निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे फुले नगर हर्सुल येथे खडी रस्ते तयार करणे, गटार दुरुस्त करणे, रोड क्रॉस पाईप व ढापे टाकणे इ. कामा करिता प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदापजत्रकीय दरापेक्षा ०.२५% कमी दराची श्री. सय्यद रफिकोद्दीन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२८/६ :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा. आयुक्त यांच्या मंजुरी नुसार प्रस्ताव सादर केला की, कु अनुराधा लिंबाजी चौथमल यांनी अर्ज दिला आहे की, त्यांना मा. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचे पत्र क्र. ९६/झुभायो/पुरवठा/९६-९७/ दि. ८-१२-९६ अन्वये वरद गणेश परिसरात उत्तरेस सिध्दार्थ उद्यानतील आतील भागात झुनका भाकर केंद्रासाठी मंजुरी दिली

आहे. तथापी संबंधीतास १०X१२ या आकाराची झुनका भाकर केंद्रसाठी खालील चतु:सिमेत जागा विना मुल्य करुन देता येवु शकेल.

पुर्वेस : रस्ता
पश्चिमेस : खुली जागा (सिध्दार्थ उद्यानाची)
दशिणेस : उद्यानाची कुंपन भिंत
उत्तरेस : खुली जागा (सिध्दार्थ उद्यानाची)

**<u>अटी शर्ती</u>**

१) अस्वच्छता होणार नाही.
२) उद्यानातील झाडांची नासधुस होणार नाही.
३) झुनका भाकर केंद्र १०० फुट रस्ता व्ही.आय.पी. रस्त्या लगत येत असल्याने वाहतुकीच्या दृष्टीकोनातुन व परिसर स्वच्छ राहील याची दक्षता घ्यावी.
४) प्रस्तावित जागेची जेव्हा मनपा स. गरज पडेल तेव्हा नोटीस न देता जागा खाली करुन घेण्यांत येईल या अटीवर झुनका भाकर केंद्रास जागा देण्या बाबत मा. स्थायी समिती समोर विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कु अनुराधा लिंबाजी चौथमल यांना सिध्दार्थ उद्यानतील आतील भागात झुनका भाकर केंद्रासाठी १०X१२ ची खालील विनामुल्य देण्यांत सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

पुर्वेस : रस्ता
पश्चिमेस : खुली जागा (सिध्दार्थ उद्यानाची)
दशिणेस : उद्यानाची कुंपन भिंत
उत्तरेस : खुली जागा (सिध्दार्थ उद्यानाची)

**<u>अटी व शर्ती</u>**

१) अस्वच्छता होणार नाही.
२) उद्यानातील झाडांची नासधुस होणार नाही.
३) झुनका भाकर केंद्र १०० फुट रस्ता व्ही.आय.पी. रस्त्या लगत येत असल्याने वाहतुकीच्या दृष्टीकोनातुन व परिसर स्वच्छ राहील याची दक्षता घ्यावी.
४) प्रस्तावित जागेची जेव्हा मनपास गरज पडेल तेव्हा नोटीस न देता जागा खाली करुन घेण्यांत येईल या प्रस्तावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६२९/७ :**

मो. संजयनगर भागात "आभ्यासिका" सुरु करण्यासाठी जागा संपादन करण्याबाबत दि. २०-९-९६ चे सर्वसाधारण सभेत ठराव क्र. ११४/१४ ने मंजुरी देण्यांत आली मंजुरी ठरावानुसार कार्यवाही करता मो. संजयनगर येथील गल्ली नं.एन-७ मधील भुखंड संपादीत करावयाचे महानगरपालिकेने प्रस्ताविलेले आहे.

हया भुखंड क्षेत्र ५५.७६ चौ.मी. खाजगी वाटाघाटीने सदरील भुखंड संपादीत करतांना र.रु. ५०,०००/- एवढे हया भुखंडाचे मुल्य निश्चित करण्यांत आले.

करिता भुखंडाचे संपादनाचा प्रस्ताव निश्चित करण्यात आलेल्या र.रु. ५०,०००/- चे मुल्यासह मान्यतेसाठी सादर.

प्रस्ताव मान्यतेनंतर सदरील भुखंड नोंदणीकृत दस्तऐवजी संबंधीताकडुन महानगरपालिका हस्तांतरीत करुन घेईल व हयासाठी सर्व खर्च महानगरपालिका करणार आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. संजयनगर येथे आभ्यासिका सुरु करण्याकरिता गल्लीइ न.ए-७ मधील भुखंड क्र.पी.पी-१ श्री. ए.के. जाधव यांच्या मालकीचा ५५.७६ चौ.मी.चा भुखंड संपादन करण्याकरिता र.रु. ५०,०००/- च्या खर्चास तसेच भुखंड नोंदणीकृत दस्तऐवजी हस्तांतरीत करुन घेण्यास आणि हयासाठी सर्व खर्च महानगरपालिकेने करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६३०/८ :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी हयांनी प्रस्तावित केले की, सन १९९६-९७ वर्षासाठी आरोग्य विभागास औषधी व शल्य साहित्य खरेदी करण्यासाठी दोन वेळा जाहिर निविदा वर्तमानपत्रातुन जाहिरात १) जा.क्र. मनपा/आरोग्य/१०७०/९६ दि. ८-८-९६ २) जा.क्र. मनपा/आरोग्य/२०६१/९६ दि. /१/९६ देऊन निविदा मागविण्यांत आल्या होत्या त्यामध्ये खालील निविदा प्राप्त झाल्या त्या मध्ये न.१) मे. अश्वनी फर्मास्टीकल औरंगाबाद २) मे. किंक्र ब्रदर्स मुंबई ३) मे. अल्ट्रा फार्मास्टीकल वाळुज औरंगाबाद निविदा प्राप्त झाल्या.

तुलनात्मकदृष्टया मे. अश्वनी फर्मा हयांनी ६७ ॲटम्स मे. किक्रब्रदर्स यांचे ३६१ ॲटम्स व मे अल्ट्रा फर्मास्टिकल्स यांचे ६१ ॲटम्स व ९९ ॲटम्स चे कुणीही दरन भरलेले नाही.

संबंधीत कमी दराचे दर क्रमांक खालील प्रमाणे आहे.

१) मे. अश्वीनी फर्मास्टीकल औरंगाबाद अ.क्र. नं. ६५,७७,१११,१३३,१७५,१९०, २६०,२६१,२६६,२६९, २७३,२७४,२८०,२८३,२८४,२८६,२८७,२८७,२९१,२९५,२९७,३०६,३०८,३१३,३१६,३२०, ३३१,३४९,३५०,३५४,३५५,३६१,३६४,३६६,३६९,३७१,३७६,३७२,३७४,३८२, ३८४,३८८,३८९,३९१,३९५,३९७,३९८,४०१,४०३ आणि ५९६ ते ६११ एकुण ६७ ॲटम्स.

२) मे. किंक्रे ब्रदर्स - अ.क्र. २ ते ६ १० ते १७,२१ ते २२,२४ ते २८ ,३० ,३१ ,३३ ते ३६ ,३९ ते ४२, ४४, ४६, ते ४९, ५८, ६० ते ६४, ६६, ७३, ७५, ७६, ७८, ८२, ८४ ते ८९, ९२ ते ९५, ९८ ते १०३ ते १०६ ते १०८, ११०, ११२ ते ११४, ११७, ११९, १२०, १२२, १२३, १२८, १३०, १३१, १३९, १४१, १४३, ते १४७, १४९, १५१, १५२, १५६, १५७, १६३, १६८, १७०, १७१, १७२, १७६, १७७, १७८, १७९, १८२, १८३, १८४, १८८, १९१, १९३, १९६, १९९, २०४, २०८ ते २१०, २१२, २१३, २१५, २१६, २१८, २२२, ते २२१, २३३, २३४, २३८, २३९, २४१, २४२, २४४, २४६, २४८, २५२ ते २५९, २६२ ते २६५, २६७, २६८, २७०, २७१, २७२, २७५, ते २७९, २८१, २८२,

२८४, २८५, २८९, २९०, २९२, २९३, २९४, २९६, २९८, २९९, ३०१, ३०२, ३०४, ३०५, ३०९, ३१०, ३११, ३१२, ३१४, ३१५, ३१८, ३१९, ३२१ ते ३३०,३३३ ,३३५, ३३६, ३३८, ३३९, ३४२, ३४६, ते ३४८, ३५१, ३५२, ३५३, ३५५, ३५७, ३५९, ३६२, ३६३, ३६०, ३६७, ३७०, ३७१, ३७५ ते ३८१, ३८५ ते ३८७, ३९०, ते ३९४, ३९६, ३९९ ते ४०२, ४०४, ते ४३०, ४३३, ते ४३८, ४४०, ते ४४५, ४४७, ४५०, ते ४५३, ४५५, ४५६, ४५८, म. ४६८, ४७० ते ४८६, ४८८ ते ४९०, ४९३, ४९७, ४९९ ते ५०८, ५१० ते ५४०, ५५५, ५५०, ५५१, ५५४, ५५७, ५५९, ५६२, ५६४, ५५६ ते ५६९, ५७१, ५७३ ते ५७५, ५७७ ते ५८४ आणि ५८६ ते ५९५ एकुण ॲटम्स ३९१.

३) मे अट्राफार्मास्टीकल वाळुज औरंगाबाद अ.क्र. १, ७, ८, ९, १८, १९, २०, २९, ३२, ७४, ८३, ९६, ९७, १०४, १०५, १०९, १२६, १२७, १२९, १७४, १७८, १८०, १८६, १८७, १९२, २११, २३२, २४०, २४५, २४७, २४९, २५०, २५१, ३००, ३०३, ३०७, ३१७, ३३२, ३३४, ३३६, ३३८, ३४०, ३४१, ३४३, ३४४, ३४५, ३५६, ३५८, ३६०, ४३१, ४३९, ४४६, ४५४, ४५७, ४५७, ५९२, ४९४, ४९५, ४९६, ४९८, ५०७ आणि ५०९ एकुण ॲटम्स ६१

वरील प्रमाणे प्राप्त झालेल्या निविदाच्या दर मध्यचे मा. आयुक्तांनी सरसगट १०% दर कमी करुन पुरवठा करण्यास मान्यता दिलेली आहे त्या नुसारन सध्या औषधी व साहित्यांची अंत्यत गरज आरोग्य विभागास असल्याने कमी दराचे दर दर्शविल्या प्रमाणे दर मंजुर करण्यांत यावेत संबंधीत निविदा धारकां बरोबर करार करण्यास मान्यता द्यावी व अंदाजपत्रकातील तरतुदी नुसार खरेदी करण्यास मंजुरी दयावी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

संवाद

श्री. कचरु नवपुते : सन १९९६-९७ साठी या प्रस्तावास मंजुर आहे की, सन १९९७-९८ साठी याची माहिती दयावी.

आरोग्य वै. अधिकारी : गेल्या निविदा वर्षी निविदा प्रमाणे मागविण्यात आलेली आहे व या प्रस्तावातील दर क्रंमाकानुसार मंजुरी ९६-९७ साठी आवश्यक आहे.

श्री. रशिद खान (मामु) : सन ९६-९७ साठी मंजुरी इतका उशिर का होता त्या पेक्षा ९७-९८ साठी पुर्ण मंजुरी घेऊनच प्रशासनाने कार्यवाही करावी.

मुख्यलेखा परिक्षक : सदरचा प्रस्ताव हा सन ९७-९८ साठीचा असुन अगोदर मार्च पुर्वी यास घेणे आवश्यक आहे.

श्री. रशिद खान (मामु) : मार्च महिना उजेडायला एकच महिना बाकी आहे आणि मंजुरी आता होऊन मग आजपर्यंत औषधी प्रत्येक दवाखान्यात कशा प्रकारे मागविली.

आरोग्य वै. अधिकारी : सन १९९९-९७ चे डबे दर आहेत त्याच दरान्वये सन १९९७-९८ ला सुध्दा अपेक्षित धरलेले आहेत संबंधीत एजन्सीला बंधनकारक राहणार आहे.

श्री. रशिद खान (मामु) : मग ठिक आहे.

श्री. महादेव सुर्यवंशी : या प्रस्तावात कितीचे अंदाजपत्रक आहे असे नमुद केलेले नाही. शिवाय औषधांची अंत्यत गरज असल्याचे लिहीलेले आहे. सदरील टेंडर दि. ८-८-९६ ला निघाले असुन या ठिकाणी औषधाची निकड लक्षात घेता आता पर्यंत कार्यवाही का केली नाही.

आरोग्य वै. अ. : मागील वर्षीच्या दराप्रमाणे निविदा मंजुर केलेली आहे आणि औषधांचा साठा आता पर्यंत आहे या औषधांच्या खर्चासाठी रु. ४.९० लाख तरतुद करण्यांत आलेली होती व त्यास स्थायी समितीने मंजुरी दिलेली होती आता रु. ५.०० लाख रु. औषधी खरेदीसाठी मंजुरी आवश्यक आहे.

मा. सभापती : मंजुर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आरोग्य विभागात औषधी व शल्य साहित्य खरेदी करण्यासाठी प्राप्त निविदा

१) मे.अश्विनी फर्मासिटीकल औरंगाबाद अ.क्र. ६५, ७७, १११, १२५, १३३, १७५, १९०, २६०, २६१, २६६, २६९, २७३, २७४, २८०, २८३, २८४, २८६, २८७, २८८, २९१, २९४, २९५, २९७, ३०६, ३०८, ३१३, ३१६, ३२०, ३३०, ३४९, ३५०, ३५४, ३५५, ३६१, ३६४, ३६५, ३६९, ३७१, ३७२, ३७४, ३८२, ३८३, ३८४, ३८८, ३८९, ३९१, ३९५, ३९७, ३९८, ४०१, ४०३ आणि ५९६ ते ६११ एकुण ६७ ॲटम्स

२) मे. किंक्रे ब्रदर्स - अ.क्र. २ ते ६ १० ते १७,२१ ते २२,२४ ते २८ ,३० ,३१ ,३३ ते ३६ ,३९ ते ४२, ४४, ४६, ते ४९, ५८, ६० ते ६४, ६६, ७३, ७५, ७६, ७८, ८२, ८४ ते ८९, ९२ ते ९५, ९८ ते १०३ ते १०६ ते १०८, ११०, ११२ ते ११४, ११७, ११९, १२०, १२२, १२३, १२८, १३०, १३१, १३९, १४१, १४३, ते १४७, १४९, १५१, १५२, १५६, १५७, १६३, १६८, १७०, १७१, १७२, १७६, १७७, १७८, १७९, १८२, १८३, १८४, १८८, १९१, १९३, १९६, १९९, २०४, २०८ ते २१०, २१२, २१३, २१५, २१६, २१८, २२२, ते २२१, २३३, २३४, २३८, २३९, २४१, २४२, २४४, २४६, २४८, २५२ ते २५९, २६२ ते २६५, २६७, २६८, २७०, २७१, २७२, २७५, ते २७९, २८१, २८२, २८४, २८५, २८९, २९०, २९२, २९३, २९४, २९६, २९८, २९९, ३०१, ३०२, ३०४, ३०५, ३०९, ३१०, ३११, ३१२, ३१४, ३१५, ३१८, ३१९, ३२१ ते ३३०,३३३ ,३३५, ३३६, ३३८, ३३९, ३४२, ३४६, ते ३४८, ३५१, ३५२, ३५३, ३५५, ३५७, ३५९, ३६२, ३६३, ३६०, ३६७, ३७०, ३७१, ३७५ ते ३८१, ३८५ ते ३८७, ३९०, ते ३९४, ३९६, ३९९ ते ४०२, ४०४, ते ४३०, ४३३, ते ४३८, ४४०, ते ४४५, ४४७, ४५०, ते ४५३, ४५५, ४५६, ४५८, म. ४६८, ४७० ते ४८६, ४८८ ते ४९०, ४९३, ४९७, ४९९ ते ५०८, ५१० ते ५४०, ५५५, ५५०, ५५१, ५५४, ५५७, ५५९, ५६२, ५६४, ५५६ ते ५६९, ५७१, ५७३ ते ५७५, ५७७ ते ५८४ आणि ५८६ ते ५९५ एकुण ॲटम्स ३९१.

३) मे अट्राफार्मास्टीकल वाळुज औरंगाबाद अ.क्र. १, ७, ८, ९, १८, १९, २०, २९, ३२, ७४, ८३, ९६, ९७, १०४, १०५, १०९, १२६, १२७, १२९, १७४, १७८, १८०, १८६, १८७, १९२, २११, २३२, २४०, २४५, २४७, २४९, २५०, २५१, ३००, ३०३, ३०७, ३१७, ३३२, ३३४, ३३६, ३३८, ३४०, ३४१, ३४३, ३४४, ३४५, ३५६, ३५८, ३६०, ४३१, ४३९, ४४६, ४५४, ४५७, ४५७, ५९२, ४९४, ४९५, ४९६, ४९८, ५०७ आणि ५०९ एकुण ॲटम्स ६१

नुसार मा. आयुक्तांनी औषधी पुरवठा धारकांनी सरसकट १०% दर कमी करुन वरील पुरवठा धारकांपैकी सर्वानुमते एकास मंजुरी देण्यांत येते. तथापी संबंधीत निविदा धारका सोबत चर्चा करावयाची झाल्यास मा. आयुक्तांपुढे चर्चा करुन निर्णय घ्यावा हा निर्णय सन १९९७-९८ साठी सुध्दा बंधनकारक राहील.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# *पुरवणी विषय पत्रिका*

**संवाद**

मा. सभापती : प्रशासनास अशी सुचना करतो की, स्थायी समिती साठी, ज्या संचिका पाठवावयाच्या असतील त्या बैठकीच्या सात दिवस पुर्वीच पाठवावी जेणे करुन पुरवणी विषय पत्रिका वेळेवर निघणार नाही, व स.स.ना वाचलाही कठीण जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

**विषय क्र. ६३१/१ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, कुंभारवाडा येथे अस्तित्वात असलेली गटार दुरुस्त करणे व गटारीवर ढापे टाकणे बाबत परिसर अभियांत्रिकी विभागाचे सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार रु. १,९४,६००/- चे तयार करण्यांत आले आहे. सदरील खर्च "स्लम शहरी भागात गटार बांधणे" या शिर्षकाखाली करण्यांत येईल.

तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. कुंभारवाडा येथे अस्तित्वात असलेली गटार दुरुस्त करणे व गटारीवर ढापे टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. १,९४,६००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "स्लम व शहरी भागात गटारी बांधणे" या शिर्षकाखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६३२/२ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी प्रस्ताव दिला की, मो. अहिसांनगर येथे २५० मी.मी. व्यासाचा ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता अंदाजपत्रक र.रु. १,१७,३७२/- चे परिसर अभियांत्रिकीच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आले आहे.

सदरील काम देखभाल व दुरुस्ती ९६-९७ च्या लेखा शिर्षकातुन प्रस्तावित केले असुन मा. आयुक्तांनी सदरील कामास दि. २०-१-९७ ला प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.

तरी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. अहिसांनगर येथे २५० मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता तयार झालेल्या र.रु. १,१७,३७२/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च देखभाल व दुरुस्ती ९६-९७ च्या शिर्षातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६३३/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, बन्सीलालनगर जवळील राजनगरचे मनपा उद्यानात विद्युतीकरण करण्याचे कामासाठी सार्व बांधकाम खात्याचे दरसुची सन ९५-९६ नुसार रु. १,४५,०००/- अंदाजपत्र तयार करण्यांत आले असुन सदर कामाचा खर्च उद्यान देखभाल दुरुस्ती या लेखा शिर्षातुन करण्यांस मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे.

तरी सदर कामासाठी अंदाजपत्रकीय र.रु. १,४५,०००/- चे खर्चास ९६-९७ वर्षा मधील बजेटमधुन मंजुरी देण्यास प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

संवाद

मा. सभापती : प्रस्तावात सदरील खर्च उद्यान व देखभाल दुरुस्ती या शिर्षाखाली असे लिहिलेले आहे. या ऐवजी सदरील खर्च शासकीय अनुदान या शिर्षातुन खर्च करण्याची दुरुस्ती सह मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बन्सीलालनगर जवळील राजनगरचे मनपा उद्यानात विद्युतीकरण करण्याचे कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. १,४५,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

सदरील खर्च "उद्यान देखभाल दुरुस्ती या लेखा शिर्षऐवजी" शासकीय अनुदान मधुन करण्यात यावा.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६३४/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, मोंढा चौक ते तान्हाजी चौक या मुख्य रस्त्यावर पथदिवे लावुन विद्युतकरण करण्यात बाबतचे कामासाठी अंदाजपत्रक सन ९६-९७ च्या सा.बा. खात्याच्या दरसुचीप्रमाणे रु. ४,९९,०००/- चे तयार करण्यांत आले असुन सदरील कामाचा खर्च "नविन पोल रोवणे" या शिर्षातुन करण्यांत मा. आयुक्त यांनी मंजुरी मिळाली आहे.

तरी सदर कामाचे अंदाजपत्रक र.रु. ४,९९,०००/- खर्चास सन ९६-९७ वर्षातील लेखा शिर्षातुन मंजुरी मिळण्यास प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ते तान्हाजी चौक या मुख्य रस्त्यावर पथदिवे लावुन विद्युतीकरण करण्याबाबतचे कामासाठी अंदाजपत्रक र.रु. ४,९९,०००/- तसेच सदरील खर्च ९६-९७ च्या लेखाशिर्षातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६३५/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, विद्यापीठ परिसरात सी.ई.डी.टी.रोड ते गोगानाथ मंदिरापर्यंत खडी रस्ता तयार करणे या कामासाठी सा.बा. खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यांत आले असुन सदरील कामाचा खर्च भांडवली रस्ते (नविन खडी रस्ते) सन ९६-९७ या लेखा शिर्षकाअंतर्गत उपलब्ध तरतुदीमधुन करण्यांत येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यांत आलेले अंदाजपत्र र.रु. १,८८,५३०/- च्या मंजुरी बाबतच्या प्रस्ताव मा. स्थायी समितीचे विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विद्यापीठ परिसरात सी.ई.डी.टी.रोड ते गोगानाथ मंदिरापर्यंत खडी रस्ता तयार करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु.

१,८८,५३०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "भांडवली रस्ते" (नविन खडी रस्ते) सन ९६-९७ या लेखाशिर्षकातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र. ६३६/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, विभाग क्र. १,२,३ मधील डांबरी रस्त्याचे पॅचवर्क करणेसाठी सिल्कोट मिक्स मटेकरअलाचा पुरवठा करणे या कामासाठी सा.बा. खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक र.रु. ५,८६,६७०/- चे तयार करण्यांत आलेले आहे. सदरील कामासाठी लागणारे मटेरिअल उपलब्ध कंत्राटदार वी.पी. एम. कटारीया यांचे कडुन अंदाजपत्रकीय दराने घेण्यात आलेले आहे. सदरील कामाचा खर्चा पुर्नडांबरीकरण (पंचवर्क) सन ९६-९७ या लेखाशिर्षकामध्ये उपलब्ध असणाऱ्या तरतुदीमधुन करण्यांत येईल.

तरी सदर कामासाठी तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक र.रु. ५,८६,६७०/- ला तसे सदरील काम श्री. पी.एस.कटारिया यांचे कडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यात आलेल्या पचॅवर्क कामास कार्योत्तर मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीचे विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विभाग क्र. १,२,३ मधील डांबरी रस्त्याचे पॅचवर्क करणेसाठी सिलकोट मिक्स मटेरिअलचा पुरवठा करणेच्या कामाकरिता तयार केलेल्या र.रु. ५,८६,६७०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम श्री. पी.एस.कटारिया यांचे कडुन करुन घेतलेल्या कामास कार्योत्तर मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

सदर खर्च पुनडांबरीकरण (पॅचवर्क) सन ९६-९७ मधुन करण्यात यावा.

**विषय क्र. ६३७/७ :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा. आयुक्त यांच्या मंजुरीनुसार प्रस्ताव सादर केला की, नाथ मार्केट येथील पहिल्या मजल्या वरील रिकामी दुकानासाठी वारंवार निविदा मागवुन ही व लिलाव करुनही नागरिकांकडुन प्रतिसाद न मिळाल्यामुळे रिकामी दुकान मिळण्यासाठी जे अर्ज प्राप्त झाले होते. एकुण १२ अर्जधारकांना निश्चित अनामत रक्कम पेक्षा जास्तीत जास्त अनामत देण्यासाठी पत्र देण्यांत आले होते. त्यापैकी सात अर्ज प्राप्त झालेले आहे. त्याचे विवरण खालील प्रमाणे देण्यांत येते.

| अ. क्र. | नांव | रिकामी दुकाने ४,५,८,९, व ३० | मागणी केलेल्या दुकाने | निश्चित अनामत रक्कम | देऊ केलेली अनामत रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १. | आरती प्रकाशन | | ४ किंवा ९ | ५४,५४०/- | ८१,०००/- |
| २. | माधव हांडे | | ८ किंवा ९ | --//-- | ६५,१००/- |
| ३. | सतिश लोणीकर | -- | १० | --//-- | ६०,१००/- |
| ४. | नंदकुमार चौथमल | -- | -- | --//-- | ६०,०००/- |
| ५. | सौ. जयश्री सुभाष भुमकर | -- | -- | --//-- | ६०,०००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६. | नितीन देशपांडे | -- | -- | --//-- | ५६,०००/- |
| ७. | अदिती सेल्स | -- | -- | --//-- | ५५,०००/- |

वरील दुकाना बाबत मा. सर्व साधारण सभेत अनामत रक्कम व भाडे दराबाबत प्रस्ताव ठेवण्यात आला होता. सदरील सभेत ठराव क्र. १४०/२ दि. ३०-१०-९६ रोजी ठराव पारित होऊन अनामत रक्कम व भाडे दर दुकान भाडे प्रति २५/- प्रति.चौ.मी. व पोटमाळासाठी १०/- प्र.चौ.मी. प्रतिम व एकुण क्षेत्रफळावर ५/- प्रति चौ.मी. प्रतिमहा प्रमाणे प्राप्त सात अर्ज धारकांना रिकामी पाच दुकाने ११ महिन्याच्या भाडे पट्टयावर देण्याबाबत प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नाथ मार्केट येथील पहिल्या मजल्यावरील प्राप्त झालेल्या अर्जाप्रमाणे खालील सात अर्जदारांना त्यांच्या नांवासमोर दर्शविलेल्या दुकान क्रमांक व अनामत रक्कमेवर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ. क्र. | नांव | दुकान क्र. | देऊ केलेली अनामत रक्कम |
|---|---|---|---|
| १. | आरती प्रकाशन | ४ | ८१,०००/- |
| २. | माधव हांडे | ९ | ६५,१००/- |
| ३. | सतिश लोणीकर | १० | ६०,१००/- |
| ४. | नंदकुमार चौथमल | ८ | ६०,०००/- |
| ५. | सौ. जयश्री सुभाष भुमकर | ५ | ६०,०००/- |
| ६. | नितीन देशपांडे | -- | ५६,०००/- |
| ७. | अदिती सेल्स | -- | ५५,०००/- |

भाडे दर दुकान भाडे प्रति २५/- प्रती चौ.मी. प्रतिमहा व पोटमाळासाठी १०/- प्रति चौ.मी. प्रतिमहा प्रमाणे आकारण्यात यावा व दुकाने ११ महिन्याच्या भाडेपट्टी यावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६३८/८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. भिमपुरा उस्मानपुरा येथे वाचनालय बांधणेच्या कामासाठी र.रु. २,१३,८६१/- चे अंदाजपत्रक मान्यता मिळालेली होती. सदर कामासाठी १) कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/श.अ./६८८/९२ दि. १०-१०-९२ अन्वये पहिले वेळ निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यामध्ये (४) निविदा दर प्राप्त झाले होते. तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी दराची श्री. शेख निजामोद्दीन यांचा अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.८८% जास्त दराची होती. सदर निविदा कार्यवाही पुर्ण होण्यासाठी जवळ जवळ एक वर्षाचा कालावधी लोटला. म्हणुन संबंधीताने काम करण्यांस नकार दिला. तेव्हा सदर कामाची एजन्सी रद्द करुन फेर निविदा (दुसरी वेळ) कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/मुलेप/७/९१ दिनांक १९-६-९५ अन्वये मागविण्यात आल्या. त्याप्रमाणे एकुण (६) निविदा विक्री झाल्या २) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्यामध्ये तुलनात्मकदृष्टया कमी दराची श्री. भगवान बी. सिरसाठ यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.३२% कमी दराची होती. परंतु संबंधीताने निविदा सोबत १% इसार रक्कम न

भरल्यामुळे ती निविदा रद्द करुन दुसरे कमी दराचे गुत्तेदार श्री. शफी कुमुबद्दीन यांचे निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११% कमी दर असलेले यांना चर्चा करण्यांसाठी बोलविण्यात आले व त्यांना पहिल्या कमी दर असलेल्या दरामध्ये काम करण्याबाबत विचारणा केली असता संबंधीताने सदर निविदाचे दर हे खुपच जुने सन ९१-९२ चे असल्यामुळे त्यांना सदरील काम अंदाजपत्रकीय दराने करण्याबाबत संमती दर्शविली.

या कार्यावाही सहा ९० दिवसांचे दर कालावधी लोटल्या मुळे व दुसरे क्रमांकाचे दरापमध्ये काम करण्यांस तयार नसल्यामुळे मा. आयुक्तांनी पुन्हा फेर निविदा मागविणे बाबत दि. १५-११-९५ अन्वये आदेशित केले पुन्हा आदेशाप्रमाणे फेरनिविदा (तिसरी नळ) कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/४२/९५ दि. १३-१२-९५ अन्वये निविदा मागविल्या असता एकुण (४) निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखे पर्यत फक्त एकच निविदा निविदा दर भरुन प्राप्त झाली सदरची निविदा श्री. आर.एल.बारवाल यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०% जास्त दराची असल्याने मक्तेदारास सदरील काम २०% जास्त दराने देखील करण्यांस लेखी पत्रान्वये नकार दिली कारण सदर प्रक्रियेस ९० दिवसांचे दर कालावधी लोटल्यामुळे व दर जुने असल्यामुळे संबंधीत गुत्तेदाराने असमर्थता दर्शविली. त्यामुळे सदर कामाचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करुन फेर निविदा मागविणेसाठी मा. आयुक्त यांनी दि. ३-६-९६ ला आदेशीत केले. त्याप्रमाणे सदर कामाचे सा.बा. खात्याचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसुचीनुसार र.रु. ३,३४,७२१/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात असले असुन त्यास दि. २०-६-९६ ला मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे. सबब सदर कामासाठी सुधारित अंदाजपत्रके र.रु. ३,३४,८२१/- या प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर. सदरचा खर्च "इतर वाचनालय" या लेखा शिर्षामधुन सन ९६-९७ या वर्षात करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भिमपुरा उस्मानपुरा येथे वाचनालय बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. ३,३४,८२१/- च्या सुधारित अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च "इतर वाचनालय" या शिर्षकातुन सन ९६-९७ मध्ये करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६३९/९ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, गोल व चौकोनी एस.आर.सी. ढापे पुरवठा करणे बाबत सर्वसाधारण सभेमध्ये रक्कम रुपये ३१,७५,०००/- यास विषय क्र. १२८/१० दि. १९-१०-९६ रोजी मान्यता मिळाली होती. त्यानंतर निविदा सुचना दै. सकाळ (पुणे) लोकमत टाईम्स, दै. आलमगिर टाईम्स व दै. सिटीजन्स इ. वर्तमानपत्रात प्रसिध्द करुन निविदा मागविल्या असता एकुण दोन निविदा विक्री झाल्या व दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

१) महाराष्ट्र लघुउद्योग महामंडळ :
अ) गोल रिंग व ढापे पुरवठा करणे - रु. ७६१/- प्रतिनग
ब) चौकोनी ढापे पुरवठा करणे.
१) १०००X७००X७५ मी.मी. - रु. ४१६/- --//--
२) ७००X५५०X५५ मी.मी. - रु. २७२/- --//--
२) के.के. मेनहोल्स ॲड ग्रिटींग कं. -

अ) गोलरिंग व ढापे पुरवठा करणे - रु. ७४६/- --//--
ब) चौकोनी ढापे पुरवठा करणे.
१) १०००X७००X७५ मी.मी. २ मध्ये रु. ४५०/- प्रतिनग
२) ७००X५५०X५५ मी.मी. ७ पासुन रु. ४५०/- प्रतिनग

अटी :

देयक २१ दिवसाचे आंत दिल्यास ५% सुट देण्यात येईल असे नमुद केले आहे.

वरील दराबाबत तुलनात्मक तक्ता केला असता के.के. मेनहोल्स ॲड ग्रिटींग कं. यांची ५% सुट देयक २१ दिवसांत अदा केल्यास देण्यात येईल. असे नमुद केले आहे.

सदरील अट विचारात घेता के.के. मेनहोल्स ॲड ग्रिटींग के. यांचे दर कमी येतात. मा. आयुक्त यांनी दि. १-२-९७ रोजी दोन्ही उत्पादकांना वाटाघाटी साठी समक्ष बोलावले असता चर्चा करुन परत बंद पाकिटामध्ये नव्याने ऑफर मागविली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहे.

१) महाराष्ट्र लघुउद्योग महामंडळ :
अ) गोल रिंग व ढापे पुरवठा करणे - रु. ७०२/- प्रतिनग
ब) चौकोनी ढापे पुरवठा करणे.
१) १०००X७००X७५ मी.मी. - रु. ४०५/- --//--
२) ७००X५५०X५५ मी.मी. - रु. २६१/- --//--
२) के.के. मेनहोल्स ॲड ग्रिटींग कं. -

दर निविदेतील मान्य केले आहे व नमुद केले आहे की, दर्जा ही बाब लक्षात घेऊन निविदा मान्य करावी.

दोन्ही पुरवठा धारकांच्या दराची तुलना केली असता महाराष्ट्र लघुउद्योग महामंडळ यांचे दराप्रमाणे एकुण र.रु. २७,७२,०००/- येते तसेच के.के. मेनहोल ॲड ग्रिटिंग कं. याची त्यांच्या निविदेतील ५% सुटच्या अटीसह र.रु. २८,५९,५००/- इतकी होते.

तरी कमी दराचे महाराष्ट्र लघु उद्योग महामंडळ यांचे दर मान्यते बाबतच्या प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गोल व चौकोनी एस.एफ.आय.सी.ढापे पुरवठा करणेकरिता वाटाघाटीअंती ठरल्यानुसार महाराष्ट्र लघुउद्योग महामंडळ यांच्या खालील दर्शविल्याप्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया कमी दरास मंजुरी देण्यांत येते.

१. महाराष्ट्र लघुउद्योग महामंडळ :
अ) गोल रिंग व ढापे पुरवठा करणे - रु. ७०२/- प्रतिनग
ब) चौकोनी ढापे पुरवठा करणे.
१) १०००X७००X७५ मी.मी. - रु. ४०५/- --//--
२) ७००X५५०X५५ मी.मी. - रु. २६१/- --//--

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६४०/१०:**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनि:सारण यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. एस.टी.कॉलनी येथील नाल्यास संरक्षित भिंत बाधणेच्या अ.प. रक्कम रु. १०,००,०००/-

च्या कामाकरिता परिसर अभियांत्रिकी चे दरपत्रक ९४-९५ नुसार र.रु. १०,००,०००/- चे तयार करुन सर्वसाधारण सभा दि. १०-१०-९६ च्या सभेत विषय क्र. ९६-१० ने मंजुर झाले.

सदरील कामाची निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/१२१/९६ दि. १८-११-९६ अन्वये बी-१ नमुन्यात जाहिरात देऊन निविदा मागविल्या असता एकुण २६ निविदा विक्री झाल्या व त्यापैकी ११ निविदा प्राप्त झाल्या. त्यांच्या तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. न्यु सुपर कन्स्ट्रक्शन | २६% | अ.प. दरापेक्षा कमी दराने |
| २. | श्री. सलीम पटेल | २३.९९% | --//-- |
| ३. | श्री. मो. सलीम | २३% | --//-- |
| ४. | श्री. मे. राणा कन्स्ट्रक्शन | २२% | --//-- |
| ५. | श्री. कुलवंतसिंग | २०.१०% | --//-- |
| ६. | श्री. ए.एम. फारुकी | १९% | --//-- |
| ७. | श्री. अब्दुल सलीम | १५% | --//-- |
| ८. | श्री. सिद्यीकी एम.झेड. | १२.९९% | --//-- |
| ९. | श्री. जी.आर.घोडेले | ८.९९% | --//-- |
| १०. | श्री. मे. एस.एच.असोशिएटस् | ७% | --//-- |
| ११. | श्री. पी.बी. पवार | ५% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अ.प.दरापैक्षा २६% कमी दराची निविदा मे. न्यु सुपर कन्स्ट्रक्शन यांची आहे.

तरी सदरील २६% कमी दराची मे न्यु सुपर कन्स्ट्रक्शन यांची निविदा मा. आयुक्तांनी दि. २९-१-९७ ला प्रशासकीय मंजुरी दिली आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एस.टी.कॉलनी येथील नाल्यास संरक्षित भिंत बाधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६% कमी दराची मे. न्यु सुपर कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६४१/११:**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, बांधकाम विभाग-२ अंतर्गत येणाऱ्या झोन नं. ४,५,६ मधील रस्ते पावसाळयामध्ये खराब झाल्याने रस्त्याचे पॅचवर्क त्वरीत करणे आवश्यक होते. त्यासाठी त्यांना मा. आयुक्त यांची परवानगी घेऊन जी.एम. कटरिया यांचेकडुन पुर्व मिश्रीत डांबर व खडीचे मटेरिअल घेऊन पॅचवर्क करण्यात आले. पावसाळयात फक्त श्री. कटारिया याचाच प्लॅट चालु असल्याने त्यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने मटेरिअल घेऊन पॅचवर्क करण्यात आले पावसाळयात फक्त श्री. कटारिया यांचाच प्लॅट चालु असल्याने त्यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने मटेरिअल घेऊन पॅचवर्क करण्यात आले सदरील कामाची अंदाजपत्रकीय र.रु. २,३३,६००/- असुन सदरील काम हे श्री. कटारिया यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्याचे कार्योत्तर मान्यतेस्तव प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बांधकाम विभाग-२ अंतर्गत येणाऱ्या झोन नं. ४,५,६ मधील श्री. कटारिया यांचेकडुन करुन घेण्यात आलेल्या पॅचवर्कच्या कामास व त्यासाठीचे र.रु. २,३३,६००/- च्या खर्चास कार्योत्तर मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६४२/१२:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, न्यु हनुमाननगर अंतर्गत रस्त्यावर हार्ड मुरुम टाकणेच्या कामाचे सन ९६-९७ चे.सां.बां. खात्याचे डी. एस.आर. दराने र.रु. २४,०१०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास मा. आयुक्त यांची मंजुरी मिळालेली आहे. सदरील कामे हे स.नगरसेवक श्री. विठ्ठल जाधव यांचे स्वेच्छा निधी सन ९६-९७ मधुन प्रस्तावित आहे.

परंतु सदर भाग हा सिडको नोटीफाईड क्षेत्रात येत असल्यामुळे सदर कामाची र.रु. २४,०१०/- चे अंदाजपत्रक स्थायी समितीचे मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे न्यु हनुमाननगर अंतर्गत रस्त्यावर हार्ड मुरुम टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. २४,०१०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी. सदर खर्च संबंधीत प्रभागाचे स. नगरसेवक श्री. विठ्ठल जाधव यांच्य स्वेच्छा निधीतुन करण्यांत यावा.

**विषय क्र. ६४३/१३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, प्रा.शा.हर्सुल ते संत ज्ञानेश्वर वेद विद्या प्रतिष्ठान पर्यंत खडी रस्ता तयार करणे या कामासाठी निविदा मुळ अं.प. र.रु. ५,१९,२२०/- ला मंजुरी मिळालेली असुन सदरील कामाच्या निविदा मागविलया असता श्री. आर.बी. चव्हाण यांची निविदा सर्वात कमी व अंदाजपत्रक दरापेक्षा २८% कमी दराने आहे. परंतु या वार्डात स. नगरसेविका सौ. शिलाबाई गुंजाळे यांच्या पत्रानुसार व मा. महापौर यांच्या शेऱ्यानुसार तसेच पालकमंत्री मा. चंद्रकांत खैरे साहेब यांचे पत्रानुसार या कामाच्या साईटमध्ये बद्दल केल्यामुळे सुधारित अंदाजपत्रक र.रु. ८,८०,०००/- होत असुन अतिरिक्त कामाबाबत र.रु. ९५,४०६/- एवढी होत आहे. सदरील अतिरिक्त वाढीव रक्कमेचे काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८% कमी दराने याच कामाचे कंत्राटदार श्री. आर.बी. चव्हाण यांचेकडुन करुन घेण्यात येईल.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यात आलेल्या सुधारित एकुण अंदाजपत्रकीय र.रु. ९,७५,४०६/- ला मान्यता देणे बाबत तसेच र.रु. ८,८०,०००/- अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८% कमी दराने व उर्वरित अतिरिक्त बाबीचे र.रु. ७५,४०६/- चे काम अंदाजपत्रकीय दराने चालु दरसुची नुसार करुन घेणे बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीने विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रा.शाळा हर्सुल ते संत ज्ञानेश्वर वेद विद्या प्रतिष्ठान पर्यंत खडी रस्ता तयार करणेच्या मुळ अंदाजपत्रक र.रु. ५,१९,२२०/- मध्ये साईट बद्दल झाल्याने तसेच अतिरिक्त बाबींमुळे वाढ झाल्यामुळे एकुण सुधारित अंदाजपत्रक र.रु. ९,७५,४०६/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच सदरील कामापैकी साईट बद्दल झाल्याने वाढलेल्या कामापैकी रु. ८,८०,०००/- चे काम पुर्वीचेच गुत्तेदार श्री. आर.बी. चव्हाण यांचेकडुन मंजुर दर म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८% कमी दराने करुन घेण्यास तसेच अतिरिक्त बाबींचे र.रु. ९५,४०६/- चे काम चालु दरसुचीनुसार अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६४४/१४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, समर्थनगर (प्लॉट नं. ३/२२) वृंदावन कॉलनी पुष्पनगरी भागातील अंतर्गत रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. ३,५०,२४०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र. ७०/१५ दि. १२-७-९६ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरिता निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ४ कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त (३) तीन निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके १२-१२-९६ रोजी उघडण्यांत आली त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. मास्कॉट कन्स्ट्रक्शन | १७.९५% | कमी दराने |
| २. | श्री. डी. अजितसिंग | ११% | --//-- |
| ३. | श्री. राजेश्वर बी. देशमुख | १०.८८% | --//-- |

वरील प्राप्त निविदापैकी मे. मास्कॉट कन्स्ट्रक्शन यांच्या निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.९५% कमी आहेत.

तरी मे. मास्कॉट कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.९५% कमी दर मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे समर्थनगर (प्लॅट नं. ३/२२) वृंध्दावन कॉलनी पुष्पनगरी भागातील अंतर्गत रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७.९५% कमी दराची मे. मास्कॉट कन्स्ट्रक्शन कं. यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६४५/१५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, कटकटगेट ते सिडको या १०० फुट विकास रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रु. २३,८१,०३१/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र. ९४/१ दि. २०-१-९६ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरिता निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ४ कोरी निविदा पत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या तारखेपर्यंत यापैकी फक्त ४ निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रकांपैकी दि. १२-१२-९६ रोजी उघडण्यांत आली त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. मास्कॉट कन्स्ट्रक्शन | २१.८६% | कमी दराने |
| २. | मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन | २०.९९% | --//-- |
| ३. | श्री. डी. अजितसिंग | ११% | --//-- |
| ४. | श्री. राजेश्वर बी. देशमुख | १०.८८% | --//-- |

वरील प्राप्त निविदापैकी मे. मास्कॉट कन्स्ट्रक्शन यांच्या निविदापैकी दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.८६% कमी आहेत.

तरी मे. मास्कॉट कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.८६% कमी दर मंजुरीबाबत प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कटकटगेट ते सिडको या १०० फुट विकास रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा २१.८६% कमी दराची मे. मॉस्काट कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६४६/१६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, औरंगाबाद महानगरपालिकेने गरवारे क्रिडा संकुल येथे बॅडमिंटन हॉलसाठी टिककड फ्लोरिंग करण्याचे कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत येऊन त्यास स्थायी समितीचे मान्यता घेण्याचे आली. सदरील कामाचे अंदाजपत्रक र.रु. ४,३६,८००/- असुन सदरील कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता विक्रीच्या वेळेपर्यंत ११ निविदा विक्री झाल्या. निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत चार निविदा स्विकृतिच्या अंतिम तारखेपर्यंत चार निविदा प्राप्त झाल्या त्याचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. शेख उमर | ९.८५% | कमी दराने |
| २. | श्री. शेख मसुद | ११.४५% | --//-- |
| ३. | श्री. मे. एलोरा कन्स्ट्रक्शन | १४% | --//-- |
| ४. | श्री. मे. न्यु सुपर कन्स्ट्रक्शन | २०.०२% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर शेख उमर यांचे असुन त्यांचे दर ९.८५% जास्त दराचे आहे.

सदरील दर जास्त वाटल्याने मा. आयुक्तांसमोर संबंधीतास वाटाघाटीस बोलवुन सदरील काम अंदाजपत्रकीय दराने करण्याबाबत मा. आयुक्तांनी सुचविले, संबंधीत कॉन्ट्रक्टर यांनी त्यास मान्यता दिली. त्यानुसार सदरील काम शेख उमर यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्याचे मान्यतेस्तव प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपाचे गरवारे क्रिडा संकुल येथे बॅडमिंटन हॉलसाठी टिककड फ्लोरिंग करण्याच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक दृष्टया कमी दराचे दरपत्रकधारक यांचेशी झालेल्या चर्चेअंती ठरल्यानुसार सदरील काम श्री. शेख उमर यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६४७/१७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, मजनुहिल उद्यान येथे ३५० मी. मिनी ट्रेनेसाठी (खोदाई भरती,बांधकाम) फाउंडेशन तयार करणे बाबत अंदाजपत्रक रु.१,३७,३००/- चे दि. ९-११-९६ च्या स्थायी समिती विषय क्र. ४८६/१६ अन्वये मंजुर झालेले आहे. त्या अनुषंगाने "बी-१" नमुन्यात निविदा मागविण्याकरिता शहरातील दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यांत आले. विक्रीच्या तारखेपर्यंत कोऱ्या निविदा एकुण पंधरा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या तारखेपर्यंत दर अरुण सिलबंद पाकीटात एकुण सात निविदा प्राप्त झाल्या. त्या उपस्थित गुत्तेदारासमक्ष लेखा-१ यांच्या दालनांत उघडण्यात आल्या असता त्यांचा तपशिल खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. रफिकोद्दीन (इसाऱ्याची रक्कम कमी भरली) | १९.३०% | कमी दराने |
| २. | श्री. मन्नान खॉन | १८.८६% | --//-- |
| ३. | श्री. शेख मसुद | १७.८६% | --//-- |
| ४. | श्री. कुलवंतसिंग | १७.७३% | --//-- |
| ५. | श्री. एम.ए.असोशिएटस | १५.१५% | --//-- |
| ६. | श्री. मे. ए.जी. मापारी | ११.११% | --//-- |
| ७. | श्री. डी.सी. पंजाबी | ७.३% | --//-- |

सदरील निविदापत्रकात सर्वात कमी तुलनात्मकदृष्टया श्री. रफिकोद्दीन गुत्तेदार यांचे आहे. परंतु संबंधीत गुत्तेदार यांनी निविदेसोबत इसाऱ्याची रक्कम कमी भरली आहे. त्याची निविदा रद्द करुन दुसऱ्या क्रमांकोच गुत्तेदार श्री. मन्नान खॉन यांचे निविदा अं.प. दरापेक्षा १८.८६% कमी दराची निविदा मा. आयुक्तांनी मान्य केली आहे. करिता श्री. मन्नान खॉन, गुत्तेदार यांची निविदा १८.८६% कमी दराची मान्य करण्यास्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मजनुहिल उद्यान येथे ३५० मी. मिनी ट्रेनेसाठी (खोदाई भरती,बांधकाम) फौउंडेशन तयार करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री. रफीकोद्दीन यांनी इसाऱ्याची रक्कम कमी भरल्यामुळे त्यांची निविदा रद्द करुन दुसऱ्या कमी दराची श्री. मन्नान खॉन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १८.८६% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६४८/१८ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, राजनगर शहानुरवाडी येथील मंजुर रेखाकंनामध्ये १०० व १५० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसुची ९४-९५ अन्वये र.रु. ३,२२,९६०/- चे अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र. ४०५/३३ दि. ८-११-९६ अन्वये मंजुरी देण्यात आली.

कार्यालयीन निविदा सुचना क्र. १२९/९६-९७ जी की, दै. वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यांत येऊन बी निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकुण पंधरा कोऱ्या निविदा विक्री झाल्या व सिलंबद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकुण सात सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. व्ही.आर. महाजन | १५.७५% | कमी |
| २. | श्री. सुरेश बी. साधवाणी | ३०% | --//-- |
| ३. | श्री. जी.आर. घोडेले | ७.७७% | --//-- |
| ४. | श्री. गॉडवीन कन्स्ट्रक्शन कं. | ४% | --//-- |
| ५. | श्री. श्री. डी.सी. पंजाबी | ७.१% | --//-- |
| ६. | श्री. राजसिंग | १५.१०% | --//-- |
| ७. | श्री. रुबी कन्स्ट्रक्शन | ४.६५% | --//-- |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर हा श्री. सुरेश बी. साधवाणी यांचा आहे. म्हणजेच अं.प. दरापेक्षा ३०% कमी अशा दर दिलेला आहे. करिता श्री. सुरेश बी. साधवाणी यांची अ.प. दरापेक्षा ३०% कमी दराची निविदा स्विकृतीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे राजनगर शहानुरवाडी येथील मंजुर रेखाकंनामध्ये १०० व १५० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेलया निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ३०% कमी दराची श्री. सुरेश बी. साधवाणी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६४९/१९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, राहुलनगर, सादतनगर,येथे सार्व वाचनालय इमारत बांधणेचे कामासाठी सां.बा. खात्याचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसुची नुसार र.रु. २,९४,२००/- चे अं.प. तयार करण्यांत आले असुन त्यास मा. आयुक्तांनी दि. १७-१-९७ अन्वये मंजुरी दिलेली आहे. तसेच प्रस्तावित कामाकरिता स. नगरसेवक श्री. अ. रशिदखॉन (मामु) यांनी सुचविलेल्या जागे बाबतच्या अभिप्रायाकरिता मालमत्ता अधिकारी यांना पत्रान्वये कळविले होते. परंतु सदर प्रस्तावित कामाच्या नियोजित जागेबाबतचे अभिप्राय मालमत्ता विभागाकडुन प्राप्त झालेले नाहीत. तरी स. नगरसेवक यांनी सुचविलेल्या जागेवर वाचनालयाचे बांधणेच्या कामाकरिता र.रु. २,९४,२००/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा विचारार्थ सादर सदरील खर्च सन ९६-९७ या वर्षात "इतर वाचनालय" या लेखा शिर्षातुन करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे राहुलनगर, सादतनगर,येथे सार्वजनिक वाचनालय बांधणे च्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु. २,९४,२००/- च्या अंदाजपत्रकास व सदरील खर्च सन ९६-९७ या वर्षात "इतर वाचनाल" या लेखा शिर्षातुन करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६५०/२० :**

शिक्षणाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, मनपाच्या सर्व शाळामधुन विद्यार्थ्यांना बसण्यासाठी लाकडी टेबल डेस्कची नितांत आवश्यकता आहे. दरापत्रके मागविण्यांत आली होती. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| टेबल डेस्क (सागवान लाकुड) | सवय्या इटरप्रायजेस | मराठवाडा ट्रेडिंग | इन्शा ट्रेडिंग |
|---|---|---|---|
| लांबी ३ १/४ फुट (तीन मिटर टॉप १०" शिट १०" बुक ८" | २०७५/- | २०५०/- | २१२५/- |
| १/२, १ १/४ x४ एम.एम. ॲगल फ्रेम तसे ऑल इंडिया लोकल सेल्फ गव्हर्नमेंट चे दर व साईज खालील प्रमाणे आहेत. | | | |
| लांबी ३ फुट"ऑप, १२" सिट१०," बुक ६" किमंत रु. २३७५/ | | | |

(राऊंड पाईप फ्रेम)

उपरोक्त दरांची तुलना केली असता मराठवाडा ट्रेडिंगचे तौलनिक दृष्टया दर ३२५/- ने (प्रतिनग) कमी आहेत.

तथापी टेबल डेस्क खरेदीची संख्या लक्षात घेता प्रति नग रु. २०५०/- या दरामध्ये वाटाघाटी करण्यांत आल्या. वाटाघाटीमध्ये १९७५/- प्रति नगर या नुसार १० निश्चित

करण्यांत आला शिक्षण विभागाच्या माध्यमिक शाळेच्या १० लाख रुपयांच्या तरतुदीमधुन खर्च केला जाईल. करिता सर्वात कमी दराचे दर पत्रकधारक मराठवाडा ट्रेडिंग कं. यांचेकडुन दहा लाखरुपये टेबल डेस्क खरेदीच्या प्रस्ताव मान्यतेसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपाच्या सर्व शाळामधुन विद्यार्थ्यांना बसण्यांसाठी लाकडी टबेल डेस्क खरेदी करण्याकरिता प्राप्त झालेल्या दरपत्रकापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे दरपत्रकधारक मे. मराठवाडा ट्रेडिंग कं. यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार प्रतिनग रु. १९७५/- च्या दराने दहा लाख रु. डेस्क खरेदीस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६५१/२१ :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्तावित केले आहे की, औरंगाबाद शहर ऐतिहासिक असुन सुंदर व तऱ्हेने विलहेवाट लावणे जरुरी शहरातील कचऱ्यांची योग्य तऱ्हेने विल्हेवाट लावणे जरुरी आहे. याकरिता घन कचऱ्यापासुन जैविक पध्दतीने खत निर्मितीचा प्रकल्प नारेगाव येथील ट्रेचिंग ग्रांऊडवर बसवावा म्हणजे ज्यापासुन प्रदुषण व स्वच्छता राखला जाईल. या प्रकल्पासाठी जैविक पध्दतीने घन कचऱ्यापासुन खत निर्मिती करणेसाठी प्राथमिक सर्व्हे करुन त्याबाबतची संपुर्ण माहिती तयार करण्यात आली व हा प्रकल्प नारेगांव येथील ट्रेचिंग ग्रांउडवर बसविण्यासाठी जाहिर निविदा मागविण्यात आल्या त्यानुसार दोन निविदा खालील प्रमाणे प्राप्त झाल्या.

१) लिफ बायोटेक मुंबई
२) सत्यम इंडस्ट्रीज औरंगाबाद.

या दोन्ही कंपन्याच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे सादर केल्या आहेत.

१) बायोलिफ कंपनीने खालील शर्ती व अटीसह मनपा हद्दीतील प्रकल्प सुरु करणे बाबत निविदा दिल्या आहेत.

१) संबधीत कपंनीला ७ हेक्टर जागा नारेगांव ट्रेचिंगग्रांउडमध्ये ३० वर्षाच्या नाममात्र लिज वर १ रुपया पर हेक्टर प्रमाणे भाडे तत्वावर द्यावी तसेच याठिकाणी महापालिकेने अंतर्गत रोड पाणी व विजकनेक्शन पुरवावे. वीज व पाण्याचा खर्च संबंधीत कंपनी करणार आहे.
२) शहरातुन महापालिकेने १५० टन घन कचरा दररोज गोळा करुन प्रकल्पाच्या जागेवर विनामुल्य द्यावा.
३) या कचऱ्यापासुन होणाऱ्या खताच्या विक्रीच्या २ टक्के रक्कम रॉयलटी म्हणुन कचरा पोटी व जमीनीपोटी महानगरपालिकेस देण्यास तयार आहेत. प्रकल्पाचा सर्व खर्च बायोटेक कंपनी करणार असुन त्यांना अनुदान व कर्ज महापालिके तर्फे देण्यात येणार नाही. हा प्रकल्प ६ महिन्याच्या कालावधीत कार्यान्वीत होईल तसेच प्रकल्प प्रदुशन रहित राहिल.

**२) सत्यम इंडस्ट्रीज औरंगाबाद.**

१) या कपंनीचे घन कचऱ्यापासुन खत निर्मिती प्रकल्प मनपाच्या नारेगांव येथील ट्रेचिंग ग्रांउडवर सुरु करण्यासाठी ५ ते ६ एकर जमीन लिजवर द्यावी.
२) जमीनीपोटी व कचऱ्यापोटी हा कपंनी मनपास खताच्या विक्री झालेल्या रक्कमेच्या ५ टक्के रॉयलटी मनपास देण्यास तयार आहे.

३) संबंधीत जागेच्या ठिकाणी रस्ता पाणी व विजची व्यवस्था मनपाने करावी. वापरण्यात येणारी वीज व पाणी याचा खर्च ते करणार आहेत.

४) मनपाने शहरातुन आपल्या यंत्रणेव्दारे घन कचरा उचलुन प्रकल्पाच्या जागी विनामुल्य आणुन द्यावा.

५) प्रकल्पाच्या आजुबाजुस स्वच्छता व प्रदुषण रहीत जागा करण्याचे काम सुपुर्णतः कंपनी करेल.

६) कंपनी हा प्रकल्प स्वताच्या खर्चाने तयार करुन खत निर्मिती सुरु करेल यासाठी मनपा तर्फे कर्ज अथवा अनुदान दिले जाणार नाही.

७) संबंधीत कंपनी एक्सल इंडस्ट्रीज मुंबईच्यांचे मदतीने प्रकल्प सहा महिन्याच्या आत उभारुन कार्यान्वित करणार आहेत. शहरातील जास्त कचरा पडलेल्या ठिकाणी संबंधीत कंपनीतर्फे विशिष्ट वाहनाव्दारे विनामुल्य फवारणी दररोज करण्यात येईल.

घन कचऱ्यांपासुन खत निर्मिती प्रकल्प नारेगांव येथे सुरु करण्यांत यावा यासाठी वरीलपैकी जो जास्त मनपाच्या आर्थिक फायदा करेल अशी कंपनी मे. सत्यम इंडस्ट्रीज औरंगाबाद यांचे अटी व शर्ती रास्त असुन संबंधीतास नारेगांव ट्रेचिंग ग्राऊंड येथील जमिन तीस (३०) वर्षाच्या लिजवर देणे व संबंधीत कंपनीस लागणारे सर्व परवाने स्वतः च्या खर्चाने द्यावेत. प्रकल्पाची जागा व खत निर्मिती नियंत्रणाच्या हिशोब तपासण्याचे अधिकार मनपा प्रतिनिधीस केव्हाही राहतील. या अटीवर संबंधीता बरोबर करार करणेसाठी व मंजुरीसाठी प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहर सुंदर व स्वच्छ ठेवण्याकरिता घन कचऱ्यापासुन जैविक पध्दतीने खत निर्मितीचा प्रकल्प नारेगांव येथील ट्रेचिंग ग्राऊंडवर बसविणे करिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया मनपास जास्त आर्थिक फायदेशीर असणारी मे. सत्यम इंडस्ट्रीज, औरंगाबाद यांची निविदा खालील अटीवर स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

१) खत निर्मिती प्रकल्प मनपाच्या नारेगांव येथील ट्रेचिंग ग्रांऊडवर सुरु करण्यासाठी ५ ते ६ एकर जमिन कंपनीस ३० वर्षाकरिता लिजवर देण्यांत यावी.

२) संबंधीत जागेच्या ठिकाणी रस्ता, पाणी, व विजेची व्यवस्था मनपाने करावी. वापरण्यांत येणारी वीज व पाणी याचा खर्च कंपनीने करावा.

३) जमिनीपोटी व कचऱ्यापोटी ही कंपनी मनपास खताच्या विक्री झालेल्या रक्कमेच्या ५ टक्के रॉयल्टी मनपास देईल.

४) मनपा आपल्या यंत्रणेव्दारे घन कचरा शहरातुन उचलुन प्रकल्पाच्या जागी विनामुल्य जाणुन देईल.

५) प्रकल्पाच्या आजुबाजुस स्वच्छता व प्रदुषण रहीत जागा करण्याचे काम संपुर्णतः कंपनी करेल.

६) कंपनी हा पुर्ण प्रकल्प स्वतःच्या खर्चाने तयार करुन खत निर्मिती सुरु करेल. यासाठी मनपातर्फे कर्ज अथवा अनुदान दिले जाणार नाही.

७) संबधीत कंपनी एक्सल इंडस्ट्रीज मुंबई याचे मदतीने प्रकल्प सहा महिन्याच्या आंत उभारुन कार्यान्वीत करणार आहे. शहरातील जास्त कचरा पडलेल्या ठिकाणी संबंधीत कंपनीतर्फे विशिष्ट वाहनाव्दारे विनामुल्य फवारणी दररोज करण्यांत येईल.

८) कंपनीमधुन ॲथोरायझेशन पेपर मिळाल्याशिवाय ॲग्रीमेंट करु नये, संबंधीताकडुन कालावधी व अटी आणि शर्तीचे पालन होऊ शकले नाही. तर सदर कॉन्ट्रक्ट रद्द करावे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६५२/२२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, इंदिरानगर (बायजीपुरा) स्लम मधील ५ फुट रुंद गल्लीत शहाबादी २" जाडीची फरशी ६८६३ मिटर लांबीच्या गल्लीत बसविण्याचे कामाचे अंदाजपत्रक दरसुची ९५-९६ प्रमाणे रु. १६,८९,२८२/- च्या अं.प. कास मा. आयुक्तांनी मंजुरी दिल्यावर सर्वसाधारण सभा दि. २०-११-९६ ला प्रस्ताव मंजुर करण्यांत आला.

सदरील कामाच्या निविदा मागविल्या असता एकुण १३ निविदा विक्री झाल्या व स्विकारण्यांच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ७ निविदा प्राप्त झाल्या. तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची निविदा श्री. डी.सी. पंजाबी हयांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६.३०% कमी दराची असलेली निविदेस मा. आयुक्तांनी दि. १२-२-९७ ला मंजुरी दिली आहे.

प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इंदिरानगर (बायजीपुरा) स्लम मधील ५ फुट रुंद गल्लीत शहाबादी २" जाडीची फरशी ६८६३ मिटर लांबीच्या गल्लीत बसविण्याचे कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६.३०% कमी दराची श्री.डी.सी. पंजाबी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६५३/२३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, म्हाडातर्फे वित्तीय वर्ष ९६-९७ साठी एकुण ७९ लाखाची तरतुद गलिच्छ वस्ती सुधारणा कार्यक्रमांतर्गत कामासाठी ठेवण्यांत आली आहे. सदरील गलिच्छ वस्ती सुधारणा कार्यक्रमांतर्गत उप अभियंता (स्लम-२) विभागाच्या एकुण ९ स्लम मधील वाढीव लोकसंख्येचे हद्दीपावेतो वाढीव रु. ८००/- दरडोई मागाकाप्रमाणे म्हाडा कार्यालयाकडुन त्यांचे पत्र जा.क्र. मुअ/औमं/चित्रशाखा/स्लम/०१४०/९७ दि. ७-१-९७ ला प्रशासकीय मंजुरी रु. ७,५०,८००/- ला मिळाली आहे व मनपाचे एकुण ९ गलिच्छ वस्त्यांमध्ये खालील तकत्यात दर्शविलेप्रमाणे अंदाजपत्रके तयार केली आहेत. सदरील कामाच्या निविदा काढणेस्तव मा. आयुक्तांना १२-२-९७ ला मंजुरी दिली आहे.

| अ. क्र. | झोपडपट्टयाचे नांव | कामाचे नांव | अ.प. दर | म्हाडा कडुन प्राप्त मंजुरी. |
|---|---|---|---|---|
| १. | भावसिंगपुरा | १. जोड रस्ता तयार करणे.<br>२. शहाबाद फरशी बसविणे. | २,०४,२००/-<br>३,८३,६९८/- | ५,६७,२००/- |
| २. | पडेगांव | १. गटार बांधुन ढापे टाकणे.<br>२. जोड रस्ता तयार करणे. | ४,५७,७७६/-<br>५०,६००/- | ५,००,०००/- |
| ३. | खोकडपुरा | १. गटारीची उंची वाढविणे.<br>२. गटार बांधुन ढापे टाकणे. | ६,१६,८५०/-<br>९,६८,६३६/- | १७,९२,०००/- |
| ४. | मिटमिटागांव | गटार बांधणे बाबत. | १,००,७८२/- | २,००,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५. | किराडपुरा | शहाबादी फरशी बसविणे. | १६,१५,५९३/- | १४,७०,४००/- |
| ६. | संजयनगर (बा) | अर्धगोलाकार गटार बांधणे. | ५,८७,१७२/- | ५,०८,०००/- |
| ७. | रोजाबाग | शहाबादी फरशी बसविणे. | १,७५,०५३/- | १,४९,६००/- |
| ८. | इंदिरानगर(बा) | अर्धगोलाकार गटार बांधणे. | १७,०८,०३०/- | १४,२८,८००/- |
| ९. | शहाबाजार | दगडी गटार बांधणे | ८,९२,०४२/- | ८,९२,०००/- |

तरी एकुण र.रु. ७५,०८,०००/- च्या अंदाजपत्रकास प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे म्हाडातर्फे वित्तीय वर्ष ९६-९७ साली ठेवण्यात आलेल्या एकुण ५३ लाखाच्या तरतुदीमधुन गलिच्छ वस्ती सुधारणीतर्गत म्हाडाकडुन मंजुर झालेल्या उपअभियंता (स्लम-२) अंतर्गत येणाऱ्या एकुण ९ स्लम मधील (भावसिंगपुरा) पडेगांव खोकडपुरा, मिटमिटळा गांव, किराडपुरा, संजयनगर (बा) रोजाबाग इंदिरानगर (बा) व शहाबाजार) विविध कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या एकुण रक्कम रु. ७५,०८,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र. ६५४/२४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यानात टप्पा क्रं २ अंतर्गत माहितीकेंद्र सांस्कृतिक गृह ब्रिजेस बांधणे इ. कामाचे अंदाजपत्रक र.रु. १०,००,०००/- चे (दहा लाख) दि. ३०-१०-९६ च्या सर्वसाधारण सभेचे विषय क्र. १३१/२ अन्वये मंजुरी झालेली आहे. या अनुषंगाने "बी-१" नमुन्यात निविदापत्रके मागविण्याकरिता शहरातील दै. वर्तमानपत्रात प्रसिध्द केले. याव्दारे विक्रीच्या तारखेपर्यंत कोरे निविदा ६ विकले गेले व स्विकारण्याच्या तारखेपर्यंत दर भरुन सिलबंद पाकीटात एकुण २ निविदा प्राप्त झाली. सदरील निविदा उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आले. त्यात दिलेले दराचा तपशील खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कुलवंतसिंग | २०.२०% | अ.प. दरापेक्षा कमी. |
| २. | जी. आर. घोडेले | ४.९९% | जास्त दराचे |

सदरील पैकी तुलनात्मकदृष्टया कमी व अं.प. दरापेक्षा २०.२०% कमी दराची श्री. कुलवंतसिंग यांची निविदा आहे. करिता प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानात टप्पा क्र.२ अंतर्गत माहिती केंद्र/सांस्कृतिक गृह ब्रिजेस बांधणे इ. कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया दृष्टया सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा २०.२०% कमी दराची श्री. कुलवंतसिंग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६५५/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, गारखेडा जवळील शास्त्रीनगर मनपाच्या खुल्या जागेवर उद्यान विकासीत करणे बाबतचे अंदाजपत्रक व गुत्तेदाराच्या नावाने कामाचे दर इ. स्थायी समिती सभा दि. २९-२-९६ विषय क्र. ३५ अन्वये मंजुर झालेले आहे.

पुर्वी या कामाचे अ.प.र.रु. ६,२८,०००/- होते. श्री. डी.सी.पंजाबी यांस अ.प. दरापेक्षा २% कमी दराने मंजुर झाले होते.

६,२८,०००/- रु. चे अंदाजपत्रकास वास्तुशास्त्रज्ञ यांच्या लॅडस्केपीक नकाशे प्राप्त होण्यापुर्वी तयार करण्यात आले होते. वास्तुशास्त्रज्ञ यांनी नकाशामध्ये सदर उद्यान दिलेल्या सर्व बाबींच्या समावेश मुळ अंदाजपत्रकात नाही. दिलेल्या नकाशा प्रमाणे सदर उद्यान परिपुर्ण व पुर्ण सुशोभित करण्याकरिता मुळ अं.प.रु.६,२८,०००/- पेक्षा जास्तीचे म्हणजे वाढीव अंदाजपत्रक र.रु. ७,१६,०००/- अशी एकुण १३,४४,०००/- इतकी येत आहे. चालु असलेल्या गुत्तेदारामार्फत श्री. डी.सी. पंजाबी यांच्याकडुन मंजुर झालेल्या दरामध्ये करुन घेण्यास्तव सदर खर्च सन ९५-९६ च्या शासकीय अनुदान १० कोटी अंतर्गत मधुन करण्यांत पंजाबी गुत्तेदार यांचेकडुन १% कमी दराने करुन घेण्यास्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गारखेडा जवळील शास्त्रीनगर येथील मनपाच्या खुल्या जागेवर उद्यान विकसीत करणेकरिता उद्यान परिपुर्ण व सुशोभित करण्याकरिता कामात वाढ झाल्यामुळे वाढीव अंदाजपत्रक रु. ७,१६,०००/- ला सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. तसेच सदरील काम शासकीय अनुदान रु. १० कोटीमधुन करण्यांस व वाढीव काम मुळचे गुत्तेदार श्री. डी.सी. पंजाबी यांचेकडुन अं.प. दरापेक्षा १% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६५६/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र येथे अंतर्गत सजावट काम करणे त्यात इमारतीच्या डोमला पोलाकॉबोनेटचे ग्लास बसवणे या कामाचे अंदाजपत्रक बाजारातील प्रचलित दरान्वये रु. ३,००,०००/- चे तयार करण्यांत आले तयास मा. आयुक्तांची मंजुरी झालेली आहे. सदरचे कामाचे खर्च रिसर्च सेंटरकरिता सुधारीत तरतुद रु. ७५ लाख यामधुन करण्यांत येणार आहे. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र येथे अंतर्गत सजावट काम करणे त्यात इमारतीच्या डोमला पोलाकॉबोनेटचे ग्लास बसवणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. ३,००,०००/- चे अंदाजपत्रकास तसेच सदरील काम रिसर्च सेंअकर करिता सुधारीत तरतुद रु. ७५ लाख यामधुन करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६५७/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र येथे अंतर्गत सजावट काम करणे त्यात पहिल्या मजल्यास आतील बाजुने भिंतीस, छतास व कोपऱ्यांना प्लॅस्टर पॅरिस, आंतील पेटींग करणे इ. कामाचे अंदाजपत्रकास बाजारातील प्रचलित दरान्वये र.रु. ४,४६,१७१/- चे तयार करण्यांत आले. त्यास मा. आयुक्तांनी मंजुरी झालेली आहे. सदर कामाचा खर्च रिसर्च सेंटर करिता सुधारित तरतुद रु. ७५ लाख यामधुन करण्यांत येणार आहे. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र येथे अंतर्गत सजावट काम करणे त्यात पहिल्या मजल्यास आतील बाजुने भिंतीस, छतास व कोपऱ्यांना प्लॅस्टर ऑफ पॅरिस, आंतील पेटींग करणे इ. कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.४,४६,१७१/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च रिसर्च करिता सुधारित तरतुद रु. ७५ लाखातुन करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६५८/५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र येथे अंतर्गत सजावट काम करणे अंतर्गत भिंतीस बाहेरुन टेस्को प्लॅस्टर करणे इ. कामाचे अंदाजपत्रपक बाजारातील प्रचलित दरान्वये र.रु. ५,००,०००/- चे तयार करण्यांत आले. त्यास मा. आयुक्तांची मंजुरी झालेली आहे. सदर कामाचा खर्च रिसर्च सेंटर करिता सुधारित तरतुद रु. ७५ लाख यामधुन करण्यांत येणार आहे. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र येथे अंतर्गत सजावट यात भिंतीस बाहेरुन टेस्को प्लॅस्टर करणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु. ५,००,०००/- च्या अंदाजपत्रकास तसे सदरील खर्च रिसर्च सेंटर करिता सुधारित तरतुद रु. ७५ लाखातुन करण्यांत सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६५९/६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र येथे अंतर्गत सजावट करणे अंतर्गत प्रवेशव्दार, जिना, येथे ग्रॅनाईट स्टोन बसविणे, जिना पायऱ्यासाठी रेलींग बसविणे इ. कामाचे अंदाजपत्रक बाजारातील प्रचलित दरान्वये र.रु. ४,६३,५१४/- चे तयार करण्यांत आले. त्यास मा. आयुक्तांची मंजुरी झालेली आहे. सदर कामाचे खर्च रिसर्च सेंटर करिता सुधारित तरतुद रु. ७५ लाखातुन करण्यांत येणार आहे. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र येथे अंतर्गत सजावट काम करणे अंतर्गत प्रवेशव्दार, जिना, येथे ग्रॅनाईट स्टोन बसविणे, जिना पायऱ्यासाठी रेलींग बसविणे इ. कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु. ४,६३,५१४/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च रिसर्च सेंटर करिता सुधारित तरतुद रु.७५ लाखातुन करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६६०/७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र अंतर्गत सजावट करणे. त्यात पुर्ण इमारतीचे विद्युतीकरण करण्याचे कामाची अंदाजपत्रक बाजारातील प्रचलित दरान्वये र.रु. ३,५०,०००/- चे तयार करण्यांत आले. त्यास मा. आयुक्तांची मंजुरी झालेली आहे. सदर खर्च रिसर्च सेंटर करिता सुधारित तरतुद ७५ लाखातुन करण्यांत येणार आहे. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र अंतर्गत सजावट करणे. त्यात पुर्ण इमारतीचे विद्युतीकरण करण्याचे कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु. ३,५०,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६६१/८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र येथे २०"X३०" आकाराचे फोटो लॅमिनेशनसह तयार करावयाची एकुण १०० नग या कामाचे अंदाजपत्रक बाजारातील प्रचलित दरान्वये र.रु. १,६५,०००/- चे तयार करण्यांत आले. त्यास मा. आयुक्तांची मंजुरी झालेली आहे. सदर कामाचे खर्च रिसर्च सेंटर करिता सुधारित तरतुद र.रु. ७५ लाखातुन करण्यांत येणार आहे. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र येथे २०"X३०" आकाराचे फोटो लॅमिनेशनसह तयार करावयाच्या एकुण १०० नगच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु. १,६५,०००/- च्या अंदाजपत्रकास सदरील खर्च रिसर्च सेंटरकरिता सुधारित तरतुद रु. ७५ लाखातुन करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६६२/९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र येथे अंतर्गत सजावट करणे, त्यात फरशीवर पोलीव्हीनर वॅडर्डल कव्हर टाकणे, छताकरिता वॉटर प्रुफिंग करणे, पॉलिथ वुड काम (लाकडी कामास पॉलिश करणे) फोटो फ्रेमसाठी मोल्डींगची बोर्ड लावणे इ. कामाचे अंदाजपत्रक बाजारातील प्रचलित दरान्वये र.रु. ४,७४,१०७/- चे तयार करण्यांत आले. त्यास मा. आयुक्तांची मंजुरी झालेली आहे. सदर कामाचे खर्च रिसर्च सेंटर करिता सुधारित (रक्कम) तरतुद रु. ७५ लाखातुन करण्यांत येणार आहे. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र येथे अंतर्गत सजावट काम करणे, अंतर्गत फरशीवर पोलीव्हीनर वॅर्डल कव्हर टाकणे, छताकरिता वॉटर प्रुफिंग करणे, पॉलिश वुड काम फोटो फ्रेमसाठी मोल्डींगची बोर्ड लावणे इ. कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु. ४,७४,१०७/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील कामा करिता रिसर्च सेंटरकरिता सुधारित तरतुद रु. ७५ लाखातुन खर्च करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६६३/१० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सुलभ शौचालय बांधणे व त्याची देखभाल सुलभ इंटरनॅशनल महाराष्ट्र एजन्सीकडुन करुन घेण्याकरिता खालील प्रमाणे अंदाजपत्रके सुलभ इंटरनॅशनल एजन्सीने सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १. | सेल्सटॅक्स ऑफिस रेल्वेस्टेशन | ७,४०,०००.०० |
| २. | सरस्वती भुवन औरंगपुरा | ७,५०,०००.०० |

| | | |
|---|---|---|
| ३. | आंबेडकरनगर गरवारे कंपनीजवळ | १०,३०,०००.०० |
| | | २५,२०,०००.०० |

तसेच त्यांनी खाली अटी व शर्ती प्रमाणे काम करण्यांची तयारी दर्शविलेली आहे.

१) कार्यादेश दिल्या बरोबर ५०% रक्कम आगाऊ देणे.
२) ५०% काम झाल्यानंतर ४०% अगावु रक्कम देणे.
३) काम पुर्ण झाल्यानंतर १०% रक्कम देणे.
४) इंम्पलीमेंटशन चार्जेस २०% रक्कम अतिरिक्त कामाच्या किंमतीवर सुलभ शौचालय चालु करणे वेळेस दयावे.
५) ३० वर्षापर्यंत देखभाल दुरुस्तीचे मुदत सुलभ इंटरनॅशनल यांचेकडे राहील. वरील सर्व कामे वैधानिक विकास मंडळाच्या १५.०० लाख व उर्वरित रक्कम १०.२० लाख फंड स्लम विभागातुन करण्यांत येईल.

वरील सर्व अटी व शर्तीसह मा. आयुक्त मनपा, औरंगाबाद यांनी प्रशासकीय मान्यता दि. ११-२-९७ रोजी दिली आहे. करिता वरील प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सुलभ इंटरनॅशनल यांचेकडुन खालील ठिकाणी सुलभ शौचालय बांधणे त्याची देखभाल करणे करिता खालील प्रमाणेच्या खर्चास खालील अटीवर सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १. | सेल्सटॅक्स ऑफिस रेल्वेस्टेशन समोर | ७,४०,०००.०० |
| २. | सरस्वती भुवन औरंगपुरा | ७,५०,०००.०० |
| ३. | आंबेडकरनगर गरवारे कंपनीजवळ | १०,३०,०००.०० |
| | | २५,२०,०००.०० |

**<u>अटी व शर्ती</u>**

१) कार्यादेश दिल्या बरोबर ५०% रक्कम आगाऊ देणे.
२) ५०% काम झाल्यानंतर ४०% अगावु रक्कम देणे.
३) काम पुर्ण झाल्यानंतर १०% रक्कम देणे.
४) इंम्पलीमेंटशन चार्जेस २०% रक्कम अतिरिक्त कामाच्या किंमतीवर सुलभ शौचालय चालु करणे वेळेस दयावे.
५) ३० वर्षापर्यंत देखभाल दुरुस्तीचे मुदत सुलभ इंटरनॅशनल यांचेकडे राहील. वरील सर्व कामे वैधानिक विकास मंडळाच्या १५.०० लाख व उर्वरित रक्कम रु. १०.२० लाख मनपा फंड स्लम विभागातुन करण्यांत यावी.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६६४/११ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, आमखास मैदान येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राजवळ मागासवर्गीय अनुसुचित जाती जमाती इतर मागासवर्गीय होतकरु विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृह बांधणेच्या कामासाठी मा. सर्वसाधारण पणे सभा ठराव क्र. ११७/३ दि. २०-९-९६ अन्वये र.रु. मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदरचे काम

हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/४/१६ दि. ९-१-९७ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकुण (१५) निविदा विक्री झाल्या निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत (५) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दि. ३१-१-९७ ला उघडण्यांत आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. एस.ए. असोशिएटस | ४% | कमी दराने |
| २. | मे. गुरू कन्स्ट्रक्शन | १७% | जास्त दराने |
| ३. | मे. अे.जी मापारी | ५.५५% | कमी दराने |
| ४. | श्री. जि.आर. घोडेले | २% | कमी दराने |
| ५. | मे. एलोरस कन्स्ट्रक्शन | ७.७८६% | कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.७८६% कमी दराची मे. एलोरा कन्स्ट्रक्शन कं. यांची निविदा आहे व त्यास स्थायी समिती समोर ठेवण्यांसाठी मा. आयुक्तांनी दि. १२-२-९७ अन्वये शिफारस केलेली आहे. सबब सदर कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.७८६% कमी दराची मे. एलोरा कन्स्ट्रक्शन यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

प्रस्तुत इमारत पुर्ण करणे करिता एकुण र.रु. ७० लाख लागणार आहे. सध्या पहिल्या टपऱ्याचे बांधकाम सुरु करण्यांचा प्रस्ताव आहे. सन ९७-९८ सालामध्ये र.रु. ५० लक्षची तरतुद करावी लागणार आहे. रक्कम रु. २० लक्षची निविदा मंजुरीचा प्रसताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आमखास मैदान डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राजवळ मागासवर्गीय अनुसुचित जाती/जमाती, इतर मागासवर्गीय होतकरु विद्यार्थ्यासाठी वस्तीगृह बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.७८६% कमी दराची (पहिल्या टप्प्याकरिता रु. २० लाखकरिता) निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६६५/१२ :**

मा. आयुक्त यांच्या वापरासाठी प्रिमियर ११८-एन,ई. पेट्रोल ए.सी.कार खरेदी करण्यासाठी प्रिमियर कंपनीचे अधिकृत विक्रेते मे. लक्ष्मी निर्मल एजंसींज औरंगाबाद यांचेकडुन रु. ३,३५,९९५/- चे दरपत्रक वसुल झाले हे दर डी.जी.एस. सदरील ॲन्ड डी. प्रमाणे असुन त्यामध्ये १०% सेल्स टॅक्स आहे. सदरील खर्च घसारा निधी या लेखाशिर्षकातुन करण्यांत येईल. जकात सोडुन हे दर असुन जकात सुट प्रमाणपत्र डिलीव्हरी घेतांना द्यावे लागेल. वाहनाची किंमत कमी वा जास्ती झाल्यास त्याप्रमाणे बिलाची अदायी करावी लागेल. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मा. आयुक्त यांच्या वापरासाठी प्रिमियर ११८-एन,ई. पेट्रोल ए.सी.कार खरेदी करण्याकरिता प्रिमियर कंपनीचे अधिकृत विक्रेते मे. लक्ष्मी निर्मल एजंसींज, औरंगाबाद यांचे र.रु. ३,३५,९९५/- च्या दरापत्रकास (जकात सोडुन) सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६६६/१३ :**

उप-आयुक्त-१ यांनी प्रस्ताव सादर केला की, वित्तीय वर्ष सन १९९७-९८ या वर्षासाठी औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तावरील मालमत्ता कराचे, दर हे मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे प्रकरणे ९ चे कलम ९९ अन्वये मनपाने दिनांक २०-२-९७ रोजी किंवा हयापुर्वी निश्चित करणे व मंजुर करणे आवश्यक आहे.

त्यानुसार सन १९९७-९८ या वित्तिय वर्षासाठी खालीलप्रमाणे दर प्रस्तावित आहे. खालील कराचे दर हे करयोग्य मुल्यावर आकारले जातील.

अ) महानगरपालिकेचे दर.

| अ. क्र. | कराचे नाव | सन १९९६-९७ चे करयोग्य मुल्य दर | सन १९९७-९८ करिता प्रस्तावित कर योग्य मुल्य दर. |
|---|---|---|---|
| १. | सामान्य कर | कोणत्याही करयोग्य मुल्यावर<br>१ ते १००० २३%<br>१००१ ते १०००० २४%<br>१०००१ ते २०००० २५%<br>२०००१ ते ५०००० २६% | १ ते २०००० २५%<br>२०००१ ते ५०००० २६%<br>५०००१ ते १००००० २७%<br>१०००० १ ते पुढे २८% |
| २. | सर्वसाधारणे | -------- | ---- |
| ३. | साफसफाई कर<br>अ) निवासी कर ब) निवासेत्तर वापर | कोणत्याही करयोग्य मुल्यावर<br>--- ३%<br>--- ६% | कोणत्याही करयोग्य मुल्यावर<br>--- ३%<br>---१% |
| ४. | वृक्षकर | --- १% | --- १% |
| ५. | अग्निशमन कर | --- १% | --- १% |
| ६. | मनपा शिक्षणकर | --- १% | --- १% |
| ७. | पथकर | --- १% | --- १% |
| ८. | जलनि:सारण लाभकर | --- १% | --- १% |
| ९. | जललाभ कर | --- १% | --- १% |
| १०. | मोकळया जागेचा कर | योग्य मुल्यावर सामान्य कराचे दराने | योग्य मुल्यावर सामान्य कराचे दराने |

ब) शासनाचे कर

| अ. क्र. | करयोग्य मुल्य रु. | राज्य शिक्षण कर | | रोजगार हमी कर |
|---|---|---|---|---|
| | | निवासी | निवासेत्तर | निवासेत्तर |
| १. | १ ते ७४ | -- | -- | -- |
| २. | ७५ ते १४९ | २% | ४% | १% |
| ३. | १५० ते २९९ | ३% | ६% | १.५% |
| ४. | ३०० ते २९९९ | ४% | ८% | २.०% |
| ५. | ३००० ते ५९९९ | ५% | १०% | २.५% |
| ६. | ६००० ते त्यापेक्षा जास्त | ६% | १२% | ३.०% |

वरीलप्रमाणे "अ" मधील कर सन १९९७-९८ साठी प्रस्तावित करण्यांत आलेले आहेत तथापी वरीलप्रमाणे प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९७-९८ या वित्तीय वर्षासाठी प्रस्तावित केलेल्या दरामध्ये खालील दुरुस्तीसह हे दर करयोग्य मुल्यावर आकारण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

अ) महानगरपालिकेचे दर.

| अ. क्र. | कराचे नाव | सन १९९६-९७ चे करयोग्य मुल्य दर | सन १९९७-९८ करिता प्रस्तावित कर योग्य मुल्य दर. |
|---|---|---|---|
| १. | सामान्य कर | कोणत्याही करयोग्य मुल्यावर<br>१ ते १००० २३%<br>१००१ ते १०००० २४%<br>१०००१ ते २०००० २५%<br>२०००१ ते ५०००० २६% | १ ते २०००० २५%<br>२०००१ ते ५०००० २६%<br>५०००१ ते १००००० २७%<br>१००००१ ते पुढे २८% |
| २. | सर्वसाधारणे | -------- | ---- |
| ३. | साफसफाई कर<br>अ) निवासी कर<br>ब) निवासेत्तर वापर | कोणत्याही करयोग्य मुल्यावर<br>--- ३%<br>--- ६% | कोणत्याही करयोग्य मुल्यावर<br>--- ३%<br>--- ६% |
| ४. | वृक्षकर | --- १% | --- १% |
| ५. | अग्निशमन कर | --- १% | --- १% |
| ६. | मनपा शिक्षणकर | --- १% | --- १% |
| ७. | पथकर | --- १% | --- १% |
| ८. | जलनिःसारण लाभकर | --- १% | --- १% |
| ९. | जललाभ कर | --- १% | --- १% |
| १०. | मोकळया जागेचा कर | योग्य मुल्यावर सामान्य कराचे दराने | योग्य मुल्यावर सामान्य कराचे दराने |

ब) शासनाचे कर

| अ. क्र. | करयोग्य मुल्य रु. | राज्य शिक्षण कर | | रोजगार हमी कर |
|---|---|---|---|---|
| | | निवासी | निवासेत्तर | निवासेत्तर |
| १. | १ ते ७४ | -- | -- | -- |
| २. | ७५ ते १४९ | २% | ४% | १% |
| ३. | १५० ते २९९ | ३% | ६% | १.५% |
| ४. | ३०० ते २९९९ | ४% | ८% | २.०% |
| ५. | ३००० ते ५९९९ | ५% | १०% | २.५% |
| ६. | ६००० ते त्यापेक्षा जास्त | ६% | १२% | ३.०% |

वरीलप्रमाणे "अ" मधील दुरुस्तीसह सन १९९७-९८ करिता करास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. तसेच चर्चेअंती असे ठरले की, मनपा हद्दीतील मालमत्ता कराच्या थकवाकी दराने म्हणणे ऐकुण त्यांना करण्यांत आलेला आकारणी ही योग्य व नियमाप्रमाणे झाली किंवा नाही याची तपासणी करुन त्यासंदर्भात निर्णय घेऊन आयुक्तांना कार्यवाही करण्याबाबत शिफारस करण्याकरिता खालील सदरच व अधिकारी यांची संयुक्त समितीगठन करण्यांत येते.

१) मा. सभापती स्थायी समिती
२) श्री. त्रिंबक तुपे स्थायी समिती सदस्य
३) श्री. सुभाष टाकळकर --//--
४) श्री. अभिमन्यु भालेराव --//--
५) श्री. अ. रशिद खान (मामु) --//--
६) श्री. भगवान घडामोडे --//--
७) श्री. मुख्य लेखा परिक्षक सदस्य
८) श्री. विधी सल्लागार --//--
९) श्री. करमुल्य निर्धारण अधिकारी-२

या ठरावास याच सभेत कायम करण्यांत येऊन सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६६७/१४ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, रामतारा हौ.सो. येथे जलनि:सारण वाहीनी टाकणे बाबत परिसर अभियांत्रिकी विभागाचे सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक र.रु. ३,०८,४१०/- चे तयार करण्यांत आले आहे. सदरील खर्च भांडवली कामे जलनि:सारण हया आर्थिक शिर्षकाखाली करण्यांत येईल. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रामतारा हौ.सो. येथे जलनि:सारण वाहीनी टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत र.रु. ३,०८,४१०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "भाडवली कामे जलनि:सारण" हया शिर्षकाखाली करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६६८/१५ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, गजानन कॉलनी गारखेडा येथे १५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत परिसर अभियांत्रिकी विभागाचे सन १९९४-९५ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक र.रु. १,६२,३६०/- चे तयार करण्यांत आले आहे. सदरील खर्च भांडवली कामे जलनि:सारण हया आर्थिक शिर्षाखाली करण्यांत येईल. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गजानन कॉलनी गारखेडा येथे १५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु.

१,६२,३६०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च भांडवली कामे जलनिःसारण या शिर्षकाखाली करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६६९/१६ :**

औरंगाबाद शहर मंजुर विकास योजनेनुसार १०० फुट रुंद रस्ता क्रांतीचौक ते पैठणगेट हया रस्त्याने न भु.क्र. १४२०५ व १४२०६ हया मिळकती बांधीत होत असुन बाधित क्षेत्र अ.क्र. ८१.४० चौ.मी. व ९२.२५ चौ.मी. आहे. सदर बाधित क्षेत्र संपादन करणेसाठी मिळकत धारकांनी समक्ष वाटाघाटीनुसार संमती दिल्यावरुन मोबदल्याची र.एकुण रु. १२,००,०००/- (रु. बारा लाख फक्त) निश्चित केली आहे. खरेदी खताचा संपुर्ण खर्च मिळकत धारकाने करावयाचा आहे असे ठरले आहे.

मिळकतधारकाने मोबदल्याच्या रक्कमेतुन खरेदी खताची रक्कत वजा करुन उर्वरित रक्कम द्यावी व खरेदी खत करुन घ्यावे असे लेखी अर्जात दिले आहे.

मिळकतधारकांच्या अर्जानुसार खरेदी खताची र.रु. १,५३,१२५/- (रु. एक लाख त्रेपन्न हजार एकशे पंचविश फक्त) वजा करुन रु. १०,४६,८७५/- (रु. दहा लाख सहेचाळीस हजार आठशे पंचाहत्तर फक्त) रक्कमेचा धनादेश मिळकतधारकाचे जी.पी.ए.धारक श्री. शेख सलीम पिता शेख शमशोद्दीन यांचे नांवे काढणेस्तव सादर.

तसेच खरेदी खतासाठी लागणाऱ्या खर्चासाठी म्हणुन अग्रीम र.रु. १,५३,१२५/- (एक लाख त्रेपन्न हजार एकशे पंचविस फक्त) श्री. डी.डी. काळेले, शा.अ.यांना देणेस्तव सादर. प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहर मंजुर विकास योजनेनुसार १०० फुट रुंद रस्ता क्रांतीचौक ते पैठणगेट हया रस्त्याने बाधीत होणारी मिळकत न भु.क्र. १४२०५ व १४२०६ ज्याचे क्षेत्र अ.क्र. ८१.४० व ९२.२५ चौ.मी. आहे. सदर बाधित क्षेत्र संपादनाकरिता वाटाघाटीअंती ठरल्यानुसार रु. १२,००,०००/- (रु. बारा लाख फक्त) खरेदी खताकरिता लागणारा खर्च रु. १,५३,१२५/- वजा करुन उर्वरित र.रु. १०,४६,८७५/- (दहा लाख सेहेचाळीस हजार आठशे पंचाहत्तर) मिळकतधारक श्री. शेख सलीम पिता शेख समशोद्दीन यांना अदाई करण्यांस व खरेदीखतासाठी लागणाऱ्या खर्चासाठी अग्रीम रु. १,५३,१२५/- (डी.डी. काळेले, शाखा अभियंता यांना देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६७०/१७ :**

औरंगाबाद शहर मंजुर विकास योजनेनुसार ५० फुट रुंद रस्ता चेलिपुरा ते रोशनगेट हया रस्त्याने बाधित झालेल्या काही मिळकती पुर्वी महानगरपालिकेने खाजगी वाटाघाटीने संपादीत केल्या होत्या. आता हया रस्त्यातील बाधित मिळकती न भुमापन क्र. ९७३१/पै, ९७९४, ९८०२, ९८०३, १००७८, १००९३, १००९३/१, १०६४५, १०२९५, १०२९४, १०३१०, १०३११, १०३११/१, १०३११/२, १०३१२ व १०३२५ च्या मिळकतधारकांनी रस्त्याखालील क्षेत्र खाजगी वाटाघाटीमध्ये समक्ष देण्यांस संमती दिली आहे. मिळकत धारकांस वाटाघाटीस बोलावुन मोबदल्याची र.रु. ५१,२५,०००/- (रु. एकावन्न लाख पंचविस हजार फक्त) निश्चित केलेली आहे. सोबत मिळकतधारकांशी मा. आयुक्तांबरोबर झालेल्या

अंतीम वाटाघाटीचा मोबदल्याचा तक्ता जोडण्यात येत आहे. हितसंबधीतांच्या मिळकतीचे मालकीहक्काचे कागदपत्रांचे तपासणी नंतरच मिळकत धारकांस मोबदला अदा करण्यांत येईल. तसेच सदर बांधीत क्षेत्र खरेदीखत करुन घ्यावयाचे असलेले खरेदीखतासाठी एकुण रु. ६,६६,५००/-(रु. सहा लाख सहासष्ट हजार पाचशे फक्त) येतो.

सबब वरील मोबदल्याची र.रु. ५१,२५,०००/- हीत संबंधीतास सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे अदा करणेस व खरेदीखते करुन घेण्यासाठी रु. ६,६६,५००/- अग्रीम म्हणुन श्री. डी.डी. काळेले शाखा अभियंता यांना देणेस्तव प्रस्ताव मंजुरीसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहर मंजुर विकास योजनेनुसार ५० फुट रुंद रस्ता चेलिपुरा चौक ते रोशनगेट हया रस्त्याने बाधित झालेल्या काही मिळकती न भु.क्र. ९७३१/पै, ९७९४, ९८०२, ९८०३, १००७८, १००९३, १००९३/१, १०६४५, १०२९५, १०२९४, १०३१०, १०३११, १०३११/१, १०३११/२, १०३१२ व १०३२५ च्या मिळकतधारकांनी रस्त्याखालील क्षेत्र खाजगी वाटाघाटीअंती देण्यांस संमती दिल्यानुसार सदर मिळकतीची एकुण र.रु. ५१,२५,०००/- संबंधीत मिळकतीधारकांना त्यांच्या मिळकतीच्या संपादीत क्षेत्राचा मोबदला देण्यांस तसेच सदर बाधीत क्षेत्र खरेदीखतासाठी येणाऱ्या खर्च रु. ६,६६,५००/- श्री. डी.डी. काळेले शाखा अभियंता यांना अग्रीम म्हणुन देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६७१/१८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिध्दार्थ उद्यान प्राणी संग्रहालय येथील निलगाय व सांबराचे पुस्तुत घरे तोडुन मागील बाजुस बांधणेच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९५-९६ चे जिल्हा दरसुचीनुसार र.रु. ८७,८९०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले होते. व सदरील कामासाठी मा. आयुक्तांनी प्रत्यक्ष स्थळावर दिलेल्या तोंडी आदेशानुसार काम तातडीचे व जनावरांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यावश्यक असल्याने उपलब्ध गुत्तेदार श्री. सुजात अली हश्मी यांचेकडुन सुरु करुन घेण्यात आले होते. व सदर कामाचे अंदाजपत्रक व एजन्सीचे नावास मा. आयुक्तांनी दि. १-६-८५ अन्वये मंजुरी दिली होती. प्रस्तुत कामात निलगायीचे रोड जुन्या रोडची साईज लहान असल्याने नविन दार मोठया साईजचे बांधणे तसेच २) सध्या सांबराचे रोडची साईज ६X४ मी. आहे. ती जनावराची संख्या वाढल्यामुळे कमी पत्रा असल्याने साईज वाढवुन देणे बाबत पशुधन विकास अधिकारी यांनी पत्राव्दारे मागणी केल्याने ९.३०X४.५० बांधावयाची असल्याने तसेच नविन रोडच्या समोर जनावरे जाण्यासाठी जाळीचा रस्ता करणे इ. कामासाठी र.रु. ३७,१३०/- वाढीव खर्चाची गरज आहे. त्यामुळे सदर कामाचे सुधारित अंदाजपत्रक रक्कम रुपये. १,२५,०००/- होत असुन त्यांस दि. १३-१२-९६ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

सबब सदर कामाचे सुधारित अंदाजपत्रक र.रु. १,२५,०००/- ला तसेच सदरचे काम मुळ एजन्सी श्री. सय्यद सुजात हाश्मी यांचे अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर. सदरचा खर्च सिध्दार्थ उद्यान विकास कार्यक्रम या लेखामधुन करण्यांत येईल.

मा. सभापती : आजच्या सभेतील मंजुर करण्यांत आलेल्या सर्व प्रस्तावांना याच सभेत स्विकृती देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

यानंतर मा. सभापती यांना सर्व उपस्थितांचे आभार मानुन जन-गण-मन या राष्ट्र गितानंतर सभा संपल्याचे घोषीत केले.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यान प्राणी संग्रहालय येथील निलगाय व सांबराचे पुस्तुत घरे तोडुन मागील बाजुस बांधणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या सुधारित अंदाजपत्रक र.रु. १,२५,०००/- ला तसेच सदरचे काम पुर्वीचेच गुत्तेदार श्री. स.सुजात हाश्मी यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव, | सभापती स्थायी समिती, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**विशेष स्थायी समिती सभा**

**दिनांक १८-२-१९९७ रोजी विशेष स्थायी समिती सभेचे इतिवृत्त (अर्थसंकल्प सुधारित १९९६-९७ व मुळ१९९७-९८) मंगळवार दि. १८-२-९७ रोजी दुपारी ठिक ३.३० वाजता मा. सभापती स्थायी समिती श्री. गिरजाराम हाळनोर यांचे अध्यक्षते खाली विशेष स्थायी समिती सभा संपन्न झाली. सभेस निम्ननिर्दिष्ट स. सभासद तसेच मनपा अधिकारी उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स.स.श्री. गौतम खरात | सभासद |
| २) | स.स.श्री. रजनी जोशी | --//-- |
| ३) | स.स.श्री. भागवत कराड | --//-- |
| ४) | स.स.श्री. कंवरसिंग बैनाडे | --//-- |
| ५) | स.स.श्री. विजयकुमार मेहेर | --//-- |
| ६) | स.स.श्री. हमीदउद्यीन ताबा | --//-- |
| ७) | स.स.श्री. सुभाष टाकळकर | --//-- |
| ८) | स.स.श्री. त्रिंबक तुपे | --//-- |
| ९) | स.स.श्री. अभिमन्यु भालेराव | --//-- |
| १०) | स.स.श्री. विकास जैन | --//-- |
| ११) | स.स.श्री. रशिद खान (मामु) | --//-- |

सभेची सुरुवात "वंदेमातरम्" या गिताने अंदाजे ठिक ३.३० वाजता झाली.

मा. आयुक्त यांच्या वैनी कै. सुशिला वसंतराव वैद्य यांचे दु:खद निधन झाल्याने सभागृहात ००.०२ मिनिटे श्रध्दाजंली वाहण्यांत यावी.

मा. सभापती : ठिक आहे. सभागृहात ००.०२ मिनिटे कै. सुशिला वसंतराव वैद्य यांना उभे राहुन श्रध्दाजली वाहण्यांत आली.

मा. आयुक्त : नविन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा व्यक्त करुन मा. सभापती स्थायी समिती यांना महानगरपालिकेचा अर्थसंकल्प (सुधारित १९९६-९७ व १९९७-९८) सादर करुन महानगरपालिकेच्या अर्थसंकल्प) बाबत माहिती वाचुन दाखविली व ॠणनिर्देष सभागृहात मानले. (अर्थसंकल्प पुस्तकातुन पृष्ठ क्र. १ ते ४)

मा. सभापती : मा. आयुक्त यांनी अर्थसंकल्पाविषयी माहिती सांगितली याबाबत स.स.नी चर्चा करावी.

श्री. हमीद ताबा : अर्थ संकल्प स्थायी समोर मांडत असतांना पुर्वी काही दिवस अगोदर अर्थसंकल्पाच्या प्रति स.स.ना वाचण्यांत द्यावयास पाहिजे होते.

मा. सभापती : अर्थसंकल्पाची पध्दत मुळात अशीच आहे. आपण पाहाल तर संसद ते विधानसभा व महानगरपालिकेत सुध्दा अशीच पध्दत अवलंबील्या जाते. आणि ही पध्दत बंद करणे योग्य नाही आपणांस या अर्थसंकल्पात चर्चेव्दारे काही सुधारणा करावयाच्या असल्यास त्या करु शकता येते. आपण आताच मा. आयुक्त यांनी प्रस्ताविकात जे सांगितले त्याप्रमाणे मागील अर्थसंकल्प जवळपास ८४-८५ कोटीचे सादर केलेले होते. यात अनेक आकडे मोठया

प्रमाणात फुगवुन टाकलेले होते. विशेषतः जकातीमधुन जे वर्षभरात ४७-४८ कोटीचे टारगेट ठेवलेले होते. त्यापैकी महाराष्ट्र डिस्टलरीज व बीडीए यांचे कडील थकबाकी रु. ८.०० कोटी दाखविलेले आहे. प्रत्यक्षात मात्र रु. ८६ कोटीचे आहे म्हणजे या ठिकाणी जकात कमी झाली. त्यानंतर शासनाकडे आपण प्रस्ताव पाठवुन वाढीव जकातीवर उत्पन्न मिळणार होते. शासनाकडील प्रस्ताव मंजुर न झाल्याने वाढीव उत्पन्न मिळु शकलेले नाही. या जकातीमध्ये खरे तर ३.०० कोटीचेच उत्पन्न महाराष्ट्र डिस्टलरीज व बिडीए यांचेकडुन मिळणार होते. यातही रु. २.०० कोटीची वाढ दाखविली म्हणजे जकातीपोटी रु. १०.०० कोटीची वाढ व शासनाकडुन विशेष अनुदान मागीवर्षी रु. १०.०० कोटी मिळाले ते आर्थिसंकल्पात दाखविलेले आहे. म्हणजे एकुण रु. २०.०० कोटीचे जास्त उत्पन्न मनपाच्या अर्थसंकल्पात दाखविण्यात आलेले होते. आताचा जो अर्थसंकल्प सादर केलेला आहे. जवळपास ७९-८० कोटीचा हा खराखुरा अर्थसंकल्प मनपाच्या आहे. यात महानगरपालिकेचेच उत्पन्न गृहीत धरलेला आहे.

डॉ. मेहेर : या अर्थसंकल्पात पृष्ठ क्र. २ मध्ये मागील वर्षीपेक्षा सन १९९७-९८ चा अर्थसंकल्प १५.१६ कोटीने म्हणजे २३% ने अधिक आहे. याबाबत काही ॲनालिसीस केलेले आहे काय?

लेखाधिकारी : मागील वर्षी रु. ३७.०० कोटी जकातीपोटी गृहित धरलेले होते. या वर्षी रु. ३.०० कोटी वाढ अपेक्षीत धरुन रु. ४०.०० कोटी करण्यांत आलेले आहे. मार्च पर्यंत ही वाढ शेडयुल्ड अपेक्षित असतो. जसे जकातीपासुन निव्वळ उत्पन्न ३२.०० कोटी व शेडयुल्डमध्ये वाढ सुचविल्यामुळे अपेक्षित उत्पन्न रु. ५.०० कोटी असे ३७.०० कोटी व ३.०० कोटी थकीत मिळतील या अपेक्षेने रु. ४०.०० कोटी आहे.

डॉ. मेहेर : मागील वर्षी आपण जे नविन कर आकारणी करण्याबाबत प्रस्ताव शासनाकडे पाठविलेला आहे. त्याप्रमाणे काय अंमलबजावणी होते आहे.

उप आयुक्त-१ : शासनाची मंजुरी मिळाल्यापासुन अंमलबजावणी करण्यांत येईल.

डॉ. मेहेर : जकातीमध्ये रु. १०.०० चे २० ट्रॉझीट बाबत केलेले आहे. तेव्हा रु. १५ करावे.

मा. सभापती : मागील वर्षी १५ चे केलेली होती. त्यामुळे यावर्षी ५ ने वाढ करण्यांत आलेली आहे.

डॉ. मेहेर : जकात नाक्यावरील काटा चालु का केलेला नाही. विद्युतची ना हरकत प्रमाणपत्रा बाबत गेल्या महिन्यापासुन प्रश्न प्रलंबित आहे. याबाबत आवश्यक ती कार्यवाही करुन जकात नाक्यावरील काटयाबाबत वेगवेगळया ठिकाणी जाहिरात बोर्ड तथा वर्तमानपत्रातुन जाहिराती द्याव्यात ज्यामुळे मनपाचे उत्पन्न वाढले. काटयापासुन किती उत्पन्न मिळते?

मा. सभापती : काटयापासुन आतापर्यंत किती उत्पन्न मनपाला मिळाले आहे.

उप आयुक्त-१ : उत्पन्न मिळते आहे. परंतु नेमका आकडा आता सांगता येणार नाही.

मा. आयुक्त : जकात नाक्यावरील काटयाचे उद्घाटन करुन टाकावे.

श्री. हमीद ताबा : ट्रांझीट फिस रु. २०.०० ही वाढ योग्य आहे.

मा. सभापती : ठिक आहे.

डॉ. महेर : महाराष्ट्र डिस्टलरीजची थकबाकी रु. ८.०० कोटी आहे.

मा. आयुक्त : रु. ४.८६ कोटी थकबाकी आहे.

डॉ. मेहेर : विज बाबत दंड व्याज विद्युत मंडळ घेत असेल तर त्याबाबत मा. उप-मुख्यमंत्री यांचेकडे चर्चा करुन कार्यवाही करता येईल.

मा. आयुक्त : शासनाकडे विनंती करावी लागणार आहे आणि त्याबाबत सर्वसाधारण सभेत प्रस्ताव ठेवावा लागणार आहे.

श्री. रशिद मामु : शासनाकडुन या वर्षी रु. १५.०० कोटी मिळणार आहेत काय?

मा. सभापती : मा. पालकमंत्री यांचेशी मागे चर्चा झालेली आहे. कमीत कमी रु. १०.०० कोटी मनपाच्या विकास कामासाठी देतील.

डॉ. मेहेर : सर्वसाधारण सभेत विज दर काज माफ करणे बाबत प्रस्ताव घेऊन शासनाकडे पाठवावा. याबाबत मी स्वतः मा. उप मुख्यमंत्री महोदय यांना भेटुन विज दराची दंडात्मक कार्यवाही माफ करणे बाबत बोलणी करतो.

मा. आयुक्त : ठिक आहे.

मा. सभापती : आपल्याला शासनाकडुन रु. १०.०० कोटी मिळणार असल्याचे तोंडी सांगितल्याने या अर्थसंकल्पात घेतलेले नाही.

मा. सभापती : पाणीपट्टी वाढ यावर्षी रु. ४००/- केलेली आहे.

श्री. हमीद ताबा : रु. ४००/- ही वाढ योग्य नाही तो कमी करावी.

मा. सभापती : मागील वर्षी पाणी पट्टीत वाढ करण्याच्या मंजुर करुन शासनाकडे पाठविलेला होता. परंतु तो मंजुर न झाल्याने काहीच करता आले नाही. कारण बी.पी.एम.सी. ॲक्ट प्रमाणेच आपणांस कार्यवाही करता येऊ शकते. त्याशिवाय नाही.

श्री. रशिद मामु : आपण सर्वसाधारण सभेत वेगवेगळया कामाचे बाबतीत चर्चा करतो व खर्च करण्याची तरतुद करावयास सुचवितो परंतु याबाबत पैसा काढुन आणायाचा आराखडा तयार करणे आवश्यक आहे.

मा. सभापती : मागील वर्षी पुर्वीपेक्षा फक्त रु. १००/- ने वाढ पाणी पट्टीत केलेली होती. परंतु शासनाची मंजुरी न मिळाल्याने आपण ती वसुली करु शकलेलो नाही. तशी गेल्या वर्षीच रु. ६००/- वाढ प्रशासनाने केलेली होती. व त्यास जोडुन रु. ४००/- ची वाढ यावर्षी प्रशासनाने केलेली आहे. तर यामध्ये रु. १०००/- वाढ करणे व सामान्य माणसावर फार ओझे टाकणे संयुक्तीक वाटत नाही. तेव्हा यामध्ये मागील वर्षी रु. ६००/- ची वाढ असे गृहीत धरुन यावर्षी रु. २००/- असे मिळुन एकुण रु. ८००/- ची वाढ करण्यांत यावी.

सौ. जोशी : मागील वर्षीचे रु. ६००/- वाढ व यावर्षीचे १००/- असे मिळुन रु. ७००/- ची वाढ करण्यांस हरकत नाही.

मा. सभापती : पाणीपट्टी वसुली आपणांस येणे किती बाकी आहे.

लेखधिकारी-१ : सन १९९५-९६ चे पाणीपट्टी थकबाकी रु. २.८२ आणि सन १९९६-९७ ने करंट मागणी रु. ३.६२ कोटी म्हणजे एकुण रु. ६.४७ कोटीची मागणी आहे.

मा. सभापती : आणि खर्च किती होत आहे?

लेखा-१ : रु. ६.०० येणे होते व वसुली रु. २.०० कोटी झाली बाकी मार्च-९७ पर्यंत वसुली होईल एकुण खर्च रु. १८.०० कोटीचा आहे. म्हणजे रु. १३.०० कोटी लॉसमध्ये आहे.

श्री. हमिद ताबा : शहरातील लोकसंख्येच्या मानाने नळ कनेक्शन किती आहेत. याची माहिती द्यावी.

डॉ. मेहेर : ग्रामपंचायतीप्रमाणे, महानगरपालिकेत सुध्दा घरपट्टी व पाणी पट्टीचे नोटीसा एकावेळी नागरिकांना देण्यात याव्या. जेणे करुन भरणा करणाऱ्यांना सोयीस्कर होईल व थकबाकी जास्तीचे राहणार नाही व त्यामुळे प्रशासनालाही जास्तीचे कामे वाढणार नाही. तेव्हा दोन्हीही नोटीसा एकाच ठिकाणी देण्याची कार्यवाही करावी.

मा. सभापती : स.स.नी. सुचित केल्याप्रमाणे मालमत्ता व पाणीपट्टी व इतर कर हे सव्र एकाच कागदावर/नोटीसीत दर्शविली गेली पाहिजेत याबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

डॉ. मेहेर : शहरात अनेक छोटे मोठे हॉटेल्स्, गॅरेज, दुकाने व इतर व्यावसायीक आहेत. पैकी फक्त ५९० व्यवसायिक नळ कनेक्शनधारक आहेत काय? याबाबत अनेक व्यवसायिक आहेत. याची पडताळणी करुन कार्यवाही होणे आवश्यक आहे.

लेखा -१ : यावर्षी अनाधिकृत व्यवसायिक व नागरिकांकडील नळ कनेक्शन बाबतिं सर्व्हे करुन शोध मोहिमेव्दारे कार्यवाही करण्याची कामे चालु आहेत.

उप आयुक्त -१ : व्यावसायिक व प्रत्येक घरोघरी जाऊन नळांचा सर्व्हे करुन अनाधिकृत नळ शोध कार्यचालु आहे.

श्री. रशिद मामु : शहरातील अनाधिकृत नळ शोध मोहिमेचा सर्व्हे करण्यापेक्षा नळ व घरांचाही दोन्हीही बाबतीत सर्व्हे होणे गरजेचे आहे. त्यामुळे टॅक्स वाढण्याची शक्यता असते. ज्यामध्ये घरमालक आहे की किरायादार कुनाच्या मालकीची जागा/घर आहे. त्या ठिकाणी नविन बांधकाम झाले आहे काय? नळ कनेक्शन कोणत्या प्रकारचे घेतलेले आहे. या सर्व बाबींचा सर्व्हे एकाच वेळेस करुन कर आकारणी करावी केवळ नळाचा सर्व्हे वारंवार करण्यांत काहीच उपयोग नाही.

श्री. हमीद ताबा : मागे स्थायी समितीमध्ये निर्णय झाल्याप्रमाणे प्रत्येक घरोघरी जाऊन नळाचे नंबरिंग नेमप्लटसहीत लावण्यांची कार्यवाही करण्याचे सुचित केले होते. त्याप्रमाणे कार्यवाही झाली काय?

मा. सभापती : याबाबतची कार्यवाही झाली म्हणुन नळांची संख्या किती आहे हे आपल्या निदर्शनास आले.

श्री. रशिद मामु : याचसाठी शहरातील प्रत्येक घरांचाही सोबतच सर्व्हे करुन घरनंबर देणे आवश्यक आहे.

डॉ. महेर : व्यावसायिक नळ कनेक्शनधारक आहेत त्याचेकडुन ताबडतोब कर वसुली करावी सोबतच अनाधिकृत नळ शोधावी.

लेखा-१ : याबाबत आकृतिबंध कार्यक्रम आखुन प्रशासन योग्य ती कार्यवाही करणार आहे.

उप आयुक्त-१ : आता मार्च महिन्यापर्यंत वसुलीचे कामाकरिता कर्मचारी लागलेले असुन एप्रिल महिन्यानंतर जनगणनेनुसार प्रत्यक्षात सर्व्हे करण्याची कार्यवाही करावी लागणार आहे. त्यामुळे घरांचा/व्यावसायिक/किरायादार वगैरे बाबत घर व नळ शोध मोहिम एकाच वेळी घेऊन एकत्रित डाटा तयार करुनच कार्यवाही अपेक्षीत आहे.

डॉ. मेहेर : माहे एप्रिलनंतर मालमत्ता कराची बिले आकारणी बाबत कार्यवाही करण्यांची अपेक्षा आहे.

श्री. रशिदमामु : शहरातील कर आकारणी कमी आहे. आणि खर्च जास्त आहे. बऱ्याचशा ठिकाणी पाणी वापरुन घेतात. याबाबत कार्यवाही होणे आवश्यक आहे.

मा. सभापती : पाणी पट्टी वसुलीद कमी होण्याचे कारण बऱ्याच ठिकाणी पाणी चोरुन वापरल्या जाते. तेव्हा अशा काही बाबतीत शोधुन संबंधीत विरुध्द फौजदारी कार्यवाही करावी. त्यामुळे शहरातील लोकांना भिती तयार होईल.

श्री. रशिद मामु : फौजदारी कार्यवाही जरी करण्याचे प्रकार शासनाने केले तरी आपल्याकडील नागरिक स.स.ने दबाव आणुन प्रकरण स्थगित ठेवण्यांसाठी प्रयत्न करतात. यासाठी मालमत्ता व पाणी पुरवठा बिले एकाच वेळी देण्याबाबतची कार्यवाही करावी.

मा. सभापती : ठिक आहे.

डॉ. मेहेर : मालमत्ता व पाणीपट्टी वसुली झोन कार्यालयाकडुन केली जाते. तेव्हा त्या अधिकाऱ्यांनी किंवा कर्मचाऱ्यांनी वसुली साठीचे जे उदिष्ट असेल त्यापेक्षाही जास्त केल्यास प्रोत्साहीत म्हणुन त्यांना योग्य ते बक्षीस देण्याबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

लेखा-१ : वर्षातील फ्रेब्र. व मार्च हे दोन महिने असे आहेत की, दोनच महिन्यांत जवळपास ८०% वसुली थकबाकी शासकीय/निमशासकीय व इनकम टॅक्स पेथेवल यांना सोयीस्कर पडते व मनपाची वसुली मोठया प्रमाणात होते.

मा. सभापती : मालमत्ता कर व पाणीपट्टी उद्दीष्टापेक्षाही वसुली करणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात यावे. परंतु पाणीपट्टी वाढ कुणावर होत आहे जे नागरिक रेगुलर भरतात त्यांचेवरच होत आहे.

श्री. रशिद मामु : अनाधिकृत नळ कनेक्शन बाबत शहरात अनेकदा सर्व्हे झालेला आहे. परंतु प्रशासनाचा काहीही फायदा झालेला नाही.

मा. आयुक्त : या सभागृहात स.स. चांगल्या कामासाठी सारखे चर्चा करतात ही बाब अतिशय चांगली आहे शहरातील लोकप्रतिनिधी पाणीपट्टी वाढीबाबत चर्चा करतात. जनतेमध्ये पाणीपट्टी वाढीबाबत मोर्चे येतात आणि त्यामुळे प्रशासनाला थोडया फार प्रमाणांत विचार करावा लागतो. दरवर्षी मनपाला पाणीवर १८.०० कोटी रु.खर्च करावा लागतो.यातुन उत्पन्न फक्त रु.५.०० कोटी मिळते आणि रु. १३.०० कोटी घाटा दरवर्षीचा मनपास सोसावा लागतो. शासनाची अशी योजना आहे की, नफा ना तोटा याप्रमाणे येणारा उत्पन्न आणि जाणारा खर्च याचा मेळ कसा बसेल अशा रितीने लोकप्रतिनिधी नी आपला वाटा उचलावा. जेणेकरुन नागरिकांत कोणत्याही जिवनावश्यक वाढीबाबत प्रक्षिम होतच असतो. परंतु प्रशासनास कठोर निर्णय घेण्याकरिता भाग पाडणे आवश्यक असते. त्यासाठी लोकप्रतिनिधी यांनी याच बाबतीत ठोसय निर्णय घ्यावा. लोकांचे कामे करित असतांना त्याना घ्यावयाचे इतर सर्व्हीसेस आपण देतो किंवा नाही हे सुध्दा आपण पाहिले पाहिजे जे अनाधिकृत नळ कनेक्शन आहेत ते तोडावयास पाहिजे. आज डामेस्टीक नळ कनेक्शनच्या नावाखाली बरेचसे नागरिक/व्यावसायिक ३" नळ कनेक्शन अनाधिकृत रित्या घेऊन वापरत आहेत त्यांच्याही शोध घेणे आवश्यक आहे. जी नळ कनेक्शन आहेत परंतु मनपात त्यांची नोंद नाहीत त्याबाबत कठोर कार्यवाही साठी पाहिजे. यावर्षी मिटर बसविण्यांची कार्यवाही आहे. त्याप्रमाणे नागरिकांना मालमत्ता व पाणीपट्टी वसुलीसाठी

एक पासबुक बनविण्यंचा प्रशासन कार्यवाही करणार आहे. यामध्ये दोन्हीही कर व इतर करांचा त्यात समावेश असेल व ज्यामुळे नागरिकांना कराबाबत संपुर्णपणे माहिती मिळु शकेल. जनतेपासुन प्रशासनाला अनेक बाबतीत विचारणा होते. पुंडलिकनगर येथील नागरिक पाण्यासाठी सारखे प्रक्षोभ करतात. त्याचा विचार मानुसकीच्या दृष्टीकोनातुन करणे आवश्यक आहे. यासाठी कठोर निर्णय घेण्याची सभागृहाला नितांत आवश्यकता आहे. रु. १८००/- पाणीपट्टी वाढीचा प्रस्ताव होता. परंतु लोकप्रतिनिधीचा विरोध लक्षात घेता टप्याटप्याने याबाबत सुधारणा घडवुन आणता येतील. पाणी काटकसरीने कसे वापरता येईल. याचाही विचार करणे आवश्यक आहे. आता प्रशासनाने पाणीपट्टी वाढ रु. १०००/- प्रस्तावित केलेली आहे. याबाबत सभागृहाने निर्णय घ्यावयाचा आहे. शहरातील विकासाची कामे करण्याच्या दृष्टीने योग्य तो निर्णय घ्यावा अशा मी विनंती करतो.

सौ. जोशी : पाणीपट्टीची वाढ रु. १०००/- दर्शविण्यांत आलेली आहे. ते सहजासहजी वसुल होणे शक्य नाही. शहरापेक्षा सिडको भागातील पाणीपट्टी वसुली फार मोठया प्रमाणात होते. तेव्हा मागील वर्षीची रु. १००/- ने वाढ करुन प्रशासनाने कार्यवाही करावी.

डॉ. महेरे : माझील अशी एक विनंती आहे की, शहरात २००० स्टॅड पोस्ट आहेत. तेव्हा सभागृहाने अशा निर्णय घ्यावा की, येणाऱ्या वर्षात एकही स्टॅन्ड पोस्ट देण्यांत येऊ नये.

श्री. हमीद ताबा : नाही तसे करणे योग्य नाही कारण शहरातील स्लम भागात स्टॅन्ड पोस्ट देणे आवश्यक आहे.

श्री. रशिद मामु : नेहरी अंबरचे पाणी जसे आपण शहरातील नागरिकांना देतो. त्याप्रमाणे शहरात बऱ्याच ठिकाणी विहीर आहेत रेल्वेस्टेशन, लोटा कारंजा, जवाहरकॉलनी वगैरे ठिकाणी आहेत. त्यातील पाणी पिण्यासाठी घेऊन पाणी साठविण्याबाबत प्रशासनाने आवश्यक ती कार्यवाही करावी.

कार्य. अभि. : मेहरु अंबरचे परकोलेशन आता होत नाही. हर्सुल तलावामुळे आपण त्या ठिकाणातुन पाणी घेत नाही.

श्री. रशिद मामु : मलीक अंबर नेहरमधुन पाणी बरेचसे शेतकीर/विटभटयावाले चोरुन घेतात. शिवाय पाणचक्की येथील पाणी सहा महिने सारखे वाहत असते. यासाठी शहराच्या पिण्याच्या पाण्याच्या माध्यमातुन साठा करणे आवश्यक आहे.

मा. सभापती : मागील लोकसभेच्या निवडणुकीच्या आचारसंहितेपुर्वी निर्णय झालेला होता. की, पाणचक्की येथील पाणी शहरात वापरण्यासाठी प्रशासनाने आवश्यक ती कार्यवाही करावी. परंतु प्रशासनाने अद्यापपावेतो कार्य कार्यवाही केली. वफत बोर्डाकडुन ना हरकत प्रमाणपत्र तरी घेतले आहे काय?

कार्य. अभि. : ठिक आहे.

श्री. रशिद मामु : सन १९७५ ला दुष्काळ पडलेला होता. त्यावेळी पाणी शहरासाठी कोठुन घेतलेले होते. १) रेल्वे स्टेशन २) जवाहर कॉलनी ३) बेगमपुरा ४) व काही ठिकाणचे विहीतील पाणी विकत घेण्यांत येत होते.

मा. सभापती : स.स.नी सुचना केल्याप्रमाणे पानचक्की येथील पाणी घेण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही प्रशासनाने करावी. याबाबत शहरासाठी पाणी पुरवठा व्यवस्थीत राहणेसाठी मनपाने स्वतःचे सोर्सेस करणे आवश्यक आहे.

मा. आयुक्त : याबाबत पुढील बैठकीत अहवाल द्यावा.

श्री. गौतम खरात : आपण शहराच्या विकासाच्या बाबतीत चर्चा करीत असतांना सन १९७५ ची लोखसंख्या जी होती. ती आज चौपट झालेली आहे. आजही पाण्यासाठी शहरवासीयांना जायकवाडी धरणाचे पाण्यावर विसंबुन रहावे लागते. पेक्षा पानचक्की /नेहरी अंबर/ विहिरी याबाबत प्रशासनाने आवश्यक ती कार्यवाही करुन पिण्याचे सुविधा शहर वासियांसाठी करुन घेणे आवश्यक वाटते. आजही शहरातील ५०% नळ कनेक्शन अनाधिकृत आहेत. ज्या भागात दाट लोकवस्ती आहे. उदा. स्लम भाग त्याठिकाणी घराला घर लागुन असतात व ते मोलमजुरी करणारे लोक असतात. त्यांचेकडे पाणी साठविण्यासाठी कोणत्याही प्रकारचे साधन नाही. आणि मोठमोठया कॉलनीत मात्र सुविधा असतात. तेव्हा कॉलनी आणि स्लम भाग यामधला फरक समजुन घेणे आवश्यक आहे. आजही मनपाचा रु. १३.०० कोटीचा तोटा संपवु शकणार नाही. अनाधिकृत नळ कनेक्शन पोलिस मदत विना करणे शक्य नाही. त्याचप्रमाणे स्लम भागामध्ये स्टॅन्ड पोस्ट देणे आवश्यक आहे.

डॉ. मेहेर : व्यापारी कनेक्शन वाढवावे परंतु पाणीपट्टी वाढ करुन नये.

मा. सभापती : १) शहरातील बऱ्याच भागातील स्टॅन्ड पोस्टच्या ऐवजी नळ कनेक्शन दिल्यास त्या लोकांना सवलत देण्यांत येईल.
२) पाणीपट्टी वर्षातुन दोनदा वसुल करण्यांची कार्यवाही करावी.
३) घरगुती पाणीपट्टी दरवर्षी वाढ रु. ८००/- (६००+२००)
४) व्यापारी/व्यावसायिक यांना पाणीपट्टी वाढ रु. ५००/-
५) उत्पन्नाची इतर साधने (१)(२)(३)
६) होर्डींग रु. ५.०० प्रति चौरस फुट करण्यांत येते.

मालमत्ता अधि. : होर्डींगबाबत खाजगी जागा व मनपाची जागा असा वेगवेगळया दर आकारणी करण्यांत येते. त्याचप्रमाणे सुपर मार्केट व इतर दुकाने यांचे भाडयावर ५% वाढ

श्री. रशिद मामु : शासकीय कार्यालये आहेत. त्यांना सार्वजनिक बांधकाम खात्याचे नियमाप्रमाणे आकारणी केली जाते.

मा. सभापती : १) सुपर मार्केट व इतर दुकाने यांचे भाडयावर ५% वाढ.
२) शो टॅक्स १५% ऐवजी १००% वाढ
३) खत बि-बियाने पुर्णपणे माफ या ऐवजी १% व किटकनाशक यांचेवर १% वाढ.
४) स्ट्रिल स्क्रॅप मटेरिअल १% ऐकरी २% जकात वाढ.
५) ट्रान्सीट फिस रु. १०/- ऐवजी रु. २०/-

श्री. रशिद मामु, श्री. हमीद ताबा : शादीखान/मंगळ कार्यालये येथील ठिकाणी कार्यक्रमातुन हजारो रु. खर्च करतात. एका दिवशी रु. ५०/- हजाराचा खर्च करतात. त्यांचेवर टॅक्स आकारणी करावी.

उप आयुक्त-१ : विशेष साफसफाई करामध्ये मोठमोठे हॉटेल्स्/दवाखाने:मंगल कार्यालये व इतर सर्व यांचेसाठी विशेष साफसफाई कर योग्य मुल्यावर ३% घेण्याचे प्रस्तावित आहे.

मा. सभापती : ठिक आहे. विशेष साफसफाई कर कर योग्य मुल्यासह ३% यानंतर सन १९९७-९८ साठीच्या अर्थसंकल्पाची ठळक वैशिष्टये यावर चर्चा करावयाची आहे. (पृष्ठ क्र. ३)

१) मनपा/ अधिकारी/ कर्मचारी आकृतीबंध याबाबत माहिती द्यावी.

लेखा- १ : प्रशासकीय दृष्टीकोनातुन अत्यंत म्हत्वाचा समजला जाणारा कर्मचारी आकृतिबंध तयार करण्यांत आलेला नाही. त्यासाठी प्रशासन योग्य रितीने व योग्य गतीने चालण्यांकरिता प्रत्येक विभागात किती कर्मचारी वर्ग असावा. नियंत्रण अधिकारी किती असावेत, विभाप्रमुख म्हणुन किती विभाग असावेत यास्तव प्रत्येक विभागाकरिता आवश्यक कर्मचारी वर्ग नॉर्मसनुसार असणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने "मनपा कर्मचारी आकृतीबंध" तयार करण्यांत आलेला असुन मंजुरी प्राप्त नुसार व सर्वसाधारण सभेत परिपुर्ण माहिती देण्यांत येईल. या आकृतीबंधानुसार अथवा श्रेणीवाढ केल्या मनपाच्या अस्थापनेवर खर्च महसुली उत्पन्नाच्या ३८% च्या वर जात नाही. शासनाच्या ४२% अस्थापना खर्चाच्या धोरणानुसार हा खर्च मर्यादित आहे.

डॉ. मेहेर : याबाबतची माहिती दयावी. आपल्याकडे गेल्या दहा वर्षापासुन फिक्स रोजंदारीवर काम करित आहेत. त्यांचे बाबतीत आवश्यक ती कार्यवाही करावी.

श्री. रशिद मामु : शासनाकडे २०० मजुर कर्मचाऱ्यांची मंजुरी बाबत प्रस्ताव पाठविलेला आहे. त्यास मंजुरी नुसार कार्यवाही करणार काय?

मा. आयुक्त : शासनाकडे सर्वसाधारण सभेच्या मंजुरीनुसार प्रस्ताव पाठविण्यात आला असता शासनाचे असे म्हणणे आहे की, ४२% च्या आतील प्रशासकीय खर्च येत असल्यास आपल्याच अखत्यारित मंजुरी पदानुसार कार्यवाही करावी. शासनाकडे पाठविण्याची आवश्यकता नाही. त्यानुसार योग्य रित्या अभ्यास व पडताळणी करुन प्रशासकीय कार्यवाही करण्यात येणार आहे.

श्री. अ. रशिद खॉन (मामु) : सुरुवातीचे २०० मजुरांचे पदे व ८०० मिळुन १००० पदे आपण भरणार काय?

मा. आयुक्त : अभ्यास करुन या सर्व १००० पदांबाबत आवश्यक ती मंजुरी सर्वसाधारण सभेसमोर घेऊनच कार्यवाही करण्यात येईल.

डॉ.विजयकुमार मेहेर : जे कर्मचारी जुने आहेत. त्यांचे बाबतीत प्राधान्य द्यावे आणि काही कर्मचाऱ्यांना दोन-तीन वर्षच सेवा समाप्तीचे राहिलेले आहेत. त्यांचे बाबतीत आवश्यक ती कार्यवाही करावी.

लेखाधिकारी : याबाबत आकृतिबंध आराखडा तयार करुन माहिती देण्यात येईल. यामध्ये ६०० ते ७०० कर्मचारी चतुर्थ श्रेणीचे तर ३०० कर्मचारी तृतिय श्रेणीचे असतील.

मा. सभापती : महापालिकेच्या मंजुर आर-आर प्रमाणेच कार्यवाही करण्यात यावी.

२) सुरत पॅटर्नवरील स्वच्छता कार्यक्रम.

आरोग्य वैद्यकिय अधिकारी : या पॅटर्नमध्ये एक सुकाणु समिती नेमण्यात येईल. त्या समितीमध्ये मा. महापौर, आरोग्य प्रमुख व नगर रचना संचालक असुन

कार्यकारी अभियंता जलनिःसारण व विधी सल्लागार हे सुध्दा राहतील. या पॅटर्नमध्ये स्वच्छते बाबत कमिटी (कंटेनर्स) असुन सबकमिटी त्यांचे अधिपत्याखाली काम पाहाते. सदरची कमिटी २४ तासात ४८ तासात तक्रार निवारण करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करेल. आणि याबाबत प्रशासकीय दंड फिस व हॉटेल मालकाकडुन दंड आकारला जातो. या संदर्भात लोकप्रतिनिधी व लोकांनी या कार्यालयात दिवस भरात आपल्या तक्रारी नोंदवावयाच्या आहेत व त्याची दखल १) एक दिवसात निवारण होईल. २) तीन दिवसांत निवारण होईल. ३) आणि सांत दिवसात निवारण होईल. अशा तक्रारी व आरोग्य विषयक तक्रारी २४ ते ४८ तासात निकाली काढता येतील. यामध्ये कंटेनर कोठे आहे. त्या ठिकाणी नांवे कचराकुंडया कोठे आहेत. ती ठिकाणे मोठया प्रमाणात कचरा साठविण्याची ठिकाणे व मनपातर्फे स्वच्छ केले जाणारे रस्ते आदींचा समावेश राहील.

श्री. अ. रशिद खॉन (मामु) : शहरात १०-२० ट्रॉली रस्त्यावर ठेवुन कार्यवाही केल्यास?

डॉ. भागवत कराड : शहरात ८०% ठिकाणी नागरिक केरकचरा कचराकुंडीत न टाकता आजु बाजुस टाकतात. तर २०% नागरिक कचरा कुंडीत टाकतात. यासाठी योग्य वळण लागण्यासाठी मनपातर्फे आवाहन करणे. त्या शिवाय कचरा रस्त्यावर पसरु नये. म्हणुन कुंडयावर ताडपत्र्या टाकुन ठेवण्याची पध्दत असावी.

श्री. अ. रशिद खान (मामु) : मी माझ्या वार्डात एका ठिकाणी केरकचरा टाकण्यासाठी एक मोठा चबुतरा तयार केलेला आहे. व त्यावर कुंडी ठेवलेली आहे. तो एक प्रयोग माझ्या वार्डात केलेला आहे. व तो यशस्वी वाटतो.

मा. आयुक्त : सुरत हे शहर सर्वात बेसुरत अशी गणना होती. परंतु आज तेथील आयुक्त यांनी या शहराचा चेहराच बदलुन टाकला असुन सुरत चे खुबसुरत शहर संबोधलया जात आहे. या शहराची सुरत पॅटर्नची कार्यवाही इतर शहरांमध्ये राबविलया जात आहे. मुंबईत याबाबत अंमलबजावणी सुरु झाली आहे. आणि पुणे या बाबतची कार्यवाही सुरु होत आहे. मुंबई/पुणे येथील उपमहापैरांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समिती सुरत याठिकाणी जाऊन आली. दिनांक २५-२६ ला त्याठिकाणी एक आखील भारतीय पातळीवरील सेमिनार भरत आहे. त्या सेमिनारला प्रत्यक्ष जाऊन पाहणी करुन अहवाल सादर करण्यांत येईल. सुरत पॅटर्न जर पटण्यासारखे असेल तर निश्चितच सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव दाखल करता येईल. आपल्या महानगरपालिकेची स्थिती अतिशय वाईटही नाही आणि अतिशय चांगलीही नाही. परंतु कर्मचारी चांगल्याप्रकारे काम करतात. त्यांचे कौतुक शक्यास हवे. याबाबत जर अहवाला वरुन तसे चांगले म्हत्व पटले तर स. सदस्यांना सांगण्यात येईल व त्यांनतरही काही स. सदस्यांना पाहणी करण्यासाठी पाठविण्यात येईल. त्याठिकाणी ४५ दिवसांत ९० हजार रुपये खर्च केले आहे. यासाठी लोकांचेही सहकार्य म्हत्वाचे आहे.

श्री. अ. रशिद खॉन (मामु) : जसे यापुर्वी विभागीय आयुक्त श्री. लखीना यांचे लखीना पॅटर्न प्रत्येक कार्यालयातुन त्याचा उपयोग करीत होते. त्याप्रमाणेच या सुरत पॅटर्नचा अहवाल पाहुन कार्यवाही करता येईल. यासाठी वाटल्यास एका दिवसांचा पगार देण्याबाबत सुध्दा आवाहन करण्यात येईल. व कार्यक्रम

शहरातील साफसफाई आणि औरंगाबाद शहर स्वच्छ शहर सुंदर शहर कसे दिसेल याकडे विशेष लक्ष देण्यात येईल. याकामी सर्व स. सदस्यांचे सहकार्य निश्चितच लाभेल.

मा. सभापती : ठिक आहे. याबाबत कार्यवाही व्हावी.

३) घन कचऱ्यांपासुन खत निर्मिती प्रकल्प.

आरोग्य वै. अधिकारी : नारेगांव येथिल प्रकल्प असुन तयापासुन खत निर्मिती प्रकल्प तयार करण्यांत येणार आहे.

मा. सभापती : या खत निर्मिती प्रकल्पासाठी वीज व पाणी खर्च सुध्दा संबंधीत एजन्सीज स्वतः करणार आहे.

श्री. अ. रशिद खॉन (मामु) : नारेगांव याच ठिकाणी प्रकल्प सादर करता येते काय? माझ्या मते विमानतळापासुन १०.०० कि.मी. अंतरावर नारेगांव भाग आहे तर तो प्रकल्प सुरळित होईल काय याची पाणी करावी. कारण ६ एकर जागेमध्ये सदरील प्रकल्प राबविण्याची आहे. तेव्हा इतरत्र जागा पाहणी करावी.

मा. आयुक्त : येथील केरकचऱ्यापासुन दुर्गंधी व गिधाड त्याठिकाणी राहु नयेत. म्हणुन सदरील प्रकल्प राबविण्याचा आहे. या व्यतिरिक्त विमानतळ प्रधिकरण यांचेशी चर्चा करता येईल.

मा. सभापती : केमिकल खत निर्मिती प्रकल्प दुर्गंधी पासुन मुक्त व गिधाड किंवा पक्षी राहणार नाहीत. यासाठी राबविण्यात येणार आहे. त्यामुळे सदरील प्रकल्प योग्य रित्या व आवश्यक आहे.

४) मालमत्ता कराची फेर आकारणी व मिळकतींना नंबर देणे.

डॉ. विजयकुमार मेहेर : करमुल्य निर्धारण अधिकारी यांचेशी मालमत्ता कराच्या फेरआकारणी संदर्भात व घरांना नंबर्स देणे बाबत चर्चा झालेली होती. त्याची माहिती द्यावी.

मा. सभापती : या संदर्भात मागेच चर्चा झालेली आहे. प्रथमतः झोन ३-४ याठिकाणी योजना सुरु करुन प्रयोग करणार आहेत नंतर इतर झोनमध्ये ती पध्दत घेण्यात येईल.

उप आयुक्त-१ : मालमत्ता कराच्या संदर्भात घर ते घर जाऊन पाहणी करण्यात येणार आहे. बऱ्याच ठिकाणी घर मालक/भाडेकरु हे समजु शकलेले नाही. त्यामुळे मालमत्ता कराबाबत फारच अडचणी येत आहेत. यासाठी कर योग्य मुल्यावरच आधारित मालमत्ता कर देण्यांत येणार असुन ज्यांना जादा कर लागलेला असेल त्यांच्या तक्रारीवरुन व स्थळपाहणीकरुन कार्यवाही करण्यात येणार आहे.

श्री. अ. रशिद खॉन (मामु) : बऱ्याच वेळेस आपले अधिकारी/कर्मचारी घर मालकांकडे गेल्यास त्या ठिकाणी मालक नसतो व भाडेकरुचे स्वाक्षरी साक्षीदार म्हणुन येतो. तशा वेळी घरमालक बदलतो व पुन्हा हा कर लावला तो योग्य नाही. म्हणुन तक्रार नोंदवतो व त्याचसाठी संबंधीत वार्डातील स. सदस्यांना अशा काही सुचना किंवा विनंती करुन मालमत्ता फेर आकारणी करावयाची असल्यास सांगुन त्यांची साक्षीदार म्हणुन स्वाक्षरी घ्यावी असे मला वाटते.

डॉ. विजयकुमार महेर : बऱ्याच भागात जुन्या इमारती आहेत व त्या डबघाईस आलेल्या आहेत. परंतु मालमत्ता कर मात्र सारखा दरवर्षी वाहुन येत असतो. याबाबत प्रशासनाने योग्य तो निर्णय घ्यावा.

मा. सभापती : या संदर्भात आपण गेल्या बैठकीत उपसमिती गठित केलेली आहे. सदरची समितीची शिफारस सर्वसाधारण सभेकडे मंजुरीसाठी केलेली आहे. या समितीने याबाबत कार्यवाही करेल.

श्री. हमीदउद्दीन ताबा : शहरातील प्रत्येक घरांना नंबरिंग देणे बाबत काय कार्यवाही केली.

मा. सभापती : मी सुचित केल्याप्रमाणे या पुढे आता घरांचा आणि नळांचा सर्व्हे करुन प्रशासन योग्य ती कार्यवाही करणार आहे. व दोन्हीही कर एकाच वेळेस भरणा करण्या बाबत कार्यवाही होईल. फेर आकारणी करण्याबाबत प्रशासनातर्फे आवश्यक ती कार्यवाही करेल. ज्यामुळे मालमत्ता कराची थकबाकी बरीचशी थकीत झालेली आहे ती वसुली होईल.

मा. आयुक्त : उप आयुक्त लेव्हल वर कर आकारणीचे पद निर्माण करावयाचा प्रशासनाचा प्रस्ताव आहे.

मा. सभापती : मालमत्ता कराची फेर आकारणी करीत असतांना जी टेक्नीकल अधिकारी कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. त्यांना विशिष्ट प्रकारे ट्रेनिंग देऊन त्यांना त्याच विभागात कायम करायचे त्यांच्या इतरत्र बदल्या करता येणार नाही. परंतु त्यांच्या वरील जो अधिकारी असेल उप आयुक्त लेव्हला तो टेक्नीकल किंवा नॉन टेक्नीकल बसवावा हा प्रशासनाचा मुद्दा आहे. यामध्ये आम्ही हस्तक्षेप करणार नाही. परंतु कर्मचारी हा प्रशिक्षित व तांत्रिक शिक्षित असलेला पाहिजे. याची दक्षता घ्यावी.

उप-आयुक्त-१ : आपल्या महापालिकेमध्ये दोन उप अभियंताचे पदे आहेत. आणि ते करमुल्य निर्धारण अधिकारी या पदावर कार्यरत आहेत. त्यांचे कडे संपुर्ण शहराचा मालमत्ता कर आकारणी करण्याची कामे दिली आहेत. व तेच फेर आकारणी आणि नामांतर प्रकरणेही हाताळतात आणि विभागीय कार्यालयाकडे तयार करुन पाठवितात. यामध्ये झोन अधिकारी व कर आकारणी विभागामध्ये संगनमत नसल्याने. मालमत्ता कराबाबत बरीचशी तफावत दिसुन येते. करमुल्य निर्धारण आधिकाऱ्यांच्या कक्षेत क. अभियंता व दुय्यम अवेक्षक असतात ते सर्व्हे कर आकरणी करतात. त्यास मधील कर्मचाऱ्यांना त्या बाबत करावयाची असते. वसुली करण्यासाठी ज्यावेळी अधिकारी/कर्मचारी घरोघरी जातात त्यावेळी झोनच्या कर्मचाऱ्यांना संबंधीत घरमालक वगैरे टॅक्स जादा लावल्याचे सांगतात. यावरुन या दोघांत संगनमत नसते. यासाठी उप आयुक्त लेव्हलचा कर मुल्य निर्धारक संगणक म्हणुन एक पद व त्यांचे अधिपत्याखाली दोन कर संगणक सहाय्यक, एक अधिक्षक, एक उपलेखापाल, क. अभियंता, शाखा अभियंता, वरीष्ठ लिपीक, कनिष्ठ लिपीक, वाहनचालक आणि शिपाई असा स्टफिंग पॅटर्न असणे बाबत प्रशासनाने आखणी केलेली आहे. या संदर्भात इतर महापालिकेमध्ये काय कार्यवाही केली जाते. याबाबत श्री.पी.जी. पवार यांना पाठविण्यात आले होते. त्यांनी इतर महापालिकांची माहिती आणली आणि त्याप्रमाणे स्टाफिंग पॅटर्न प्रशासना करण्याचे ठरविले आहे. त्यास मान्यता मिळाल्यास पुढील कार्यवाही होईल. याच विभागाने कर आकारणी करावी व वसुली त्यांनीच करावी.

मा. सभापती : माझे सुध्दा हेच मत आहे की, या विभागासाठी उपआयुक्त व त्यांचा अधिकारी/कर्मचारी वर्ग असावा व त्यांनीच मालमत्ता कर लावावा व त्यांनीच

मालमत्ता कर लावावा व त्यांनीच वसुलीचे कामही पहावे ते योग्य ठरविक लोकांनाच ट्रेनिंग देऊन त्यांचेकडुन कामे करवुन घेणे ठिक राहील.

श्री. रशिद खॉन (मामु) : सदरची बाब मा. आयुक्तांच्या अधिकारात असुन ज्यांच्याकडे पॉवर डेलिंगेट दिल्या जातील. त्याप्रमाणे ते कार्यवाही करतील.

मा. आयुक्त : कर आकारणी विभागासाठी प्रशासनातर्फे अधिकारी असावा की, टेक्नीकल अधिकाऱ्यांपैकी असावा या बाबत अभ्यास करुन निर्णय घ्यावा लागणार आहे. प्रशासनाचा अधिकारी ठेवुनच कार्यवाही करावी असे करणे आवश्यक आहे. या विभागासाठी कनिष्ठ अभियंता आठ, शाखा अभियंता दोन, उप अभियंता दोन राहणार आहे. या व्यतिरिक्त या सर्वावर कंट्रोल करणारा कर संकलन अधिकारी जो की, उपआयुक्त लेव्हलचा मालमत्ता कर लावणारा व वसुली करणारा अधिकारी राहणार आहे.

मा. सभापती : कर आकारणी या विभागाशी सहा संचालक, मालमत्ता विभाग व कर आकारणी हे तीनही विभाग एकमेकांशी संबंधीत आहेत.

मा. आयुक्त : आकृतीबंध प्रोग्राम बाबत नगर रचना विभागाने तयार केल्याची माहिती द्यावी.

सहा. संचालक : कर आकारणी, मालमत्ता विभाग आणि नगर रचना हे तीनही विभाग एकमेकांशी संलग्नीत राहणार असुन यांच्यामध्ये टेक्नीकल बाबत माहिती आहे.

मा. सभापती : कर आकारणी, मालमत्ता व नगर रचना एकमेकांशी रिलेटेड असल्याने आपसात यांच्याच बदल्या करुन प्रशासन कार्यवाही करु शकते.

सहा. संचालक : पुणे महानगरपालिकेत या बाबत काम करणारा आधिकारी हा टेक्नीकल मधुन कार्यरत आहे. परंतु इतर महापालिकेत काय पोजिशन आहे. याची मला कल्पना नाही.

मा. आयुक्त : या संदर्भात मी बारकाईने लक्ष देऊन व माहिती घेऊन वेळ पडल्यास चर्चा करुनच निर्णय घेईन. आणि नंतर अहवाल सादर करणार आहे.

मा. सभापती : ठिक आहे याबाबतचा निर्णय लवकर घ्यावा.

५) बोल्ट (Bolt) पध्दतीने व्यापारी संकुलाचा विकास.

सहा. संचालक : पुणे मनपाने त्यांचेतर्फे बांधण्यात येणाऱ्या व्यापारी संकुलाकरिता बोल्ट पध्दत (Bolt Operote Lease & trensfer-system) निविदा मागविण्यात येतात. त्यानुसार ठरविले आहे. साधारणतः जाहिरात देऊन वरील पध्दतीनुसार विकसीत करण्याबाबत बांधलेले व्यापारी संकुलाची मालकी महापालिकेकडे हस्तांतरीत होते. यासाठी मनपातर्फे काहीही खर्च येत नाही. त्यामुळे ही पध्दत अवलंबिणे योग्य राहील.

मा. आयुक्त : आपल्याकडे औरंगपुरा येथील मार्केट बन्सीलालनगर येथील खुल्या जागेवर दुकाने काढावयाची असतील, स्टेडियम बांधवयाचे असेल किंवा इतर कोणत्याही ठिकाणी व्यापारी संकुल बांधवयाचे असल्यास त्या बाबत संबंधीत एजन्सीजकडुन अर्ज मागवुन जी एजन्सी आपल्याकडुन १५.२० वर्षाच्या लिजवर करारनामा तयार करुन त्याठिकाणी त्यांचे स्वतःचे पैसे खर्च करुन बांधकाम करेल व त्यांचे बांधकाम पुर्ण होऊन त्यांनी खर्च केलेले पैसे परफेड होईपर्यंत दुकान चालवितात व त्या लिजपर्यंत करारनामा संपल्यानंतर पुन्हा महापालिकेकडे व्यापारी संकुले परत करतात. अशा प्रकारची पध्दती मुंबईकडे जास्त मोठया प्रमाणात विकसीत होत आहेत.

यामध्ये जमिन महापालिकेची राहिल मालकी हक्क आपलाच राहील. फक्त खर्चाची बाब संबंधीत एजन्सी करुन लिजवर जागा घेऊन कार्यवाही करणार आहे.

मा. सभापती : १) संबधीत एजन्सीने व्यापारी संकुल उभारुन त्यांनी त्यातील गाळे दुसऱ्यास विकले तर आपण काय करणार?
२) आपल्याकडे जागेची किंमत नाही.
३) रिझर्वेशन जागा अकोमोडेशन
४) जळगांव पॅटर्न बाबत माहिती आहे काय?

श्री. अ. रशिद खॉन (मामु) : विवेकानंद कॉलेज समोरील जी जागा आहे. त्याठिकाणी व्यापारी संकुल महापालिकेने उभारावीत.

मा. सभापती : पुढील चार -पाच वर्षात औरंगाबाद शहराची परिस्थिती वेगळी राहणार आहे. एकदा संकुल उभारले की, त्या एजन्सीने दुसऱ्यास विक्री करावे. किंवा पोटभाडेकरु ठेवुन मोकळे व्हावे. त्याला कोण जबाबदार एकदा जागा लिजवर दिली की, १५ वर्षानंतर सदरची फाईलही सापडत नाही व भाडेही मिळत नाही. तेव्हा आपण काय करणार? याबाबत आपण करारनाम्याचे संगणीकरण करावे काय? याची पडताळणी करावी जेणे करुन मनपाचे रेकॉर्ड व्यवस्थित राहु शकेल. तेव्हा बोल्ट पध्दतीने २५% मनपास संकुल फुकट द्यावी व ७५% त्या एजन्सीने विकसीत करुन ठेवावे व विकुन टाकावे. वरचा एफ.एस.आय. त्यांना देऊन कार्यवाही केली तर मनपाचा विकास होऊ शकेल.

सहा संचालक नगर रचना : याबाबत पॉलिसी ठरविणे आवश्यक आहे. परंतु बोल्ट पध्दतीमुळे कार्यवाही तात्काळ होईल. यामध्ये आपला पैसा खर्च न करता लिजवर जागा घेऊन संबधीत एजन्सी कार्यव्हावी करते आणि करारनाम्या बाबत पुढील दिशा ठरवावयाच्या असल्यास लिजच्या प्रती लॉकरमध्ये ठेवावे.

श्री. गौतम खरात : महापालिकेच्या विकास कामात लक्ष घालतांना कल्याणकारी भुमिका ठरविणे आवश्यक आहे. यातील काही प्रमाणक ठरवुन सर्वसाधारण व्यक्तीपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. यामध्ये सबसिडी ठेवलेली आहे काय?

मा. सभापती : मी आता जी सुचना केलेली आहे. २५%, ७५% ते बरोबर आहे काय? त्यामुळे महापालिकेचा विकास जलदगतीने होईल. ज्यामुळे महापालिकेचे व्यापारी संकुलही उभे राहील व स्वत:चे लामकी हक्क राहील.

लेखाधिकारी -१ : शासनाने नविन जी.आर. प्रमाणे (१) २५% द्यावे व २) लँड पोस्ट प्रमाणे कार्यवाही करावी.

मा. सभापती : याबाबत योग्य रित्या पॅटर्न तयार करुन शासनाकडे प्रस्ताव पाठवावा. १) जवळगांव पॅटर्न २) २५% व ७५% रिझर्वेशन ऑफ आकोमोडेशन ३) बोल्ट पध्दत.
६) महानगरपालिकेकरिता स्वतंत्र न्यायालयाची मागणी.

मा. आयुक्त : औरंगाबाद महापालिका प्रशासना विरुध्द न्यायप्रविष्ठ असलेल्या प्रकरणांसंबंधी अनेक प्रकरणे प्रलंबित असल्याने स्वतंत्र न्यायालय असणे आवश्यक आहे.

मा. सभापती : ठिक आहे. मंजुर

७) गणपती विसर्जन विहिर परिसराचे भुसंपादन करणे.

श्री. रशिद खॉन (मामु) : अंदाजे या कामी खर्च किती येणार आहे?

मा. सभापती : गणपती विसर्जनाकरिता जागेचा प्रश्न कायमचा सुटणे आवश्यक आहे प्रस्ताव मंजुर.

८) अंतर्गत परवानगी खर्च/स्वखर्चाने अंतर्गत विकास कामे करणे.

मा. सभापती : बांधकाम परवानगी घेतेवेळेस बेटरमेंट चार्जेस घेतल्या जाते. व परवानगी घेऊन बांधकाम केल्या जाते. ते केल्यानंतर संबंधीत मालकाने अंतर्गत विकास करुन घ्यावा.

मा. आयुक्त : जमिन मालकाचे ले आऊट धारकास प्रवृत्त करावयाचे झाल्यास लाईट/ड्रेनेज/पाणी व रस्ता व अंतर्गत विकसीत कामे करावयाची कबुली दिल्यास परवानगी द्यावी.

श्री. रशिद खॉन (मामु) : आपण अशा प्रकारे जाचक नियम लावल्यास संबंधीत मालक अंतर्गत विकास कामे करवुन घेणे साठी मनपाकडे पैसा भरुन ठेवण्याकरिता त्यांचे कडे पैसाच नसतो मग तो मालक एवढे पैसे कोठुन आणणार.

मा. आयुक्त : जमिन मालकाकडुन ५०% बेटरमेंट चार्जेस व ५०% विकास शुल्क आकारणी करावे.

सहा. संचालक नगर रचना :संबंधीत मालकाकडुन ५०% बेटरमेंट चार्जेस घेतल्यानंतर व मंजुरी दिल्यानंतर व बरेचसे मालक त्यानंतर पैसे भरतच नाहीत.

श्री. रशिद मामु : परंतु जमिन मालक एवढा पैसा कोठुन आणेल. ज्या मालकाकडे जमीन आहे. परंतु बांधकाम करण्यासाठी परवानगी बाबत सादर करुन विकसीत करण्याबाबतचा जादा पैसा मालकाकडे उपलब्ध नसतो. त्यामुळे बरेचसे कामे ठप्प होतात.

सहा. संचालक : पृष्ठ क्र. ३३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे अंतर्गत विकास कामे खर्च करण्याकरिता १००% विकास खर्च व १००% जमिन विकास शुल्क आकारणी खर्च अगोदर भरावे लागेल आणि जर अर्जदार स्वखर्चाने अंतर्गत विकास कामे मनपा त्याच्या विभागाच्या देखरेखीखाली पुर्ण करुन देणार असेल तर ५०% विकास खर्चाची रक्कम अनामत म्हणुन बिनव्याजी ठेवण्यांत येते. व १००% जमिन विकास शुल्क वसुल केल्या जाते.

मा. सभापती : हे दोन्हीही प्रस्ताव योग्य वाटत नाहीत.

श्री. रशिदखान मामु : या प्रस्तामध्ये बद्दल होणे आवश्यक आहे.

मा. आयुक्त : बांधकाम परवानगीचे अर्ज प्राप्त होतात पैकी ५०% लोकांना ओपन टेंटयाटिव्ह परवानगी देतो पैकी १०% लोक बांधकाम सुरु करतात. परंतु एकदा बांधकाम परवानगी घेतल्यानंतरही नंतर पुन्हा तोच लोक विकास कामाचे शुल्क भरावयास मनपात कशाला येतील. येतच नाही यासाठी प्रशासनाने नियमात थोडा फार बद्दल केलेला आहे.

मा. सभापती : ५०% विकास खर्च बांधकाम परवानगीच्या वेळेस घ्यावे व उर्वरित ५०% नंतर घ्यावे.

सहा. सचालक नगर रचना : ५०% विकास खर्च बांधकाम परवानगीच्या वेळेस घेऊन परवानगी दिल्यास उर्वरित ५०% संबंधीत मालक नंतर येऊन भरणा करीतच नाही.

मा. आयुक्त : ५०% टेंटयाटिव्ह मंजुरी देतांना विकास खर्च संबंधीत मालकाकडुन घ्यावा व उर्वरित ५०% बांधकाम परवानगी घेतांना घ्यावी.

श्री. रशिद मामु : सर्वाकडेच पैसा उपलब्ध असतो असे नाही. या प्रस्तावात काही तरी अटी व शर्ती टाकुन प्रस्तावास मंजुरी द्यावी.

सहा. संचालक नगर रचना : एकदा बांधकाम परवानगी दिल्यानंतर दुसऱ्या वेळेस उर्वरित पैसे भरण्याकरिता अवघड राहत नाही.

मा. सभापती : एखाद्या मालकाने ५०% वेटरमेंट भरुन फायनल लेआऊटला मंजुरी घावयाची झाल्यास भरावे आणि नंतर ५०% उर्वरित शुल्क भरावे आणि संबंधीत मालकाने पुर्ण भाग विकसीत केल्याशिवाय परवानगीच्या वेळेस अट टाकुन बंधनकारक ठेवणे आवश्यक आहे. यामध्ये १) वेटमेंट चार्जेस ५०% २) शहर विकास शुल्क ५०% असावे.

श्री. गौतम खरात : शहरात बऱ्याच भागातुन २०X३० चे प्लॉट पाडुन अनाधिकृत घरे राहत आहेत. आपल्याकडे २०X३० चे ले आऊट मंजुरी दिल्या जाते काय?

सहा. संचालक नगर रचना : होय देता येते. आपल्या नगर रचना ॲक्ट मध्ये असे आहे ३०X२० च्या प्लॉटधारकांना नियमाप्रमाणे ओपन स्पेस ठेवावे लागते.

मा. सभापती : ठिक आहे २०X३० च्या प्लॉटधारकांना बांधकाम परवानगी द्यावी.

श्री. रशिदमामु : शहरात बऱ्याच वेळेस अशा घटना घडतात की, बांधकाम परवानगी असुनही त्या घराशेजारील व्यक्तीचे पटत नसल्यास मनपाकडे खोटी तक्रार नोंदवतात. तेव्हा या प्रकरणांमध्ये मनपातर्फे तक्रार नोंदविणाऱ्या धारकाकडुन काहीतरी फिस आकारणी करावा. जो की, खोटी तक्रार असल्यास रु. २०००/- किंवा ३०००/- डिपॉझीट ठेवुन ते दंड म्हणुन परत देता येणार नाही.

सहा संचालक नगर रचना : तसे नियमात नाही आहे. परंतु मागे या प्रकारचा प्रस्ताव मांडण्यात आलेला होता. एखाद्या वेळी बांधकाम परवानगी दिल्यानंतरही अशा प्रकारचे केसेस आमच्याकडे येतात. तरी संबंधीत तक्रारधारकाकडुन दंड म्हणुन डिपॉझीट घ्याव व तक्रार निवारण झाल्यास त्यातील काही पैसे परत द्यावे तक्रार खोटी असल्यास डिपॉझीट जप्त करण्यांत यावी.

मा. आयुक्त : अशा प्रकारचा प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवावा.

मा. सभापती : ठिक आहे. ९) उघडयावर घाण टाकने, शौचास बसणे यावर दंड आकारावे.

मा. सभापती : उघडयावर घाण टाकणे शौचास बसणे यावर दंड करण्याबाबत रिपोर्ट कुणी दिल्यानंतर कार्यवाही होईल.

आरोग्य वै. अधि. : संबंधीत झोन मधील स्वच्छता निरिक्षक यांना याकडे लक्ष देऊन कार्यवाही करावी.

श्री. रशिद मामु : शहरात ज्या भागात कचरा कुडया नाहीत त्या भागात कचरा कुंडयाची व्यवस्था करणे.

डॉ. कराड, श्री. त्र्यंबक तुपे : या प्रस्तावाबाबत नागरीकांस जनजागरण करणे आवश्यक आहे.

उप आयुक्त-१ : रस्त्यावर याच संदर्भात जनजागरण करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे वेगवेगळया ठिकाणी पोस्टर्स, बॅनर्स किंवा ॲटोरिक्षाव्दारे वृत्तपत्र जाहिरीव्दारे आवाहन जनतेसमोर करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे आपआपल्या झोन

मधील स्वच्छता निरिक्षकांना याबाबत जनतेसमोर सुचना देणे आवश्यक आहे.

श्री. रशिद मामु : माझ्या माहितीप्रमाणे अशा प्रस्तावाबाबत कोर्टाच्या आदेशाची प्रत असणे आवश्यक आहे.

लेखा - १ : मा. आयुक्तांना याबाबत अधिकार आहेत.

मा. सभापती : नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

१०) नविन नळ कनेक्शन देतांना मिटर बंधनकारक करणे.

डॉ. कराड, श्री. रशिद खॉन : बसविल्यास मनपास त्याचा काय फायदा होणार आहे. मिटर बसवुनही ज्यांना पाणी भरावयाचे आहे ते पाणी भरतील याबाबत प्रशासन कुठेकुठे लक्ष देणार.

श्री. गौतम खरात : यावेळी एव्हरेज प्रमाणे बिल द्यावे.

मा. आयुक्त : आज शहरात जी पध्दत आहे. ती पध्दत बरोबर नाही आहे. व बऱ्याचशी भागात पाणी रस्त्यावरुन वाहत राहते. काही घरामध्ये दहा हंडे पाणी भरतात तर काही घरात २० हंडे पाणी भरतात. त्यामुळे ही तफावत आहे. याचसाठी पाण्याची मिटर पध्दती सुरु करता येऊ शकते.

कार्यकारी अभियंता (पा.पु) : मिटर पध्दती आता पर्यत लागु केलेली नव्हती.

श्री. गौतम खरात : या बाबत नियमावली आहेत त्या आधारे प्रशासनाने कार्यवाही करावी.

श्री. रशिद खान (मामु) : मिटर पध्दती अस्तित्वात आणल्यास कमी रु. ७००/- आणि जास्तीत जास्त किती फिस आकारणी करणार याची माहिती द्यावी.

मा. सभापती : या संदर्भात प्रशासन नियमाप्रमाणे कार्यवाही करेल.

११) जायकवाडी पासुन होणाऱ्या पाणी पुरवठयावर विद्युत देयक आकारणे.

मा. सभापती : प्रस्ताव मंजुर करुन शासनाकडे पाठवावा.

१२) प्रभावी मालमत्ता कर वसुली राबविणे.

लेखाधिकारी-१ : (अंदाजपत्रक पृष्ठ क्र. ३७ पहावे) औरंगाबाद महापालिकेची सुमारे ३० कोटींची मालमत्ता करांची थकबाकी असल्यामुळे प्रभावीपणे कर आकारणी वसुली करण्या करिता देशातील इतर म.न.पा. ने राबविलेले उपक्रम औरंगाबाद मनपाने राबविणे आवश्यक वाटते उदा. अहमदाबाद व हैद्राबाद येथे सध्या प्रयोग चालु आहे.

डॉ. विजयकुमार मेहेर. श्री. हमीद ताबा : एखाद्या मालकाकडे १० भाडेकरु आहेत. परंतु मालक व भाडेकरु यांच्यात भांडण चालु आहे. त्यामुळे मालमत्ता कर थांबलेला आहे आणि अशा परिस्थितीत नळ कनेक्शन बंद केल्यास आणि पुन्हा भाडेकरुने मालमत्ता कर भरणा करावयास आल्यास आपण काय करावे.

लेखाधिकारी-१ : हस्ते म्हणुन भाडेकरु असे करता येईल.

श्री. रशिद मामु : एखाद्या मालकाने विश्वासघात केल्यास मनपा तर्फे पोलिस केस करता येईल काय?

मा. आयुक्त : अशा प्रकारच्या नियमाप्रमाणे पोलिस केस करावयाचे असल्यास ते करावे. परंतु सिडको मालमत्ता धारकांबाबत तेथील मालकाकडुन न घेता सिडको कडुन घ्यावे असा प्रस्ताव आहे.

मा. सभापती : माझे असे मत आहे की, संपुर्ण सिडको प्रॉपर्टीजच्या संदर्भात एकच दिनांक नोटीस सिडकोला द्यावी आणि कर न भरल्यास सरळ कोर्टात जावे.

श्री. रशिद मामु : सिडकोतील नागरिक मालमत्ता कर भरणा करीतच नाही.

मा. आयुक्त : सिडको येथील नागरिक सिडकोकडे सर्व्हीस चार्जेस भरणा करतात तेव्हा मालमत्ता कर हा संपुर्ण सिडकोने मनपास द्यावा. असे म्हणणे आहे.

श्री. रशिद मामु : सिडको जर मालमत्ता कराची वसुली देत नसल्यास नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

मा. सभापती : सिडको ही स्वायंत्त संस्था आहे. त्यांनी जर मालमत्ता कर भरणा नसल्यास आपण कोर्टात जाऊ शकतो.

श्री. रशिद मामु : सदरील प्रस्ताव दोन ठिकाणी लागु होत नाही. तेंव्हा सिडको बाबत मालमत्ता कर भरणा करणे बाबत कसे करावे.

मा. सभापती : शहरातील बाब वेगळी आहे आणि सिडको ही स्वायत्त संस्था आहे. त्याबाबत कार्यालयीन कार्यवाही नियमाप्रमाणेच करावे लागेल.

श्री. हमीद ताबा, श्री. रशिद मामु : सिडको भागातील मालमत्ता धारकां कडील कर बराचसा वसुल होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे शहरातील जुन्या इमारतीचे करा बाबत प्रशासनाने आवश्यक ती कार्यवाही करावी. सिडको ही स्वायत्त संस्था असल्याने मालमत्ता व पाणीपट्टी थकीत वसुलीच्या बाबतीत कोर्टात जाणे आवश्यक आहे. या बाबत वेगळा प्रस्ताव घ्यावा.

मा. सभापती : ठिक आहे.

१३) बालकनी.

मा. सभापती मंजुर.

श्री. रशिद मामु : मुंबई सारख्या सुविधा या शहरात सुध्दा असणे आवश्यक आहे. कर्मचाऱ्यांची गृहानिर्माण संस्था स्थापन करणे.

श्री. गौतम खरात : किलेअर्क येथे बऱ्याच वर्षापासुन चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची गृह संस्था आहे. त्यांचे शेअर्स घेऊन त्यांना चांगली घरे बांधुन दयावी.

मा. सभापती : ठिक आहे.

१५) विविध आदर्श बाबी.

मा. सभापती : १) दोन आदर्श झोपडपट्टया.

२) दोन आदर्श रोडस.

३) तीन आदर्श स्मशान भुमी

४) दहा आदर्श शाळा.

१६) छत्रपती संभाजी महाराज, महाराणा प्रताप, स्वातंत्र्यविर सावरकर यांचे पुतळे बसविणे.

मा. सभापती : मंजुर.

१७) मौलाना अब्दुल कलाम आझाद (रिसर्च सेंटरचे" बांधकाम हाती घेणे.

मा. सभापती : मंजुर.

१८) १०० खाटांचे अद्ययावत रुग्णालय तयार करणे.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी : शिवाजी मैदान येथील सिव्हील हॉस्पिटल हे मध्यवर्ती असल्याने सदरची इमारत म.न.पा.च्या ताब्यात देणे बाबतचा प्रस्ताव घेऊन शासनाकडे पाठवावा.

मा. सभापती : आपल्याला मेडियम कॉलेज आणि हॉस्पिटल असा प्रस्ताव ठेवायचा होतो. प्रस्ताव मंजुर.

१९) म.न.पा. चे व्ही.आय.पी. गेस्ट हाऊसचे बांधकाम करणे.

मा. सभापती : मंजुर

२०) दुग्ध शाळा स्थापन करणे.

मा. आयुक्त : शहरातील सगळे गोठे एकत्रित करुन आरे सरिता केलेली आहे. त्याच प्रकारे शहरातील गोठे बाबत चिकलठाणा परिसरात १ गुंठे जागा शासनाने दिलेली आहे त्या ठिकाणी कार्यवाही करावयाची असुन त्यामुळे शहरातील गोण्यांच्या आजुबाजुचा परिसर स्वच्छ राहील.

मा. सभापती : शहरातील गोठे धारकांना विश्वासात घेणे आवश्यक आहे त्यांची लवकरच बैठक बोलविण्यांत येईल.

डॉ. विजयकुमार मेहेर : मो. पडेगांव भावसिंगपुरा येथील गोठे चिकलठाणा परिसरात हलविल्यास त्यांना एवढया दुर अंतरावर कसे शक्य आहे.

मा. सभापती : ठिक आहे याबाबत चर्चा करुनच निर्णय घ्यावा लागेल.

डॉ. भागवत कराड : मी यापुर्वी सुचना केलेली होती, स. सदस्य जे आपआपल्या वॉर्डात काम करतात त्यांचेसाठी झोनवाईज मनपाच्या खुल्या जागेवर नगर सेवकांना कार्यालय बांधुन दयावे. त्या बाबत योग्य ती कार्यवाही कार्यवाही होत नाही.

मा. सभापती : स. सदस्यांची सुचना योग्य आहे, परंतु अशा प्रकारची कार्यवाही अपेक्षित नाही.

लेखाधिकारी-१ : आता पृष्ठ क्र. १० मधील सन १९९७-९८ या आर्थिक वर्षात काही म्हत्वाच्या बाबींवर होणाऱ्या खर्चाचा तपशिलाकडे चर्चा करावी.

मा. सभापती : १) प्रशासकीय खर्च यामध्ये "मनपा कर्मचारी आकृतीबंध"

२) पाणी पुरवठा

३) भुमिगत जलनिःसारण व्यवस्था या प्रस्तावा बाबत पुणे येथील घाडगे ग्रुपशी ट्रीटमेंट प्लॉट बांधणे बाबत चर्चा व्हावी.

डॉ. विजयकुमार मेहेर श्री. सुभाष टाकळकर : सिडको येथील भागातील सर्व नागरिकांना पाणी मिळणेसाठी सिडको येथे स्टोरेज टाकीची व्यवस्था व्हावी. सिडको येथील एन-५ या ठिकाणी पाण्याची टाकीसाठी जागा उपलब्ध आहे. त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी.

कार्यकारी अभियंता (पा.पु.व.ज.निः) : स. सदस्य सुचना केल्या प्रमाणे आता त्या ठिकाणी जागा उपलब्ध नसल्यामुळे कोणतीही कार्यवाही करता येणार नाही. सिडको भागातील नागरिकांना पुरेसे पाणी मिळेल एवढा साठा उपलब्धते इतकी स्टोरेज टाक्या आहेत. तरीही सिडको एन-७ या भागात सिडकोच्या खुल्या जागा आहेत. सिडकोशी संपर्क साधुन याबाबत कार्यवाही करता येऊ शकेल.

मा. सभापती : १) सिडको येथे पाण्याचा साठा भरपुर प्रमाणात राहावा म्हणुन सिडको कार्यालयाशी पत्र व्यवहार करुन, सिडकोच्या एन-७ या खुल्या जागे बाबत मागणी करावी.

२) महाराष्ट्र शासनाने नुकतेच जाहिर केल्याप्रमाणे पाणी प्रश्नावर श्वेत पत्रिका काढणार आहे.

३) शासनाकडुन पाणी प्रश्नाबाबत मनपाने योग्य ती अनुदाना बाबत मागणी करावी.

४) सिडकोतील नागरिकांना भरपुर प्रमाणात पाणी मिळण्यासाठी म.न.पा. च्या विशेष अनुदानातुन दोन टाक्या सिडको येथे बांधण्या बाबत तरतुद करण्यात येते.

५) झोपडपट्टी विकास कार्यक्रम.

श्री. गौतम खरात : स्लम भागासाठी मनपाने किती तरतुद केलेली आहे व किती खर्च अपेक्षित आहे याची माहिती द्यावी.

लेखाधिकारी-१ : स्लम भागासाठी रु. ४.० कोटीची तरतुद अंदाजपत्रकात केलेली आहे.

श्री. गौमत खरात : माझा असा आरोप आहे की, स्लम भागासाठी जी मनपा तरतुद करुन ठेवते त्यापैकी इतरत्र कामासाठीच केला जातो. याबाबत स्लम विभाग मनपा मध्ये वेगळा निर्माण करुन त्यासाठी कार्यकारी अभियंता हे पद निर्माण करुन कार्यवाही व्हावी.

लेखाधिकारी-१ : कर्मचारी आकृतिबंध कार्यक्रमात त्याच पध्दतीने आखलेला आहे.

मा. सभापती : प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे मंजुर.

६) व्यापारी संकुल बांधकाम.

श्री. रशिद मामु : या प्रस्तावात व्यापारी संकुलाचे काम डिपॉझिट बेसीसवर करण्यात येणार आहे. म्हणजे नेमके काय? याची माहिती द्यावी.

श्री. विकास जैन : मनपाच्या खुल्या जागांवर छोटे छोटे शॉपिंग बांधण्यात यावे.

श्री. रशिद मामु : मी वारंवार सुचना करित असतो की, समर्थनगर भागातील विवेकानंद कॉलेजच्या पाठी मागील खुली जागा म.न.पा. ची आहे. तेंव्हा संबंधीत संस्था चालकांनी चर्चा करुन कॉलेज समोर जी. मोकळी जागा आहे. त्या ठिकाणी म.न.पा. तर्फे शॉपिंग बांधावे, त्यामुळे उत्पन्नात भर पडेल.

मा. सभापती : प्रस्ताव मंजुर.

७) मेमोरियल संशोधन केंद्र.

मा. सभापती : मंजुर.

८) रस्ते.

श्री. रशिद मामु : शहरातील जी नविन रस्त्यावर डांबरीकरण झालेले आहे. त्यावर पुन्हा सरफेसिंग करण्यापेक्षा एक वर्ष त्या रस्त्यावर काहीही करु नये. त्यापेक्षा तोच खर्च इतर रस्त्यावर करावा व रुपये ५.५० कोटी खर्च यासाठी ठेवलेला आहे. त्यातुन रु. २.०० कोटी काढुन भुसंपादनासाठी करावे.

मा. सभापती : अति. शहर अभियंता यांनी खुलासा करावा.

अति.शहर अभियंता : शहरातील जे मुख्य रस्ते आहेत. त्यावर डांबरीकरण करणे आवश्यक आहे. आणि त्यासाठी हा खर्च अपेक्षित आहे. (भुसंपादन) खर्च देण्याबाबत प्रलंबीत आहे. तेंव्हा शहरातील रस्त्यांवर पुन्हा पुन्हा डांबरीकरण करण्यापेक्षा त्यातुन भुसंपादनाच्या खर्चासाठी जादा रक्कमेची आवश्यकता आहे. यामध्ये रु. २.०० कोटी भुसंपादनासाठी द्यावे किंवा रु. १.०० कोटी तरी कमी करावे आणि नाला ट्रेचिंग साठी काही खर्चाची तरतुद करण्यात यावी.

मा. सभापती : ठिक आहे. लेखाधिकारी यांनी त्याप्रमाणे कार्यवाही करावी. व पुर्नडांबरीकरण यातुन रु. २.०० कोटीची तरतुद केलेली आहे. त्यातील रु. ०.५० लाख काढुन नाला ट्रेचिंगच्या कामासाठी तरतुद करावी.

९) विद्युत.

मा. सभापती : विद्युतीकरण कामाकरिता १.३० कोटीची तरतुद वेगवेगळया कामासाठी अर्थ संकल्पात करण्यात आलेली आहे. नविन पोल एकुण ४०० आहेत. म.रा.वि.मं. याबाबत त्यांनी सहकार्य न केल्याने मनपातर्फे संपुर्ण कार्यवाही करण्यांत आलेली आहे. त्यामुळे एवढया मोठया प्रमाणात शहरातील विविध भागात नविन पोल रोवण्यात आलेले आहेत. सदरील प्रस्ताव मंजुर.

१०) साठा खरेदी.

शहर अभियंता : मनपातर्फे बांधकाम करावयाच्या इमारतीला लागणारे लोखंड आणि खरेदी करण्यासाठी रु. १.५० कोटीची स्वतंत्ररित्या तरतुद करण्यात आली आहे. एखादया वेळी आपल्याला याचा साठा नसल्यास बरीचशी कामे खोळंबतात त्यामुळे साठा असणे आवश्यक आहे. उपलब्धते नुसार कार्यवाही तात्काळ करता येते.

मा. सभापती : मंजुर

११) सुलभ शौच्यालय आणि स्त्री-पुरुषां करिता मुताऱ्या बांधणे.

मा. सभापती : या प्रस्तावा नुसार महिलांसाठी सुलभ शौच्यालय व मुताऱ्या बाबतीत प्राधान्याने कामे करावीत.

श्री. रशिद मामु : शिवाजी मैदान (आमखास) येथील खुल्या जागेवर मोठे मनपा तर्फे स्टेडियम बांधणे.

लेखधिकारी-१ : सदरील जागा महापालिकेच्या अखत्यारीतील नाही.

मा. सभापती : मंजुर

१२) इमारती बांधकामे ( अ ते ल) पृष्ठ क्र. १६ ते १९)

मा. सभापती : मंजुर.

१३) नविन उद्याने.

मा. सभापती : मंजुर

१४) वाहने खरेदी.

मा. सभापती : गाडया खरेदी करण्या करिता प्रस्तावास मंजुरी देण्यांत येते.

१५) क्रिडा स्पर्धा आयोजित करणे.

मा. सभापती : १. खो खो २.कबड्डी ३. जिम्नॅस्टिक व बुध्दीबळ ५. ज्युडो ६. क्रिकेट या व्यतिरिक्त कुस्ती, फुटबॉल व हॉकी या खेळांचाही समावेश करण्यात येतो. प्रस्ताव मंजुर.

१६) सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणे.

सौ. रंजनी जोशी : सांस्कृतिक कार्यक्रमात रु. ५.०० लाखाची तरतुद दाखविलेली आहे. पुन्हा रु. १.०० लाख वाढवुन द्यावे.

मा. सभापती : सांस्कृतिक कार्यक्रमात कवि संमेलने मराठी/हिन्दी/उर्दु या भाषेतुन घेण्यांत यावे.

१७) क्रिडा संकुल बांधणे -५० लाख.

१८) पुर नियंत्रण कामे -१.०० कोटी.

मा. सभापती : मंजुर

१९) सभासद स्वेच्छा निधी व मानधन.

मा. सभासद १) स. सभासद स्वेच्छा निधी व मानधन रु. १.४१ कोटीची तरतुद केलेली आहे. यामध्ये स्वेच्छा निधी १५०.०० लाखा वरुन १७५.०० लाख करण्यात येते.

२) टेंडर ५०% वाढ

३) होडिंग रु. ५/- प्रति चौरस फुट वाढ.

४) शो टॅक्स १००% (इ. वाढवुन सभासद स्वेच्छा निधीत वाढ करण्यात येते.)

५) विवेकानंद येथील गार्डनसाठी रु. ०० लाख तरतुद.

२०) घर बांधणी /वाहन खरेदी अग्रिम.

मा. सभापती : तांत्रिक व अतंत्रिक या दोन्हीही अधिकाऱ्यांना समसमान ५०% - ५०% प्रामणे गाडया खरेदी करण्यासाठी कार्यवाही करावी आणि व्याज दर शासन निर्णयप्रमाणे आकारावा.

२१) कर्जाची परत फेड.

मा. सभापती : मंजुर

२२) शिक्षण (अ ते इ. पृष्ठ क्र. २२ ते २३)

श्री. गौतम खरात : येत्या शैशिक्षणसाठी रु. २.०० लाखाची तरतुद करावी.

सौ. रजंनी जोशी : महिला प्रशिक्षणासाठी वर्ष सुरु होण्या पुर्वीच प्रशासनाने या बाबत कार्यवाही करावी.

मा. सभापती : येत्या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीसच सर्व शाळांतील बालवाडी व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व ड्रेस देण्या बाबत प्रशासनाने कार्यवाही करावी. व येत्या शैक्षणिक वर्षापासुन महापालिकेच्या सर्व बालवाडी शाळातील मुलांना मोफत ड्रेस, डॉ. आंबेडकर गणवेश योजनेचा लाभ देण्यात यावा.

श्री. अ. रशिद खॉन (मामु) : शासनाकडुन रु. १०.०० कोटी मिळणार आहेत तर त्यातील ३.०० कोटी भुसंपादनासाठी वेगळे करण्यात यावे.

मा. सभापती : शासनाकडुन प्राप्त झाल्यानंतर आणि प्रशासन त्यावेळी विविध कामाचे अंदाजपत्रक तयार करील. त्यावेळी विचार करता येईल. त्याचप्रमाणे १) शहर सौदर्योकरणावर रु. ४५.०० लाख.

व २) ट्रॉफिकवर रु. ५.०० लाख.

५०.०० लाख.

तरतुद करण्यात आलेली आहे.

मा. आयुक्त : शासनाकडील रजिस्ट्रेशन फीस व न्यायालयातील फीस बाबत प्रशासनातर्फे योग्य ती पडताळणी करुन मागविण्यात येईल.

मा. सभापती : स. सदस्यांच्या सुचनेप्रमाणे.

१) नामांतर फीस रु. ५०/-

२) एखादयाने बांधकामाबाबत तक्रार केली असल्यास त्यांचेकडुन प्रथमःत डिपॉझीत रक्कम घेऊनच तक्रार दाखल करण्याची फीस.

| | |
|---|---|
| अ) स्लम विभागासाठी | रु. ५००/- |
| ब) वैधानिक बंगला | रु. १०००/- |
| क) कमशिर्यल/कॉम्प्लेक्स | रु. ५०००/- |

**विषय क्र. ६७२/१ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये मा. आयुक्तांनी तयार केलेले औरंगाबाद महानगरपालिकेचे सन ९६-९७ चे सुधारित अंदाजपत्रक व सन १९९७-९८ चे मुळ अंदाजपत्रकावर विचार-विनिमय करणे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार प्रशासनातर्फे सभागृहासमोर सादर करण्यांत आलेल्या सन ९६-९७ च्या सुधारित अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

तसेच प्रशासनातर्फे ९७-९८ वर्षाकरिता सभागृहासमोर सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पात खालील दर्शविल्याप्रमाणे दुरुस्ती व फेरफार सुचविण्यांत येतात.

**<u>जमा बाजु</u>**

| अ. क्र. | लेखा शिर्ष | मुळ अंदाजपत्रकातील तरतुद | स्थायी समिती सुचविलेली तरतुद |
|---|---|---|---|
| १. | उत्पन्न करवाह ट्रांझिट फी | २०/- रु. | २०/- रु. |
| २. | स्क्रॅप मटेरियल वरील जकात | २% | २% |
| ३. | शो टॅक्स | १५/- रु. प्रती शो. | १००/- रु. प्रति. शो. |
| ४. | होर्ल्डींग कर | ३.७५/-रु. प्रति चौ. पुट | ५/- रु. प्रति चौ. पुट |
| ५. | पाणीपट्टी कमर्शियल | १०००/- रु. प्रति वर्षाला रु. ५००/- वाढ | ८००/- रु. प्रति वर्षाला |
| ६. | टेंडर विक्र | | प्रचलित दराच्या ५०% वाढ |
| ७. | मालमत्ता हस्तांतरण फी | ३०/- रु. | ५०/- रु. |
| ८. | बांधकाम परवानगी दिल्या नंतर तक्रार केल्यास अनामत रक्कम ठेवणेची तरतुद. | | |
| १) | स्लममधील बांधकाम अनामत | | रु. ५००/- |
| २) | बंगल्याचे बांधकाम अनामत | | रु. १०००/- |
| ३) | कमर्शियल कॉम्प्लेक्स अनामत | | रु. ५०००/- |

उपरोक्त दुरुस्ती व फेरफारसह सन ९७-९८ च्या मुळ अंदाजपत्रकास मंजुरी देण्यांत येते.

**<u>खर्च बाजु</u>**

| अ. क्र. | लेखा शिर्ष | मुळ अंदाजपत्रकातील तरतुद | स्थायी समिती सुचविलेली तरतुद |
|---|---|---|---|
| १. | पुर्नडांबरीकरण | २००० | १५०० |
| २. | मा. महापौर निवासस्थाना-साठी फर्निचर व इतर साहित्य | --- | १०० |
| ३. | मा. आयुक्त यांच्या निवास स्थानासाठी साहित्य खरेदी. | --- | १०० |
| ४. | मा. सभासदांचा स्वेच्छ निधी | १२३०० | १४३५० |
| ५. | रोपवे | ५१०० | १०० |
| ६. | तारांगण | ५१०० | १०० |
| ७. | विज्ञान केंद्र | २१०० | १०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | कॉम्प्युटर छपाई बिले पाणी पुरवठा. | २०० | ३५० |
| ९. | सरकारी कर्ज परत फेड | ३०००० | २५००० |
| १०. | नाला ट्रेनिंग | १०००० | १५०० |
| ११. | नविन कॉपिंग प्रिंटर खरेदी व झेरॉक्स मशिन दुरुस्ती. | ५० | १०५० |

उपरोक्त दुरुस्ती व फेरफारसह सन ९७-९८ च्या मुळ अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते.

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन ९७-९८ च्या अर्थ संकल्पाची ठळक वैशिष्टे खालील प्रमाणे.

१) महापालिका अधिकारी/कर्मचारी आकृतीबंध
२) सुरत पॅटर्न वरील स्वच्छता कार्यक्रम.
३) घन कचऱ्यापासुन खत निर्मिती प्रकल्प.
४) मालमत्ता कराची फेर आकारणी व मिळकतींना नंबर देणे.
५) महापालिकेकरिता स्वतंत्र न्यायालयाची मागणी.
६) गणपती विसर्जन विहिर परिसराचे भुसंपादन करणे.
७) अंतर्गत विकास खर्च/स्वखर्चाने अंतर्गत विकास कामे.
८) उघडयावर घाण टाकणे, शौच्यास बसणे यावर दंड आकारणी.
९) पाणी पुरवठा, विद्युत देयक शेतीच्या दराने आकारणी करणे.
१०) प्रभावी मालमत्ता कर वसुली करणे.
११) बालकनी बंद करण्ो बाबत प्रिमियम आकारणे.
१२) कर्मचाऱ्यांची गृह निर्माण संस्था व कंझ्युमर्स सोसायटी स्थापन करणे.
१३) विविध आदर्श बाबी.
१४) छत्रपती संभाजी महाराज, महाराणा प्रताप, स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे पुतळे बसविणे.
१५) मौलाना अब्दुल कलाम आझाद "रिसर्च सेंटरचे" बांधकाम हाती घेणे.
१६) १०० खांटाचे अद्ययावत रुग्णालय तयार करणे.
१७) महापालिकेचे व्ही.आय.पी. गेट हाऊस बांधणे.
१८) दुग्धशाळा स्थापन करणे.

या व इतर दुरुस्त्यासह प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

"जन गण मन" या राष्ट्रगितानंतर सभा संपली.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
सभापती स्थायी समिती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक ४-३-९७ रोजी भरलेल्या स्थायी समिती इतिवृत्त. दि. ४-३-९७ रोजी मा. श्री. गिरजाराम हाळनोर,सभापती यांचे अध्यक्षतेखाली वंदे मांतरम् या गिताने सभेला सुरुवात झाली. या सभेस महापालिका अधिकारी तथा खालील निम्ननिर्दीष्ट स.सभासद उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स.स. श्री. गौतम खरात | सभापती |
| २) | स.स.सौ. रजंनी जोशी | --//-- |
| ३) | सस.डॉ. भागवत कराड | --//-- |
| ४) | स.स.कु. माया लाडवाणी | --//-- |
| ५) | स.स.डॉ. विजयकुमार मेहेर | --//-- |
| ६) | स.स.श्री. महादेव सुर्यवंशी | --//-- |
| ७) | स.स.श्री. हमीदउद्दीन ताबा | --//-- |
| ८) | स.स.श्री. सुभाष टाकळकर | --//-- |
| ९) | स.स.श्री. भगवान घडामोडे | --//-- |
| १०) | स.स.श्री. त्रिंबक तुपे | --//-- |
| ११) | स.स.श्री. अभिमन्यु भालेराव | --//-- |
| १२) | स.स.श्री. कचरु नवपुते | --//-- |
| १३) | स.स.श्री. अ.रशिद खॉन(मामु) | --//-- |

**संवाद**

मा. सभापती : मंत्रमंडळाची बैठक असल्याकारणाने अगोदर इतिवृत्तावर चर्चा करावी.

श्री. महादेव सुर्यवंशी : इतिवृत्तातील पृष्ठ क्रं. २८ व २९ मधील विषय क्र. ६५१/२१ मध्ये ट्रेचिंग ग्राऊडवरील खत निर्मिती प्रकल्पा बाबत दोन निविदा मागविल्या पैकी सत्यम इंडस्ट्रिज औरंगाबा व लिफ बायोटेक मुंबई यांनी भरल्या परंतु या खत निर्मिती प्रकल्पासाठी एकुण किती जागेची मागणी केली याचा व व तो कोणत्या दराने घ्यावा याची माहिती द्यावी.

श्री. कचरु नवपुते : सदरच्या प्रस्तावामध्ये किती हेक्टर जागेची मागणी आहे व त्याचा दर काय असावा याचा उल्लेख नाही.

आरोग्य वैद्यकिय अधिकारी : संबंधीत निविदा धारकांना आपण काहीही पैसा देणार नाही. त्यांना घालुन दिलेल्या अटी व शर्तीनुसार १ रुपये प्रती हेक्टरने जागा लिजवर देण्यांत येणार आहोत.

मा. सभापती : खत निर्मिती प्रकल्प एकदा सुरु झाल्यानंतर या सभोवतालच्या भागातील दुर्गधी व इतर कोणताही त्रास होणार नाही. यासाठी या प्रकल्पासाठी निविदाधारकांनी भरलेल्या अटी व शर्तीनुसार त्यांना मंजुरी देण्यास हरकत नसावी.

श्री. कचरु नवपुते : कचऱ्यापासुन होणाऱ्या खताच्या विक्रीच्या ५% रक्कम रॉयलटी म्हणुन कचरा पोटी संबंधीत एजन्सीकडुन घेण्यात यावे.

श्री. महादेव सुर्यवंशी : या ठिकाणी महानगरपालिकेतर्फे रोड/लाईट व पाणी पुरवठा करण्यात येणार आहे.

मा. सभापती : संबंधीत एजन्सीजला पाणी व विज पुरवठा बाबत महापालिकेने कार्यवाही करुन व बाकी ते स्वतःच करणार आहेत.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी : खत प्रकल्पासाठी एजन्सीला ५-६ हेक्टर जागा लागणार आहे. आणि ती जागा लिजवर द्यावयाचा प्रस्ताव आहे यात प्रामुख्याने अटी व शर्ती घालुनच योग्य ती कार्यवाही करण्यात येणार आहे. महापालिकेतर्फे लिजवर जागा दिल्यानंतर त्या ठिकाणी कंपनी हा प्रकल्प स्वतःच्या खर्चाने तयार करुन खत निर्मिती सुरु करणार आहे. यासाठी मनपातर्फे कोणत्याही प्रकारचे कर्जे व अनुदान दिली जाणार नाही.

मा. सभापती : या एजन्सीवर आपला सुपुर्ण आधिकार राहणार आहे.

आरोग्य वैद्यकिय अधिकारी : प्रकल्पाची जागा व खत निर्मिती नियंत्रणाच्या हिशेब तपासण्याचे अधिकार महापालिकेस केव्हाही राहणार आहे. या प्रकल्पासाठी आपण जाहिर निविदा मागविल्या आहेत. त्यानुसार संबंधीत एजन्सीने निविदा भरलेल्या असुन प्रस्ताव विचाराधीन असावा.

मा. सभापती : नोरगांव ट्रेचिंग ग्राउंड वरील कचऱ्यापासुन दिवसेंदिवस तेथील नागरिकांना व परिसरात डोके दुःखी होत आहे. यासाठीच सदरील प्रकल्प त्याठिकाणी उभारुन स्वच्छ परिसर राहील व प्रदुषनाच्या दृष्टीनेही योग्य राहील.

डॉ. विजयकुमार मेहेर : संबंधीत एजन्सीजने सर्व बाबतीत एकंदर किती खर्चाचा प्रकल्प आहे. याची सविस्तर टिप्पणी दाखल केलेली असल्यास तो खर्च स्थायी समितीस दाखववावा.

मा. सभापती : यामध्ये एक करता येईल. प्रकल्पासाठी केरकचऱ्या पासुन २% किंवा ५% रॉयलटी महापालिकेस देणार आहेत. त्यापेक्षा त्या एजन्सीजला प्रत्यक्षात वाटाघाटीसाठी बोलावुन संपुर्णतः माहिती मागवुन घ्यावी. व रॉयलटी वाढवुन मिळणेबाबत चर्चा करता येईल.

श्री. महादेव सुर्यवंशी : विज व गॅस निर्मिती करण्यासाठी या प्रस्तावात कोण पुढाकार घेणार आहे. त्यापासुन येणाऱ्या उत्पन्नावर महापालिका काय करणार आहे.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी : विज निर्मिती बाबत प्रकल्प मरविम येते. यासाठी याबाबतचा विचार मरविमं पुरताच आहे.

मा. सभापती : संबंधीत एजन्सीला चर्चेसाठी मा. आयुक्त यांचे दालनांत अटी व शर्ती प्रशासनाने तयार करण्यात व स्थायी समिती समोर संपुर्ण अहवालासह पुढील बैठकीत दाखल करावा.

श्री. गौतम खरात : पृष्ठ क्र. १९ मधील प्रस्ताव क्र. ३६७/७ मध्ये अनु. क्र. २ श्री. माधव हांडे यांना मार्केटमधील गाळा क्र. ९ देण्यात आल्याचे दर्शविलेले आहे. त्याऐवजी ८ त्यांचे नांवे करावे.

मालमत्ता अधिकारी : संबंधीत व्यक्तींने दुकाने क्र. ८ चे भाडे भरणा केलेला आहे. त्यामुळे आता तसे काही दुरुस्ती करावे लागणार आहे. आपण जर निर्णय घ्याल त्याप्रमाणे कार्यवाही करता येईल.

मुख्य लेखापरिक्षक : दुकान क्र. ८ व ९ मधील अनामत रक्कमेत फरक असल्याने आता तशी दुरुस्ती करणे योग्य होणार नाही.

मालमत्ता अधिकारी : श्री. चौथमल यांनी दुकान क्र. ९ ची मागणी केलेली नाही व त्याप्रकारे चर्चाही केलेली नाही.

मा. सभापती : आता दुरुस्ती करता येणार नाही.

श्री. हमीदउद्यीन ताबा : मागील इतिवृत्तात शिक्षक भरती प्रकरणातील शिक्षकांना पगार देणे बाबत चर्चा केलेली होती. ज्याप्रमाणे काय कार्यवाही झाली. शिवाय शिक्षक भरती प्रकरणी समितीचा अहवाल अद्यापही प्राप्त झाला नाही.

मा. सभापती : नविन शिक्षक भरती प्रकरणी सर्व शिक्षकांना पगार देण्यात आलेला आहे.

श्री. अ. रशिदखॉन (मामु) : जकात करंट अकांऊट बाबत अद्याप काहीही कार्यवाही झालेली दिसत नाही.

मा. सभापती : प्रशासनाने अद्याप माहिती दिलेली नाही.

उप आयुक्त-१ : प्रशासनाने नियमाप्रमाणे आता जकात बाबत करंट अकांऊट रेन्यु करणे बाबत कार्यवाही केलेली नाही. व तसे आवश्यक वाटत नाही.

श्री. अ. रशिद खान(मामु) : दै. वृत्तपत्रात येथील प्लंबर असोसिएशनने जकात फारच कमी होत असल्याचे निदर्शनास आणुन दिलेले आहे. याबाबत माहिती द्यावी.

श्री. हमीद उद्यीन ताबा : जकात दिवसेंदिवस कमी येत आहे. याबाबत प्रशासनाने आवश्यक ती कार्यवाही करावी.

मा. सभापती : प्रशासनाने याबाबत आवश्यक ती दखल घ्यावी.

**विषय क्र. ६७३/१ :**

दिनांक १३-२-९७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

मा. सभापती : मंजुर.

**ठराव :**

१) इतिवृत्तातील पृष्ठ क्रं. २८ व २९ मधील विषय क्र. ६५१/२१ सदरील विषया बाबत प्रशासनाने स. सदस्यांच्या सुचनेनुसार संबंधीत एजन्सीजला चर्चेसाठी बोलवावे. व स्थायी समिती समोर पुर्न अहवाल पुढील बैठकीत ठेवावे.

२) या व इतर दुरुस्तीसह दि. १३-२-९७ चे इतिवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६७४/२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, चंपा मस्जीद चौक येथे स्वसंचलित वाहतुक संकेतांक बसविण्याच्या कामाकरिता र.रु. ३,६८,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च शासनाकडुन वाहतुक सुविधा अंतर्गत प्राप्त अनुदानामधुन करण्यांत येईल.

शासनाचे परित्रक जा. क्रं/एमयुजी-४६७६/१२५७/सीआर-२७०/युडी-९ दिनांक २९ नोव्हेंबर १९७९ अन्वये वाहतुक संकेताकांची कामे महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक महामंडळ मर्या.(मेलट्रॉन) यांच्याकडुन निविदा न मागविता थेट अंदाजपत्रकीय दराने करुन घेता येतात. सदरील प्राप्त अनुदान मार्च १९९७ पुर्वी खर्च करणे जरुरी आहे. त्यामुळे सदर वाहतुक संकेताकांचे काम त्वरीत पुर्ण करणे आवश्यक आहे.

करिता वरील शासन निर्णयाचे अधिन राहुन सदरील काम महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक महा मंडळ मर्या. (मेल्ट्रॉन) यांच्याकडुन अंदाजपत्रकीय दराने निविदा न मागविता करुन घेणे योग्य होईल.

तरी सदरील कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. ३,६८,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक महामंडळ मर्या. (मॅल्ट्रॉन) यांच्या कडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेणे बाबतचा प्रस्ताव स्थायी समिती विचारार्थ सादर.

मा. सभापती : मंजुर ३१ मार्च पुर्वी शासनाकडील आलेल्या अनुदानातुन सर्व कामाचा खर्च करावा. नसता पैसा शासनाकडे परत जाईल याची प्रशासनाने नोंद घ्यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चंपा मस्जीद चौक येथे स्वसंचलित वाहतुक संकेतांक बसविण्याचे कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. ३,६८,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील कामाची तातडी लक्षात घेता सदर काम महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक महामंडळ मर्या. (मेल्टॉन) यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६७५/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, महावीर चौक (बाबा पेट्रोल पंप) येथे स्वसंचलित वाहतुक संकेतांक बसविण्याच्या कामाकरिता र.रु. ३,२०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च शासनाकडुन वाहतुक सुविधा अंतर्गत प्राप्त अनुदानामधुन करण्यात येईल.

शासनाने परिपत्रक जा.क्र./एमयुजी-४६७६/१२५७/सीआर-२७०/युडी-९ दिनांक २९ नोंव्हेबर १९७९ अन्वये वाहतुक संकेतांकाची कामे महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक महामंडळ मर्यादित (मेल्ट्रान) यांच्याकडुन निविदा न मागविता थेट अंदाजपत्रकीय दराने करुन घेता येतात. सदरील प्राप्त अनुदान मार्च १९९७ पुर्वी खर्च करणे जरुरी आहे. त्यामुळे सदर वाहतुक संकेताकाचे काम त्वरीत पुर्ण आवश्यक आहे.

करिता वरील शासन निर्णयाने अधिन राहुन सदरील काम महाराष्ट्रा इलेक्ट्रानिक महामंडळ मर्यादित (मेल्ट्रॉन) यांच्याकडुन अंदाजपत्रकीय दराने निविदा न मागविता करुन घेणे योग्य होईल.

तरी सदरील कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. ३,२०,०००/- इलेक्ट्रॉनिक महामंडळ मर्यादित (मेल्ट्रॉन) यांच्याकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेणे बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महावीर चौक (बाबा पेट्रोल पंप) येथे स्वसंचलित वाहतुक संकेतांक बसविण्याच्या कामाकरिता र.रु. ३,२०,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम महाराष्ट्रा इलेक्ट्रॉनिक महामंडळ यांचे कडुन अंदाजपत्रकीय दराने करुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६७६/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, मुकुंदवाडी चौक, जालना रोड येथे स्वयंचलीत वाहतुक संकेताक बसविण्याच्या कामाकरिता रु.रु. ३,६८,०००/- चे

अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील खर्च शासनाकडुन वाहतुक सुविधा अंतर्गत प्राप्त अनुदानामधुन करण्यात येईल.

शासनाचे परिपत्रक जा.क./एमयुजी/४६७५/१२५७/सी.आर. २५०/युडी-९ दिनांक २९ नोंव्हेबर १९७९ अन्वये वाहतुक संकेतांकाची कामे महाराष्ट्रा इलेक्ट्रॉनिक महामंडळ मर्यादित (मेल्ट्रान) यांच्याकडुन निविदा न मागविता थेट अंदाजपत्रकीय दराने करुन घेता येतील सदरील प्राप्त अनुदान मार्च १९९७ पुर्वी खर्च करणे जरुरी आहे. त्यामुळे सदर वाहतुक संकेताकांचे काम त्वरीत पुर्ण करणे आवश्यक आहे.

करिता वरील शासन निर्णयाचे अधिन राहुन सदरील काम महाराष्ट्र अंदाजपत्रकीय दराने निविदा न मागविता करुन घेणे योग्य होईल.

तरी सदरील कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. ३,६८,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक महामंडळ मर्यादित (मेल्ट्रॉन) यांच्याकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेणे. बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मुकुंदवाडी चौक, जालना रोड येथे स्वयंचलीत वाहतुक संकेताक बसविण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रु.रु. ३,६८,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक महामंडळ यांचे कडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. ैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६७७/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर करित आहेत की, इटखेडा येथील शिवसमाधी हौसिंग सोसायटी मधील खडी रस्त्यांना डांबरीकरण करणेच्या कामाचे सन ९६-९७ चे सा.बा. खात्याचे दरसुचीनुसार र.रु. ३,०५,८००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे.

सदरील कामास मा. आयुक्त यांची मंजुरी मिळालेली आहे. सदरील कामाचा खर्च "भांडवली रस्ते डांबरीकरण" या लेखाधिकारी मधुन सन ९६-९७ साठी असलेल्या तरतुदी मधुन प्रस्तावित आहे.

तरी सदर कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु. ३,०५,८००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीच्या मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इटखेडा येथील शिवसमाधी हौसिंग सोसायटी मधील खडी रस्त्यांना डांबरीकरण करणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. ३,०५,८००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "भांडवली रस्ते डांबरीकरण" या शिर्षा खाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यावाही व्हावी.

**विषय क्र. ६७८/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, संत एकनाथ रंगमंदिर ते झांबड इस्टेट या रोडवर म.रा.वि.म. च्या पॉल सोडियम व्हेपर दिवे फिटींग लावुन विद्युत व्यवस्था करणेसाठी सदर अंदाजपत्रक सा.बा. खात्याचे सन ९६-९७ चे दर सुचिनुसार र.रु. १,१०,३००/- चे तयार करण्यात आलेले असुन खर्च "शहरात नविन पोल लावणे" या शिर्षातुन सन ९६-९७ मधुन करण्यास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिली आहे.

तरी र.रु. १,१०,३००/- चे अंदाजपत्रकीय खर्चास मंजुरी देण्यास प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, संत एकनाथ रंगमंदिर ते झांबड इस्टेट या रोडवर म.रा.वि.म. च्या पोलवर सोडियम व्हेपर दिवे फिटींग लावुन विद्युत व्यवस्था करणेसाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. १,१०,३००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "शहरात नविन पोल लावणे" या शिर्षातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यावाही व्हावी.

**विषय क्र. ६७९/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, जवाहर कॉलनी येथील उद्यानात विद्युतीकरणाचे काम करण्यासाठी सा.बा. खात्याच्या सन ९६-९७ च्या दरसुचीनुसार र.रु. २,००,८००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च ९६-९७ च्या "नविन उद्याने" या शिर्षकाखाली करण्यांत येईल.

तरी र.रु. २,००,८००/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जवाहर कॉलनी येथील उद्यानात विद्युतीकरणाचे काम करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. २,००,८००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "नविन उद्याने" या शिर्षकाखाली करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यावाही व्हावी.

**विषय क्र. ६८०/८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, आमखास मैदान येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथील विद्युतीकरणेचे काम करण्यासाठी सार्व. बांधकाम विभागाचे सन ९६-९७ चे दरसुचीनुसार र.रु. १,८५,१३५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले सदरील खर्च सन ९६-९७ च्या "नविन उद्यान" या शिर्षकाखाली करण्यांत येईल.

तरी र.रु. १,८५,१३५/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आमखास मैदान येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथील विद्युतीकरणेचे काम करण्यासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रु. १,८५,१३५/- च्या अंदाजपत्रकास तसे सदर खर्च "नविन उद्याने" या शिर्षखाली करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यावाही व्हावी.

**विषय क्र. ६८१/९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, जयविश्व भारती कॉलनी येथील उद्यानाचे विद्युतीकरण करण्याच्या कामासाठी सा.बां. खात्याच्या सन ९६-९७ च्या दरसुचीनुसार र.रु. २,६९,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील खर्च सन ९६-९८ साठी "नविन उद्याने" या शिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदीतुन करण्यात येईल.

तरी र.रु. २,६९,०००/- चे अंदाजपत्रक मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जयविश्वभारती कॉलनी येथील उद्यानाचे विद्युतीकरण करण्याच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु. २,६९,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम "नविन उद्याने" या शिर्षकाखाली करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यावाही व्हावी.

**विषय क्र. ६८२/१० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, मुंबई जकात नाका नगर नाका व वाळुज नाका व पैठण नाका येथे डांबरीकरण करणेच्या कामाचे अं.प. सन ९६-९७ चे डी.एस.आर. दराने र.रु. २,१९,३७०/- तयार करण्यांत आले आहे. त्यास मा. आयुक्तांची मंजुरी मिळालेली आहे. सदरील कामाचा खर्च "रस्ते दुरुस्ती व देखभाल पॅचवर्क)" या लेखा शिर्षामधुन सन ९६-९७ मधुन प्रस्तावित आहे.

तरी सदर कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रु. २,१९,३७०/- चे अं.प. स. स्थायी समितीच्या मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुंबई रोड जकात नाका व वाळुज नाका व पैठण नाका येथे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. २,१९,३७०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "रस्ते दुरुस्ती व देखभाल (पॅचवर्क)" या लेखाशिर्षातुन करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यावाही व्हावी.

**विषय क्र. ६८३/११ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, अलंकार कॉलनी परिमल सोसायटी व रोशन सोसायटीमध्ये रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाचे सन ९५-९६ चे सा.बा. खात्याचे दराने र.रु. ५,५९,१५७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन त्यास मा. आयुक्त यांची मंजुरी मिळालेली आहे. सदरील कामाचा खर्च रस्ते दुरुस्ती व देखभाल "पुर्नडांबरीकरण" सन ९६-९७ मधुन प्रस्तावित आहे.

सदरील कामासाठी निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण तिन निविदापत्रके विक्री झाल्या असुन निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण तीन निविदा प्राप्त झाली असुन त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. डि. अजितसिंग | ५% | जास्त दराने |
| २. | मे. मास्कॉट कन्स्ट्रक्शन | ९% | --//-- |
| ३. | मे. अदिनाथ कन्स्ट्रक्शन | ११% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराने श्री. डी. अजितसिंग यांची निविदा आहे सदर दर जास्त वाटल्याने मा. आयुक्तांसमोर संबंधीतास वाटाघाटीसाठी बोलावुन सदरील काम अंदाजपत्रकीय दराने करण्याबाबत सुचविले संबंधीत ठेकेदार त्यास मान्यता दिली त्यानुसार सदरील काम श्री. डी. अजितसिंग यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्याचे मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अलंकार सो.परिमल सोसायटी व रोशन सोसायटीमध्ये रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची श्री. डी. अजितसिंग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यावाही व्हावी.

**विषय क्र. ६८४/१२ :**

सर्वासाधारण सभेचा ठराव क्र. २९/२७ दि. २०-७-९६ अन्वये अनाधिकृत वसाहतीमतध्ये सुविधा पुरवायच्या असल्यास सदर खर्चाच्या २५% लोकवर्गणी नागरिकांनी भरल्यास सुविधा पुरविण्यांत याव्यात असा ठराव संमत झालेला आहे. त्याअनुषंगाने सुरेवाडी येथे १००, १५० व २०० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकण्यासाठी र.रु. ४,९९,५५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले असुन सदरील वसाहत अनाधिकृत असल्यामुळे अंदाजपत्रकांच्या २५% र.रु. १,२४,८८८/- पैकी रु. ९०,०००/- कार्यालयात जमा केले आहे. व बाकी उरलेली रक्कम सुध्दा भरणार आहेत. सदरील प्रस्ताव हा दि. १९-२-९७ रोजी सर्वसाधारण सभेमध्ये मांडण्यांत आला होता. परंतु सदरील सभा आचार संहिता मुळे तहकुब करण्यांत आली आहे. संबंधीत प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवुन पुढील कार्यवाही करणे बाबत मा. आयुक्तांनी आदेशीत केले आहे.

तरी अं.प. रु. ४,९९,५५०/- स मंजुरी मिळण्यास्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सुरेवाडी येथे १००, १५० व २०० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु. ४,९९,५५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यावाही करावी.

**विषय क्र. ६८५/१३ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पैठण रोडलगत श्री. नंदकिशोर कासलीवाल यांच्या बंगल्यापासुन जुन्या मुख्य लाईन पर्यंत २५० मी.मी. व्यासाची जलनिःसारण वाहीनी टाकणे बाबत परिसर अभियांत्रिकी विभागाचे सन ९५-९६ च्या दरसुची प्रमाणे अंदाजपत्रक र.रु. २,७५,०५०/- चे तयार करण्यांत आले आहे. सदरील खर्च "जलनिःसारण भांडवली" हया शिर्षकाअंतर्गत करण्यांत येईल.

तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पैठणरोड लगत श्री. नंदकिशोर कासलीवाल यांच्या बंगल्यापासुन जुन्या लाईनपर्यंत २५० मी.मी. व्यासाची जलनि:सारण वाहीनी टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु. २,७५,०५०/- या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "जलनि:सारण भांडवली" या शिर्षकांतर्गत करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यावाही व्हावी.

**विषय क्र. ६८६/१४ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पदमपुरा येथे ४५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत परिसर अभियांत्रिकी विभागाचे सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक र.रु. ४,१९,०००/- चे तयार करण्यांत आले आहे. सदरील खर्च "मुख्य जलनि:सारण वाहिनी टाकणे" हया शिर्षकातुन करण्यांत येईल.

तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पदमपुरा येथे ४५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु. ४,१९,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च "जलनि:सारण भांडवली" या शिर्षकाअंतर्गत करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यावाही व्हावी.

**विषय क्र. ६८७/१५ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वारे टी हाऊस रेल्वे स्टेशन ते जहागिरदार कॉलनी येथे ३०० मी.मी. व्यासाची मुख्य जलनि:सारण वाहिनी टाकणे बाबत परिसर अभियांत्रिकी विभागाचे सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक र.रु. ४,३०,५००/- चे तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाची आर्थिक तरतुद "जलनि:सारण भांडवली" मधुन करण्यांत आला आहे. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वारे टी हाऊस रेल्वे स्टेशन ते जहागिरदार कॉलनी येथे ३०० मी.मी. व्यासाची मुख्य जलनि:सारण वाहिनी टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु. ४,३०,५००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "जलनि:सारण भांडवली" या शिर्षकातुन करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यावाही व्हावी.

**विषय क्र. ६८८/१६ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, म्हाडा कॉलनी रेल्वे स्टेशन येथे १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकवयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९५-९६ च्या दरसुची नुसार र.रु. २,३४,०३५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदर कामाचा खर्च भांडवली कामाची तरतुद मधुन करण्यांत येणार आहे. तरी अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे म्हाडा कॉलनी रेल्वे स्टेशन येथे १५० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रु. २,३४,०३५/- च्या

अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च भांडवली कामाच्या तरतुदीमधुन करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यावाही व्हावी.

**विषय क्र. ६८९/१७ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शहानुरवाडी येथील वैद्यकीय को. ऑ.हौ.सो. येथे १०० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९४-९५ व ९५-९६ च्या दरसुचीनुसार र.रु. ३,४३,११५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले. त्यास स्थायी समिती ठराव क्र. ३००/९ दि. ९-१०-९६ अन्वये मंजुरी देण्यांत आली. कार्यालयाची निविदा सुचना क्र. १२९/९६ जी की दै. वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यांत येऊन बी-१ निविदा मागविण्यांत आल्या कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण पंधरा निविदा विक्री झाल्या. व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या तारखेस एकुण सहा सिलबंद निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदा खालील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. व्ही.आर. महाजन | २२.७% | कमी |
| २. | श्री. मन्नान खॉन | ५% | --//-- |
| ३. | श्री. सुरेश साधवानी | २३% | --//-- |
| ४. | श्री. अरविंद पवार | १५.५% | --//-- |
| ५. | श्री. जी.आर. घोडेले | ०.०१% | --//-- |
| ६. | श्री. राजसिंग | १५% | --//-- |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर हा श्री. सुरेश साधवानी यांचा आहे. म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३% कमी दराची आहे.

तरी अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३% कमी दराची श्री. सुरेश साधवानी यांची निविदा मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहानुरवाडी येथील वैद्यकीय को. ऑ.हौ.सो. येथे १०० मी.मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता प्राप्त निविदापैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा २३% कमी दराची श्री. सुरेश साधवानी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यावाही व्हावी.

**विषय क्र. ६९०/१८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, माजी महापौर सौ. सुनंदा कोल्हे यांनी दि. २-७-९६ रोजी पत्र दिलेले असुन लायन्स क्लब कॉलनी मुकुंदवाडी येथील जुने सार्व शौचालय तोडुन त्या जागेवर बालवाडी बांधणेकरिता मागणी आहेत तसेच तथील नागरिकांना सुध्दा निवेदन दिलेले आहे.

लायन्स कल्ब स.गृ नि.सं. मुंकुंदवाडी झोपडपट्टी श्रेणीवाढ योजना औरंगाबाद या कॉलनीतील सार्व शौचालय तोडुन त्या जागेवर बालवाडी बांधणेच्या कामासाठी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता सदर कामासाठी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता सदर ठिकाणी पंधरा बैठकीचे शौचालय आहे. सदरचा भाग हा स्लम असल्यामुळे प्रकल्प संचालक यांचा अभिप्राय प्राप्त केला असुन सदर अभिप्रयामध्ये त्यांनी नमुद केला आहे की, सदर कॉलनीमध्ये प्रत्येक

घरात शौचालय देण्यांत आले आहे. त्यामुळे सदर शौचालयाची गरज नाही. त्याऐवजी सदर शौचालयाच्या आतील भिंती तोडुन कमी खर्चात त्या इमारतीचा अपयोग बालवाडी करिता खोली तयार करणे करिता सुचविले आहे.

सदर शौचालयाची स्थिती पाहता मा. प्रकल्प अधिकारी यांनी सुचविल्याप्रमाणे सार्व. शौचालयाच्या आतील भिंती तोडुन बालवाडीची खोली तयार करणे तांत्रिकदृष्टया बरोबर नाही. तसेच सदरील सार्व शौचालयाची पाण्याअभावी स्वच्छता होत नसल्या मुळे दुर्गधी मुळे रोगराई पसण्याची शक्यता नाकरता येणार नाही. तसेच प्रत्येक घरात शौचालय असल्यामुळे सदरील सार्व शौचालय असल्यामुळे सदरील सार्व. शौचालय तोडुन बालवाडी बांधणे प्रस्ताव संयुक्तीक आहे.

सदरील सार्व शौचालयाची बांधकामाबाबत उप अभियंता स्लम-१ यांच्या विभागात जाऊ न चौकशी केली असता सदरील शौचालय १० ते १२ वर्षापुर्वी बांधण्यांत आले असल्याचे सांगितले. तसेच वेगळे बांधण्यांत आले असल्याचे सांगितले. तसेच नेमके कोणत्या वर्षी बांधण्यांत आले आहे. त्याची तारीख कळाली नाही. जुने शौचालय तोडुन त्या जागेवर बालवाडी बांधणेच्या कामासाठी सार्व. बांधकाम खात्याचे ९५-९६ चे जिल्हा दरसुची नुसार रक्कम रुपये २,०९,५४०/- चे अं.प. तयार करण्यांत आले असुन त्यास स्थायी सिमती समोर सादर करण्यासाठी मा. आयुक्तांनी दि. २२-२-९६ अन्वये शिफारस केलेली आहे. सबब सदर कामाचे व रु. २,०९,५४०/- चे अं.प. मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर. सदरचा खर्च विकास इमारती शाळा व दवाखाने या लेखा शिर्षामधुन प्रस्तावित आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुकुंदवाडी येथील जुने सार्व शौचालय तोडुन त्या जागेवर बालवाडी बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रुपये २,०९,५४०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यावाही व्हावी.

**विषय क्र. ६९१/१९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. भावसिंगपुरा गाव येथे अभ्यासिका बांधणेच्या कामासाठी सार्व. बांधकाम खात्याचे सन ९६-९७ चे जिल्हा दरसुची नुसार र.रु. १,९३,३३६/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन मा. आयुक्तांना दि. १९-२-९६ अन्वये मंजुरी दिलेले आहे. सबब सदर कामाचे र.रु. १,९३,३३६/- अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

सदरचा खर्च ९७-९८ या वर्षात व्यापारी संकुल व इतर इमारती या लेखा शिर्षातुन करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भावसिंगपुरा गाव येथे अभ्यासिका बांधणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु. १,९३,३३६/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "व्यापारी संकुल व इतर इमारती" या शिर्षातुन करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यावाही व्हावी.

**विषय क्र. ६९२/२० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, गरमपाणी स्लम येथे डांबरी रस्ते तयार करणे बाबत कामाकरिता सा.बां. खाते यांच्या वर्ष ९४-९५ च्या दर सुचीनुसार रु. १,४४,५५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाचा खर्च डांबरी रस्ते

रु. ११० लाख शिर्षातुन करण्यांत येईल. सदरील अंदाजपत्रकास मा. आयुक्तांना दि. ११-१०-९६ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदर कामाकरिता तयार करण्यांत आलेले अं.प. रु. १,४४,५५०/- यास मान्यतेचा प्रस्ताव मंजुर तथा विचारार्थ सादर.

**संवाद**

श्री. रशिद मामु : या प्रस्तावातील अंदाजपत्रक वाढवुन मिळावे कारण सदरील खर्चाची तरतुद सन १९९४-९५ या वर्षाच्या दरसुचीनुसार काढलेले आहे. तेव्हा सन १९९६-९७ या प्रमाणे वाढीव तरतुदीतुन करण्यांत यावे.

शहर अभियंता : सन १९९६-९७ या डि.एस.आर. दराप्रमाणे १०% वाढ होईल.

मा. सभापती : सन १९९६ या वित्तीय वर्षाच्या डी.एस.आर. दराप्रमाणे वाढ करण्यांत हरकत नाही. प्रस्ताव मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. गरमपाणी स्लम येथे डांबरी रस्ते तयार करणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेले रक्कम रुपये. १,४४,५५०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "डांबरी रस्ते" रु. ११० लाख या लेखा शिर्षातुन करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यावाही व्हावी.

**विषय क्र. ६९३/२१ :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा. आयुक्त यांच्या मंजुरी नुसार प्रस्ताव सादर केला की, नाथ मार्केट येथील तिसऱ्या मजल्या वरील जागा कौंटुबिक न्यायालयास भाडयाने दिलेली होती. ती जागा त्यांनी रिकामी केली आहे. तसेच सहा. आयुक्त अन्न व औषध प्रशासन यांनी विनंती केल्यानुसार मा. स्थायी समिती ठराव क्र. ४६६/३४ दि. ८-३-९६ अन्वये ठराव पारित होऊन कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी ठरविलेल्या दराने भाडयाने देणे बाबत मान्यता दिली होती. त्या अनुषंगाने सहा. आयुक्त अन्न व औषध प्रशासन यांना समिती पत्र देण्यांत आले होते. तसेच त्यांना जागेचा ताबा घेणे मनपाच्या हक्कात करारनामा करुन देणेसाठी वारंवार पत्र देण्यांत आले असता, त्यांनी दिनांक २९-१-९६ व १-२-९७ ला कळविले की, शासनाकडुन लवकरच जागा भाडयांनी घेणेसाठी मंजुरी मिळताच जागेचा ताबा घेणे सोईचे होईल असे कळविले आहे.

तथापी सहा. आयुक्त अन्न व औषध प्रशासन यांनी दि. २०-२-९७ रोजी पत्र दिले आहे की, तिसऱ्या मजल्या वरील संपुर्ण जागा भाडयाने घेणेसाठी शासनाचे पत्र सी.औ.एम/२५९/९६ दिनांक १३-२-९६ अन्वये प्रयोगशाळा उघडण्यांसाठी शासनाकडुन मंजुरी मिळाली आहे. तरी सदरील जागेचा ताबा देण्यांत यावा.

तसेच नाथ मार्केट येथील संपुर्ण तिसऱ्या मजल्या वरील जागा भाडयाने मिळण्या साठी अधिक्षक अभियंता परिसर अभियांत्रिकी मंडळ यांनी पत्र दिले की, प्रादेशिक मुख्य अभियंता मंडळ हया कार्यालयाने जागाची मागणी केलेली आहे.

तसेच जिल्हा व्यवस्थापक लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ यांनी गाळा मधील जागाची मागणी केलेली आहे.

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम दरमहा भाडे रु. २२,८९८/- (रु. बावीस हजार आठशे अठयान्नव) एवढे निश्चित केले असुन हे भाडे महानगरपालिकेचे कर वगळुन निश्चित केले आहे. व एकुण क्षेत्रफळावर ५/- रु. प्रति चौ.मी. प्रतिमहा सेवा शुल्कासह

नेहमीचया अटी-शर्तीनुसार वरील जागा अन्न व औषध प्रशासन यांना देण्या बाबत प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर कार्योत्तर मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम निश्चित केलेल्या दरानुसार महानगरपालिकेचे कर वगळुन दरमहा रु. २२,८९८/- भाडयाने व एकुण क्षेत्रफळावर ५/- रु.प्रति चौ.मी. प्रतिमहा सेवा शुल्कासह नेहमीच्या अटी-शर्ती नुसार नाथ मार्केट येथील तिसऱ्या मजल्यावरील संपुर्ण जागा अन्न व औषध प्रशासन यांना देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यावाही व्हावी.

## *पुरवणी विषय पत्रिका*

**विषय क्र. ६९४/१ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, क्रांतीचौक व खोकडपुरा येथे ४०० व १५० मी.मी. व्यासाची सी. आय. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची सन ९२-९३ नुसार र.रु. १३,०५,०००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात येवुन त्यात साहित्याची किंमत र.रु. ७,३४,५७०/- एवढी असुन मंजुरी र.रु. ५,७०,४३०/- एवढी आहे. त्यात प्रशासकीय ठराव क्र. १९७/- दि. २३-३-९५ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदरचा खर्च हा १०% लोकवर्गणी जी मनपाने मंडळास भरावयाची आहे. त्यामधुन कपात करुन खर्च करावयाचा आहे.

सदर कामासाठी दै. वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येऊन फक्त मंजुरीच्या रक्कमेची बी-१ निविदा मागविण्यात आल्या. त्यामध्ये व्ही.आर. महाजन यांची सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% जास्त दराच्या निविदेस प्रशासकीय ठराव क्रं. १९५ दि. २३-३-९५ अन्वये मंजुरी देण्यांत आली. मागील दोन वर्षापासुन जालना रोड क्रॉस करुन जलवाहिनी टाकण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे परवानगी न मिळाल्यामुळे काम पुर्ण झाल्या नंतर पैठणगेट परिसरात पाण्याचा पुरवठा सुरळीत होईल. त्यासाठी मनपाकडे असलेल्या क्रांतीचौक येथील रस्त्यावर रोड क्रॉसिंग करुन घ्यावे लागेल. या करिता जलवाहिनीची लांबी वाढत आहे. त्यामुळे मुळ अंदाजपत्रकात र.रु. ३,७०,१६२/- एवढयाची वाढ होत आहे.

तरी वाढीव अंदाजपत्रक र.रु. ३,७०,१६२/- यास व मंजुर निविदा धारक श्री. आर. महाजन यांच्याकडुन मंजुर दरात काम करुन घेण्यासाठी प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

कार्यकारी अभियंता : सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन जालना रोड क्रॉसिंग लाईन टाकणेसाठी ना हरकत प्रमाण पत्र मिळालेले नाही.

मा. सभापती : या बाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. प्रस्ताव मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे क्रांतीचौक व खोडपुरा येथे ४०० व १५० व्यासाची सी.आय. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता जलवाहिनीची लांबी वाढल्यामुळे वाढीव अंदाजपत्रक रु. ३,७०,१६२/- ला आणि सदर काम पुर्वीचेच गुत्तेदार श्री. व्ही.आय. महाजन यांच्याकडुन मंजुर दरात करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यावाही व्हावी.

**विषय क्र. ६९५/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मोतीकारंजा नाईकवाडा स्लम येथे नविन खांडके बसविणे, जुनी खांडकी दुरुस्ती करणे, नविन गटार बांधणे व गटार दुरुस्त करणे याबाबत कामाकरिता सा.बा. खाते यांचा वर्ष ९५-९६ च्या दरसुची नुसार ६,५२,६६२/- चे अंदाजत्रक तयार करण्यांत आले. सदरील काम ५% कमकुवत घटक कल्याण योजना या शिर्षकातुन करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त दि. ३०-८-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे. तसेच दिनांक २८-२-९६ च्या सर्वसाधारण सभेत विषय क्र. ९८/१२ नुसार मंजुरी मिळालेली आहे.

प्रसतावित कामासाठी निविदा मागविण्यांत आले असता एकुण (१५) निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारण्यांच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण (२) दोन निविदा प्राप्त झाल्या व उपस्थित गुत्तेदारसमक्ष उघडण्यांत आल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. अन्सारी कन्स्ट्रक्शन | ४.९% | जास्त |
| २. | श्री. एस. झेड. सिद्यीकी | ७% | जास्त |

सदरील दर कार्यालयास जास्त वाटल्याने दराच्या वाटाघाटी साठी बोलावले असता. दि. १३-२-९७ रोजी मा. आयुक्त यांची मंजुरी प्रमाणे ठेकेदाराने सदरील काम अंदाजपत्रकीय दराने करण्यास संमती दिली आहे. करिता अंदाजपत्रकीय दराची असलेली श्री. अन्सारी कंन्स्ट्रक्शन यांची निविदा मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोतीकारंजा नाईकवाडा स्लम येथे नविन खांडकी बसविणे, जुनी खांडकी दुरुस्ती करणे, नविन गटार बांधणे व दुरुस्त करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व म्हणजेच अंदाजपत्रकीय दराची श्री. अन्सारी कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यावाही व्हावी.

**विषय क्र. ६९६/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो मंजुरपुरा, हर्षनगर मधील नाल्यावर पुलाजवळ बहुउद्देशीय दुकान बांधणेच्या कामासाठी मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. १६२/३ दि. २०-११-९६ अन्वये र.रु. १७,७५,२१९/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि/४/९७ दि. ९-१-९७ अन्वये निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकुण ६ निविदा विक्री झाल्या निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण २ निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्याची तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. जी.आर. घोडले | ५% | जास्त |
| २. | श्री. एलोरा कन्स्ट्रक्शन | ८.५५% | जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराची श्री.श्री. आर.असल्यामुळे मक्तेदाराचे वाटाघाटी होऊन सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जासत एवेजी अंदाजपत्रकीय दराने करण्यांत मा. आयुक्तांनी मान्यता दिली. व त्यास मक्तेदारानेही संमती दर्शविली सबब सदर कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त ऐवजी (दराने वाटाघाटीनुसार) अंदाजपत्रकीय दराची श्री. जी.आर. घोडेले यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मंजुरपुरा, हर्षनगर मधील नाल्यावर पुलाजवळ बहुउद्देशीय हॉल व दुकान बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक दृष्टया कमी दराचे निविदाधारक श्री.जी.आर. घोडेले गुत्तेदार यांनी संमती दिल्यानुसार सदर काम त्यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यावाही व्हावी.

**विषय क्र. ६९७/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो भिमपुरा भागात डॉ. बाबासाहेब पुतळयास संरक्षित भिंत बांधणेचे कामाकरिता र.रु. ४,६२,१००/- चे अंदाजपत्रक सा.बा. विभाग, औरंगाबाद यांची दरसुचना ९५-९६ नुसार तयार करण्यांत आले असुन मा. आयुक्त यांना दि. २४-२-९७ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

सदर काम आर्थिक तरतुद ९६-९७ च्या दलित वस्तीसाठी राखुन ठेवलेले एक कोटी अनुदानातुन करण्यात येईल. करिता मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो भिमपुरा भागात डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयास संरक्षित भिंत बांधणेचे कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु. ४,६२,१००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च दलित वस्तीसाठी राखुन ठेरलेले एक कोटी अनुदानातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६९८/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, सोना मंगल कार्यालय ते किराणाचावडी पोलिस स्टेशन पर्यंतच्या ४० फुट विकसीत रोडेचे रुंदीकरण करणेच्या कामासाठी सा.बा. खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक र.रु. ३,०५,३२०/- चे तयार करण्यांत आलेले आहे. सदरील कामाचा खर्च शासकीय अनुदान सन ९५-९६ (१० कोटी) या शिर्षकातुन करण्यांत येईल.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक र.रु. ३,०५,३२०/- चे मंजुरीबाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीचे विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सोना मंगल कार्यालय ते किराणाचावडी पोलिस स्टेशन पर्यंतच्या ४० फुट विकसीत रोडेचे रुंदीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रु. ३,०५,३२०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च शासकीय अनुदान ९५-९६ (१० कोटी) मधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६९९/६ :**

मो. जाफरगेट येथील स.नं. ३५ मधील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मालकीचे भुखंड विक्री करण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीने काढल्या होत्या. त्या भुखंडापैकी भुखंड क्र. ३ व ५(क) हे महानगरपालिकेने तेथे महानगरपालिकेचे शॉपिंग सेंटर विभागीय कार्यालय इ. तत्सम वापराकरिता खरेदी करण्यांचे प्रस्ताविलेले आहे.

सदर भुखंड खरेदी करण्यांचे दृष्टीने कृषी उत्पन्न बाजार समितीची पदाधिकांऱ्याशी खाजगी वाटाघाटी करुन हया जमीनीचा दर रु. ९०/- प्रति चौरस फुट निश्चित करण्यांत आला. त्या दरास व जागा विक्रीस शासनाची मान्यता मिळाल्याचे समितीने कळविले आहे. याबाबत समितीने शिफारस पत्र जागेवर प्रत्यक्ष भुखंडाचे सिमांकन करुन प्रथम क्षेत्र निश्चित करुन घेण्या बाबत कळविले आहे.

स्थायी समितीने वर नमुद केल्याप्रमाणे जागा खरेदीस व दर रु. ९०/- प्रति चौरस फुटाकरिता मंजुरी दिल्यास प्रत्यक्ष जागेवरील सिमांकनानुसार उपलब्ध जमिन क्षेत्राची खात्री करुन त्या क्षेत्राकरिता प्रति चौरस फुट रु. ९०/- प्रमाणे रक्कम कृषी उत्पन्न बाजार समितीस अदा करण्यांत येईल. हया जमिनीचे खरेदी खाता चा सर्व खर्च महानगरपालिकेस करावयास आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. जाफरगेट येथील स.नं. ३५ मधील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मालकीचे भुखंड क्र. ३ व ५ (क) हे मनपाचे शॉपिंग सेंटर विभागीय कार्यालय इ. तत्सम कामाकरिता प्रति चौ. फुट रु. ९०/- प्रमाणे खरेदी करण्यांस व खरेदी खताचा सर्व खर्च मनपाचे करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७००/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, विनायकराव पाटील चौक ते रेल्वे स्टेशन या १०० फुट रस्त्याचे रुंदीकरण करणे बाबत बन्सीलालनगर ते रेल्वे स्टेशन पर्यंतचा रस्त्यावर दुभाजक टाकणे बाबत चे सन ९५-९६ चे सां.बा. खात्याचे डी.एस.आर. दराने र.रु. २३,१२,४८०/- चे अं.प. तयार करण्यांत आले असुन त्यास मा. आयुक्त यांची मंजुरी मिळालेली आहे. सदरील कामाचा खर्च भांडवली रस्ते या लेखाशिर्षातुन ठेवण्यांत आलेल्या वर्ष ९६-९७ च्या एकुण ४६०/- (४००+४०+२०) लक्ष तरतुदीमधुन प्रस्तावित आहे.

सदील कामासाठी निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत २१ निविदा विक्री झाल्या असुन निविदा स्विकृतीच्या तारखेपर्यंत एकुण सहाच निविदा दर भरुन प्राप्त झाल्या असुन त्यांचा तक्ता खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. सलाम पटेल | २७.८६% | कमी दराने |
| २. | श्री. कुलवंतसिंग | २७.७३% | --//-- |
| ३. | श्री. डी.सी. पंजाबी | २३.३६% | --//-- |
| ४. | श्री. आर.बी. चव्हाण | २२% | --//-- |
| ५. | श्री. एस.एच असोशिएटस् | २१.२२% | --//-- |
| ६. | श्री. मोहमंद सलीम | १९.९५% | --//-- |

तुलनात्मकृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.८६% कमी दराने श्री. सलीम पटेल यांची निविदा आहे.

तरी सदर कामाकरिता तयार करण्यांत करण्यांत आलेल्या र.रु. २३,१३,४८०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम श्री. सलीम पटेल यांच्याकडुन २७.८६% कमी दराने करुन घेण्या बाबतच्या प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विनायकराव पाटील चौक ते रेल्वे स्टेशन या १०० फुट रस्त्याचे रुंदीकरण करणेच्या कामाकरिता व बन्सीलालनगर ते रेल्वे स्टेशन पर्यंतच्या रस्त्यावर दुभाजक टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया

सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा २७.८६% कमी दराची श्री. सलीम पटेल यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७०१/८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. ८२ चिकलठाणा (गाव) व चौधरी कॉलनी येथे नविन खडी रस्ते तयार करणे व अस्तीत्वात असलेल्या खडी रस्त्याचे मजबुतीकरण करणेचे कामाकरिता रु. ४,८५,०००/- चे अंदाजपत्रक सा.बा. विभाग औरंगाबाद यांचे दरसुची ९५-९६ प्रमाणे तयार करण्यांत आले असुन मा. आयुक्तांनी दि. २४-९-९६ च्या प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तसेच दि. ९-१०-९६ च्या स्थायी समिती विषय क्र. ३१३/२२ अन्वये मंजुरी मिळाल्यानंतर रितसर निविदा वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन मागविण्यांत आली सुचना क्र. मनपा लेखा/नि/११३ दिनांक २०-१०-९६ अन्वये मागविण्यांत आल्या असता निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकुण १९ कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्यांच्या तारखेपर्यंत फक्त सात निविदा प्राप्त झाल्या त्या निविदा दि. २०-११-९६ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. आर.बी. चव्हाण | २३% | कमी दराने |
| २. | श्री. भारुका | ३०% | --//-- |
| ३. | श्री. हुसैन अली | २६.८६% | --//-- |
| ४. | श्री. अ. सलाम | १५.९९% | --//-- |
| ५. | श्री. कुलवंतसिंग | १५.७०% | --//-- |
| ६. | श्री. मंडोरे | १३.१% | --//-- |
| ७. | श्री. एस.एच. असो. | - | दर भरला नाही व इ.एम.डी. जोडला नाही. |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३३% कमी दराची श्री. आर.बी. चव्हाण यांची निविदा मा. आयुक्तांनी दि. २०-२-९७ रोजी मान्यता दिलेली आहे. करिता मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. ८२ चिकलठाणा (गाव) व चौधरी कॉलनी येथे नविन खडी रस्ते तयार करणे व अस्तीत्वात असलेल्या खडी रस्त्याचे मजबुतीकरण करणेच्या कामाकरिता प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी अं.प. दरापेक्षा ३३% कमी दराची श्री. आर.बी. चव्हाण यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७०२/९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. पडेगांव स्लम मधील रस्त्याचे डांबरीकरण करणे बाबत कामाकरिता सा.बां. खाते यांच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार रु. ३,७०,२००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे. सदरील काम "१८ खेडी विकास" या शिर्षातुन करण्यांत येईल सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दि. १८-८-९६ ला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. तसेच स्थायी समिती दि. ३०-८-९६ रोजी विषय क्र. १५ नुसार मंजुरी मिळालेली आहे.

प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यांत आले असता अंतिम तारखेपर्यंत एकुण दोन निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण दोन निविदा प्राप्त झाल्या व उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. आर.बी. देशमुख्य | ७.८८% | जास्त |
| २. | श्री. आदिनाथ कन्स्ट्रक्शन | १०.७९% | --//-- |

त्यांनतर पहिल्या क्रमांकाचे ठेकेदार श्री. आर.बी. देशमुख यांना दराबाबत वाटाघाटीसाठी बोलवले असता ते आले नाही. म्हणुन त्यांची अनामत रक्कम १% जप्त करुन दुसऱ्या क्रमांकाचे ठेकेदार श्री. आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांनी मा. आयुक्ता यांच्या पालनांत दि. २५-२-९७ रोजी हे काम अंदाजपत्रकीय दराने करण्यांस लेखी संमती दिलेली आहे.

तरी अंदाजपत्रकीय दराची असलेली आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पडेगांव स्लम मधील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता सर्वात कमी दराचे दरपत्रकधारक वाटाघाटीस न माल्याने गुत्तेदार श्री. आर.बी. देशमुख यांची अनामत रक्कम जप्त करुन दुसरे कमी दराचे गुत्तेदार श्री. आदिनाथ कन्स्ट्र यांचेशी वाटाघाटीनुसार सदर काम अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७०३/१० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. मोगलपुरा (बारापुल्ला) स्लम येथे डांबरीकरण करणे बाबत कामाकरिता सा.बां. खाते यांच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार रु. ४,४८,८८५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील कामाचा खर्च "डांबरी रस्ते" या शिर्षातुन करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दि. २६-३-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे. तसेच स्थायी समिती दि. ३०-८-९६ रोजी विषय क्र. ४ नुसार मंजुरी मिळालेली आहे.

प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आले असता अंतिम तारखेपर्यंत एकुण दोन निविदा विकल्या गेल्या व स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण दोन निविदा प्राप्त झाल्या उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. आर. बी. देशमुख | ८.८८% | जास्त |
| २. | श्री. आदिनाथ कन्स्ट्रक्शन | १२% | जास्त |

त्यानंतर पाहिल्या क्रमांकाचे ठेकेदार श्री. आर.बी. देशमुख यांना दराबाबत वाटाघाटीसाठी बोलवले असता ते आले नाही. म्हणुन त्यांची १% अनामत जप्त करुन दुसऱ्या क्रमांकाचे ठेकेदार आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांना मा. आयुक्त यांच्या दालनात दि. २५-२-९७ रोजी हे काम अंदाजपत्रकीय दराने करण्यांस लेखी संमती दिलेली आहे.

तरी अंदाजपत्रकीय दराची असलेली आदिनाथ कन्ट्रक्शन यांची निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मोगलपुरा (बारापुल्ला) स्लम येथे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी कमी दराचे निविदाधारक श्री. आर.बी. देशमुख वाटाघाटीकरिता आले नाही. म्हणुन त्यांची अनामत रक्कम जप्त करुन दुसरे कमी दराचे

निविदाधारक श्री. आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदर काम त्यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७०४/११ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. हर्षनगर स्लम येथे डांबरीकरण करणेचे कामाकरिता सा.बां. खाते ९५-९६ च्या दरसुचीनुसार रु. ९,९०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले. सदरील काम "डांबरी रस्ते" या शिर्षातुन करण्यांत येईल. सदरच्या अं.प.स.मा. आयुक्तांनी दि. १६-७-९६ ला प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. तसेच सर्वसाधारण सभा दि. १९-८-९६ रोजी विषय क्र. ७ नुसार मंजुरी मिळालेली आहे.

प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आले असता अंतिम तारखेपर्यंत दोन निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारण्यांच्या तारखेपर्यंत एकुण दोन निविदा प्राप्त झाल्या व उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. आर.बी. देशमुख | ७.८८% | जास्त |
| २. | श्री. आदिनाथ कस्ट्रक्शन | १०.७९% | जास्त |

त्यानंतर पहिल्या क्रमांकाचे ठेकेदार श्री. आर.बी. देशमुख यांना दराबाबत वाटाघाटीसाठी बोलवले असता ते आले नाही. म्हणुन त्याची अनामत रक्कम १% जप्त करुन दुसऱ्या क्रमांकाचे ठेकेदार श्री. आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांनी मा. आयुक्तांच्या दालनांत दि. २५-२-९७ रोजी हे काम अंदाजपत्रकीय दराने करण्यांस लेखी संमती दिलेली आहे.

तरी अंदाजपत्रकीय दराची असलेली आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्षनगर स्लम येथे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी कमी दराचे निविदाधारक श्री. आर.बी. देशमुख हे वाटाघाटीस न आल्याने त्यांची अनामत रक्कम जप्त करुन दुसऱ्या क्रमांकाचे कमी दराचे निविदाधारक श्री. आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचेकडुन सदरील काम अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७०५/१२ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, नारळी बाग येथे २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. जलनि:सारण वाहिनी टाकण्याचे कामाकरिता परिसर अभियांत्रिकी विभागाचे सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक रु. १,६२,१००/- चे तयार करण्यांत आले आहे. सदरील खर्च "भांडवली कामे जलनि:सारण" हया आर्थिक शिर्षातुन करण्यांत येईल. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नारळी बाग येथे २५० मी.मी. व्यासाची आर.सी.सी. जलनि:सारण वाहिनी टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रु. १,६२,१००/- सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७०६/१३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, चंपा मस्जीद ते रोशनगेट या ५० फुट विकास रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रु. ८,४४,८०१/- च्या अंदाजपत्रकास मा. सर्वसाधारण सभा विषय क्र. १४५/२ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामासाठी निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या तारखेपर्यंत एकुण तीन निविदापत्रके विकल्या गेली व स्विकृतीच्या तारखेपर्यंत दोन निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके दि. १३-१-९७ रोजी उघडण्यांत आली असता त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. मास्कॉट कन्स्ट्रक्शन | ५% | जास्त दराने |
| २. | श्री. मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन | ९% | जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापैकी मे. मास्कॉट कन्स्ट्रक्शन यांचे निविदा तुलनात्मक दृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त आहे. मे. मास्कॉट यांना मा. आयुक्तांच्या दालनांत सदरील कामादराच्या वाटाघाटीस बोलावले असता संबंधीताने सदर काम अंदाजपत्रकीय दराने करुन देणे बाबत संमती दर्शविली आहे.

तरी सदरील काम मे. मास्कॉट कन्स्ट्रक्शन यांचे कडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेणे बाबत प्रस्ताव मा. स्थायी समितीचे विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चंपा मस्जीद ते रोशनगेट या ५० फुट विकास रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक दृष्टया कमी दराचे निविदाधारक यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदर काम मे. मॉस्काट कन्स्ट्रक्शन यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र. ७०७/१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र येथील (आमखास) अंतर्गत डेकोरेश इमारतीच्या भिंतीस बाहेरुन टेरेको युरोपियन प्लॉस्टर करणे कामाचे प्रस्ताव दि. १३-२-९७ च्या स्थायी समितीच्या मंजुरीन्वये सदर कामाचे दरपत्रके मागविण्याकरिता शहरातील दै. वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यांत आले. त्या अनुषंगाने स्विकारणेच्या तारखेपर्यंत एकच दरपत्रक दर भरुन प्राप्त झाले. गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आले. त्या दिलेल्या दराचा तपशील खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | एक्सपर्ट | ३७१.२२ | प्रति चौ. मी. |

सदरील आलेले दरपत्रक मा. आयुक्त यांचेकडे मंजुरी स्तव सादर करण्यांत आले. त्यावर मा. आयुक्त यांनी दराचे वाटाघाटी साठी संबंधीत एजन्सीस बोलवावे असे आदेशित केले. त्यानुषंगाने एजन्सी बरोबर मा. आयुक्तांची दराचे वाटाघाटीसाठी चर्चा अंती रु. ३५०.०० प्रति. चौ.मी. प्रमाणे काम करावे असे मा. आयुक्तांनी गुत्तेदारास सांगितले. त्यावर गुत्तेदारानी मान्य केले. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र अंतर्गत डेकोरेशन इमारतीतील भिंतीस बाहेरुन टेरेको युरोपीयन प्लांस्टर करणेच्या कामाकरिता मे. एक्सपर्ट

एजन्सींशी झालेल्या वाटाघाटीनुसार ३५०/-रु. प्रति.चौ.मी. प्रमाणे करुन घेण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७०८/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मजनुहिल येथील उद्यानात मिनी ट्रेन बसविणे बाबत शहरातील दै. वृत्तपत्रात प्रसिध्दी देवुन दरपत्रके मागविण्यात आली. आणि त्या अनुषंगाने दोन दरपत्रके प्राप्त झाली. त्यात दिलेले दराचे तपशील खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | व्हायके कंपनी (दमन-गुजरात) | ३.२५ | लक्ष |
| २. | त्रिमुर्ती इंजिनिअरींग (पुणे) | ६.६८ | लक्ष |

सदर पत्रकात सर्वात कमी दराची व्हायके कंपनीची दरपत्रके तांत्रिक दृष्टया चुकीची आढळुन आली. त्यामध्ये ट्रॅक उभारणी साठी अतिरिक्त २,५०,०००/- लक्ष इतका खर्च येईल असे त्यांनी दराच्या वाटाघाटी वेळी सांगितले परंतु ते त्यांच्या दरपत्रकात ते नमुद केलेले नव्हते. या व्यतिरिक्त एकच दरपत्रक आल्याने फेर निविदा मागविण्यांत याव्या असे आदेश झाले. या अनुषंगाने फेर निविदा प्रसिध्द करण्यांत आल्या. त्यात पुन्हा दोन दरपत्रके प्राप्त झाले. त्यात दिलेले दराचे तपशील खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | व्हायकेम (दमन) | ६.१० | लक्ष |
| २. | नेशनल इंजिनिअरिंग (बल्साड, गुजरात) | ७.२५ | लक्ष |

सदरील दरपत्रकास सर्वात कमी तुलनात्मकदृष्टया ६.१० लक्ष व्हायके दमन यांचे आहे. पुर्वीच्या दरापेक्षा दर ट्रकची रुंदी ६०० से.मी. ऐवजी १०० से.मी. वाढविल्याने (नॅरो गेज ऐवजी मिटर गेज) यामुळे एकुण किंमतीत वाढ दिसते. व ती योग्य वाटते. तसेच जकातचे कर त्यांनी भरावे या अटीवर व्हायकेम दमन यांचे दरपत्रके मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मजनुहिल येथील उद्यानात मिनी ट्रेन बसविण्याच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या दरपत्रकधारकापैकी कमी दराचे दरपत्रकधारक मे. व्हायकेम (दमन) यांचेकडुन सदर काम ६.१० लक्ष या दरात करुन घेण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७०९/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. भावसिंगपुरा गांव स्लम येथे गटार बांधणे, ढापे टाकणे व इतर कामाबाबत सा.बा. खाते यांच्या सन ९६-९७ च्या दरसुचीनुसार र.रु. ४,७४,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे. सदरील काम "अठरा खेडी विकास योजना" या शिर्षातुन करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दि. २४-२-९७ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक रु. ४,७४,०००/- यांस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भावसिंगपुरा गांव स्लम येथे गटार बांधणे, ढापे टाकणे व इतर कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रुपये र.रु. ४,७४,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "अठरा खेडी विकास योजना" या शिर्षकातुन करण्यांत सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद**

श्री. गौतम खरात : स. सदस्य श्री. रशिद मामु यांनी बऱ्याच वेळेस सभागृात मागणी केलेली होती की, रेल्वेस्टेशन व बसस्टॅंड येथे विद्युत विभागातर्फे हायमर लावण्यात यावे.

मा. सभापती : अति शहर अभियंता यांनी या बाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.

श्री. गौतम खरात : श्री. खोब्रागडे पी.के. यांनी स्थायी समितीकडे अपिल केलेले आहे. त्याबाबत मा. सभापती यांनी विचारपुर्वक निर्णय घ्यावा. माझ्या माहितीप्रमाणे प्रशासनाचे असे मत आहे की, जे अधिकारी किंवा कर्मचारी नगरसचिव किंवा मुख्य लेखा परिक्षक यांचे कक्षात किंवा त्यांचे अधिपत्याखाली काम करतात. त्याचेच अपिलावर निर्णय स्थायी समिती मध्ये घेता येतो. आणि अधिपत्याखाली काम करित होते. त्यानुसार त्यांचे अपिलावर योग्य तो निर्णय व्हावा. कारण त्यांना एकाच वेळेस दोन प्रकारच्या शिक्षा प्रशासनाने दिलेल्या आहेत. त्या योग्य वाटत नाही.

मा. सभापती : या संदर्भात अपिल बाबत बैठक बोलावुन निर्णय घ्यावयाचा आहे. दुसरे असे की, सचिव विभागात सध्या जीप नाही आहे. त्यामुळे टपाल वाटप करणे शक्य नाही. यासाठी त्वरीत व्यवस्था करावी.

श्री. गौतम खरात : मी ऐनवेळी असा प्रस्ताव मांडत आहे शिक्षण विभागातील मनपाच्या सर्व बालवाडयांना व शाळांना शैक्षणिक साहित्य पुरवठा करणे बाबत मी मा. आयुक्त व मा. महापौर तसेच मा. सभापती यांना पत्र देवुन कळविले आहे की, शैक्षणिक साहित्य व बालवाडी साहित्याचा पुरवठा प्रशासनाने निविदा मागवुन स. नगरसेवक श्री. घडामोडे यांच्या स्वेच्छा निधी करिता मंजुरी दिलेली आहे. व त्याचे दरसुची तयार करुन त्यासही मंजुरी मिळालेली आहे. याबाबत अंतिम झालेल्या दरसुचीप्रमाणे शालेय साहित्य व बालवाडी साहित्याचे दिलेल्या ॲटमनुसार मंजुरी द्यावी.

मा. सभापती : स. सदस्याच्या सुचनेनुसार त्यांनी माझ्याकडे पत्र देवुन विनंती केली आहे. त्यानुसार शैक्षणिक साहित्य व बालवाडी साहित्याचा पुरवठा करणे. बाबत प्रशासनाने दरपत्रके मागवुन त्यानुसार दरसुचिला ६% रिबेट घेऊन प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. यामध्ये (१) इयत्ता ३ री ते ७ वी पी.व्ही.पी. चे शैक्षणिक चार्ट सर्व विषयाचे २००० चार्ट २) संतरज्या ८२ शाळेला दोन प्रमाणे व मनपा १०३ बालवाडी शाळांना प्रत्येकी ०१ प्रमाणे ९x१२ (ॲपको कं.ची) पुरविण्यात यावे. ३) मनपा १०३ बालवाडयांना व ८२ शाळांना प्लॉयवुड, न्युवुड ६.०० मी.मी. मध्ये तयार केलेले खेळणी संच (ओकरवा पाहु, वाजले किती, बारा महिने,सात वार, अक्षर खेळ, मानव शरीर, पक्षी ट्रे, प्राणी ट्रे.) प्रत्येकी एक संच याप्रमाणे देण्यांत यावे. सदरील मंजुरी सन १९९६-९७ या अर्थ संकल्पातील तरतुदीतुन करण्यांत यावे. जर तरतुद शिक्षक नसल्यास सन १९९७-९८ या वित्तीय वर्षातील तरतुदीतुन प्राधान्याने साहित्य घेण्यास प्रशासनाने घेऱ्या स्थायी समिती सभे समोर प्रस्ताव सादर करावा.

श्री. गौतम खरात : महापालिकेतर्फे १७ बॅकांच्या खाती अकांउट ठेवलेले आहेत. त्याची माहिती द्यावी.

जकात अधिक्षक : होय, जकात फाडत असतांना चेकव्दारे जे धनादेश प्राप्त होतात. ते त्या बॅकेव्दारे जाते.

श्री. गौतम खरात : बॅकामध्ये पुन्हा इतर ठिकाणी चालु खाते उघडण्याचे अधिकार कुणास आहेत.

मा. सभापती : याचे अधिकार स्थायी समितीला आहे.

श्री. हमीद उद्दीन ताबा : तत्कालीन आयुक्त यांनी स्वतःच्या अधिकारात इतर बॅकामध्ये खाते ठेवलेले आहेत.

मा. सभापती : तत्कालीन आयुक्त यांनी ६७(३) (क) चा वापर केलेला असेल. त्यानुसार आपलाही अधिकार आहे.

या बरोबर "जन गण मन" राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी जाहिर केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपलिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
सभापती स्थायी समिती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती सभा

**शुक्रवार दिनांक १४-३-१९९७ रोजी दुपारी ठिक ३.०० वाजता मा. सभापती स्थायी समिती श्री. गिरजाराम हाळनोर यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभा संपन्न झाली. सभेस निम्ननिर्दीष्ट स. सभासद तसेच मनपा अधिकारी उपस्थित होते.**

| | | |
|---|---|---|
| १) | स.स.श्री. गौतम खरात | सभासद |
| २) | स.स.श्री. भागवत कराड | --//-- |
| ३) | स.स.सौ. रंजनी रमेश जोशी | --//-- |
| ४) | स.स.श्री. कंवरसिंग बैनाडे | --//-- |
| ५) | स.स.कु. माया लाडवाणी | --//-- |
| ६) | स.स.श्री. विजयकुमार मेहेर | --//-- |
| ७) | स.स.श्री. महादेव सुर्यवंशी | --//-- |
| ८) | स.स.श्री. हमीदउद्यीन ताबा | --//-- |
| ९) | स.स.श्री. सुभाष टाकळकर | --//-- |
| १०) | स.स.श्री. भगवान घडामोडे | --//-- |
| ११) | स.स.श्री. त्रिबंक तुपे | --//-- |
| १२) | स.स.श्री. अभिमन्यु भालेराव | --//-- |
| १३) | स.स.श्री. कचरु नवपुते | --//-- |
| १४) | स.स.श्री. रशिद खॉन (मामु) | --//-- |

सभेची सुरुवात "वंदे मातरम्" या गिताने अंदाजे ठिक ३.३० वाजता झाली.

श्री. रशिद खॉन (मामु) : शहरात मच्छरांची फार मोठया प्रमाणात वाढ झालेली दिसुन येते. त्यामुळे बरेबसे नागरिक त्रासले आहेत. याबाबत आपल्या विभागामार्फत योग्य ती औषध फवारणी होणे आवश्यक आहे. आपल्या आरोग्य शहरात फवारणी योग्य रित्या होत नसुन मलेरिया कर्मचारी सकाळच्या वेळेस फवारणी करतांना दिसुन येत नाही. माझ्या मते मच्छर हे सायंकाळनंतर जास्त प्रमाणात दिसुन येतात. आणि त्यांच्या घरी कोणत्याही प्रकारची सुविधा नाहीत त्यांना या मच्छरामुळे अतिशय त्रास होतो. यांची खबरदारी प्रशासनाने घेऊन आवश्यक ती कार्यवाही करावी.

मा. सभापती : या बाबत प्रशासनाने कडक कार्यवाही करावी. कारण मच्छर हे संपुर्ण शहरात नव्हे तर सिडको हडको भागातही तेवढयाच प्रमाणात आहेत. या बाबत आरोग्य वैद्यकीय यांनी महिती द्यावी.

सौ. रंजनी जोशी : याबाबत बऱ्याच वेळेस मी सुध्दा सभागृहात प्रश्न उपस्थित केलेले आहेत की, शहरातील साफ सफाई व्यस्थित राहणेसाठी व काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर देखरेख ठेवणेसाठी झोन निहाय स्वच्छता निरिक्षक आहेत. ते अत्यल्प आहेत. त्यामुळे योग्य ती व्यवस्था शहरातील होऊ शकत नाही. यासाठी नविन पुन्हा काही स्वच्छता निरिक्षक नेमुन शहरातील आरोग्याच्या दृष्टीने योग्य ती उपाय योजना करावीत.

श्री. कचरु नवपुते : माझा मुद्दा असा आहे की, मलेरिया विभागातील कर्मचारी कामे करतात काय? याची माहिती द्यावी. बाबत आरोग्य वै. अधिकारी यांनी माहिती द्यावी.

श्री. महादेव सुर्यवंशी : महानगरपालिकेमध्ये फॉनिंग मशिनची आवश्यकता आहे. त्या घेणे बाबत सुचना केलेल्या होत्या. त्याप्रमाणे कार्यवाही झाली आहे काय? मलेरिया विभागातील कर्मचारी सकाळी ७.०० वा च्या पुर्वी औषध फवारणी करणे आवश्यक असते. परंतु असे लक्षात येत की, औषध फवारणी ८ च्या नंतर करतात आणि सायंकाळी सुध्दा करणे आवश्यक असते. तथापी फवारणी केल्या जात नाही. विशेषता फॅनिंग मशीने कर्मचारी फवारणी करतांना दिसुन येत नाही. शहरातील साफसफाई बाबत आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे अजिबात कंट्रोल नाही. असा माझा सभागृहात आरोप आहे. कारण सभागृहामध्ये डांसाच्या संदर्भात वेळोवेळी चर्चा झालेल्या आहेत.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी या बाबत कोणत्याही प्रकारची आवश्यक ती कार्यवाही केलेले नाही. त्यापेक्षा दोन-दोन महिने त्यांच्या कडुन कार्यवाही होत नाही. याचे उदा. द्यावयाचे झाल्यास एखाद्या कर्मचाऱ्यांस अचानक प्रवृत्ती बिघडल्यास तो दवाखान्यात जातो व प्रायव्हेट इलाज करतो मात्र त्याला लागणाऱ्या खर्चाचे देयके जे कार्यालयाने नियमाप्रमाणे परत द्यावयाचे असल्यास त्याबाबत आरोग्य वैद्यकीय अधिकार तोंड पाहुन काम करतात असा माझा स्पष्ट आरोप आहे. याबाबत आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी खुलासा करावा. आणि प्रमाणात घेणे बाबत जाणुन बुजुन टाळाटाळ करतात याची दक्षता घ्यावी.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी : मच्छरांचा प्रार्भाय शहरात फार मोठया प्रमाणात होत आहे. या बाबत सभागृहात चर्चा होते. या कामासाठी मलेरिया विभागात कर्मचारी वर्ग अपुरी आहे. ज्यावेळी फक्त नगर परिषद अस्तित्वात होती. त्यावेळेस जेवढा मलेरिया कर्मचारी वर्ग होता तेवढाच वर्ग आजही कार्यरत आहे. म्हणजे ४८ कर्मचारी संपुर्ण शहराचा भार पाहतात. त्यामुळे कामाची गती वाढलेली नाही. शहराच्या लोकसंख्येच्या मानाने आज मलेरिया विभागात आणखी कर्मचारी वाढ होणे आवश्यक आहे. या विभागातील कर्मचाऱ्यांना शासनातर्फे अनुदान मिळणे व त्यातुनच खर्च करावा लागतो. या विभागासाठी एक जिवशास्त्रज्ञ म्हणुन पद अस्तित्वात आहे. सदरचे पद सध्या रिकामे असुन शासनामार्फत हे पद भरल्या जाते त्यापेक्षा मनपाने सदरील आवश्यक आहे शहरात डासांचा जास्त प्रमाणात वाढ होण्याचे कारण म्हणजे संडासाची ब्रिडींग व सांडपाणी आणि नालीव्दारे वाहणाऱ्या पाण्यापासुन बारिक अंडयान्वये याची उत्पती ताबडतोब होते. यावर उपाय योजना म्हणजे फॉनिंग मशिनने औषध फवारणी केल्यास त्याच भागात पुन्हा पांच ते सहा दिवसांत फवारणी करणे आवश्यक असते. नसता डासांची उत्पती पुन्हा वाढतच जाते. यासाठी कर्मचारी वर्ग अपुरा असल्याने झोन एका आठवडयात शक्य होत नाही. अनेक वेळा आमचे कर्मचारी सायंकाळी एखादया भागात फवारणी करावयास गेल्यास काही नागरिक त्यांचे बाबतीत तक्रार नोंदवतात सध्या मलेरिया कर्मचारी वर्ग २२२ असतो आवश्यक आहे. एकाच ठिकाणी पाणी साचुन साहित्यास डांसाची उत्पन्नी वाढते. शिवाय सेफ्टी टॅक फ्रुटल्यास किंवा लिव्हेज असल्यास त्यामुळेही डासांची वाढ अधिक प्रमाणात

होते. यापुर्वी सुध्दा मलेरिया विभागामार्फत अभिदान दोनदा घेण्यांत आलेले आहे. त्याचप्रमाणे आताही पंधरवाडा घेण्यांत येईल.

श्री. रशिदखॉन (मामु) : जे नागरिक मलेरिया बाबत सायंकाळी फवारणी केल्या बाबत तक्रारी करतात तर आपण संबंधीत ठिकाणी जाऊन काय? कार्यालयीन कार्यालयीन कार्यवाही केलेली आहे काय? यांची माहिती द्यावी आपल्याकडे ४८ कर्मचारी सध्या कार्यरत आहेत व बाकी दै. वेतनावर कर्मचारी आहेत ते काम करित नाही. काय? आपल्याकडील स्त्री फॉनिंग मशिन आठ आहेत. त्यांनी कधी एखादया भागात जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली आहे काय? आपल्याकडे माहिती देवुन कार्यवाही करावी.

मा. सभापती : मागे ज्याप्रमाणे डांस निर्मुलन पंधरवडा घेतलेला होता. त्याच प्रमाणे आता ही प्रशाासनाने डांस निर्मुलन पंधरवडा सुरु करावा. यासाठी प्रशासनाने शहरातील सामाजित संस्था व इतर कार्यरत लोकोपयोगी संस्थाना आवाहन करुन सदरील मोहिम यशस्वीपणे राबवावी यासाठी मनपातील सर्व स.स. सुध्दा योग्य ते सहकार्य देतील.

श्री. महादेव सुर्यवंशी : सकाळी आणि सायंकाळी या दोन्हीही वेळात फॉनिंग मशीनने फवारणी करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी.

श्री. कचरु नवपुते : माझ्या वार्डात मलेरिया कर्मचारी फक्त एकच तास काम करतात. तेव्हा त्यांना पा बंद करावे.

श्री. रशिद खॉ (मामु) : स्त्री डॉक्टर आपल्याकडे जेवढे आहेत त्यांना झोननिहाय संबंधीत भागांत आठवडयातुन एकदा भेट देवुन वार्डातील स्वच्छता व साफसफाई बाबत पाहणी करुन योग्य ती उपाययोजना करणे बाबत सुचना द्याव्यात व जे लोक फवारणी बाबत अडवणुक करतात त्याचे वर केसेस करावी.

आरोग्य वैद्यकीय अ. : पंधरवडा डांस निर्मुल सप्ताह या योजने मध्ये संपुर्ण डांस नाहिसे होतील अशी कार्यवाही करण्यात येईल.

मा. सभापती : आरोग्य वै. अ. यांनी या बाबत त्वरीत कार्यवाही करावी डांस समुळ नष्ठ करण्यासाठी "पधरवडा" सप्ताह कार्यक्रम आखुन या कामी आपलेकडील स्त्री वै. अ. आणि विविध सामाजिक संस्था आदिचे सहकार्य घ्यावं.

श्री. हमिद ताबा : प्रशासनाने काम फारच धिम्या गतीने चालेल असुन बऱ्याचशा संचिका आठवडे भर एकाच ठिकाणी पडुन राहतात. गेल्या दोन वर्षापासुन माझ्या वार्डातील एका कामाचे बाबतीत स्थायी समितीत मंजुरी होऊनही कामास सुरुवात झालेली नाही याचे कारण काय?

शहर अभियंता : सदरील कामाचे बाबतीत रिवाईज अंदाजपत्रक तयार करण्यासाठी उशिर झालेला आहे. शिवाय तेथील कामाचे जागेच्या वादामुळे दोनदा टेंडर काढले आणि आता ते काम नविन ठिकाणी शिफ्ट केलेले आहे.

श्री. हमीद ताबा : एका कामाच्या बाबतीत दोन-दोन वर्षापासुन संचिका पडुन राहतात ही बाब योग्य नाही. याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.

श्री. रशिद खॉ (मामु) : कोणत्या स.स.च्या वार्डात कोणकोणते काम झाले याचे वार्ड निहाय रजिष्टर असावे.

सौ. रंजनी जोशी : कामधेनु या ठिकाणी दररोज पडलेली होता त्या ठिकाणी अंधाराचा फायदा उचळुन दरोडे खोरांनी लुटमार केली तेव्हा या बाबत लाईट चालु करण्याची कार्यवाही करावी.

मा. सभापती : संबंधीत अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

उप-अ.विद्युत-२ : सदरील कामास मंजुरी मिळालेली आहे.

श्री. सुभाष टाकळकर, सौ. रंजनी जोशी : गेल्या दोन वर्षापासुन या कामा संदर्भात सतत विचारणा करिता आहे. तरीही कार्यवाही झालेली नाही.

मा. सभापती : या संदर्भात उप अभियंता विद्युत-२ यांचे कडुन योग्य ती माहिती घेऊन मा. आयुक्त यांनी पुढील बैठकीत सविस्तर माहिती द्यावी.

श्री. महादेव सुर्यवंशी : गेली तीन महिन्यापासुन हायमड बसविण्या बाबत सारखे विचारणा करीत आहे. परंतु लहान लहान कामाकडे दुर्लक्ष केल्या जाते.

मा. सभापती : याबाबत मा. आयुक्त स्वतः लक्ष देतील.

श्री. अभिमन्यु भालेराव : माझ्या वार्डात आरोग्य केंद्र चालु करणे बाबत अद्यापही प्रशासनाने कार्यवाही नाही.

शहर आभियंता : मो. मसनतपुर येथे नाल्याच्या बाजुला जागा मिळालेली आहे. तेथील लॅन प्लॅन तयार करुन ताबडतोब कार्यवाही करता येईल. या विभागामार्फत सध्या ५० कामे चालु आहेत.

मा. सभापती : संबंधीत कामाबाबत ताबडतोब प्लॅन तयार करुन मंजुरीसाठी पाठवावे.

श्री. गौतम खरात : वृत्तपत्रात अशी बातमी छापुन आली आहे की, माजी प्रशासक श्री. गोविंद गारे यांनी आपल्या मनपातील अति. शहर अभियंता श्री. सि.एस. सोनी यांचे पद भरतांना सिडको हस्तांतरण झाल्या केली गेली व पद आस्थापनेवर भरण्यांत येईल. असे असतांनाही पुर्वीच या पदावर श्री. सोनी यांची नेमणुक केली गेली व श्री. आय.टी. गायकवाड यांचेही शहर अभियंता पदावर प्रशासकीय ठराव घेऊन भरती करण्यांत आली. या बाबत त्यावेळी प्रशासनातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आस्थापनेवर या लोकांनी घाईघाईने पदे भरण्याची वर्षी लावुन प्रशासनाची दिशामुल केली व त्याचसोबत प्रशासकांच्या काळातच सिमेंट खरेदी प्रकरण सुध्दा घाईघाईने ठराव घेऊन घेण्यात आले यास सर्वस्वी कोण जबाबदार आहेत या बाबत प्रशासनाकडे काही माहिती असल्यास या सभागृहात माहिती द्यावी.

मा. आयुक्त : सदरची बातमी मी स्वतः वर्तमान पत्रात वाचलेली आहे. अधिकृत रित्या माझ्याकडे असे काही हे सर्व शासन पातळीवर कार्यवाही होत आहे. शासनाने जर विचारणा केल्यास तेव्हा ती शहानिशा करुन माहिती देण्यांत येईल.

श्री. हमीद ताबा : पालकमंत्री यांनी सुचित केले आहे की, २०x३० च्या प्लॉट यापुढे बांधकाम परवानगी देता येणार नाही. असे म्हणणे बरोबर आहे काय? म्हणजे शासन पातळीवर निर्णय झालेला आहे काय? याची माहिती द्यावी.

मा. सभापती २०x३० ची ज्या प्लॉट धारकांची रजिस्ट्री झालेली असेल व ज्यांची रिजव्हेशन मध्ये जागा असुन त्यांनी अनाधिकृत घरे बांधलेली असेल त्यांना ना हरकत प्रमाणपत्र देता येणार नाही. यासाठी अशा प्रकारचे परवानगी न देण्याबाबत बंधन घातलेले आहे.

श्री. गौतम खरात : श्री. सी.एस. सोनी अति. शहर अभियंता यांना पदावर बसवितांना अशी अट होती की, सिडको हस्तातर झाल्यानंतर या पदाची निर्मिती करण्यात येईल. असे असतांना पुर्वीच पद प्रशासनाने का भरले याची माहिती द्यावी.

मा. आयुक्त : या बाबत माहिती पुढील बैठकीत देण्यांत येईल.

श्री. गौतम खरात : आशाबाई साळवे या स्त्री वै. अधिकारी म्हणुन आपल्याकडे कार्यरत होत्या. परंतु आपल्या मनपामध्ये प्रत्येक वैद्यकीय अधिकाऱ्यांना वेगवेगळा पगार दिल्या जातो काय? सर्वांना सारखा पगार दिल्या जात नाही काय? या स्त्री डॉक्टरांना वेतन इतर डॉक्टरांच्या प्रमाणे दिल्या गेला नाही. त्यामुळे त्या कंटाळुन नौकरी सोडुन निघुन गेल्या आहेत. व त्या वेळोवेळी निवेदन देवुन पगाराच्या वर्तनातील फरकाची मागणी करित आहेत परंतु अद्यापही तसे त्यांना रक्कम मिळत नाही आहे या बाबत आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी या बाबत अशी प्रकराची भेदभावना का ठेवावी यांनी चौकशी करुन प्रशासनाने न्याय द्यावा.

मा. आयुक्त : या बाबतची चौकशी करुन कार्यवाही करतो.

श्री. रशिद खॉन (मामु), श्री. हमीद ताबा : बऱ्याचशा ट्रान्सपोर्ट वरील जकातीच्या पावती फाडल्या बाबत ट्रान्सपोर्ट मालक व मनपातील अधिकारी कर्मचारी यांचे लांगेबाधे असल्याने जकात करावर परिणाम होत आहे. याबाबत प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

जकात अधिक्षक : या बाबत चौकशी केलेली आहे. तसे काहीही नाही.

श्री. रशिद खॉन (मामु) : संबंधीत अधिकाऱ्यांचे असे म्हणणे बरोबर नाही.

श्री. गौतम खरात : जकात कर कमी झाल्या बाबत वारंवार वर्तमान पत्रात बातम्या प्रलिध होतात. या बाबत प्रशासनाने आवश्यक ती कार्यवाही करावी.

उप आयुक्त-१ : या संदर्भात एक समिती नेमलेली होती. त्या संदर्भात कार्यवाही चालु आहे. वर्तमान पत्रात जी बातमी आलेली आहे माहे. ऑक्टो-९६ च्या वेळेस ज्या बातम्या वर्तमान पत्रात आलेल्या आहेत त्याच प्रकारच्या बातम्या आलटुन पालटुन या ही वेळेस येत आहेत. या बाबम्यामध्ये काही तथ्य नाही. महा डिस्टलरीच मेल्ट्रॉन व गरवारे यांचे काही युनिटस बंद पडल्याने थोडया फार प्रमाणात जकातीवर परिणाम झालेला आहे.

श्री. रशिद खॉन (मामु) : मोठयांतील ट्रान्सपोर्ट मालक व मनपातील कर्मचारी यांचे संगनमताने जकातीच्या पावत्या फाडल्या जातात. त्यामुळे जकातीवर परिणाम झालेला आहे. त्यामुळे प्रशासनाने अचानक पाहणी करुन कार्यवाही करावी. यापुर्वीही कमीटीने सुचना केलेल्या आहेत.

उप आयुक्त-१ : प्रत्येक नाल्यावर संपर्क साधण्यासाठी वायरलेस आवश्यक असुन सेंट्रल गवर्हनमेंट कडे या बाबत मागणी केलेली आहे.

श्री. गौतम खरात : माहे एप्रिल महिन्यात त्या अधिकारी कर्मचात्यांना तिन वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेली असेल त्यांच्या बदल्या करण्यात याव्यात.

मा. आयुक्त : ठिक आहे.

मा. सभापती : विषय क्र. ७११/१ दि. ४-३-९७ चे इतिवृत्त कायम करणे.

श्री. कचरु नवपुते : मागील इतिवृत्तातील नारेगांव येथील खत प्रकरणा बाबत प्रस्ताव स्थगित ठेवण्यांत आलेला होता. तो मंजुर करण्यात यावा.

मा. सभापती : ठिक आहे प्रशासनाने लवकरात लवकर कार्यवाही करावी. दि. ४-३-९७ व १८-२-९७ च्या इतिवृत्तास मंजुरी देण्यांत येते.

**ठराव :**

१) इतिवृत्तातील पृष्ठ क्र. २८ व २९ मधील विषय क्र. ६५१/२१ हा विषय स्थगित ठेवलेला होता तो मंजुर करण्यांत येतो.

२) मलेरिया विभागामार्फत डांस निर्मुलनासाठी पंधरवाडा साजरा करणे डांस (मच्छर) नायनाट करणे.

३) या व इतर दुरुस्तीवर दि. १८-२-९७ व ४-३-९७ चे इतिवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७१२/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, झोन क्र. १,२, व ३ अंतर्गत येणाऱ्या बाबत कामाकरिता सा.बां. खाते यांच्या सन ९५-९६ च्या दरसुची नुसार रु. १,१४,०३८/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील काम देखभाल दुरुस्ती या शिर्षातुन करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दि. २५-२-९७ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

तरी सदरील कामासाठी तयार करण्यांत आलेले अंदाजपत्रक रु. १,१४,०३८/- यास मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे झोन क्र. १,२, व ३ अंतर्गत येणाऱ्या स्लम विभागात खड्डे सिल कोट टाकुन बुजविणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. १,१४,०३८/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "देखभाल दुरुस्ती" या शिर्षातुन करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७१३/३ :**

मो. मसनतपुर शहानगर ही वसाहत नविन असुन त्याठिकाणी जलनिःसारण वाहिनी टाकण्यांत आलेली नाही. जलनिःसारण वाहिनी टाकण्यासाठी अं.प. तयार करण्यांत आले सदर अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिकी सन ९५-९६ च्या दरसुची नुसार तयार करण्यांत आले असुन रु.रु. ४,२५,३२०/- असुन त्यास प्रशासकीय मंजुरी मिळालेली आहे. या कामावर होणारा खर्च ९६-९७ मधील कमकुवत घटकासाठी कल्याणकारी योजना ५% या शिर्षातुन करण्यांत येणार आहे.

तरी मो. मसनतपुर येथे जलनिःसारण वाहिनी टाकण्याचे कामाचे अंदाजपत्रक रु. ४,२५,०००/- चे प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मसनतपुर शहानगर या वसाहतीमध्ये जलनिःसारण वाहिनी टाकण्यांच्या कामाचे तयार करण्यांत आलेले र.रु. ४,२५,३२०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च "९६-९७ मधील कमकुवत घटकासाठी कल्याणकारी योजना ५% या शिर्षातुन करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७१४/४ :**

मो. मसनतपुर शहानगर ही वसाहत नविन असुन त्याठिकाणी जलनिःसारण वाहिनी टाकण्यांत आलेली नाही. जलवाहिनी टाकण्यासाठी अं.प. र. ४,८७,२५३/- चे परिसर अभियांत्रिकी सन ९५-९६ च्या दरसुची नुसार तयार करण्यांत आले असुन या कामावर

होणारा खर्च ९६-९७ मधील कमकुवत घटकासाठी कल्याणकारी योजना ५% या लेखा शिर्षाखाली तरतुदीमधुन करण्यांत येणार आहे. अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी मिळालेली आहे.

तरी मो. मसनतपुर शहानगर येथे जलवाहिनी टाकण्याचे अंदाजपत्रक रक्कम रु. ४,८७,२५३/- चे प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मसनतपुर शहानगर या वसाहतीमध्ये जलवाहिनी टाकण्याचे कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु. ४,८७,२५३/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च (९६-९७ मधील कमकुवत घटकासाठी कल्याणकारी योजना ५% या लेखा शिर्षकातुन करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७१५/५ :**

पाणी पुरवठा विभाग क्र. २ सिडको झोन क्र. ५ व ७ मधील जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी स्लम वॉल खरेदी करण्यासाठी अं.प.रु. ५,५८,०००/- चे तयार करण्यांत आले असुन त्यास सर्वसाधारण सभा ठराव क्र. १५१/१ दि. १९-१२-९६ अन्वये मंजुरी मिळालेली आहे. त्या अनुषंगाने निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत एकुण पाच निविदा विक्री झाल्या व स्विकारण्यांच्या अंतिम तारखेला एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. सागर इंटरप्रायजेस | ११.४२% | जास्त दराने |
| २. | श्री. मोवर इंजिनिअरींग | १६.४०% | --//-- |
| ३. | श्री. मे. अर्थ मोव्हर्स | १०.२०% | कमी दराने |

उपरोक्त प्रमाणे सर्वात कमी दराची निविदा म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०.२०% कमी दर असल्याची निविदा मे. अर्थ मोव्हर्स यांची आहे.

तरी मे. अर्थ मोव्हर्स यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०.२०% कमी दरची निविदा स्विकृतीस प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

सर्वानुमते असे ठरले की, या कामाकरिता फेर निविदा मागविण्यांत याव्यात.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७१६/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु येथे छत्रपती शिवाजी महाराज भवानी मातेकडुन तलवार स्विकारनांच्या प्रसंगाची शिल्पकृती ब्रॉझ धातुमध्ये तयार करुन देणेच्या कामासाठी दि. २७-८-९६ रोजी संपन्न झालेल्या छत्रपती शिवाजी महाराज पुराणावस्तु संग्रहालय कमेटी बैठकीमध्ये ठरल्याप्रमाणे दरपत्रके मागविली असता दरपत्रके स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण दोन दरपत्रके दर भरुन प्राप्त झाली त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**१) श्री. आर. टी. बगले:**

यांनी कार्यलयीन अटी मान्य करुन ब्रॉझ धातुमधील पुर्णकृती शिल्प तयार करुन देणेसाठी आपल्या कुठल्याही अटी न देता रु. ५,२५,०००/- चे दरपत्रक दिलेले आहे.

**२) मे. मडीलकेकर आर्ट स्टुडीओ.**

यांनी कार्यालयात अटी मान्य करुन ब्रॉझ धातुमधील पुर्णकृती शिल्प तयार करुन देणेसाठी र.रु. ८,०७,०००/- चे दरपत्रक खालील अटीसह दिलेले आहे.
१) कामाच्या ऑर्डरसोबत ३०% रक्कम ॲडव्हान्स देण्यांत यावी.
२) क्ले मॉडेल झालेवर ३०% रक्कम ॲडव्हान्स देण्यांत यावी.
३) धातुमधील ओत काम पुर्ण झालेवर २०% रक्कम देण्यांत यावी.
४) शिल्प पुर्ण झालेवर २०% रक्कम देण्यांत यावी.
५) शिल्प पुर्ण करणेस ४ महिने लागतील.
६) शिल्प पुर्ण झालेवर जागेवर पोच देवु

वरील प्राप्त दरपत्रकापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व कुठल्याही अटी न देता श्री. आर.टी. बगले यांनी र.रु. ५,२५,०००/- चे दरपत्रक दिलेले आहे.

तद्अनुषंगाने दि. ६-२-९७ रोजी प्रत्यक्ष म्युझियम इमारतीच्या साईटवर मा. खासदार, मा. महापौर, मा. आयुक्त आणि म्युझियम कमिटीचे सदस्य यांचेसमवेत झालेल्या चर्चेनुसार व त्यांना श्री. आर.टी. बगले यांच्या प्रतिकृतीची निवड केल्यानुसार श्री. आर.टी. बगले यांचे तुलनात्मकदृष्टया कमी व र.रु. ५,२५,०००/- चे दरपत्रक आहे. सदरील कामाचा खर्च भांडवली इमारती सन ९६-९७ या लेखाशिर्षकातुन करण्यांत येईल.

तरी सदरील कामासाठी श्री. आर.टी.बगले यांचे कडुन घेणे बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीचे विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद**
श्री. कचरु नवपुते : महाराणा प्रताप यांचा पुतळा उभारणेची कार्यवाही व्हावी.
मा. सभापती : ठिक आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय येथे छत्रपती शिवाजी महाराज भवानी मातेकडुन तलवार स्विकारतांनाच्या प्रसंगाची शिल्पाकृती ब्रॉस धातुमध्ये तयार करुन देणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या दरपत्रकांपैकी कमी दराचे व विनाअट असलेले र.रु. ५,२५,०००/- चे श्री. आर.टी. बगले यांचे दरपत्रक स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७१७/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, सिल्क मिल्क कॉलनी येथील रस्त्यांश पुर्नडांबरीकरण करणेच्या कामाचे सन ९५-९६ चे सा.बां. खात्याचे डी.एस.आर. दराने रु. ७,७५,१००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन मा. आयुक्तांची मंजुरी मिळालेली आहे. सदरील कामाचा खर्च रस्ते पुर्नडांबरीकरण रस्ते दुरुस्ती सन ९६-९७ मधुन प्रस्तावित आहे.

सदरील कामासाठी निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुणर तीन निविदापत्रके प्राप्त झाली असुन निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम

तारखेपर्यंत एकुण तिनच निविदा भरुन प्राप्त झाल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. डी. अजितसिंग | ४.९% | जास्त दराने |
| २. | श्री. मे. मास्कोट कन्स्ट्रक्शन | ६.०% | --//-- |
| ३. | श्री. अदिनाथ कन्स्ट्रक्शन | ८.५% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९% जास्त दराने श्री. डी. अजितसिंग यांची निविदा आहे. परंतु सदर दर जास्त वाटत असल्याने सदर ठेकेदारास वाटाघाटीसाठी बोलावले असता अंदाजपत्रकीय दराने निविदेस मंजुरी दिलेली आहे. त्यास संबंधीत ठेकेदाराने संमती दर्शविली आहे.

तरी सदर कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रु. ७,७५,१००/- चे सदरील काम श्री. डी. अजितसिंग यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिल्क मिल्क कॉलनी येथील रस्त्याना पुर्नडांबरीकरण करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व दराच्या निविदाधारकांसमवेत झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदर काम श्री. डी. अजितसिंग यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७१८/८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, बालाजीनगर व महुनगर भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाचे सन ९५-९६ चे सा.बां. खात्याचे डी.एस.आर. दराने र.रु. १६,२३,८४३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन त्यास मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे. सदरील कामाचा खर्च सन ९६-९७ साठी असलेल्या "भांडवली रस्ते डांबरीकरण" मधुन प्रस्तावित आहे.

सदरील कामासाठी निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या तारखेपर्यंत एकुण चार निविदापत्रके विक्री झाल्या असुन निविदापत्रके स्विकृतीच्या अतिम तारखेपर्यंत एकुण चार निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाले त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. मे. अदिनाथ कन्स्ट्रक्शन | ४.९९% | जास्त दराने |
| २. | श्री. डी. अजितसिंग | ९.००% | --//-- |
| ३. | श्री. मे. मॉस्कोट कन्स्ट्रक्शन | ९.००% | --//-- |
| ४. | श्री. मे. रे. कन्स्ट्रक्शन | १०% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९% जास्त दराने मे. अदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. परंतु सदर दर जास्त दर जास्त वाटत असल्यामुळे सदर ठेकेदारास दराच्या वाटाघाटीसाठी बोलविले असता वाटाघाटीअंती २% जास्त दराने निविदेस मंजुरी झालेली आहे. त्यास संबंधीत ठेकेदाराने संमती दर्शविली आहे.

तरी सदर कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रु. १६,२३,८४३/- च्या अं.प. तसेच सदरील काम मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचेकडुन २% जास्त दराने करुन घेण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बालाजीनगर व महुनगर भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारक मे. अदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार ठरल्यानुसार सदर काम अं.प. दरापेक्षा २% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७१९/९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, महावीर चौक ते रेल्वे स्टेशन या १०० फुट रस्त्याने रुंदीकरण करणे व पुलाचे रुंदीकरणाचे काम करणेच्या कामाचे सन ९५-९६ चे सा.बां. खात्याचे डी.एस.आर. दराने रु. ११,२५,०५०/- चे अं.प. तयार करण्यांत आले असुन त्यास मा. आयुक्तांनी मंजुरी दिली आहे. सदरील कामाचा खर्च "भाडवंती रस्ते" ९६-९७ साठी असलेल्या एकुण तरतुदी मधुन प्रस्तावित आहे.

सदरील कामासाठी निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण २३ निविदापत्रके विक्री झाल्या असुन निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ९ निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. निसार अहेमद | २९.०१८% | कमी दराने |
| २. | श्री. एस.एस. मंडोरे | २८१०% | --//-- |
| ३. | श्री. रामेश्वर कन्स्ट्रक्शन | २८.०५% | --//-- |
| ४. | श्री. डी.सी. पंजाबी | २७.३% | --//-- |
| ५. | श्री. आर.बी. चव्हाण | २६% | --//-- |
| ६. | श्री. सलीम पटेल | २२.९९% | --//-- |
| ७. | श्री. मे. एस.ए. असोशिएटस् | १८.२३% | --//-- |
| ८. | श्री. मोहम्मंद सलीम | १४.८५% | --//-- |
| ९. | श्री. मे. एलोरा कन्स्ट्रक्शन | १४.५०% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २९.०१८% कमी दराने श्री. निसार अहेमद यांची निविदा आहे.

तरी सदर कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या रु. ११,२५,०५०/- च्या अं.प. तसेच सदरील काम श्री. निसार अहेमद यांच्याकडुन २९.०१८% कमी दराने करुन घेण्याकरिता प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्त सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महावीर चौक ते रेल्वे स्टेशन या १०० फुट रस्त्याने रुंदीकरण करणे व पुलाचे रुंदीकरणाचे काम करणेकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा २९.०१८% कमी दराची निविदा स्विकारणेस तसेच सदरील कामाकरिता येणाऱ्या र. रु. ११,२५,०५०/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७२०/१० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, इटखेडा येथे शंकरनगर वसाहत येथे खडी रस्ते तयार करणेच्या कामाचे सन ९६-९७ चे सा.बां. खात्याचे

डी.एस.आर. दराने रु. ४,०१,२००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन त्यास मा. आयुक्त यांची मंजुरी मिळालेली आहे. रस्त्याची एकुण लांबी ८३० मी. आहे. सरासरी रु. ७.५० मीटर आहे. सदर कामाचा खर्च देखभाल दुरुस्ती रोड ९६-९७ सदर कामाचा खर्च देखभाल दुरुस्ती रोड ९६-९७ मधुन प्रस्तावित आहे.

तरी सदर कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु. ४,०१,२००/- चे अं.प.स मंजुरी बाबतचा प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इटखेडा येथे शंकरनगर वसाहत येथे खडी रस्ते तयार करणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु. ४,०१,२००/- च्या अंदाजपत्रकास तसे सदर खर्च "देखभाल दुरुस्त रस्ते" या शिर्षकातुन करण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७२१/११ :**

पाणी पुरवठा विभाग क्र. २ (सिडको) झोन क्र. ५ व ७ अंतर्गत असलेल्या जनवाहिन्याच्या देखभाल दुरुस्तीसाठी १००,१५० व २०० मी.मी. व्यासाचे ए.सी. पाईप व जॉइन्ट खरेदीसाठी रु. ३,६२,५००/- चे अं.प. तयार करण्यांत आले व सदरील साहित्य खरेदी करण्यासाठी दि. ९-१०-९६ च्या स्थायी समिती विषय क्र. २२९/८ ठरावात मंजुर करण्यांत आले या अनुषंगाने निविदा मागविण्यांत आल्या असता एकुण ५ निविदा विकण्यांत आल्या व शेवटच्या तारखेस ४ निविदा प्राप्त झाल्या त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. अग्रवाल आयर्न स्टील वर्क | ०.९९% | जास्त दराने |
| २. | श्री. जैन अस्बेस्टॉस प्रॉडक्टस | ०.३७% | --//-- |
| ३. | श्री. सुरज इंटरप्रायजेस | १९.७२% | --//-- |
| ४. | श्री. अर्थ मोव्हर्स | १७.६४% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया वरील तकत्यानुसार सर्वात कमी दराची निविदा मे. सुरज इंटरप्रायजेस यांची असुन त्यांची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९.७३% कमी दराची आहे. त्यांची निविदा स्विकारणे योग्य वाटते. करिता प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पा.पु. वि.क्र. २ मधील झोन ५ व ७ अंतर्गत येणाऱ्या जनवाहिन्याच्या देखभाल दुरुस्तीसाठी १००,१५० व २०० मी.मी. व्यासाचे ए.सी. पाईप व जॉइन्ट खरेदी करण्यासाठी प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ९.७२% कमी दराची मे. सुरज इंटरप्रायजेस यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७२२/१२ :**

पाणी पुरवठा विभाग क्र. २ झोन क्र. ५ व ७ अंतर्गत येणाऱ्या जनवाहिन्याच्या देखभाल दुरुस्तीसाठी आय.ए. आयमार्कचे मेकॅनिकल टी, रेडसर, अडॉप्टर, खरेदी करण्यासाठी अं.प. रु. ५,१२,०००/- चे तयार करण्यांत आले त्यास सर्वसाधारण सभा ठराव ९७/११ दि. १९-१०-९६ अन्वये मंजुरी मिळणी आहे. त्या अनुषंगाने निविदा काढण्यांत आली. निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत तीन निविदा विकल्या व सिलंबर निविदा स्विकारण्याच्या तारखेला तिन निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | ओरीएन्ट रबर प्रॉडक्टस | ०.०३% | कमी दराने |
| २. | मे. अर्थ मोव्हर्स | २.३९% | जास्त दराने |
| ३. | ओसीस रिलायबल प्रॉडक्टस | १३.२९% | --//-- |

उपरोक्त प्रमाणे सर्वात कमी दराची निविदा अं.प. दरापेक्षा ०.०३% कमी दर असलेली निविदा ओरिएन्ट रबर प्रॉडक्टस यांची होती. स्पर्धात्मक दर प्राप्त न झाल्याने पत्र देऊन संबंधीत गुत्तेदारास वाटाघाटीसाठी बोलावण्यांत आले. वाटाघाटी अंती अं.प. दरापेक्षा १% कमी दराने काम करण्यांस गुत्तेदार तयार आहे.

तरी ओरिएन्ट रबर प्रॉडक्टस् यांची अं.प. दरापेक्षा १% कमी दराची निविदा स्विकृतीस प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पाणी पुरवठा विभाग क्र. २ मधील झोन क्र. ५ आणि ७ अंतर्गत येणाऱ्या जनवाहिन्याच्या देखभाल दुरुस्तीसाठी आय.एस. आयमार्कचे मेकॅनिकल टी, रेडसर,बेंड, अडॉप्टर, खरेदी करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदर काम अं.प. दरापेक्षा १% कमी दराने मे. ओरिएन्ट रबर प्रॉडक्टस यांचे कडुन करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७२३/१३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. संजयनगर बायजीपुरा स्लम येथे बॉक्स टाईप कल्व्हर्ट तयार करणे बाबत या कामाकरिता सा.बां. खातेच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुचीनुसार रु. ४,१८,९२५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन त्यास स्थायी समिती सभा दि. २१-१-९७ ला मंजुरी मिळाली आहे. या कामाकरिता निविदापत्रके मागविण्यांत आली असता अंतिम तारखेपर्यंत एकुण वीस निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण दहा निविदा प्राप्त झालया. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. अमीत कन्स्ट्रक्शन | २१.००% | कमी |
| २. | श्री. सय्यद रफिकोद्दीन | १९.१५% | --//-- |
| ३. | श्री. निसार अहमद | १९.०६% | --//-- |
| ४. | श्री. मन्नान खॉन | १६.००% | --//-- |
| ५. | श्री. अब्दुल सलाम | १३.१०% | --//-- |
| ६. | श्री. कुलवंतसिंग | १०.७७% | --//-- |
| ७. | श्री. एस.ए. नवाब | १०.८२% | --//-- |
| ८. | श्री. एस.ए. असोशिएटस् | ७.००% | --//-- |
| ९. | श्री. शेख सलीम अहमद | ५.८६% | --//-- |
| १०. | श्री. गुरु कन्स्ट्रक्शन | १२.००% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अं.प. दरापेक्षा २१.११% कमी दराची श्री. अमित कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. निविदा मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संजयनगर बायजीपुरा स्लम येथे बॉक्स टाईप कल्व्हर्ट तयार करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व

अं.प. दरापेक्षा २१.११% कमी दराची श्री. अमित कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७२४/१४ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्तावा सादर केला की, दैनिक पाणी पुरवठा देखभाल व दुरुस्तीसाठी लागणारे विविध व्यासाचे जिफी जॉईटस व दुरुस्ती खरेदी करण्यासाठीच्या अं.प. रु. ४,९९,११८/- स्थायी समिती ठराव क्र. ३८६/१४ दि. ८-११-९६ अन्वये मंजुरी देण्यांत आली आहे. कार्यालयाची निविदा सुचना क्र. ७९/९७ जी की दै. वृत्तपत्रात प्रसिध्दीस देण्यांत येईल "डी" फॉर्मवर निविदा मागविण्यांत आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण तिन सिलबंद निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. मे. अग्रवाल आयर्न ॲन्ड स्टील वर्क्स | ११.५३% | कमी |
| २. | श्री. मे. ओरिएन्ट रबर प्रॉडक्टस | १२.१११% | --//-- |
| ३. | श्री. मे. आर.के. घोष ॲन्ड कं. | ५.०१४% | --//-- |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२.१११% कमी दराची मे. ओरिएन्ट रबर प्रॉडक्टस यांची निविदा स्विकारण्यास्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दैनिक पाणी पुरवठा देखभाल व दुरुस्तीसाठी लागणारे विविध व्यासाचे जीफी जॉइन्टस खरेदी करण्याकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा १२.१११% कमी दराची मे. ओरिएन्ट रबर प्रॉडक्टस यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७२५/१५ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, दैनिक पाणी पुरवठा व देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी लागणारे विविध व्यासाचे ए.सी. पाईप खरेदी करावयाचे आहेत. त्यासाठी अं.प. रु. ४,९४,७७५/- एवढयाचे तयार करण्यांत येऊन त्यास स्थायी समितीचा ठराव क्र. ५०५/१९ दि. १८-१२-९६ अन्वये मंजुरी देण्यांत आली असता कार्यालयीन निविदा क्र. ११९/९६-९७ दै. वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देऊन "डी" फार्मवर निविदामागविण्यांत आल्या कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकुण चार निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एकुण तीन सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. श्री. अर्थ मुव्हर्स | ४.९२५% | जास्त |
| २. | श्री. मे. जैन ॲसबेस्टॉस प्रॉडक्टस | -- | अंदाजपत्रकीय दर |
| ३. | श्री. मे. सुरज इंटरप्रायजेस | ०.६०७% | कमी |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.६०७% कमी दर मे. सुरज इंटरप्रायझेस यांचा आहे. करिता निविदा स्विकृतीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दैनिक पाणी पुरवठा व देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी लागणारे विविध व्यासाचे ए.सी. पाईप खरेदी करण्याकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.६०७% कमी दराची मे. सुरज इंटरप्रायजेस यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# *पुरवणी विषय पत्रिका*

**विषय क्र. ७२६/१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, आमखास मैदान येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र येथील उद्यानात फोक्स लाईटींग व गार्डन कटींग लावण्याचे कामाकरिता सा.बां. खाते सन ९६-९७ च्या दरसुचीनुसार रु. २,१४,७९६/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील खर्च डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र विकसीत करणे या शिर्षकाखाली ९६-९७ या आर्थिक वर्षात उपलब्ध असलेल्या र.रु. ३० लक्ष (सुधारित) तरतुदीतुन करण्यात येईल.

तरी रु. २,१४,७९६/- चे अं.प. मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावा दर्शविल्याप्रमाणे आमखास मैदान येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर केंद्र येथील उद्यानात फोक्स लाईटींग व गार्डन कटींग लावण्याचे कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु. २,१४,७९६/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. सदर खर्च "डॉ. बाबासाहेब आंबेडकर केंद्र विकसित करणे या शिर्षकाखाली करण्यांत यावा.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७२७/२ :**

मो. आंबेडकर नगर येथील गौतमनगर या भागात १०० मी.मी. व २०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकण्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार र.रु. २,३०,९२०/- चे तयार करण्यांत आले असुन त्यास प्रशासकीय मंजुरी मिळालेली आहे. सदर कामावर होणार खर्च हा स्लम भागासाठी ठेवण्यांत आलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदीमधुन करण्यांत येणार आहे.

तरी मो. आंबेडकरनगर येथील गौतमनगर भागात जलवाहिनी टाकण्याचे अंदाजपत्रक र.रु. २,३०,९२०/- चे प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आंबेडकरनगर येथील गौतमनगर या भागात १०० मी.मी. व २०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी टाकणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु. २,३०,९२०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च स्लम भागासाठी ठेवण्यांत येते. त्याचप्रमाणे सध्या उन्हाळा सुरु होत असल्यामुळे हे काम तातडीने हाती घेण्यांत यावे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७२८/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, छावणी पुलाच्या पुर्व दिशेला मोकळया जागेत औरंगाबाद मुंबई रस्त्यावर वाहतुक बेट बांधणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु. १२,२९,१५०/- च्या अंदाजपत्रकास मा. सर्वसाधारण सभा विषय क्र. १७६/१४ दि. १९-१२-९६ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे. त्यानुसार सदरील कामाकरिता निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ९ निविदा

पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त ५ निविदापत्रके दर भरुन प्राप्त निविदापत्रके दि. १४-२-९७ रोजी उघडण्यांत आली. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. एस.एच. असोशिएटस | २०.२१% | कमी दराने |
| २. | मे. भाग्यश्री कन्स्ट्रक्शन | १६% | --//-- |
| ३. | मे. खर्डीकर कन्स्ट्रक्शन | १२% | --//-- |
| ४. | मे. शेख कन्स्ट्रक्शन | १०.२७% | --//-- |
| ५. | मे. साई कन्स्ट्रक्शन | ०.२१% | --//-- |

वरील प्राप्त निविदापैकी मे.एस.एच. असोशिएटस यांच्या निविदाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.२१% कमी आहेत.

तरी मे. एस. एच. असोशिएटस यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.२१% कमी तर मंजुरी बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे छावणी पुलाच्या पुर्व दिशेला मोकळया जागेत औरंगाबाद मुंबई रस्त्यावर वाहतुक बेट बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.२१% कमी दराची मे. एस.एच. असोशिएटस यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७२९/४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, मुथियान कॉर्नर चौक ते दर्गा रोड या मुख्य रस्त्यावर विद्युतीकरणाचे कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रु. ४,९९,०००/- च्या अंदाजपत्रकीय खर्चास स्थायी समितीच्या सभेत मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामासाठी निविदापत्रके मागविली असता कोरी निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम दि. ३१-१-९७ पर्यंत ५ निविदापत्रके प्राप्त झालीत त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. लुना इलेक्ट्रीकल | १% | कमी दराने |
| २. | मे. प्रगत इलेक्ट्रीकल | ९.९% | जास्त दराने |
| ३. | मे. गजानन इलेक्ट्रीकल | ६% | --//-- |
| ४. | मे. शाम इलेक्ट्रीकल | १.५% | --//-- |
| ५. | मे. नाबला इलेक्ट्रीकल | ५% | --//-- |

वरील प्राप्त निविदापैकी मे. लुना इलेक्ट्रीकल यांचे निविदातील दर तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा रु. १% कमी आहेत.

तरी मे लुना इलेक्ट्रीकल यांचे सर्वात कमीचे रु. १% कमी दर मंजुरीबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुथियान कॉर्नर चौक ते दर्गा रोड या मुख्य रस्त्यावर विद्युतीकरणाचे कामासाठी प्राप्त झालेलया निविदापैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा १% कमी दराची मे लुना इलेक्ट्रीकल यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७३०/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, धनमंडी येथील रस्त्यावर २५० व्हॅटचे सोडीयम दिवे पोलसह बसविण्याच्या कामाकरिता करण्यात आलेल्या रु. ३,०९,७५०/- चे अंदाजपत्रक स्थायी समितीमध्ये मंजुर झालेले आहे.

त्यानुसार सदरील कामाकरिता निविदापत्रके मागविली असता निविदापत्रके गेल्या मोहरबंद निविदा विकल्या गेल्या मोहरबंद निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत ४ निविदा मा. लेखाधिकारी यांचे दालनांत दि. ३१-१-९७ रोजी उघडण्यात आली. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. शाम इलेक्ट्रीकल | २.५% | जास्त दराने |
| २. | मे. प्रगत इलेक्ट्रीकल | ८% | --//-- |
| ३. | मे. लुना इलेक्ट्रीकल | १% | कमी दराने |
| ४. | मे. गजानन इलेक्ट्रीकल | ६.६% | जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापैकी मे. लुना इलेक्ट्रीकल यांचे दर सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराने आहेत.

तरी मे. लुना इलेक्ट्रीकल यांचे सर्वात कमी दर रु. १% कमी असल्याचे त्यांचे दर स्विकारण्यास विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे धनमंडी येथील रस्त्यावर २५० वॅटचे सोडीयम व्हेपर दिवे बसविण्याच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा १% कमी दराची मे. लुना इलेक्ट्रीकल यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७३१/६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, दशमेशनगर ते टिळकनगर या रस्त्यावर विद्युती करण करण्यासाठी तयार करण्यांत आलेल्या रु. २,६०,०००/- चे अंदाजपत्रकास स्थायी समितीत मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामासाठी निविदापत्रके मागविली असता कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण १५ निविदा विकल्या गेल्या व स्विकृतीच्या तारखेपर्यंत ४ निविदा प्राप्त झाल्या. त्या दि. ३१-१-९७ रोजी उघडण्यांत आल्या. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. जे.बी. इलेक्ट्रीकल | ६.२% | जास्त दराने |
| २. | मे. प्रगत इलेक्ट्रीकल | २.११% | कमी दराने |
| ३. | मे. गजानन इलेक्ट्रीकल | ७% | जास्त दराने |
| ४. | मे. लुना इलेक्ट्रीकल | ५.१% | --//-- |

वरील प्राप्त निविदापैकी मे. प्रगत इलेक्ट्रीकल यांचे निविदापत्रकाचे दर तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.११% कमी दराने आहेत. वाटाघाटी अंती मान्यता झालेल्या मे. प्रगत इलेक्ट्रीकल यांचे अंदाजपत्रकीय दराप्रमाणे निविदा दर मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दशमेशनगर ते टिळकनगर या रस्त्यावर विद्युतीकरण करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा २.११% कमी दराची मे. प्रगत इलेक्ट्रीकल यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७३२/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, कटकटगेट ते सिडको या १०० फुटी रस्त्यावर रस्ता दुभाजक टाकणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रु. ३,९५,२०८/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषयी क्र. ४०२/३० दि. २९-११-९६ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार सदरील कामाकरिता निविदापत्रके मागविली निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण पंचविस निविदा विकल्या गेली व निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखे पर्यंत एकुण बारा निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदा दि. ३१-११-९७ रोजी उघडण्यांत आली त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मो. सलीम | २७.८६% | कमी दराने |
| २. | मो. सिराजुद्यीन सिद्यीकी | २७.५% | --//-- |
| ३. | श्री. निसार अहेमद | १५.२६५ | --//-- |
| ४. | श्री. सय्यद खुर्शिद हसन | २४.९९% | --//-- |
| ५. | श्री. विश्वनाथ जी. स्वामी | २२.२२% | --//-- |
| ६. | मे. न्यु सुपर कंन्स्ट्रक्शन | २१.१०% | --//-- |
| ७. | श्री. डी.सी. पंजाबी | २१.३% | --//-- |
| ८. | श्री. जि.क्र. पवार | १८.१९% | --//-- |
| ९. | श्री. कुलवंतसिंग | १५.८६% | --//-- |
| १०. | श्री. मे. गुरु कस्ट्रक्शन | ११% | --//-- |
| ११. | मे. एस.एच. असोशिएटस | ७.७७% | --//-- |

वरील प्राप्त निविदापैकी श्री. मो. सलीम यांच्या निविदाचे दर तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.८६% कमी दराने आहेत.

तरी मो. सलीम यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.८६% कमी दर मंजुर बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीचे विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कटकटगेट ते सिडको या १०० फुटी रस्त्यावर रस्ता दुभाजक टाकणेच्या कामाकरिता झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा २७.८६% कमी दराची श्री. मो. सलीम यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७३३/८ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला की, चंपा मस्जीद येथे आर.सी.सी. गटार बांधणेच्या अंदाजपत्रकीय रक्कम रु. ३,४०,०००/- च्या

कामात स्थायी समिती सभा दि. ९-१०-९६ ला विषय क्र. ११८/७ ने ठराव संमत झालेला आहे. सदरील कामाची निविदा सुचना क्र. मनपा/जनि/२/१२१ दि. १८-११-९६ ला वृत्तपत्रात जाहिरात देऊन बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकुण १९ निविदा विक्री झाल्या. व त्यापैकी १० निविदा प्राप्त झाल्या त्याची तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. सलीम पटेल | २६.९९% | कमी दराने |
| २. | श्री. डी.सी. पंजाबी | २३.३% | --//-- |
| ३. | श्री. मो. सलीम | २२% | --//-- |
| ४. | श्री. स. रफिकोद्दीन | २१.२०% | --//-- |
| ५. | श्री. सिराजोद्दीन सिद्दीकी | २९% | --//-- |
| ६. | मे. न्यु सुपर कन्स्ट्रक्शन | १७.९०% | --//-- |
| ७. | मे. राणा कन्स्ट्रक्शन | २१.००% | --//-- |
| ८. | श्री. एम.ए. देशमुख | १३.००% | --//-- |
| ९. | मे. एस.एच. असोशिएटस | ७.००% | --//-- |
| १०. | श्री. पी.बी. पवार | ५.००% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६.९९% कमी दराने श्री. सलीम पटेल यांची निविदा आहे. सदरील निविदास मा. आयुक्तांनी दि. ७-३-९७ ला प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. तरी सदरील निविदा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चंपा मस्जीद येथे आर.सी.सी. गटार बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकद दृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा २६.९९% कमी दराची श्री. सलीम पटेल यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७३४/९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, टिळकनगर येथील मनपाच्या खुल्या जागेवर भिंत व तार कुंपन करणे बाबतचे अंदाजपत्रक सन ९५-९६ च्या सा.बां. खात्याच्या दरसुची अन्वये र.रु. ३,०४,७००/- चे तयार करण्यांत आले त्यास मा. आयुक्त यांची मंजुरी झालेली आहे.

सदर कामाचे खर्च विकास योजना अंतर्गत भुखंडाचे संरक्षण या तरतुदी अंतर्गत करण्यांत येणार आहे. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे टिळकनगर येथील मनपाच्या खुल्या जागेवर भिंत व तार कुंपन करणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु. ३,०४,७००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७३५/१० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, नेहरुनगर कटकटगेट भागात वीस खांटाचे आरोग्य केंद्र बांधणेच्या कामासाठी सर्वसाधारण सभा दि. २०-१२-९५ ची तहकुब

२७-१२-९५ चा विषय क्र. ११६/६ अन्वये र.रु. २५,००,०००/- चे अंदाजपत्रकास मान्यता प्राप्त झाली आहे. तसेच स्थायी समिती ठराव क्र. ५३४/८२ दि. २९-२-९६ अन्वये मे. एलोरा कन्स्ट्रक्शन कं. यांचे निविदा दरास मान्यता प्राप्त झाली आहे. तसेच मक्तेदारास दि. १५-३-९६ ला कार्यदेश देण्यांत आलेला आहे. प्रत्यक्ष काम सुरु केले असता बांधकामाच्या जागेत बद्दल झाल्याने प्रत्यक्ष स्थळपाहणी करुन त्रिमुर्ती हौसिंग कॉलनीतील जागा निश्चित केली. त्यानुसार वास्तुतज्ञाकडुन नकाशा मागवुन कामास सुरुवात करण्यांत आलेली आहे. सदरील जागा लो लेबलची असल्याने व रस्त्यापेक्षा ३.५ मीटर खाली असल्याने पावसाचे व ड्रेनेजचे पाणी साचत आहे. त्यामुळे रस्त्याच्या लेबलला स्लॅब टाकुन तळमजलासाठी भविष्यात एक बेसिमेंट फ्लोअर म्हणुन हॉल करता येऊ शकतो. या दृष्टीने पडदी करिता चाळ सोडणे व बेसिमेंट फ्लोअरच्या विन कास्टींग करताना बेसिमेंट फ्लोअर लेबलचा स्लॅब स्थळावर तांत्रिक अडचणी पाहता टाकुण घेणे बाबत व पडदी करिता चाळ सोडुन काम करणे आवश्यक असल्याने त्यास मा. आयुक्त साहेब यांनी शहर अभियंता व मुख्यलेखा परिक्षक यांचेशी चर्चा करुन वाढीव रक्कम रु. ४,३३,०००/- मान्यता दि. २७-११-९६ ला मान्यता दिलेली आहे.

सबब सदर कामासाठी सुधारित अंदाजपत्रक र.रु. २९,३३,०००/- ला तसेच सदरील वाढीव काम मुळ मंजुर एजन्सी मे. एलोरा कंन्स्ट्रक्शन कं. यांचेकडुन मंजुर निविदेच्या दरानुसार काम करुन घेण्यास्तव प्रस्ताव मंजुरीस्तव सादर सदरचा खर्च शासकीय अनुदान र.रु. १०.०० कोटी मधुन करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नेहरुनगर कटकटगेट भागात वीस खांटाचे आरोग्य केंद्र बांधणेच्या कामाची जागा बदलल्यामुळे बांधकाम येत असलेल्या वाढीव खर्च रु. ४,३३,०००/- ला व सुधारित अंदाजपत्रक रु.रु. २९,३३,०००/- ला सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. तसेच वाढीव काम मुळ मंजुर एजन्सी मे. एलोरा कन्स्ट्रक्शन रु. यांचेकडुन मंजुर निविदा दरानुसार करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७३६/११ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. ज्युबलीपार्क मनपा निवास स्थानाच्या बाजुला मनपा शाळेच्या परिसराजवळ निष्क्रीय जागेवर स. नगरसेविका यांनी मागणी केल्यानुसार फक्त ज्युबली पार्क येथील मनपा शालेय विद्यार्थ्यांकरिता टेबल टेनिस हॉल बांधण्यासाठी सा.बां. खात्याचे सन ९६-९७ चे जिल्हा दरसुचीनुसार र.रु. २,०२,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन सदर ठिकाणी हॉल बांधणेसाठी सहाय्यक संचालक नगर रचना यांनीही प्रस्तावित जागेवर हॉल बांधण्यात संमती दर्शविली आहे. व सदर हॉल बांधण्याचे अंदाजपत्रक स्थायी समितीमध्ये मंजुरीस्तव शिफारस केलेली आहे. सबब सदर कामाचे र.रु. २,०२,०००/- अंदाजपत्रक मंजुरीस्तव प्रस्ताव सादर. सदर खर्च विकास इमारती शाळा दवाखाने बांधणे या लेखा शिर्षकामधुन करण्यात येईल.

संवाद

सौ. रजंनी जोशी : सदरील महिलांसाठी बसुन मंजुर करण्यात यावा.

श्री. कचरु नवपुते : या प्रस्तावातील कोणत्या ठिकाणी न भु.क्र. जागेसह व अटी व शर्तीसह किती वर्षाच्या लिजवर जागा देणार यांच्या माहितीसह सविस्तर पुढील बैठकीत माहिती द्यावी.

मा. आयुक्त : या बाबत निर्णय घेता येणार नाही. प्रत्यक्षात पाहणी करुनच प्रशासन कार्यवाही करेल.

श्री. अ. रशिदखॉन (मामु) : प्रस्ताव मंजुर करण्यास हरकत नाही. कारण त्या ठिकाणी टेनिस हॉल बांधुन शालेय विद्यार्थ्यांना खेळण्यास प्रोत्साहन मिळेल.

मा. सभापती : सदरील प्रस्तावात मा. आयुक्त यांनी स्वतः चर्चा करुन व जागेची पाहणी मनपाच्या अटी व शर्तीसह किती वर्षाच्या लिजवर जागा द्यावयाची याची सविस्तर माहितीसह पुढील बैठकीत माहिती द्यावी. तो पर्यंत प्रस्ताव स्थगित.

**ठराव :**

सर्वानुमते असे ठरले की, सदर प्रस्ताव पुढील बैठकी पर्यंत स्थगित ठेवण्यात येतो.

**विषय क्र. ७३७/१२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, फ्रेंडस् कॉलनी येथील मनपाच्या खुल्या जागेवर (दोन ठिकाणच्या) तार कुंपण करणे बाबत सन ९४-९५ च्या सा.बां. खात्याच्या दरसुची र.रु. २,०२,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले. त्यास मा. आयुक्तांनी मंजुरी दिली व स्थायी समिती विषय क्र. ५ दि. ५-८-९६ अन्वये मंजुरी झालेली आहे. त्या अनुषंगाने बी-१ नमुन्यात निविदा मागविण्यात आल्या विक्रीच्या तारखेपर्यंत एकुण १४ कोरे निविदा विकले गेले व स्विकारणेच्या तारखेपर्यंत दर भरुन एकुण पाच निविदा प्राप्त झाल्या. त्यात सर्वात कमी तुलनात्मकदृष्टया श्री. चंद्रसुहास पाटील गुत्तेदार यांचे अं.प. दरापेक्षा १६.८०% कमी दराचे दर होते. त्यास मंजुरी झालेली आहे. २% अनामत भरणे बाबत कार्यवाही केली. परंतु गुत्तेदार यांनी २% अनामत भरली नाही. तदनंतर दुसऱ्या क्रमांकाच्या गुत्तेदारास प्रथम क्रमांकाच्या दरात काम करणे बाबत विचारणा करण्यात आली. त्याने आपण भरलेले दर १२.७% कमी दराने काम करण्यास तयार आहे. त्यावर मा. आयुक्तांनी काम करण्यास तयार आहे. त्यावर मा. आयुक्तांनी दराच्या वाटाघाटीसाठी क्रं.२ च्या निविदाधारकास बोलवावे अशी तजबिज केली. त्या अनुषंगाने दराच्या संदर्भात मा. आयुक्तांकडे चर्चा झाली. त्यावर १५% कमी दराने काम करावे. मान्य नसल्यास फेरनिविदा काढावीत. त्यावर गुत्तेदार यांनी काम करण्यास मान्य केले नाही. फेरनिविदा काढण्यात आली. एकुण १३ निविदा विक्री झाल्या पैकी तीन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्यात सर्वात कमी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी तुलनात्मकदृष्टया श्री. शे. शरीफ यांचे ३.७०% अं.प. दरापेक्षा जास्त दराचे दराचे होते. दराचे संदर्भिय वाटाघाटीसाठी मा. आयुक्त यांचेकडे बोलविण्यात आले. त्यात मुळ काम (तार फेन्सिंगचे) रद्द करावे.

संपुर्ण दगडी बांधकाम करणेत यावे. अशा आदेशान्वये सुधारित अंदाजपत्रक सन ९५-९६ च्या दरसुची अन्वये र.रु. ३,०८,६५०/- चे तयार करण्यांत आले व शेख शरीफ गुत्तेदार यांनी अं.प. दराने काम करण्याचे मान्य केले आहे. त्यास मा. आयुक्तांनी मान्यता दिली आहे. सदर कामाचे निविदा दोन वेळेस मागविण्यात आली आहे. त्यात बराच कालावधी गेलेला आहे. या करणाअंती अंदाजपत्रकीय रक्कमेस व श्री. शेख शरीफ यांच्याकडुन अंदाजपत्रकीय दराने कामा करुन घेण्यास्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, फ्रेंडस् कॉलनी येथील मनपाच्या खुल्या जागेवर (दोन ठिकाणच्या) तार कुंपण करणे च्या कामाकरिता तयार केलेल्या सुधारित अंदाजपत्रक र.रु. ३,०८,६५०/- ला व सदर काम श्री. शेख शरीफ गुत्तेदार यांच्याकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७३८/१३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, घाटी जयभिमनगर स्लम येथे ३०० मी.मी. व्यासाची अर्थगोलाकार गटार बांधणेच्या कामाकरिता सा.बां. खात्याच्या सन ९५-९६ च्या दरसुचीनुसार र.रु. ६,३७,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभा विषय क्र. ७ दि. १९-१०-९६ अन्वये मंजुरी मिळालेली आहे. सदर खर्च "खुली गटार बांधणे" या शिर्षकाखाली करण्यांत येईल.

प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आल्या. असता अंतिम तारखेपर्यंत एकुण पधंरा निविदा विक्री झाल्या व पैकी एकुण सात निविदा प्राप्त झाल्या त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. ए.एम. फारुकी | २४% | कमी |
| २. | श्री. के.बी. पाथ्रीकर | २२.६५% | कमी |
| ३. | श्री. सैय्यद रफिकउद्दीन | १९.१०% | --//-- |
| ४. | श्री. शेख मसुद | १७.२५% | --//-- |
| ५. | श्री. जी.आर. घोडेले | ९.९९% | --//-- |
| ६. | श्री. पी.बी. पवार | ५% | --//-- |
| ७. | श्री. सिद्यीकी एस.झेड | -- | अं.प. दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमिी व अं. दरापेक्षा २४% कमी दराची श्री. ए.एम. फारुकी यांची प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद**

**श्री. गौतम खरात :** या प्रस्तावातील गुत्तेदार हा व्यवस्थित काम करीत नाही. अर्धवट काम करुन सोडून जातो त्याचे काम करण्याची पध्दत व्यवस्थित नाही. त्यापेक्षा प्रस्ताव रिकॉल करावा.

**शहर अभियंता :** संबंधित गुत्तेदार जर अर्धवट काम सोडून जात असल्यास अथवा त्याचे काम समाधानकारक नसल्यास त्यांचेवर फाईन करण्यात येईल. किंवा त्यास ब्लॅक लिस्ट मध्ये नांव टाकता येईल.

**मा. सभापती :** सदरील प्रस्ताव रिकॉल करण्यात यावा.

**ठराव :**

सर्वानुमते असे ठरले की, सदर कामाकरिता पुन्हा निविदा मागविण्यांत याव्यात.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७३९/१४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, हर्सुल स्लम येथील रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता सा.बां. खात्याच्या सन ९५-९६ दरसुचीनुसार

१४,२६,६३०/- चे अं.प. तयार करण्यांत आले आहे. सदरील काम अठरा खेडी विकास योजना या शिर्षकातुन करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभा विषय क्र. १६८ दि. १९-१२-९६ अन्वये मंजुरी मिळालेली असुन कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता अंतिम तारखे पर्यंत पांच निविदा विक्री झाल्या. पैकी तीन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. व्यंकटेश कन्स्ट्रक्शन | १३.७८७% | कमी |
| २. | श्री. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | ४.९५% | जास्त |
| ३. | श्री. आदिनाथ कस्ट्रक्शन | ९.६५% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा १३.७८७% कमी दराची श्री. व्यंकटेश कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. करिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्सुल स्लम येथील रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा १३.७८७% कमी दराची श्री. व्यंकटेश कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७३९/१५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. गौतमनगर येथे डांबरीकरण करणे बाबत सा.बां. खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुचीनुसार रु. ५,९४,७००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील काम "डांबरीकरण रस्ते" या शिर्षातुन करण्यांत येईल. सदरच्या अं.प. मा. आयुक्तांनी दि. ८-८-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे. तसेच सर्वसाधारण सभेत दि. ९-१०-९६ विषय क्रं. ८ अन्वये मंजुर झाला आहे. प्रस्तावित कामासाठी निविदा मागवलया असता अंतिम तारखेपर्यंत एकुण दोन निविदा प्राप्त झाल्या व उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. आदिनाथ कस्ट्रक्शन | ५.६१% | जास्त |
| २. | श्री. डी. अजितसिंग | ११% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया कमी दराची म्हणजे अं.प. दरापेक्षा ५.६१% जास्त दराची निविदा मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची आहे. परंतु हे दर कार्यालयास जास्त वाटत असल्याने दराच्या वाटाघाटीसाठी ठेकेदारास बोलावले असता दि. १३-३-९७ रोजी मा. आयुक्त यांच्या दालनांत श्री. आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांनी हे काम अं.प. दरापेक्षा २% जास्त दराने करण्यांस लेखी संमती दिली आहे.

तरी अं.प. दरापेक्षा २% जास्त दराची असलेली मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्ताव दर्शविल्याप्रमाणे गौतमनगर येथे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी कमी दराचे निविदाधारक श्री. आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदर काम त्यांचेकडुन अं.प. दरापेक्षा २% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७४०/१६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, इंदिरानगर बायजीपुरा स्लम येथील मुख्य रस्त्यांचे पुर्नडांबरीकरण करणेचे कामाकरिता सा.बां. खाते सन ९५-९६ चे दरसुची नुसार रु. ५,०३,३०४/- चे तयार करण्यांत आले आहे. सदरील काम "डांबरीकरण" या शिर्षातुन करण्यांत येईल. सदरच्या अं.प. मा. आयुक्त यांनी दि. २१-१०-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे. तसेच स्थायी समिती दि. ८-११-९६ रोजी विषय क्र. ३ नुसार मंजुरी मिळालेली आहे. प्रस्तावित कामासाठी निविदा मागविल्या असता अंतिम तारखेपर्यंत एकुण तीन निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारण्यांच्या अंतिम तारखे पर्यंत एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या व उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. आदिनाथ कन्स्ट्रक्शन | ४.९% | जास्त |
| २. | श्री. मास्कॉट कन्स्ट्रक्शन | ९.८०५ | --//-- |
| ३. | श्री. डी. अजितसिंग | ९.९% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अं.प. दरापेक्षा ४.९% जास्त दराची निविदा श्री. आदिनाथ कस्ट्रक्शन यांची आहे. परंतु हे दर कार्यालयास जास्त वाटत असल्याने दराच्या वाटाघाटीसाठी मा. आयुक्त यांच्या दालनांत दि. १३-३-९७ रोजी श्री. आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांनी हे काम अं.प. दराने करण्यास लेखी संमती दिली आहे.

तरी अं.प. दराची असलेली श्री. आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची निविदेस मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इंदिरानगर बायजीपुरा स्लम येथील मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री. आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदर काम त्यांचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७४१/१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. काझीवाडा येथे अभ्यासिका बांधणेच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र. ३५६/१५ दिनांक ६-१-९६ अन्वये सन ९५-९६ चे जिल्हा दरसुची नुसार र.रु. ३,७५,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी प्राप्त झालेली आहे. तसेच स्थायी समिती ठराव क्र. २५९/३८ दि. २१-९-९६ अन्वये तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व मा. आयुक्तांचे आदेशान्वये अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९% जास्त ऐवजी अंदाजपत्रकीय दराचे श्री. एम.ए.कुरेशी यांचे निविदेस सर्वानुमते मान्यता मिळालेली असुन कार्यालयीन आदेश क्र. ए.एमसी/एमईइब्ल्यू (बा) ११०/९६/ दि. ३-९-९६ अन्वये संबंधीत ठेकेदारास कार्यादेशही देण्यांत आलेला आहे. कामासा प्रत्यक्ष सुरुवात केली असता सदर जागेवर खड्डा असुन समोर भगवान बुध्दाचा पुतळा ओटा असल्यामुळे इमारत मागे घ्यावी लागली एकंदरीत इमारतीचे प्लीथ वर घ्यावे लागेल. तसेच भरती देखिल करावी लागली. एकंदरीत इमारतीचे आकारमानामुळे स्थळामुळे प्रस्तुत प्रकल्प पुर्ण करणे करिता रु. १,५२,१८१/- ची वाढ झाली त्यामुळे सदर कामाचे सुधारित अं.प. (३७५०००+१५२१८१) र.रु. ५,२७,१८१/- चे झाले असुन बी-१ निविदा नियम ३८ नुसार अं.प. दराने मुळ एजन्सी

कडुन करुन घेण्यासाठी प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर करण्यासाठी मा. आयुक्तांना दि. १३-३-९७ अन्वये शिफारस केलेली आहे.

सबब सदर कामासाठीचे सुधारित अं.प. र.रु. ५,२७,१८१/- ला तसेच सदरील वाढीव काम मुळ एजन्सी श्री. एम.ए. कुरेशी यांचे कडुन अंदाजपत्रक दराने करुन घेणेसाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर. सदरचा खर्च ५% कमकुवत घटक कल्याणकारी योजना या शिर्षातुन करण्यांत येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे येथे अभ्यासिका बांधणेच्या कामाची जागेमध्ये बद्दल होऊन वाढीव कामामुळे वाढीव सुधारित अंदाजपत्रक रक्कम र. ५,२७,१८१/- ला तसेच सदरील काम मुळ गुत्तेदार श्री. एम.ए. कुरेशी यांचे कडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७४२/२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, चोंडेश्वरी सो. भुषणनगर, गिरीजादेवी सो. व रुणवाल ले आऊट अंतर्गत डांबरीकरण करण्याचे कामाचे अं.प. तयार करण्यांत आले. सदरील कामाचे अं.प. रु. ४,१४,१५४/- असुन त्यास स्थायी समिती मान्यता मिळाल्या नंतर निविदा काढण्यांत आल्या. त्यात एकुण सात निविदा विक्री झाल्या. त्यांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे. मास्काट कन्स्ट्रक्शन | १७.८६% | कमी |
| २. | मे. व्यंकटेश कन्स्ट्रक्शन | १५.३९% | कमी |
| ३. | श्री. एम.एस. जग्गी | १५% | कमी |
| ४. | श्री. बी.के. पार्थीकर | ११.११% | कमी |
| ५. | मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन | ८.५६% | कमी |

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी दर मे. मास्काट कन्स्ट्रक्शन यांचे असुन त्यांचे दर १७.८६% कमी दराचे आहे. तरी सदरील काम हे मॉस्काट कन्स्ट्रक्शन यांचेकडुन १७.८६% कमी दराने करुन घेण्याचे मान्यतेस्तव प्रस्ताव स्थायी समितीसमोर सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे चोंडेश्वरी सोसा. भुषणनगर, गिरजादेवी व रुग्णवाल ले-आऊट अंतर्गत डांबरीकरण करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापेकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा १७.८६% कमी दराची मे. मास्कॉट कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणे सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७४३/३ :**

उप-आयुक्त-२ यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिकेचे लहान जनावरांसाठी शहाबाजार येथे पशुधवधगृहामध्ये सध्या महानगरपालिकेतर्फे प्रत्येकी जनावर रु. १.०० ऐवजी रु. ४.०० प्रति जनावर कत्तल फी दि. १-४-९७ पासुन आकारण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद**

श्री. रशिद मामु : रेल्वेस्टेशन येथे एक मनपातर्फे कत्तलखाना करण्यात यावा. कारण तेथील व आसपासच्या लोकांना शहाबाजार/लोटा कारंजा भाग लांब पडतो.

पशुधन विकास अधिकारी : अशा प्रकारचा कत्तलखाना वेगवेगळया विकाणी करावयाचे झाल्यास प्रशासकीय खर्च वाढतो.

मा. सभापती : ठिक आहे. आणखी एक कत्तलखाना बांधणेबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

श्री. कचरु नवपुते : चिकलठाणा/मुकुंदवाडी येथुनही लोकांना कत्तलखान्यासाठी यावे लागते.

श्री. महादेव सुर्यवंशी : कत्तलखाना वेगळा न करता ज्या ठिकाणी बकरे कापतात त्याच ठिकाणी फिस आकारणी करावी.

मा. सभापती : याबाबत मा. आयुक्त यांनी शहानिशा करुन कार्यवाही करावी.

श्री. रशिद (मामु) : जनावरे कापण्यासाठी ज्या प्रमाणात कत्तलखाना फिस आकारली जाते त्याच प्रमाणात रस्त्यावर कोंबडे कापले जातात. त्यांचेवरही फिस आकारणी करावी.

मा. सभापती : ठिक आहे. याबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी प्रस्ताव मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या शहाबाजार येथील पशुवधगृहामध्ये लहान जनावरांकरिता प्रति जनावर रु. १/- ऐवजी प्रति जनावर रु. ४/- (चार रुपये मात्र) कत्तल फी दिनांक १,४,९७ पासुन आकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७४४/४ :**

महाराष्ट्र हौसिंग सोसायटी (गौरी शंकर कॉलनी) शहाबाजार औरंगाबाद येथील रेखांकनाच्या खुल्या जागे लगत असलेले भुखंड क्र. ८ व ९ चे क्षेत्र प्रत्येकी ३३.५७ चौ.मी. दलित स्मशानभुमीसाठी संपादन करणेसाठी स. नगरसेवकांनी विनंती केल्यानुसार सदर मिळकतधारकांशी संबंधीत नगरसेवक विरोधी पक्ष नेता. यांचे समवेत मा. आयुक्तांनी चर्चा व वाटाघाटी केली. हया वाटाघाटीमध्ये मिळकतधारकांने जागेचा दर भुखंड क्र. ८ चा दर रु. १०५/- प्रति चौरस फुटआणि भुखंड क्र. ९ चा दर रु. ९०/- प्रति चौरस दिल्यास जागा देण्यास तयारी दर्शविली आहे. सबब मोबदल्याची रक्कम दोन्ही भुखंडांची मिळुन रुपये. ७,०२,०००/- (रुपये सात लाख दोन हजार फक्त) निश्चित केली आहे. सदर रक्कम घेण्यास हितसंबंधीतांनी मान्य केले आहे. परंतु खरेदीखताचा खर्च रु. ९६,०००/- (रु. शहाण्णव हजार फक्त) येतो. मोबदल्याची रक्कम मिळकतधारक १) श्री. मिर गजनफर अली पिता मिर मुजफर अली २) श्री. अकबर खान पिता मोहमंद खॉन यांनी देणेत येईल. मिळकतधारकांचे मालकी हक्कांचे कागदपत्र तपासुन रक्कम अदा करणेत येईल.

सबब मोबदल्याची रक्कम रु. ७,०२,०००/- (रु. सात लाख दोन हजार फक्त) मिळकतधारकांस अदा करणेस्तव आणि खरेदीखत करुन घेणेसाठी रक्कम रु. ९६,०००/- अग्रीम म्हणुन श्री. डी.डी. काळेले. शाखा अभियंता यांना देणेस्तव प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र हौसिंग सोसायटी (गौरी शंकर कॉलनी) शहाबाजार औरंगाबाद येथील रेखांकनाच्या खुल्या जागेलगत असलेले भुखंड क्र. ८ व ९ चे क्षेत्र प्रत्येकी ३३.५७ चौ.मी. दलित स्मशानभुमीसाठी संपादन करण्यास तसेच वाटाघाटी अंती ठरल्याप्रमाणे भुखंड क्र. ८ रु. १०५/- प्रति चौरस फुट आणि भुखंड क्र. ९ रु. ९०/- प्रति चौरस फुट या दराने खरेदी करण्यास तसेच यासाठी येणाऱ्या र.रु. ७,०२,०००/- (रुपये सात लाख दोन हजार फक्त) च्या खर्चास सर्वानुमते मजुरी देण्यांत येते. सदर रक्कम मिळकतधारक १) श्री. मिर गजनफर अली पिता मिर मुजफर अली २) श्री. अकबर खान पिता मोहमंद खॉन यांनी देण्यात यावी. कागदपत्रे तपासुनच रक्कम अदा करावी. सदर रक्कम अग्रीम म्हणुन श्री.डी.डी. कळेले, शाखा अभियंता यांना देण्यांस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच ज्या प्रस्तावास याच सभेत् स्विकृती देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७४५/५ :**

उप-आयुक्त-२ यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गत सिध्दार्थ उद्यान येथे मत्सालय सुरु करण्यांत आले असुन सदर मत्सालयातील माशांची देखरेखी करिता वार्षिक ठेका मासिक पध्दतीने देण्या बद्दलचे वर्तमापत्राव्दारे निविदा मागविण्यात आली असता खालील प्रमाणे निविदा प्राप्त झालेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | फिश होम, औरंगाबाद | रु. २५,०००/- | प्रति महा. |
| २. | सागर फिशरिज इंटरप्रायजेस, | रु. २१,०००/- | --//-- |

वरील प्रमाणे दोन निविदा दि. १६-१-९७ ते १५-१-९८ या कालावधी करिता प्राप्त झाले असता सर्वात कमी दर सागर फिशरिज इंटर प्रायजेस यांना मा. आयुक्त यांनी चर्चेनंतर रु. १८,०००/- प्रतिमहा ठेका रक्कम मान्य केले आहे.

तरी मत्सालयाचा वार्षिक ठेका महानगरपालिकेच्या अटी व शर्ती यांचे अधिन राहुन दि. १६-१-९७ ते १५-१-९८ या कालावधीसाठी सागर फिशरिज इंटरप्रायजेस, औरंगाबाद यास रु. १८,०००/- प्रतिमहा ठेका रक्कम मंजुर करण्यास प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद**

मा. सभापती : या प्रस्तावात साफ सफाई मेटनन्स व माशा रिप्लेस ही संबंधीत एजन्सीज स्वतः करणार आहे. त्यामुळे प्रस्ताव मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका अंतर्गत सिध्दार्थ उद्यानातील मत्सालयातील माशांची देखरेख करण्याकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया कमी दराचे निविदा धारकांशी झालेल्या चर्चेअंती ठरल्यानुसार सदर कामाचा ठेका दि. १६-१-९७ ते १५-१-९८ या कालावधी करिता मे. सागर फिशरिज इंटरप्रायजेस, औरंगाबाद यांना प्रति महा रु. १८,०००/- रक्कमेस देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७४६/६ :**

मालमत्ता अधिकारी यांनी मा. आयुक्त यांच्या मंजुरी नुसार प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयाच्या परिसराचा इमारतीतील जागा युनायटेड वेस्टर्न बॅक यांना भाडयाने देण्यात आली आहे. तथापी सदरील जागा बॅकेस अपुरी पडत असल्याने

त्यांनी पत्र दिले आहे की, अपुरी पडत असल्यामुळे दक्षिणेकडील इमारतीतील जागा वाढवुन द्यावी. असे पत्र दिले आहे.

युनायटेड वेस्टर्न बॅक यांना मनपा तर्फे १०२२ स्कवे. फिट जागा दर महा ५५००/- प्रमाणे भाडयाने देण्यात आली आहे. तसेच बॅकेच्या दक्षिणेकडील जागा ज्याचे क्षेत्रफळ १०.५ मी. लांब व ४.५ मिटर रुंद (असे एकुण क्षेत्रफळ ४७.५ चौ.मी. जागा सहाय्यक संचालक नगररचना विभाग जे भाडे निश्चित करतील त्या दराने वरील जागा बॅकेस भाडयाने देण्या बाबत मा. स्थायी समिती समोर विचारार्थ सादर.

मा. सभापती : मंजुर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालय परिसराच्या इमारतीतील सध्याच्या युनायटेड वेस्टर्न बॅकेच्या दक्षिणे कडील १०.५ मी. लांब व ४.५ मिटर रुंद (एकुण क्षेत्रफळ ४७.५ चौ.मी.) ही जागा युनाटेड वेस्टर्न बॅकेस सहाय्यक संचालक, नगर रचना विभाग जे भाडे निश्चित करतील त्या दराने भाडयाने देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७४७/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, एकनाथनगर येथील क्रिडांगणांवर विद्युत पोल रोवुन त्यावर २५० वॅट सोडियम व्हेपर दिवे लावण्याचे कामासाठी अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्यांचे दरसुचीनुसार (सन ९६-९७) रु. १,१९,४०१/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन सदर कामाचे खर्चास "शहरात नविन पोल लावणे" या तरतुदीचे शिर्षातुन मा. आयुक्त यांचे मंजुरी मिळाली आहे.

तरी सदरील कामाचे रु. १,१९,४०१/- चे अंदाजपत्रक सन ९६-९७ वर्षातील शिर्षातुन खर्चास मंजुरी देण्याचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एकनाथनगर येथील क्रिडांगणावर विद्युत पोल रोवुन त्यावर २५० वॅटचे सोडियम व्हेपर दिवे लावण्याकरिता तयार करण्यांत आलेल्या रक्कम रु. १,१९,४०१/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरचा खर्च "शहरात नविन पोल लावणे" या शिर्षकातुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबर "जन गण मन" या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषीत केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा. सभापती स्थायी समिती,
महानगरपालिका, औंरगाबाद.

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**स्थायी समिती सभेचे इतिवृत्त**

**दि. २९-३-९७ रोजी स्थायी समिती सभेची सुरुवात "वदेमातरम्" या गिताने सुरुवात अंदाजे ३.४० वा. झाली. सभापती मा. गिरजाराम हाळनोर यांचे अध्यक्षतेखाली सभा संपन्न झाली. सभेस रजिस्टर प्रमाणे स.स. व अधिकारी उपस्थित होते.**

१) श्री. गौतम भागाजी खरात
२) सौ. रंजनी रमेश जोशी
३) श्री. भागवत कराड
४) श्री. कवरसिंग बैनाडे
५) कु. माया लाडवाणी
६) श्री. विजयकुमार मेहेर
७) श्री. महादेव सुर्यवंशी
८) श्री. हमीदउद्दीन ताबा
९) श्री. सुभाष टाकळकर
१०) श्री. त्रिबंक तुपे
११) श्री. अभिमन्यु भालेराव
१२) श्री. कचरु नवपुते
१३) श्री. विकास जैन
१४) श्री. भगवान घडामोडे
१५) श्री. रशिद खॉन (मामु)

श्री. अ. रशिद खॉन (मामु) : गेली दोन वर्षापासुन स्थायी समिती सदस्य म्हणुन जे सदस्य आहेत व आज या मधुन निवृत्त होत आहेत. त्यांचा स्थायी समिती मध्ये सत्कार करण्यांत यावा.

मा. सभापती : ठिक आहे.

श्री. महादेव सुर्यवंशी : गेल्या १० तारखेला कळसे या विषारी वायुमुळे एका इसमाचा मुत्यु झालेला होता. त्यामुळे येथील नागरीकांत घबराटीचे व नाराजी पसरलेली आहे. त्यांना मनपा तर्फे ना हरकत प्रमाणपत्र दिलेले असल्यास ताबडतोब रद्द करावे. कारण त्या कारखान्यातील पाणी बाहेर पडते सदरील पाणी विषारी युक्त असुन त्यांच्या रंगावरुन लगेच लक्षण येते की, या पाण्याचा रंग इतका गढुळ आणि वास येण्या सारखा असतो. त्यामुळे आजुबाजुच्या परिसरातील जे लोक राहतात. त्यांच्यावरही त्यामुळे वातावरणाने फरक जानवतो परिणामी रिॲक्शन होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

डॉ. मेहेर : गेल्या वर्षी सुध्दा मी अशीच प्रकारचा प्रश्न सभागृहात उपस्थित केला होता. एका कंपनीतुन विषारी वायु गळतीमुळे नागरीकांना त्रास होतो. त्यासाठी तेथील नागरिकांना बाहेर हलवावे अशी सुचना मी केलेली होती.

गौतम खरात : विषारी वायु गळतीने शहरात फारच मोठया प्रमाणात दुर्घटना घडत आहेत मागील वेळेसही शहागंज येथेही अशीच घटना घडली यासाठी मनपामार्फत अशा दुर्घटना बाबत एक समिती आरोग्य वै. अ. यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करुन कार्यवाही होणे आवश्यक आहे.

डॉ. कराड : वायु गळतीत मुत्यु झाल्याबाबत चौकशी करुन कार्यवाही व्हावी.

श्री. महादेव सुर्यवंशी : सदरील कारखान्यातल्या कामगाराचा मृत्यु झाला. त्यास कारणीभुत तेथील व्यवस्थापन असुन त्या ठिकाणी धुर बाहेर पडण्यासाठी चिवनी आहे. ती फार लहान आहे. तेथील धुरामुळे व पाण्यामुळे इतर आजुबाजुच्या नागरिकांना जास्त त्रास होतो. त्याच ठिकाणी शेजारी दालमिल आहे. तेथील दाळीचा रंग सुध्दा बदलेला दिसुन येतो. याची पडताळी करणे आवश्यक आहे. त्यामुळे बरेचसे कुटुंब उध्वस्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी संबंधीत कारखान्यावर कार्यवाही होणे गरजेचे आहे.

श्री. अभिमन्यु भालेराव : महाराष्ट्र डिस्ट्रीवरीज या कारखान्यामुळे शेजारी वस्तीत प्रदुषणाचा फारच मोठा त्रास सतत होत असतो. तेथील २००-२५० फुट लांब पाणी वाहत जाते. त्याचा रंग एकदम लाल रंगाचा असुन त्यामुळे पाणी झिरपुन पिण्याच्या पाण्याव्दारे लोकांना त्रास होतो. यासाठी संबंधीत कारखान्याबाबत आवश्यक ती कार्यवाही होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे पॉवरलुम कंपनीतील ड्रेनेज लाईन सुध्दा सुपुर्णपणे सोडलेली आहे. आणि त्यामुळे दुर्गधी सारखी सुरु असते. या दुर्गधीमुळे नागरिकांना सर्देव घाण वासामुळे आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. यासाठी संबंधीत कारखान्यावर कायदेशीर कार्यवाही व्हावी.

श्री. अ. रशिद खॉन (मामु) : कोणत्याही कारखान्याबाबत अगोदर अग्नीशामन विभागाची "ना हरकत" प्रमाणपत्र घेणे आवश्यक असते ते घेतलेले आहे काय याची पाहणी करावी.

डॉ. मेहेर डॉ. कराड : अशा काही कारखान्याबाबत सभागृहाने मागे ठराव घेतलेला होता त्याबाबत काय कार्यवाही केली व किती कारखाने ना हरकत प्रमाणपत्र घेऊन सुरु झाले याची माहिती द्यावी.

आरोग्य वै. अ. : आपण आपल्या मार्फत या कारखान्यास "ना हरकत प्रमाणपत्र" दिलेले नाही. एमआयडीसी आणि पोलुशन बोर्ड यांच्या कडुन लायसेंन्स घेतलेले आहे. ज्यावेळेस अशा प्रकारचे मनपाकडे एन ओसी. साठी घेऊन येतात. त्यापुर्वी आपला त्या भागाशी काही एक संबंध नसुन तो पुर्णत: एमआयडीसी व पोलूशन बोर्डाशी संबंधीत असल्याने तेच या बाबत निर्णय घेऊन कार्यवाही करतात. दरम्यान रेडियम कारखान्याला पोलुशन बोर्ड व पोलिस कार्यालयांनी सुध्दा बंद करण्याबाबत कार्यवाही केलेली आहे. त्यास मनपातर्फे कार्यवाही करण्या बाबतच्या सुचना दिलेल्या आहेत.

श्री. अ. रशिद खॉन (मामु) : शहरातील असे काही कारखाने आहेत की जे मनपाने अग्नीशामन विभागामार्फत (ना हरकत प्रमाणपत्र" घेऊन सुरु करावी व त्यास मनपानेच आवश्यक वाटलयास कार्यवाही करावी. व त्यांचेवर केसेस दाखल करावी. असे करावे.

आरोग्य वै. अ. : औद्योगिक परिसरातील कारखान्याला लायसेंस मनपातर्फे दिले जात नाही.

श्री. अ. रशिद खॉन (मामु) : आपलेकडे अन्न निरिक्षक हे पद आहे. या पदाचा मनपास काय उपयोग आहे ते कोणते दैनंदिन कामे करतात. त्यांनी अशा काही केसेस बाबत मनपाच्या निदर्शनास ही बाब लक्षात आणुन द्यावी जेणे करुन कार्यवाही करणे संयुक्तीक ठरेल.

श्री. मेहेर : आरोग्य विभागाने या बाबत आवश्यक ती कार्यवाही करणे आवश्यक आहे.

मा. सभापती : औद्योगिक परिसरातील कारखाने जरी मनपाच्या हद्दीत असले तरी त्यांना एमआयडीसी च्या मार्फत लयसेंस दिले जाते. परंतु अशा काही दुर्घटना घडतात. त्यावर मात्र नागरिकांना त्रास होतो. त्यामुळे मनपाने कार्यवाही करावी अशी माणी जोर धरु लागते. यासाठी पोलीस आयुक्त व पोलुशन बोर्ड यांचे पत्रान्वये कार्यवाही होणे आवश्यक असते.

श्री. गौतम खरात : नुकतेच बुक्क्लगुडा येथे एक व्यक्ती वायुगळतीने मृत्युमुखी पडलेली आहे. शहरात अशा प्रकारे अनेक घटना घडत आहेत मनपातर्फे वर्तमान पत्रात या बाबत जाहिर आवाहन करुन जनतेला पटवुन देणे आवश्यक आहे. की, सदरील कारखाना हा लोकवस्तीत न राहता शहराबाहेर असावयास हवा व त्या अटी आणि शर्ती शासनाने पाहुन लायसेंस दिलेले आहे. ते मनपातर्फे नाही जर मनपाने परवानगी दिलेली असल्यास मनपाने ताबडतोब कार्यवाही करणे यासाठी शहरातील एमआयडीसी कारखान्याची यादी मपनाने मागवुन स्थायी समिती समोर ठेवावी. जेणे करुन अशा प्रकारच्या विषारी वायुच्या मुळे ज्या कारखान्यांची लायसेंस किंवा परवानगी दिलेली असल्यास त्याबाबत मनपा आवश्यक ती कार्यवाही करेल.

मा. सभापती : मनपाच्या वार्ड निहाय ८२ स.स. आहेत. त्यांनी जर आपल्या वार्डातील अशा प्रकारे कारखाने मनपाच्या निदर्शनास आणुन दिले तर कार्यवाही करता येईल. व या बाबत नागरीकांनाही अपील करावे.

डॉ. महेर : नायट्रीक ॲसिड चा कारखाने भारतात कोठेही नसुन फक्त परदेशात आहेत. सदरील कारखाना या ठिकाणी कसा काम चालतो त्या बाबत कार्यवाही व्हावी.

श्री. हमिद ताबा : शहरात पॅच वर्कच्या बहुतेक माल येतो तो एका गाडीत किती टनाचा येतो याची माहिती द्यावी. आपल्याकडे दोन गाडया ३ टनाच्या आहेत. परंतु जकातीच्या पावत्या मात्र ५ टनाच्या फाडल्या जातात ते योग्य आहे काय याची माहिती द्यावी.

उप अ. यांत्रिकी : ५ क्यु.एम. एका गाडीत डांबर बसतो म्हणजे एका गाडीत ३ टन.

श्री. हमीद ताबा : पॅचवर्कचा एका गाडीत ३ टन बसतो परंतु ५ टनाची पावती जकात नाक्यावरुन फाडवी जाते ते योग्य नाही. याची चौकशी व्हावी.

मा. सभापती : या बाबत प्रशासनाने चौकशी करावी.

डॉ. मेहेर : नारेगांव येथील ट्रेचिंग ग्राऊंडवर दररोज दहा बारा ट्रक चा कचरा चोरीला जातो याची चौकशी व्हावी.

श्री. कचरु नवपुते : ट्रेचिंग येथील केरकचरा लिलावासाठी दोनदा काढलेला असुन त्या बाबत लवकरात लवकर कार्यवाही व्हावी.

उप आयुक्त-२ : संबंधीत बाबत दोनदा टेंडर कॉल केलेला असुन एका खाजगी व्यक्तीने सदरील बाबत पत्र दिलेले होते. त्यांनी ६५ प्रमाणे मागणी केलेली होती परंतु १.३५ प्रमाणे मा. आयुक्त यांनी देण्याबाबत सुचना केलेल्या आहेत.

डॉ. मेहेर : अंजली टॉकीजच्या पाठीमागे एक भुखंड आहे. त्यावर अतिक्रमण झालेले आहे. त्याबाबत काय कार्यवाही केली याची माहिती द्यावी.

मा. सभापती : प्रशासकीय आधिकारी यांनी माहिती द्यावी.

प्रशासकी अधिकारी : संबंधीत बाबतीत पोलिस बंदोबस्त साठी प्रशासनाने पत्र दिलेले आहे. पोलिस संरक्षण मिळाल्यानंतर आवश्यक ती कार्यवाही करण्यांत येईल व सध्या तरी तेथील बांधकाम बंद केले आहे.

मा. सभापती : प्रशासनाने कोणाचाही बाबतीत अनाधिकृत बांधकामे शहरात आढळल्यास त्यावर कार्यवाही करावी.

श्री. हमिद ताबा : मनपा टाऊन हॉल समोरिल इमारत तीन मजली आहे त्याबाबत नियमाप्रमाणे परवानगी घेऊन बांधकाम आहे काय? या बाबत मनपाने कार्यवाही करण्याचे सुचना केलेली होती. त्याबाबत काय झाले.

सहा. स.न. रचना : संबंधीत बाबत आपण सबडिव्हीजनची परवानगी दिलेली आहे.

श्री. हमीद ताबा : निरला बाजार येथील रस्त्यावर पुर्णपुणे अनाधिकृत बांधकाम झालेले आहे. त्याबाबत कार्यवाही करावी.

मा. सभापती : या बाबत चौकशी करुन कार्यवाही करावी.

सौ. रंजनी जोशी : रेल्वेस्टेशन येथील कर्मचाऱ्यांचे क्वॉर्टर कोणत्या वर्गासाठी आहे. वर्ग-१ वर्ग-२ वर्ग-३ साठी आहे याची माहिती द्यावी.

मा. सभापती : मालमत्ता अधिकारी यांनी माहिती द्यावी.

मालमत्ता अधिकारी : सदरील ठिकाणी अधिकारी वर्गाना क्वॉर्टर दिलेले होते परंतु विधी सल्लागार यांचे क्वार्टर रिकामे झाल्याने एका स्त्री शिक्षिकेला मा. आयुक्त यांच्या परवानगीने दिलेले आहे.

श्री. हमीद ताबा : एक स्त्री शिक्षिका कर्मचारी यांना पुर्वी दिलेले क्वॉर्टर एका वाहन चालकाने ताब्यात घेतल्याने सदरील क्वॉर्टर संबंधीत स्त्री शिक्षिकेला नियमाप्रमाणे दिलेले आहे.

सौ. जाशी : मला एवढेच सुचना करावयाची आहे की, मनपातील क्वॉर्टर स्त्री/पुरुष कर्मचारी/ अधिकारी कोणत्या वर्गातील असल्यास देता येते काय?

उप आयुक्त : रेल्वे स्टेशन येथील मनपा निवासस्थानी वर्ग-१ व वर्ग-२ चे कर्मचारी राहत होते. सदरील निवासस्थान रिकामे झाल्यान व कर्मचाऱ्यांचे मागणी नुसार सदरील निवास्थान अर्जाचे जेष्ठतेनुसार देण्यांत येते.

मा. सभापती : तत्कालीन आयुक्त यांनी काही शिक्षक संघटनेला त्यांच्या बैठकीत आश्वासन दिल्यानुसार मनपातील निवासस्थाने उपलब्धतेनुसार शिक्षकांनाही द्यावे असे ठरले होते. त्यानुसार शिक्षकांना प्राधान्य देवुन निवासस्थान देणे बाबत कार्यवाही करण्यांत आली.

श्री. महादेव सुर्यवंशी : मनपातर्फे विविध औषधे खरेदी करण्याचा प्रस्ताव मागील बैठकीत संमत करण्यात आला. परंतु आरोग्य वै.अ. यांनी मागील बैठकीत असे सांगितले की, मनपात कोणत्याही प्रकारचा औषधी गोळया उपलब्ध नसतात बी कॉम्पलेक्सच्या गोळया सुध्दा नाहीत जर औषधे पुरेसे आहेत. असे सांगतात तर आता दुकाने औषधी खरेदीचा प्रस्ताव का मांडला याचा अर्थ असा तर नाही ना खाजगी ठिकाणी औषधे विकल्या जातात. या बाबत चौकशी व्हावी.

सौ. रंजनी जोशी : मनपाचे अनेक ठिकाणी आरोग्य केंद्र आहेत. आणि त्या ठिकाणी गोरगरिबांना औषधोपचार केले जातात.

आरोग्य वै. अ. : मनपाच्या आरोग्य केंद्रात बी कॉम्लेक्स /बी कॅप्सुल गोळया अपुऱ्या आहेत आता नविन टेंडर काढलेले आहे. तेव्हा प्रस्ताव मंजुर झाल्यांनतर औषधी खरेदी करुन साठा पुरेसा उपलब्ध होईल.

श्री. महादेव सुर्यवंशी : माझ्या माहितीप्रमाणे बरीचशी औषधे मनपा आरोग्य केंद्राच्या ठिकाणी उपलब्ध नसतात. याची माहिती द्यावी.

मा. सभापती : आपल्याकडे कोणत्याही औषधाचया साठा कमी पडण्याची शक्यता असल्यास आरोग्य वै. अ. यांनी ताबडतोब कार्यवाही करावी.

श्री. कंवरसिंग बैनाडे : सिडको भागात पाण्याचा सतत त्रास होत आहे. नागरिकांना वेळेवर पाणी मिळत नाही. तेंव्हा तेथील संबंधीत अधिकारी श्री. कलीम अख्तर यांच्या निष्काळजी पणामुळे त्यांची त्या ठिकाणावरुन बदली करण्यात यावी.

सौ. रंजनी जोशी : धुळवडीच्या दिवशी सिडको भागात आरक्षण पाण्यावाचुन बऱ्याच भागात नागरिकांना पाण्या अभावे तोंड द्यावे लागेल याचा खुलासा व्हावा.

श्री. अ. रशिद खॉन : सध्या कर आकारणी, विभागात कोणत्याही अधिकाऱ्यांची नेमणुक नसल्याने लोकांची सारखी ओरड होत आहे तेव्हा करमुल्य निर्धारण अधिकारी या पदावर कलीम अख्तर यांची बदली करावी.

श्री. भगवान घडामाडे, सौ. रंजनी जोशी : उन्हाळा सुरु आहे. आणि सिडको भागात पाण्याचा त्रास सदैव असतो. सध्या पाणी पुरवठयावर नियंत्रण ठेवण्यांसाठी अनुभवी अधिकारी श्री. कलीम अख्तर आहेत. त्यांची सध्या कुठेही बदली करु नये वाटळयास उन्हाळा संपल्यानंतर करण्यास हरकत नाही.

श्री. महादेव सुर्यवंशी : सिडको भागात पापु-२ अधिकारी श्री. कलिम अख्तर यांचे काम समाधान कारक आहे. त्यामुळे त्यांची इतरत्र बदली करु नये.

श्री. अ. रशिद खॉन (मामु) : श्री. रामटेके व श्री. कलीम अख्तर हे दोन्हीही अधिकारी गेल्या काही वर्षापासुन सतत एकाच विभागात कार्यरत आहेत. त्यामुळे त्यांची तेथुन बदली करण्यांत यावी. व त्यांचा जागी दुसऱ्यांची नियुक्ती व्हावी.

श्री. महादेव सुर्यवंशी : पापु-२ या विभागात ज्यांना ३ वर्ष पुर्ण झालेले नाहीत त्याची बदली करु नये.

श्री. हमीद ताबा : करमुल्य निर्धारण अधिकारी-२ म्हणुन कोणतेही अधिकारी सध्या कार्यरत नाही.

उप आयुक्त-१ करमुल्य निर्धारण अधिकारी-२ म्हणुन सध्या श्री. कलीम अख्तर यांचे तुर्त कारभार पाहण्यासाठी दिलेला आहे.

श्री. कचरु नवपुते : बदल्या प्रकरणी स.स.नी प्रशासनात ढवळाढवळ करु नये. ही बाब पुर्वत प्रशासनाची आहे.

श्री. भगवान घडामोडे : सिडको पाणी पुरवठयाचा अभियंत्याबाबत उन्हाळा संपेपर्यंत बदली करु नये.

मा. सभापती : स.स.च्या भावना लक्षात घेता सिडको पाणी पुरवठा-२ येथील संबंधीत अधिकाऱ्यांची इतरत्र बदली न करता त्यांनाच त्या ठिकाणी कायम ठेवावे.

उप आयुक्त-१ पुर्वीचे करमुल्यनिर्धारण अधिकारी श्री. पवार गेली १ १/२ महिन्यापासुन रजेवर आहेत. श्री. रामटेके यांना अति. कारभार पाहणेबाबत आदेश काढण्यांत आलेला होता. आणि नंतर श्री. कलीम अख्तर यांचेकडे अती. कार्यभार सोपविण्यात आलेला आहे.

श्री. हमीद ताबा : लेखाधिकारी-२ यांची जकात विभागात बदली केलेली आहे का?

उप आयुक्त-१ : लेखा विभागाची पाहणी करण्यासाठी त्यांना सुचना केलेल्या आहेत.

मा. सभापती : प्रशासनाला अनेक वेळा स्थायी समितीने आदेश देवुनही कोणतेही कार्यवाही केलेली दिसत नाही. प्रशासनातील काही पदे आर.आर. प्रमाणे भरावयाची स्थायी समितीने सुचना दिलेल्या होत्या त्यानुसार भरलेल्या नाहीत. त्यामुळे प्रशासनाचा स्थायी समिती सभेत निषेध करीत आहेत.

२) वर्ग-१ व २ यांचे शासन निर्णय प्रमाणे त्यांना वेतन श्रेणी लागु करणे बाबतची कार्यवाही प्रशासनाने केलेली नाही. त्यामुळे स्थायी समिती प्रशासनाचा निषेध फक्त करते.

श्री. कचरु नवपुते : नेहरु रोजगार योजनेची सबसिडी सर्व बॅकांना आलेली नाहीत याची माहिती द्यावी.

श्री. भगवान घडामोडे : मागील बैठकीत "डासांचा पंधरवडा" निर्मुलन सप्ताह सुरु करणे बाबत निर्णय झालेला होता. त्याबाबत प्रशासनाने काय कार्यवाही केली याची माहिती द्यावी.

आरोग्य वै. अ. : डांस निर्मुलन पंधरवडा सप्ताह प्रशासनाने सुरु केलेला आहे. आपण घरोघरी जाऊन नोवॉन फवारनी करीत आहोत.

मा. सभापती : वर्तमान पत्रात जाहिर आवाहन करावे.

श्री. भगवान घडामोडे : डासांचा प्रादुर्भाव फारच मोठया प्रमाणात झालेला असुन एक महिन्या भरात डांस निर्मुलन साठी उपाय करुनही संपणार नाही. अशी स्थिती आज झालेली आहे. या बाबत योग्य ती कार्यवाही व्हावी.

आरोग्य वै. अ. : एकुण २२० कर्मचारी यांनी नविन पदे निर्माण करणे बाबत मागणी प्रस्तावात केलेली आहे. शासनाकडुन सदरील पदे मंजुरी होणे आवश्यक आहे.

डॉ. मेहेर : दै. वेतनावर कर्मचारी घेऊन आवश्यक ती कार्यवाही करावी.

मा. सभापती : स.स.च्या भावना लक्षात घेता शहरात फार मोठया प्रमाणात डास आहेत. त्याचे निर्मुलन होणेसाठी आवश्यक ती उपाययोजना होणे आवश्यक आहे. या बाबत आरोग्य वै. अ. यांनी तातडीने कार्यवाही करावी.

आरोग्य वै. अ. : मनपामध्ये जिवशास्त्र हे एक पद रिक्त आहे ते जर पद भरणा केल्यास मलेरिया कर्मचाऱ्यांवर त्यांचे नियंत्रण राहते. व त्यांच्या अधिशता खाली बराचसा कर्मचारी वर्ग असते सदरील पद हे शासन प्रतिनियुक्तीने भरावे लागते या बाबत शासनाकडुन पद मिळत नाही. तोपर्यंत पुर्वी काम करीत असणारे श्री. सुभेदार यांना पाचारण करावे.

श्री. अ. रशिद खॉन (मामु), श्री. गौतम खरात : शासनाकडुन जर प्रतिनियुक्तीने अधिकारी येत नसल्यास मनपातर्फे कर्मचाऱ्यामधुन सदरचे पद भरण्यात यावे.

श्री. महादेव सुर्यवंशी : मलेरिया विभागामार्फत फॉगिंग मशीनने दोन शिफ्ट मध्ये कामाला लावावे.

आरोग्य वै. अ. : जीवशास्त्रज्ञ हे पद मलेरिया संबंधीत डासांचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी त्याचे नियंत्रणाखाली कार्यवाही होत असते.

डॉ. मेहेर : सिडको हस्तांतर मनपाकडे होण्यापुर्वी सिडकोतील स.स. यांचेशी चर्चा केल्याशिवाय निर्णय घेण्यात येऊ नयेत.

डॉ. कराड : क्रांती चौक येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळया भोवती लाईटची व्यवस्था होणे बाबत काय कार्यवाही केली.

उप अ. विद्युत : सदरील बाबत पंधरा दिवसात काम पुर्ण करण्यांत येईल.

श्री. भगवान घडमोडे : जालना रोडवरील लाईटचे काम करुनही स्ट्रिट लाईटचे बिल जादा दिलेले आहे.

उप अ. विद्युत : डोअर लॉक असल्यामुळे जालना रोड वरील स्ट्रीट लाईटचे बिल दिलेले आहे.

श्री. अ. रशिद खॉन : शहरातील बरेचसे लाईट अनेक ठिकाणी बंद स्थितीत आहेत. याची पाहणी दररोज करणे आवश्यक असते. परंतु तसे काहीही होत नाही. मागे असा निर्णय घेतलेला होता की, प्रत्येक लाईनमन दुपारी ४.०० नंतर संबंधीत वार्डातील साईटवर हजर असणे आवश्यक आहे. परंतु तसे काही दिसुन येत नाही. शिवाय वार्डातील एका ठिकाणी रजिस्टर ठेवुन नोंद घेणे आवश्यक असते. आणि काम केल्याचे स.स. ना सुचना देणे आवश्यक असते. परंतु तसे कुणीही लाईनमन तसे करतांना दिसुन येत नाही.

उप अ. विद्युत : अति शहर अभियंता यांचेकडे कामाचे रजिस्टर ठेवलेले आहे.

श्री. भगवान घडामोडे माझ्या माहितीप्रमाणे विद्युत विभागाचे वाहन चालक यांचेवर संबंधीत उप अभियंताचे कंट्रोल नाही.

श्री. गौतम खरात : आपल्याकडे विद्युत मेंटेनन्स मटेरियल उपलब्ध नाहीत या बाबत कार्यवाही करावी.

मा. सभापती : आता चर्चा भरपुर झालेली आहे. विषय क्र. १ सुरुवात करावे.

**विषय क्र. ७४८/१ :**

दि. १४-३/१९९७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

संवाद

श्री. अ. रशिद खॉन (मामु) : मटन कत्तल फिस रु.४/- प्रति जनावर दि. १-४-९७ पासुन आकरणे बाबत प्रस्ताव मागील इतिवृत्त विषय क्र. ७४३/३ पृष्ठ क्र. २५ मध्ये केलेला आहे. त्याऐवजी रु. २/- कत्तल फिस आकरणी करावी.

मा. सभापती : सर्वानुमते ठरवावे.

श्री. हमिद ताबा : बऱ्याच दुरुवरुन भागातील लोक कत्तलीसाठी जनावरे घेऊन त्यामुळे रु ४/- ऐवजी रु. २/- फिस आकरणी करावी.

डॉ. महेर व डॉ. कराड श्री. अ. रशिद खॉन (मामु), श्री. त्रिबंक तुपे : रु. ४/- कत्तल फिस ऐवजी रु. ३/- आकरणी करावी. रु. २/- कत्तल फिस आकरणी करावी अशी आमची विनंती आहे.

मा. सभापती : ठिक आहे. स.स. च्या विनंती व सभागृहाच्या भावना लक्षात घेता रु. ३/- ऐवजी रु. २/- कत्तल फिस आकरणी १ एप्रिल ९७ पासुन अंमलात आणावे अशी दरुस्ती करण्यांत येते.

ठराव :

१) प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विषय क्र. ७४३/३ पृष्ठ क्र. २५ मधील ठराव संमत झालेला आहे. त्यात कत्तल फिस रु. ४/- ऐवजी २/- दि. १ एप्रिल ९७ पासुन करण्याची दुरुस्ती करण्यांत येते.

२) विषय क्र. ७४७/१ सदरील प्रस्तावामध्ये डॉ. आंबेडकर जंयती निमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रम होतात. त्यामुळे संबंधीत वार्डाच्या नगरसेवकाच्या मागणीनुसार सदरील काम उपलब्ध गुत्तेदाराकडुन करुन घेण्यांत यावे.

३) विषय क्र. ७३८/१३ सदर कामाकरिता बंधपत्रावर गुत्तेदाराकडुन लिहुन घ्यावे, की मुदतीच्या आता काम करुन देईल व कामाचा दर्जा चांगला ठेवण्यात येईल. करिता जयभिमनगर घाटी स्लम येथील ३०० मी.मी. व्यासाची अर्धगोलाकार गटार बांधण्याचे कामास मंजुरी देण्यांत येते.

या व इतर दुरुस्तीसह दि. १४-३-९७ च्या इतिवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७४९/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. मुकुंदवाडी (गांव) येथिल मस्जीर जवळील खांडकी दुरुस्ती करणे व नविन खांडकी रस्ते तयार करणे कामाकरिता र.रु. २,०१,०००/- चे अंदाजपत्रक सा.बां. विभाग औरंगाबाद यांची दरसुची ९६-९७ अनुसार तयार करण्यात आले असुन मा. आयुक्तांनी दि. ६-३-९७ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदर काम सन ९६-९७ सालच्या १८ खेडी विकास योजना कार्याक्रम अंतर्गत करण्याचे प्रस्तावित आहे. करिता मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुकुंदवाडी (गांव) येथिल मस्जीर जवळील खांडकी दुरुस्ती करणे व नविन खांडकी रस्ते तयार करणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु. २,०१,०००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च ९६-९७ सालच्या १८ खेडी विकास योजना कार्यक्रम अंतर्गत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७५०/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. शहाबाजार स्लम येथे दगडी गटार बांधणे कामाबाबत सा.बां. खाते दरसुची वर्ष ९५-९६ नुसार ८,९२,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम म्हाडा ९६-९७ च्या रु. ७९.०० लाखाच्या तरतुदी मधुन करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. १४-२-९७ रोजी मान्यता दिली आहे. प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आले असता अंतिम तारखे पर्यंत एकुण ८ (आठ) निविदा विक्री झाल्या व स्विकारणेचे अंतिम तारखे पर्यंत एकुण ३ (तीन) निविदा प्राप्त झाल्या व दि. २७-२-९७ रोजी उपस्थित गुत्तेदारा समक्ष उघडण्यात आल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | बसरा कन्स्ट्रक्शन | ८.१% | कमी |
| २. | शे. एम. फारुकी | ५% | जास्त |
| ३. | शे. शरीफ | ४% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वा कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराची निविदा श्री. बसरा कस्ट्रक्शन यांची आहेत तरी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराची असलेली निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहाबाजार स्लम येथे दगडी गटार बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराची मे. बसरा कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७५१/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. घाटी जयभिमनगर स्लम येथे २५० मी.मी. व्यासाची जलनि:सारण वाहिनी टाकणे बाबत कामाकरिता सा.बां. यांच्या वर्ष ९६-९७ दरसुचीनुसार रु. ८,१९,३००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम "म्हाडा फंड" या शिर्षातुन करण्यांत येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. १७-१२-९७ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे. तसेच सर्वसाधारण सभेत दि. १९-२-९७ रोजी मंजुरी मिळालेली आहे.

प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता अंतिम तारखेपर्यंत एकुण सहा निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या. व उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | औरंगाबाद कन्स्ट्रक्शन | १% | कमी |
| २. | श्री. कुलवंतसिंग | ५% | जास्त |
| ३. | श्री. सलीम पटेल | ७% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया कमी असलेला श्री. औरंगाबाद कंन्स्ट्रक्शन यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराची निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे घाटी जयभिमनगर स्लम येथे २५० मी.मी. व्यासाची जलनि:सारण वाहिनी टाकणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराची औरंगाबाद कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७५२/५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. भिमनगर भावसिंगपुरा स्लम येथे शहाबाद फरशी बसविणे बाबत कामाकरिता सा.बां. खाते यांच्या वर्ष ९५-९६ दरसुची नुसार रु. ३,८३,६९८/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम "म्हाडा फंड" या शिर्षकातुन करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. १४-२-९७ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

प्रस्तवित कामासाठी निविदा मागविण्यात आले असता अंतिम तारखेपर्यंत एकुण नऊ (९) निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखे पर्यंत एकुण पाच (५) निविदा प्राप्त झाल्या व उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. विपुल कंन्स्ट्रक्शन | २५% | कमी |
| २. | श्री. डी.के. कंन्स्ट्रक्शन | २४.१७% | कमी |
| ३. | श्री. सरोदे एस.पी. | २४.१% | --//-- |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | श्री. मोडके व्ही.एस. | २२.९९% | --//-- |
| ५. | श्री. कुलवंतसिंग | ५.८६% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५% कमी दराची असलेला श्री. विपुल कंन्स्ट्रक्शन यांची निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे भिमनगर भावसिंगपुरा स्लम येथे शहाबाद फरशी बसविणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २५% कमी दराची मे. विपुल कंन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ७५३/६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. पडेगांव (स्लम) येथे गटार बांधणे खडी रस्ता तयार करणेच्या कामासाठी सा.बां. विभाग दरसुची सन ९६-९७ नुसार रु. ४,५७,७७६/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम "म्हाडा फंड" ९६-९७ तरतुद ७९ लाख मधुन घेण्यात येत आहे. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. १४-२-९७ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

प्रस्तावित कामासाठी एकुण १० विकल्या गेल्या व स्विकारणेचे अंतिम तारखपर्यंत एकुण ६ निविदा प्राप्त झाल्या व दि. रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. डी.के. कंन्स्ट्रक्शन | ३१.२२% | कमी |
| २. | श्री. डी.सी. पंजाबी | २४.९% | --//-- |
| ३. | श्री. अन्सारी कंन्स्ट्रक्शन | २३.१०% | --//-- |
| ४. | श्री. ट्री.स्टार कन्स्ट्रक्शन | २२.६% | --//-- |
| ५. | श्री. हुसैन अली | १७.८६% | --//-- |
| ६. | श्री. एस.एम. मंडोरे | ६.३५ | --//-- |

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३१.२२% कमी दराची निविदा श्री. डी.के. कंन्स्ट्रक्शन यांची आहे. तरी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३१.२२% कमी दराची निविदा असलेली श्री. डी.के. कंन्स्ट्रक्शन यांच्या निविदेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पडेगांव (स्लम) येथे गटार बांधणे खडी रस्ता तयार करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ३१.२२% कमी दराची श्री. डी.के. कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरीइ देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७५४/७ :**

मो. नागसेननगर स्लम भागात अर्धगोलाकार गटार बांधकाम करणे (भाग-२) करिता र.रु. १९,४०,२००/- अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असुन मा. आयुक्तांनी दि. २७-२-९७ रोजी प्रशासकीय मान्यता दिली असुन रितसर वृत्तपत्रात प्रसिध्दी देऊन कार्यालयाची निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि./१२ दि. १३-२-९७ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा

विक्रीच्या अंतिम दि. २०-२-९७ पर्यंत पाच निविदा विकल्या गेल्या व स्विकारणेच्या अंतिम दि. फक्त तीन निविदा प्राप्त झाल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. बी.आर. फुलारे | -- | अं.प. दराने |
| २. | श्री. मे. एलोरा कंन्स्ट्रक्शन | १०% | अं.प. दरापेक्षा जास्त |
| ३. | श्री. सलीम पटेल | १०.१०% | --//-- |

त्या निविदा दि. २७-२-९७ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आल्या असता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा म्हणजे अंदाजपत्रकीय दराची निविदा श्री. बी.आर. फुलारे यांची अं.प. दराची निविदा मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

सदर काम म्हाडा अनुदान मधुन करण्याच्या प्रस्तावित आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. नागसेननगर स्लम भागात अर्धगोलाकार गटार बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अं.प. फुलारे यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७५५/८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. इंदिरानगर बायजीपुरा स्लम येथे अर्धागोलाकार गटार बांधणे व खडी रस्ते तयार करणे बाबत कामाकरिता सा.बां. खाते यांच्या वर्ष ९५-९६ च्या दरसुचीनुसार रु. १,७०,८०३/- चे अं.प. तयार करण्यात आल आहे. सदरील काम "म्हाडा फंड" या शिर्षकातुन करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. १४-२-९७ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आले असता अंतिम तारखेपर्यंत एकुण सहा निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारण्याच्या या अंतिम तारखेपर्यंत एकुण एक निविदा प्राप्त झाली व उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आले.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. जी.आर. घोडेले | १.१४% | कमी |

करिता अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.१४% कमी दराची असलेली श्री. जी.आर. घोडेले यांची निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे इंदिरानगर बायजीपुरा स्लम येथे अर्धागोलाकार गटार बांधणे व खडी रस्ते तयार करणेच्या कामाकरिता प्राप्त झालेली श्री. जी.आर. घोडेले यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.१४% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७५६/९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. संजयनगर (स्लम) येथे अर्धगोलाकार गटार बांधणे व शहाबादी फरशी बसविणेचे कामासाठी सा.बां. दरसुची सन ९५-९६ नुसार रु. ५,८७,१७२/- चे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदरील काम म्हाडा फंड सन ९६-९७ रु. ७९ लाखातुन करावयाचे आहे. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी दि. १४-२-९७ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे. प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आले असता अंतिम तारखे पर्यंत एकुण ८ निविदा विकल्या गेल्या व स्विकारणेचे अंतिम तारखेपर्यंत सात निविदा प्राप्त झाल्या व दि. २७-२-९७ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. डी.सी. पंजाबी | २७.३% | कमी |
| २. | श्री. औरंगाबाद कंन्स्ट्रक्शन | २७.०७७% | कमी |
| ३. | श्री. ट्री.स्टार कंन्स्ट्रक्शन | २६.६०% | --//-- |
| ४. | श्री. आर.एस. भाटीया | २४.५% | --//-- |
| ५. | श्री. एलोरा कन्स्ट्रक्शन | २१.९९९% | --//-- |
| ६. | श्री. सय्यद रफीयोद्दीन | १९.१९% | --//-- |
| ७. | श्री. जी.आर. घोडेले | १४.००% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.३% कमी दराची श्री. डी.सी. पंजाबी यांची आहे. तरी अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.३% कमी दराची असेलेली श्री. डी.सी. पंजाबी यांची निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संजयनगर स्लम येथे अर्धगोलाकार गटार बांधणे व शहाबादी फरशी बसविणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा २७.३% कमी दराची श्री. डी.सी. पंजाबी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *पुरवणी विषय*

**विषय क्र. ७५७/१० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. शाहुनगर (बन्सीलालनगर) परिसर येथील मनपाच्या खुल्या जागेत उद्यान विकसीत करणे बाबत सा.बां. खात्याचे सन ९६-९७ च्या दरसुचीन्वये र.रु. ४,६८,२००/- चे तयार करण्यांत आले त्यास मा. आयुक्तांनी मंजुरी दिली. परंतु सदर काम सन ९६-९७ या आर्थिक वर्षात हाती घेण्यांत यावे सदर कामाचे खर्च नविन उद्यान या तरतुदीतुन करण्यांत येणार आहे.

करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शाहुनगर (बन्सीलालनगर) परिसर येथील मनपाच्या खुल्या जागेत उद्यान विकसीत करणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या र.रु. ४,६८,२००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च ९६-९७ या आर्थिक वर्षात नविन उद्याने या तरतुदीतुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७५८/११ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. बन्सीलालनगर मधील जागृती प्रा. शाळेच्या मनपाच्या खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे व खेळणी बसविणे बाबत कामाचे अंदाजपत्रक सा.बां. खात्याचे सन ९५-९६ च्या दरसुची अन्वये रक्कम रुपये १,५७,७००/- चे तयार करण्यांत आले. त्या मा. आयुक्तांनी मंजुरी दिली आहे. परंतु सदर काम सन ९७-९८ च्या आर्थिक वर्षात काम हाती घेण्यात येईल.

सदर कामाचे खर्च नविन उद्याने या तरतुदीतुन करण्यांत येईल. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बन्सीलालनगर मधील जागृती प्रा. शाळेच्या मनपाच्या खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे व खेळणी बसविणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु. १,५७,७००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च नविन उद्याने या तरतुदीतुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७५९/१२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. पगारिया कॉलनी (बन्सीलालनगर परिसर) येथील मनपाच्या खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधुन जागा विकसीत करणे बाबतचे अंदाजपत्रक सा.बां. खात्याचे सन ९६-९७ च्या दरसुची अन्वये र.रु. १,२९,८००/- चे तयार करण्यांत आले. त्यास मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे. परंतु सदर काम सन ९७-९८ या आार्थिक वर्षात हाती घेण्यांत येईल.

सदर कामाचे खर्च नविन उद्याने या तरतुद मधुन करण्यांत येईल. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पगारिया कॉलनी (बन्सीलालनगर परिसर) येथील मनपाच्या खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधुन जागा विकसीत करणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु. १,२९,८००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदर खर्च नविन उद्याने या तरतुदीमधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७६०/१३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. रमानगर स्मशानीभुमीची पुर्वेकडील बाजुची उर्वरित भिंतीचे बांधकाम, भिंतीची उंची वाढविणे तसेच अंतर्गत मुरमाचे रस्ते तयार करणे व अंतर्गत कामे करण्याचे अंदाजपत्रक सन ९५-९६ च्या सा.बां. खात्याचे दरसुची अन्वये र.रु. २,४४,८००/- चे तयार करण्यांत आले. रमानगर येथील स्मशान भूमी आदर्श बनविण्याच्या दृष्टीने त्यास मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे.

सदर कामाचा खर्च स्मशान भुमी या तुरतुदीमधुन करण्यांत येईल. करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रमानगर स्मशानीभुमीची पुर्वेकडील बाजुची उर्वरित भिंत बांधकाम, भिंतीची उंची वाढविणे तसेच अंतर्गत मुरमाचे रस्ते तयार करणेच्या कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या र.रु. २,४४,८००/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील खर्च स्मशान भुमी या तरतुदी मधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७६१/१४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. किराडपुरा स्लम येथे शहाबादी फरशी बसविणे बाबत कामाकरिता सा.बां. खाते वर्ष ९५-९६ च्या दरसुचीनुसार रु.

१५,३८,६६०/- चे अं.प. तयार करण्यांत आले सदरील काम "म्हाडा फंड" या शिर्षातुन करण्यांत येईल सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दि. १४-२-९७ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे.

प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आले असता अंतिम तारखेपर्यंत एकुण सहा निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या व उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सुपर कंन्स्ट्रक्शन | २१.००२% | कमी |
| २. | एलोरा कंन्स्ट्रक्शन | १२.७८६% | --//-- |
| ३. | श्री. शेख सलाम | १२.१३% | --//-- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.००२% कमी दराची असलेली सुपर कंन्स्ट्रक्शन ॲन्ड मेंटनस यांची निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे किराडपुरा स्लम येथे शहाबादी फरशी बसविणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा २१.००२% कमी दराची मे. सुपर कंन्स्ट्रक्शन ॲन्ड मेटेन्नस यांची निविदा स्विकारणेस मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७६२/१५ :**

मो. हमालवाडी स्लम भागात अर्धगोलाकार गटार बांधकाम करणे (भाग-२) करिता र.रु. ९,७२,६३२/- चे अं.प. सा.बां. यांची दरसुचीनुसार तयार करण्यांत आले असुन मा. आयुक्तांनी दि. २७-२-९७ रोजी प्रशासकीय मान्यता दिली सदरील काम म्हाडा अनुदानतुन करण्यांस प्रस्तावित आहे. सदर कामाची प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर कार्यालयाची प्रगट निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/नि:१२ दि. १३-२-९७ वृत्तपत्रात प्रसिध्द करुन निविदा मागविण्यांत आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम दि. २०-२-९७ पर्यंत एकुण १५ कोऱ्या निविदा विकल्या गेल्या. स्विकारण्यांच्या अंतिम दि. फक्त ३(तीन) मोहबंद निविदा प्राप्त झाल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. निसार अहमद | ०.०५% | कमी दराने |
| २. | श्री. एस.एम. मंडोरे | ३.००% | जास्त दराने |
| ३. | श्री. जी.आर. घोडेगे | ७.००% | --//-- |

त्या निविदा दि. २७-२-९७ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आल्या असता तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी दराची निविदा श्री. निसार अहमद यांची निविदा ०.०५% कमी दराची आहे.

करिता श्री. निसार अहमद यांची ०.०५% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराची निविदा मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हमालवाडी स्लम भागात अर्धगोलाकार गटार बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा ०.०५% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७६३/१६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. गांधीनगर स्लम येथील नाल्याची उंची वाढविणे या कामाकरिता सा.बा. वि भा दरसुची ९५-९६ नुसार र.रु. ६,१६,८५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील काम म्हाडाकडे फंड सन ९६-९७ तरतुद ७९.०० लाखातुन घेण्याचे आहे. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दि. १४-२-९७ रोजी मान्यता दिली आहे. तसे सर्वसाधारण सभेचाही मंजुरी प्राप्त आहे. प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यांत आल्या असता अंतिम तारखेपर्यंत एकुण ५ निविदा विकल्या गेल्या व स्विकारणेचे अंतिम तारखेपर्यंत एक निविदा प्राप्त झाली व दि. २७-२-९७ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यांत आल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. कुलवंतसिंग | १०.८६% | कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०.८६% कमी दराची निविदा श्री. कुलवंतसिंग यांची आहे. तरी अ.प. दरापेक्षा १०.८६% कमी दराची श्री. कुलवंतसिंग यांच्या निविदेस मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. गांधीनगर स्लम येथील नाल्याची उंची वाढविणेच्या कामाकरिता प्राप्त झालेली श्री. कुलवंतसिंग यांची अं.प. दरापेक्षा १०.८६% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७६४/१७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. घाटी जयभिमनगर स्लम गुलाबवाडी परिसरात आदर्श झोपडपट्टी योजने अंतर्गत दर्शनी विटांची भिंत बांधणे बाबत कामाकरिता सा.बां. खाते ९५-९६ च्या दरसुचीनुसार रु. ३०,६१,३५१/- चे अं.प. कास मा. आयुक्तांनी दि. २८-१-९७ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदर काम "आदर्श झोपडपट्टी" या शिर्षकांतुन करण्यांत येईल.

प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता अंतिम तारखेपर्यंत एकुण पाच निविदा विक्री झाल्या व स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण चार निविदा प्राप्त झाल्या व उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | एलोरा कंन्स्ट्रक्शन | ११.९% | जास्त |
| २. | श्री. कुलवंतसिंग | १५% | जास्त |
| ३. | श्री. जी.आर.घोडेले | १५% | जास्त |
| ४. | श्री. खर्डीकर कंन्स्ट्रक्शन | १७% | जास्त |

तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी म्हणजेच अं.प. दरापेक्षा ११.९% जास्त दराची श्री. एलोरा कन्स्ट्रक्शन यांची निविदा आहे. परंतु सदर दर कार्यालयास जास्त वाटल्यांने ठेकेदास दराच्या वाटाघाटीस बोलावले असता मा. आयुक्तांच्या दालनात दि. १०-३-९७ रोजी ठेकेदाराने हे काम अंदाजपत्रकीय दराने करण्यास लेखी संमती दिली आहे.

तरी अं.प. दराची श्री. एलोरा कन्स्ट्रक्शन यांची निविदा मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो. घाटी जयभिमनगर स्लम गुलाबवाडी परिसरात आदर्श झोपडपट्टी योजने अंतर्गत दर्शनी विटांची भिंत बांधणेच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या

निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री. एलोरा कंन्स्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार सदर काम त्याचेकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. तसेच या ठरावास याच सभेत स्विकृती देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७६५/१८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. घाटी जयभिमनगर स्लम जुनी खांडकी दुरुस्ती करणे व नविन खांडकी बसविणे बाबत कामाकरिता सा.बां. खाते ९५-९६ च्या दरसुचीनुसार रु. ६,१४,२५३/- चे अं.प. तयार करण्यांत आले आहे. सदरील काम "खुलया गटारी बांधणे" या शिर्षातुन करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दि. ८-८-९६ ला प्रशासकीय मान्यता दिली आहे. तसेच सर्वसाधारण सभेत दि. १९-१०-९६ रोजी विषय क्रं. ६ नुसार मंजुरी मिळालेली आहे.

प्रस्तावित कामासाठी निविदा मागविण्यात आली असता अंतिम तारखपर्यंत एकुण बारा निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारण्यांच्या तारखेला तीन निविदा प्राप्त झाल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. सिद्यीकी एस.झेड | ३३% | कमी |
| २. | श्री. डी.सी. पंजाबी | २६.३% | कमी |
| ३. | श्री. खर्डीकर कन्स्ट्रक्शन | १७.८६% | --//-- |

